# वारकरी भजन संग्रह

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २५३२



## संपादक - ह.भ.प. प्रा. शं. वा. दाण्डेकर

REFBK-0024719



काव्य संदर्भ काव्य
२५३२
२४७१९
२३।१०।८५

# वारकरी भजनसंग्रह

REFBK-0024719

REFBK-0024719

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५३२
अ. क्र. २४७१९
काव्य २३।१०।८५
ग्रंथ शाखा

# पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥ १ ॥
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ॥ २ ॥
दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥ ३ ॥
वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळीं । भेटतु भूतां ॥ ४ ॥
चलां कल्पतरूंचे आरव । चेतनाचिंतामणीचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥ ५ ॥
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ ६ ॥
किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ॥ ७ ॥
आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्टविजयें होआवे जी ॥ ८ ॥
येथ म्हणे विश्वेशरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ॥ ९ ॥

# वारकरी भजनसंग्रह

संपादक

वै. ह. भ. प. प्रा. शं. वा. दांडेकर, एम. ए.

प्राचार्य दांडेकर धार्मिक शैक्षणिक व सांस्कृतिक
वाङ्मय प्रकाशन मंडळ

प्रकाशक : **अनंत अंबादास कुलकर्णी**
**चिटणीस**, प्रा. दांडेकर धार्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक
वाङ्मय प्रकाशन मंडळ,
द्वारा कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
**विजयानगर**, पुणे ३०.

मुखपृष्ठ : नंदू नार्वेकर

(सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन)

पहिली आवृत्ती : १९५५

नववी आवृत्ती : १९८०
दहावी आवृत्ती : १९८५

**किमत दहा रुपये**

प्रतिरूप मुद्रण :
**संगम प्रेस प्रा. लि., १७ ब, कोथरूड,**
**पुणे ४११ ०२९.**

# प्रथम आवृत्तीची प्रस्तावना ...

आमच्या प्रकाशनमंडळातर्फे 'वारकरी भजनसंग्रह' हें पुस्तक आज प्रसिद्ध होत आहे ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. या वर्षीच श्रीज्ञानेश्वर-महाराज व श्रीएकनाथमहाराज या संतश्रेष्ठांचे सार्थ हरिपाठ मंडळानें प्रसिद्ध केले आहेत व त्यानंतर लगेच हा भजनसंग्रह प्रसिद्ध करण्याचा सुयोग आला आहे.

या भजनसंग्रहांत वारकरी संतांच्या अमर वाणींतून जे अभंग निघाले त्यांपैकीं नित्य पाठांतील एकूण जे अभंग आहेत, ते निवडून घेतले आहेत. श्रीज्ञानेश्वरमहाराजादी संत म्हणजे परमेश्वरानें प्रसन्न होऊन महाराष्ट्रास दिलेली एक अमूल्य अशा नवरत्नांची देणगी आहे. या संतांनीं देव आपलासा करून घेतला; इतकेंच नव्हे तर देवाच्या भेटींत त्यांना जें महासुख प्राप्त झालें तें इतर लोकांनाहि चाखांवयास मिळावें म्हणून त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. 'सेवितो हा रस वाटितो आणिकां' असे म्हणत ते घराबाहेर पडले. लोकांच्या घरी जाऊन देव घ्या कोणी देव घ्या कोणी' असे म्हणत त्यांनी त्यांना बोलाविलें; पण ते त्यांना झोंपलेले आढळून आले. तेव्हा त्यांना 'आतां उघडी डोळे' म्हणून हाक मारून जागें केलें. असें करीत असतांना त्यांना प्रापंचिक लोकांच्या शिव्याहि खाव्या लागल्या; पण या संतांचें हृदय म्हणजे माउलीचे हृदय होते. त्यांनी ते कार्य आपल्या हयातीत कीर्तन–प्रवचनद्वारा केलेच; पण आपला नश्वर देह पडल्यानंतरहि मागून येणाऱ्या पांथिकांना उपयोगी पडावे म्हणून आपल्या उपदेशाची ग्रंथरूपाने रचना केली. दयानिधि संतांनीं अशा रीतीने जो परमात्मप्राप्तीचा मार्ग दाखवून दिला त्या मार्गानें चालत जाऊन सहस्रावधि जीवांनीं आपल्या आयुष्याचे सार्थक करून घेतले आहे. तो उपदेशाचा मार्ग पूर्वीसारखाच आजहि स्वच्छ राहिला आहे; कोठेहि मलीन अथवा पुसट झालेला नाही. म्हणूनच त्या उपदेशास अभंग म्हणतात.

हे सर्वच अभंग ब्रह्मरसानें ओतप्रोत भरलेले आहेत. त्यात श्रेष्ठ–कनिष्ठ अशी निवड करता येत नाहीं. सामान्य गाईमध्ये तान्ही, पारठी अशी निवड करतात; पण कामधेनूमध्ये अशी निवड करता येईल का? परंतु असे जरी असले तरी हा अमृताचा सागर आहे, तो सर्वच चाखणे सर्वांना शक्य नाही.

म्हणून आपल्या कामापुरता, काही भाग त्यांतून निवड करून तो सेवन करण्याचा परिपाठ रूढ झाला आहे. नित्यशः परमात्म्याचे भजन करणारी जी वारकरी मंडळी आहेत, त्यातील अधिकारी मंडळीनें ही निवड केली आहे; ती अनेक वर्षे चालली आहे. पहाटेच्या ब्राह्म मुहूर्ताचे वेळी म्हणावयाचे काकड आरतीचे अभंग, भूपाळ्या, वासुदेव, आंधळे, पांगळे, गौळणी, हरिपाठ वगैरे अभंग, भगवंताच्या जन्मदिवसाचे अभंग, वारांचे अभंग, निवडक अभंग, काल्याचे अभंग, मदालसा, विनवणीचे अभंग अशी नित्य व नैमित्तिक निवड, या भजनसंग्रहांत करून एक विशिष्ट क्रम आखून दिला आहे.

सारांश, नित्यशः भजन करणाऱ्या मंडळीला या पुस्तकाने मोठी मदत होईल. मनुष्यजन्माचे सार्थक भगवंताच्या प्राप्तींत आहे व भगवंतांच्या प्राप्तीचे सोपं व सुलभ साधन–प्रपंच न सोडता करता येण्यासारखें–म्हणजे भजन आहे.

वारकरी भजनसंप्रदायाप्रमाणें विशिष्ट अभंगांची निवड करून त्यांचा क्रम या पुस्तकांत दिला आहे. या कामीं भजनी मंडळीला परिचित असलेले सुप्रसिद्ध ह. भ. प. गोपाळराव रिसबूड व ह. भ. प. गंगाधरपंत रिसबूड यांची आम्हाला फार मदत झाली आहे. त्यांचे आमच्या मंडळातर्फे आभार मानणे जरूर आहे. या पुस्तकाची छपाई आपुलकीच्या भावनेने वेळेवर व अल्प किमतीत करून दिल्याबद्दल आम्ही श्री. रा. गो. पाटील यांचे आभारी आहोंत.

सर्वांनी या भजनसंग्रहाचा उपयोग करून आदिपुरुषाचे अखंडित भजन करून सुखी व्हावे अशी श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या शब्दात विनवणी करून हें निवेदन पुरें करतों.

नेवासे फा. व. ११, शके १८७७ — शं. वा दांडेकर

## दहाव्या आवृत्तीविषयी

वारकरी भजनसंग्रहाच्या नऊ आवृत्त्या संपल्या. ही दहावी आवृत्ती वाचकांच्या हाती देताना आम्हास आनंद होत आहे.

रा. शं. वाळिंबे
अध्यक्ष



वै. गुरुवर्य सोनोपंत तथा मामा दाण्डेकर

# विषयानुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ मंगलाचरण पहिले | ७ |
| २ मंगलाचरण दुसरे | ९ |
| ३ काकड आरतीचे अभंग व भूपाळ्या | ११ |
| ४ वासुदेव | २० |
| ५ आंधळे व पांगळे | २९ |
| ६ जोगी | ३६ |
| ७ बाळछंद | ३६ |
| ८ दळण | ३८ |
| ९ जाते | ३८ |
| १० जोहार | ३९ |
| ११ मुका | ३९ |
| १२ बहिरा | ३९ |
| १३ गौळणी | ४० |
| १४ श्रीज्ञानेश्वरमहाराजकृत हरिपाठ | ६४ |
| १५ गुरुपरंपरेचे अभंग | ७० |
| १६ सोमवारचे अभंग | ७२ |
| १७ मंगळवारचे अभंग | ७६ |
| १८ बुधवारचे अभंग | ८० |
| १९ गुरुवारचे अभंग | ८५ |
| २० शुक्रवारचे अभंग | ८९ |
| २१ शनिवारचे अभंग | ९४ |
| २२ रविवारचे अभंग | ९७ |
| २३ नाटाचे अभंग | १०२ |
| २४ ताटीचे अभंग | १३० |
| २५ श्रीकृष्णजन्माचे अभंग | १३२ |
| २६ श्रीरामजन्माचे अभंग | १३७ |
| २७ हनुमानजन्माचे अभंग | १४० |
| ८२ मदालसा | १४१ |
| २९ एकादशीचे अभंग | १४७ |
| ३० द्वादशीचे अभंग | १४८ |
| ३१ क्षीरापतीचे अभंग | १५३ |
| ३२ काल्याचे अभंग | १५४ |
| ३३ निवडक अभंग | १५७ |
| ३४ विनंतीचे अभंग | २१८ |
| ३५ आरत्या | २१९ |
| ३६ उपसंहार व वरप्रसाद | २२१ |


———

२५३२ २४७९५ २३।१०।८५

॥ श्रीविठ्ठल प्रसन्न ॥

# वारकरी भजनसंग्रह

## मंगलाचरण पहिलें

### भजन—जय जय रामकृष्णहरि

१. रूप पहातां लोचनीं । सुख झालें वो साजणी ॥ १ ॥ तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा ॥ २ ॥ बहुता सुकृतांची जोडी । म्हणोनि विठ्ठलीं आवडी ॥ ३ ॥ सर्व सुखाचें आगर । बापरखुमादेवीवर ॥ ४ ॥

२. वचन ऐका कमळापती । माझी रंकाची विनंती ॥ १ ॥ कर जोडितों कथेकाळीं । आपण असावें जवळीं ॥ २ ॥ घ्यावी घ्यावी माझी भाक । जरी कां मागेन आणिक ॥ ३ ॥ तुकयाबंधू म्हणे देवा । शब्द इतकाचि राखावा ॥ ४ ॥

३. राहो आतां हेंचि ध्यान । डोळां मन लंपटो ॥ १ ॥ कोंडकोंडुनि धरीन जीवें । देहभावें पूजीन ॥ २ ॥ होईल येणें कळसा आलें । स्थिरावलें अंतरीं ॥ ३ ॥ तुका म्हणे गोजिरिया । विठोबा पायां पडों द्या ॥ ४ ॥

४. तुज पाहतां सामोरी । दृष्टि न फिरे माघारी ॥ १ ॥ माझें चित्त तुझ्या पायां । मिठी पडली पंढरीराया ॥ २ ॥ नोहे सारितां निराळें । लवण गळवितां जळें ॥ ३ ॥ तुका म्हणे बळी । जीव दिला पायांतळीं ॥ ४ ॥

५. तुम्ही सनकादिक संत । म्हणवितां कृपावंत ॥ १ ॥ एवढा करा उपकार । सांगा देवा नमस्कार ॥ २ ॥ माझी भाकावी करुणा । विनवा पंढरीचा राणा ॥ २ ॥ तुका म्हणे मज आठवा । मूळ लवकरी पाठवा ॥ ४ ॥

६. आतां तुम्ही कृपावंत । साधुसंत जिवलग ॥ १ ॥ गोमटें तें करा माझें । भार ओझें तुम्हांसी ॥ २ ॥ वंचिलें तें पायांपाशीं । नाहीं यासी वेगळें ॥ ३ ॥ तुका म्हणे सोडिल्या गांठी । दिली मिठी पायांसी ॥ ४ ॥

७. लेकुराचें हित । जाणें माउलीचें चित्त ॥ १ ॥ ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीति ॥ २ ॥ पोटीं भार वाहे । त्याचें सर्वस्वही साहे ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें । तुम्हां संतावरी ओझें ॥ ४ ॥

८. करूनि उचित । प्रेम घाली हृदयांत ॥ १ ॥ आलों दान मागायास । थोर करूनियां आस ॥ २ ॥ चिंतनसमयीं । सेवा आपुलीच द्यावी ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे भावा । मज निरवावे देवा ॥ ८ ॥

९. न धरी उदास । माझी पुरवावी आस ॥ १ ॥ ऐका ऐका नारायणा । माझी परिसा विज्ञापना ॥ २ ॥ मायबाप बंधुजन । तूंचि सोयरा सज्जन ॥ ३ ॥ तुका म्हणे तुज विरहित । कोण करील माझें हित ॥ ४ ॥

१०. गरुडाचे पायीं । ठेवी वेळोवेळा डोई ॥ १ ॥ वेगीं आणावा तो हरी । मज दीनातें उद्धरी ॥ २ ॥ पाय लक्ष्मीच्या हातीं । तिसी यावें काकुळती ॥ ३ ॥ तुका म्हणे शेषा । जागे करा हृषीकेशा ॥ ४ ॥

११. ये ग ये ग विठाबाई । माझे पंढरीचे आई ॥ १ ॥ भीमा आणि चंद्रभागा । तुझ्या चरणींची गंगा ॥ २ इतुक्यांसहित त्वां बा यावें । माझे रंगणीं नाचावें ॥ ६ ॥ माझा रंग तुझे गुणीं । म्हणे नामयाची जनी ॥ ४ ॥

## भजन—विठोबा रखुमाई

## मंगलाचरण दुसरें

१२. सुंदर तें ध्यान उभें विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ॥ १ ॥ तुळसीहार गळां कासे पीतांबर ॥ आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥ २ ॥ मकरकुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणि विराजित ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें हेचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ ४ ॥

१३. राजस सुकुमार मदनाचा पुतळा । रविशशिकळा लोपालिया ॥ १ ॥ कस्तुरी मळवट चंदनाची उटी । रुळे माळ कंठीं वैजयंती ॥ २ ॥ मुकुट कुंडलें श्रीमुख शोभलें । सुखाचे ओतले सकळही ॥ ३ ॥ कासे सोनसळा पांघरे पाटोळा । घननीळा सांवळा बाइयांनो ॥ ४ ॥ सकळही तुम्ही व्हा गे एकीसवा । तुका म्हणे जीवा धीर नाहीं ॥ ५ ॥

१४. सदा माझे डोळा जडो तुझी मूर्ती । रखुमाईच्या पती सोयरीया ॥ १ ॥ गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देई मज प्रेम सर्वकाळ ॥ २ ॥ विठो माउलिये हाचि वर देई । येऊनियां राहीं हृदयीं माझ्या ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं न मागों आणिक । तुझे पायीं सुख सर्व आहे ॥ ४ ॥

१५. आवडे हें रूप गोंजिरें सगुण । पाहतां लोचन सुखावले ॥ १ ॥ आतां दृष्टीपुढें ऐसाचि तूं राहें । जो मी तुज पाहें वेळोवेळां ॥ २ ॥ लांचावलें मन लागलीसे गोडी । तें जीवें न सोडी ऐसें झालें ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हीं मागावें लडिवाळीं । पुरवावी आळी मायबापा ॥ ४ ॥

१६. झणीं दृष्टि लागो तुझ्या सगुणपणा । तेणें माझ्या मना बोध केला ॥ १ ॥ अनंत जन्मींचें विसरलों दुःख । पाहतां तुझें मुख पांडुरंगा ॥२॥ योगियांच्या ध्यानीं ध्यातां नातुडसी । तों तूं आम्हांपासीं मागे पुढें ॥ ३ ॥ नामा म्हणे जीवें करीन निंबलोण । विटेंसहित चरण ओवाळीन ॥ ४ ॥

१७. पाहतां श्रीमुख सुखावलें सुख । डोळियांची भूक न वजे माझ्या ॥ १ ॥ जिव्हे गोड तीन अक्षरांचा रस । अमृत जयास फिकें पुढें ॥ २ ॥ श्रवणाची वाट चोखाळली शुद्ध । गेले भेदाभेद निवारोनी ॥ ३ ॥ महामळें मन होतें जें गादलें । शुद्ध चोखाळलें स्फटिक जैसें ॥४॥ तुका म्हणे माझ्या जीवाचें जीवन । विठ्ठल निधान सांपडलें ॥ ५ ॥

१८. येणें मुखें तुझें वर्णीन गुणनाम । तेंचि मज प्रेम देई देवा ॥ १ ॥ डोळे भरोनियां पाहीन तुझें मुख । तेंचि मज सुख देई देवा ॥ २ ॥ कान भरोनियां ऐकेन तुझी कीर्ति । ते मज विश्रांति देई देवा ॥ ३ ॥ वाहे रंगीं टाळी नाचेन उल्हास । हें देई हातास पायां सुख ॥ ४ ॥ तुका म्हणे माझा सकळ देहभाव । आणिक नको ठाव चिंतूं यासी ॥ ५ ॥

१९. नको ब्रह्मज्ञान आत्मस्थितिभाव । मी भक्त तूं देव ऐसें करी ॥१॥ दावी रूप मज गोपिकारमणा । ठवूं दे चरणावरी माथा ॥ २ ॥ पाहीन श्रीमुख देईन आलिंगन । जीवें

निंबलोण उतरीन ।। ३ ।। पुसतां सांगेन हितगुजमात । बैसोनि एकांत सुखगोष्टी ।। ४ ।। तुका म्हणे यासी न लावी उशीर । माझें अभ्यंतर जाणोनियां ।। ५ ।।

## काकड आरतीचे अभंग व भूपाळ्या

२०. उठा उठा साधुसंत साधा आपुलें हित । गेला गेला हा नरदेह । मग कैचा भगवंत ।। १ ।। उठोनी वेगेंसी । चला जाऊं राउळासी । जळती पातकांच्या राशी । काकड आरती देखिलिया ।। २ ।। उठोनियां पहाटे । विठ्ठल पाहा उभा विटे । चरण तयाचे गोमटे । अमृतदृष्टी अवलोका ।। ३ ।। जागे करा रुक्मिणीवरा । देवा आहे निदसुरा । वेगें निंबलोण करा । दृष्ट होईल तयासी ।।४।। पुढें वाजंत्री वाजती । ढोल दमामे गर्जती । होते काकड आरती । पांडुरंगरायाची ।। ५ ।। सिंहनाद शंख भेरी । गजर होतो महाद्वारीं । केशवराज विटेवरीं । नामा चरण वंदितो ।। ६ ।।

२१. उठा उठा प्रभात झाली । चिंता श्रीविठ्ठल माउली । दीन जनांची साउली । येई धावुनि स्मरतांचि ।। १ ।। पंढरपुरी जें भीमातटीं । सुंदर मनोहर गोमटी । दोन्ही कर ठेवोनियां कटी । भेटीसाठी तिष्ठतसे ।।२।। किरीट कुंडलें मंडित । श्रीमुख अति सुंदर शोभत । गळां वैजयंती डुल्लत । हार मिरवत तुळसीचा ।। ३ ।। सुरेख मूर्ती सगुण सांवळी । कंठीं कौस्तुभ एकावळी । केशर उटी परिमळ आगळी । बुका भाळीं विलसतसे ।।४।। पीत पीतांबर कसला कटी । अक्षयीं वीट चरण तळवटी । सकळ सौंदर्य सुखाची पेटी । हृदय संपुष्टीं आठवा तें ।। ५ ।। अति प्रिय आवडे तुळसी बुका । तैसीच प्रीतिकरी भोळ्या

भाविका । नामा पदपंकज पादुका । शिरीं मस्तकीं वांदितसे ॥६॥

२२. उठा जागे व्हा रे आतां । स्मरण करा पंढरीनाथा । भावें चरणीं ठेवा माथा । चुकवीं व्यथा जन्माच्या ॥ १ ॥ धन दारा पुत्र जन । बंधू सोजरे पिशून । सर्व मिथ्या हें जाणून । शरण रिघा देवासी ॥ २ ॥ माया विघ्नें भ्रमला खरें । म्हणतां मी माझेनि घरे । हें तों संपत्तीचें वारें । साचोकारे जाईल ॥३॥ आयुष्य जात आहे पाहा । काळ जपतसे महा । स्वहिताचा घोर वाहा । ध्यानीं राहा श्रीहरीच्या ॥ ४ ॥ संतचरणीं भाव धरा । क्षणाक्षणा नाम स्मरा । मुक्ति सायुज्यता वरा । हेंचि करा बापांनो ॥ ५ ॥ विष्णुदास विनवी नामा । भुलूं नका भव कामा । धरा अंतरीं निजप्रेमा । न चुका नेमा हरि-भक्ति ॥ ६ ॥

२३. उठा पांडुरंगा आतां दर्शन द्या सकळां । झाला अरुणोदय सरली निद्रेची वेळा ॥ १ ॥ संत साधु मुनी अवघे झालेती गोळा । सोडा सेजसुख आतां पाहूं द्या मुखकमळा ॥ २ ॥ रंगमंडपीं महाद्वारीं झालीसे दाटी । मन उतावेळ । रूप पाहावया दृष्टी ॥ ३ ॥ राही रखुमाबाई तुम्हां येऊं द्या दया । सेजें हालउनी जागें करा देवराया ॥ ४ ॥ गरुड हनुमंत पुढें पाहती वाट । स्वर्गींचे सुरवर घेऊनि आले बोभाट ॥ ५ ॥ झालें मुक्तद्वार लाभ झाला रोकडा । विष्णुदास नामा उभा घेऊनि काकडा ॥ ६ ॥

२४. उठा अरुणोदय प्रकाश झाला । घंटा गजर गार्जिन्नला । हरि चौघडा सुरू झाला । काकड आरती समयाचा ॥ १ ॥ महाद्वारीं वैष्णवजन । पूजा सामुग्री

घेऊन । आले द्यावे तयांसी दर्शन । बंदिजन गर्जती ।। २ ।। सभामंडपी कीर्तन घोष । मृदंग टाळ वीणे सुरस । आनंदें गाती हरीचे दास । परम उल्हास करूनियां ।। ३ ।। चंद्रभागे वाळवंटीं । प्रातःस्नानाची जनदाटी । आतां येतील आपुले भेटी । उठीं उठीं गोविंदा ।। ४ ।। ऐसें विनवी रुक्मिणी । जागृत झाले चक्रपाणी । नामा बुद्धांजळी जोडुनी । चरणीं माथा ठेवितसे ।। ५ ।।

२५. उठा पांडुरंगा प्रभात समयो पातला । वैष्णवांचा मेळा गरुडपारीं दाटला ।। १ ।। वाळवंटापासूनि महाद्वारा-पर्यंत । सुरवरांची दाटी उभे जोडूनि हात ।। २ ।। शुकसन-कादिक नारद तुंबर भक्तांच्या कोटी । कवाडा आडूनि पाहताती जगजेठी ।। ३ ।। सुरवरांची विमानें गगनीं दाटलीं सकळ । रखुमाबाईमाते वेगीं उठवा घननीळ ।। ४ ।। रंभा-दिक नाचती उभ्या जोडूनि हात । त्रिशूळ डमरू घेऊनि आला गिरजेचा कांत ।। ५ ।। पंचप्राण आरत्या घेऊनियां देवस्त्रिया येती । भावें ओवाळिती राहीरखुमाईचा पती ।। ६ ।। अनंत अवतार घेसी भक्तांकारणें । कनवाळु कृपाळु दीनालागीं उद्धरणें ।। ७ ।। चौयुगांचा भक्त नामा उभा कीर्तनीं । पाठीमागें डोळे झांकुनि उभी ते जनी ।। ८ ।।

२६. सहस्र दीपें दीप कैसी प्रकाशली प्रभा । उजळल्या दशादिशा गगना आलीसे शोभा ।।१।। काकड आरती माझ्या कृष्णा सभागिया । चराचर मोहरलें तुझी मूर्ति पाहावया ।। २ ।। कोंदलेसे तेच प्रभा झालीसे एक । नित्य नवा आनंद ओवाळितां श्रीमुख ।। ३ ।। आरती करितां तेज प्रकाशलें नयनीं । तेणें तेजें मिनला एकाएकीं जनार्दनीं ।। ४ ।।

२७. का हो तुम्ही निश्चिंतीने निजलाती हरी । मानिलें हें सुश आम्ही वांचूं कैशापरी ॥ १ ॥ उठा सावध व्हावें क्षेम सकळां द्यावें । जयां जी वासना तयां तैसें पुरवावें ॥ २ ॥ जन्मोजन्मीं सांभाळिलें क्षमा करा अन्याय । कृपा करी देवा आम्हां तूंचि मायबाप ॥ ३ ॥ तुका म्हणें करा वडीलपण दानासी । जेणें सुख होय सकळ हे जनासी ॥ ४ ॥

२८. अवघे हरिजन मिळोनि आले राउळा । दोन्ही कर जोडोति विनविती गोपाळा ॥ १ ॥ उठा पांडुरंगा हरिजना सांभाळी । पाहूं द्या वदन वंदूं पायांची धूळी ॥ २ ॥ उगवला दिनकर झाल्या निवळस दिशा । कोठवरी निद्रा आतां उठा परेशा ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही उभे तिष्ठत द्वारासी । दोन्ही कर जोडोनि गाई गोपाळ सेवेसी ॥ ४ ॥

२९. तुझिये निढळीं कोटी चंद्र प्रकाशे । कमल नयन हास्य वदन हासे ॥१॥ हाल कां रे कृष्णा डोल कां रे । घाडिये घाडिये घाडिये गुज बोल कां रे ॥ २ ॥ उभा राहोनियां कैसा हालवितो बाहो । बापरखुमादेवीवरू विठ्ठलु नाहो ॥ ३ ॥

३०. भक्तीचिया पोटीं बोध काकडा ज्योती । पंच प्राण जीवें भावें ओवाळूं आरती ॥ १ ॥ ओवाळूं आरती माझ्या पंढरीनाथा । दोन्ही कर जोंडोनि चरणीं ठेवीन माथा ॥ २ ॥ काय महिमा वर्णूं आतां सांगणें किती । कोटी ब्रह्महत्या मुख पाहातां जाती ॥ ३ ॥ राही रखुमाई दोही दों बाहीं । मयूर पिच्छ चामरें ढाळिती ठायीं ठायीं ॥ ४ ॥ तुका म्हणे दीप घेऊनी उन्मन ती शोभा । विटेवरी उभा दिसे लावण्यगाभा ॥५॥

३१. उठा सकळ जन उठिलें नारायण । आनंदले मुनि-

जन तिन्ही लोक ॥ १ ॥ करा जयजयकार वाद्यांचा गजर । मृदंग विणे अपार टाळ घोळ ॥ २ ॥ जोडोनियां कर मुख पाहा सादर । पायांवरी शिर ठेवूनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे काय पढियंते मागा । आपुलालें सांगा दुःख सकळ ॥ ४ ॥

३२. योगियां दुर्लभ तो म्यां देखिला साजणी । पाहातां पाहातां मना न पुरे धणी ॥ १ ॥ देखिला माये देवांचा देवो । फिटला संदेहो निमाले दुजेपण ॥ २ ॥ अनंत रूपें अनंत वेषें देखिलें म्यां त्यासी । बापरखुमादेवीवरु खूण बाणली कैसी ॥ ३ ॥

३३. आवतराची राशी तो हा उभा विटेवरी । शंखचक्र-गदापद्मसहित करीं ॥ १ ॥ देखिला देखिला देवाधिदेव बरवा । समाधान जीवा पाहतां वाटे गे माये ॥ २ ॥ सगुण चतुर्भुज रूपडे तेज पुंजाळती । वंदुनी चरणरज नामा विनवितसे पुढती ॥ ३ ॥

३४. करून विनवणी पायीं ठेवितों माथा । परिसावी विनंती माझी पंढरीनाथा ॥ १ ॥ अखंडित असावें ऐसें वाटतें पायीं । साहोनि संकोच ठाव थोडासा देई ॥ २ ॥ असो नसो भाव आलों तुझीया ठाया । कृपादृष्टी पाहे मजकडे पंढरीराया ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही तुझीं वेडीं वाकुडीं । नामें भवपाश हातें आपुल्या तोडी ॥ ४ ॥

३५. माझें चित्त तुझे पायीं । राहे ऐसें करी कांहीं । धरोनियां बाही । भव हा तारीं दातारा ॥ १ ॥ चतुरा तूं शिरोमणी । गुणलावण्याची खाणी । मुकुट सकळां मणी । धन्य तूंचि विठोबा ॥ २ ॥ करी या तिमिराचा नाश । उदय होऊनि प्रकाश तोडी आशापाश । करी वास हृदयीं ॥ ३ ॥ पायें

गुंतलों नेणतां । माझी असो तुम्हां चिंता । तुका ठेवी माथा । पायीं आतां राखावें ॥ ४ ॥

३६. ऐसी वाट पाहे कांहीं निरोप कां मूळ । कां हो कळवळा तुम्हां उमटेचिना ॥ १ ॥ अहो पांडुरंगे पंढरीचे निवासे । लावोनियां आसे चाळवुनि ठेविलें ॥२॥ काय जन्मा येऊनियां केली म्यां जोडी । हाचि घडोघडी चित्ता येतो आठव ॥३॥ तुका म्हणे खरा न पविजे विभाग। धिक्कारितें जग हाचि लाहें हिशोब ॥ ४ ॥

३७. बोलोनियां दाऊं कां तुम्ही नेणाजी देवा । ठेवाल ते ठेवा ठायीं तैसा राहेन ॥१॥ पांगुळलें मन कांहीं नाठवे उपाय । म्हणऊनि पाय जीवीं धरूनि राहिलों ॥ २ ॥ त्याग भोग दुःख काय सांडावे मांडावें। ऐसी धरियेली जीवें माझ्या थोर आशंका ॥ ३ ॥ तुका म्हणे बाळ माता चुकलिया वनीं । न पवतां जननी दुःख पावें विठ्ठले ॥ ४ ॥

३८. कां गा केविलवाणा केलो दीनाचा दीन। काय तुझी हीन शक्ति झालीसे दिसे ॥१॥ लाज वाटे मना तुझा म्हणवितां दास । गोडी नाहीं रस बोलिलिया सारिखी ॥ २ ॥ लाजविली मागें संतांचीं हीं उत्तरें । कळो येतें खरें दुजें एकावरूनी ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी कोणी वदविली वाणी । प्रसादावांचुनि तुमचिया विठ्ठला ॥ ४ ॥

३९. जळो माझें कर्म वाया केली कटकट । झालें तैसें तट नाहीं आलें अनुभवा ॥१॥ आतां पुढें धीर काय देऊं या मना । ऐसें नारायणा प्रेरिलें तें पाहिजे ॥ २ ॥ गुणवंत केलों दोष

जाणायासाठीं । माझें मज पोटीं बळकट दूपण ।। ३ ।। तुका म्हणे अहो केशीराजा दयाळा । बरवा हा लळा पाळियेला शेवटी ।। ४ ।।

४०. जळोत तीं येथें उपजवितीं अंतराय । सायासाची जोडी माझी तुमचे पाय ।। १ ।। आतां मज साह्य येथें करावें देवा तुझी घेइ सेवा सकळ गोवा उगवोनि ।। २ ।। भोगें रोगा जोडोनियां दिलें आणिका । अरुचि ते हो कां आतां सकळां-पासूनी ।। ३ ।। तुका म्हणे असो तुझे तुझें मस्तकीं । नाहीं ये लौकिकीं आतां मज वर्तणें ।। ४ ।।

४१. न सांगतां तुम्हां कळो येतें अंतर । विश्वीं विश्वंभर परिहाराचि नलगे ।। १ ।। परि हें अनावर आवारितां आवडी । अवसान तें घडी पुरों एकी देत नाहीं ।। २ ।। काय उणें मज येथें ठेविलिये ठायीं । पोटा आलों तइं पासुनियां समर्थे ।। ४ ।। तुका म्हणे अवघी आवरिली वासना । आतां नारायणा दुसरियापासूनी ।। ४ ।।

४२. तुजसवें आम्ही अनुसरलों अबळा । नको अंगीं कळा राहो हरी हीन देऊं ।। १ ।। सासुरवासा भितो जीव ओढे तुजपाशीं । आतां दोहींविषीं लज्जा राखें आमुची ।। २ ।। न कळतां संग झाला सहज खेळता । प्रवर्तली चिंता मागिलाचि यावरी ।। ३ ।। तुका म्हणे असतां जेसें तैसें बरवें । वचन या भावें वेंचूनियां विनटलों ।। ४ ।।

४३. कामें नेलें चित्त नेदी अवलोकूं मुख । बहु वाटे दुःख फुटों पाहे हृदय ।। १ ।। कां गा सासुरवासी मज केलें भगवंता । आपुलिया सत्ता स्वाधीनता ते नाहीं ।। २ ।। प्रभातेसीं वाटे

तुमच्या यावें दर्शना । येथें न चले चोरी उरली राहे वासना ॥३॥ येथें अवघे वायां गेले दिसती सायास । तुका म्हणे नास दिसे झाला वेंचाचा ॥४॥

४४. तुझे दास्य करूं आणिका मागों खावया । धिग् झालें जिणें माझें पंढरीराया ॥ १ ॥ काय गा विठोबा तुज आतां म्हणावें । शुभाशुभ गोड तुम्हां थोरांच्या नांवें ॥२॥ संसाराचा धाक निरंतर आम्हांसी । मरण भलें परि काय अवकळा ऐसी ॥ ३ ॥ तुझा शरणागत शरण जाऊं आणिकांसी । तुका म्हणे लाज कवणा हे कां नेणसी ॥ ४ ॥

४५. चित्तीं तुझे पाय डोळां रूपाचें ध्यान । अखंड मुखीं नाम तुमचे वर्णावे गुण ॥ १ ॥ हेंचि एक तुम्हां मागतों मी दातारा । उचित तें करा भाव जाणोनी खरा ॥ २ ॥ खुंटली जाणीव कांहीं बोलणेंचि आतां । कळों येईल तैसी करा बाळाची चिंता ॥३॥ तुका म्हणे आतां नका देऊं अंतर । न कळे पुढें काय कैसा होईल विचार ॥ ४ ॥

४६. वाट पाहें बाहें निढळीं ठेवूनियां हात । पंढरीचे वाटे दृष्टि लागलें चित्त ॥ १ ॥ कइं येतां देखेन माझा मायबाप । घटिका बोटें दिवस लेखीं धरूनियां माप ॥ २ ॥ डावा डोळा लवे उजवी स्फुरतसे बाहे । मन उतावीळ भाव सांडुनियां देहे ॥ ३ ॥ सुख सेज गोड चित्तीं नलगे आणिक । नाठवे घरदार तहान पळाली भूक ॥ ४ ॥ तुका म्हणे धन्य ऐसा दिवस तो कोण । पंढरीचे वाटे येतां मूळ देखेन ॥ ५ ॥

४७. पडिलें दूरदेशीं मज आठवें मानसीं । नको नको हा वियोग कष्ट होताती जीवासी ॥ १ ॥ दिन तैसी रजनी झाली

वो माये । अवस्था लाऊनि गेला अझुनि कां न ये ।। २ ।। गरुडवाहना गंभीरा येई गा दातारा । बापरखुमादेवीवरा श्रीविठ्ठला ।। ३ ।।

४८. पैल विळाचिये विळ आगणीं उभी ठेलिये । येतिया जातिया पुसे विठ्ठल केउता गे माये ।। १ ।। पायरऊ झाला संचारु नवल । वेधें विंदान लाविलें म्हणे विठ्ठल विठ्ठल ।। २ ।। नेणें तहान भूक नाहीं लाज अभिमान । बेधिलें जनार्दनीं देवकीनंदनु गे माये ।।३।। बापरखुमादेवीवरु जीवींचा जीवनु । माझे मनींचे मनोरथ पुरवी कमलनयनु ।। ४ ।।

४९. येतिया पुसे जातिया धाडी निरोप । पंढरपुरीं आहे माझा मायबाप ।। १ ।। येई वो येई बो विठाबाई माउलिये । निढळावरी कर ठेवूनि वाट मी पाहे ।। २ ।। पीतांबर शेला कैसा गगनीं झळकला । गरुडावरी बैसोनि माझा कैवारी आला ।। ३ ।। विठोबाचें राज्य आम्हां नित्य दिवाळी । विष्णुदास नामा जीवेंभावें ओवाळी ।। ४ ।।

५० येई वो येई वो येई धावोनियां । विलंब का वाय। लावियला कृपाळे ।। १ ।। विठाबाई विश्वंभरे भवच्छेदके । कोठें गुंतलीस माये विश्वव्यापके ।। २ ।। न करीं न करीं आतां आळस अव्हेरू । व्हावया प्रकट कैचे दूरी अंतरु ।। ३ ।। नेघे नेघे नेघे माझी वाचा विसावा । तुका म्हणे हांवा हांवा हांवा साधावा ।। ४ ।।

५१. देखिले तुमचे चरण निवांत राहिलें मन । कासया त्यजीन प्राण आपुला गे माये ।। ३ ।। असेन घणीवरी आपुले माहेरी । मग तो श्रीहरी गीतीं गाईन ग माये ।। २ ।।

सकळही गोत माझें पंढरीस जाण । बापरखुमादेवीवरु श्रीविठ्ठलांचे आण ॥ ३ ॥

५२. आतां कोठें धांवे मन । तुझे चरण देखिलिया ॥ १ ॥ भाग गेला शीण गेला । अवघा झाला आनंद ॥ २ ॥ प्रेमरसें बैसली मिठी । आवडी लाठी मुखासी ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्हांजोगें । विठ्ठल घोगें खरें माप ॥ ४ ॥

## वासुदेव

५३. बाबा ममतानिशीं अहंकार दाट । रामनामे वासुदेवीं वाट । गुरुकृपा बोळलें वैकुंठ । तेणें वासुदेव दिसे प्रकट गा ॥ १ ॥ वासुदेव हरी वासुदेव हरी । रामकृष्ण हरी वासुदेवा ॥ध्रु०॥ आला पुंडलीक भक्तराज । तेणें केशव बोळला सहज । दिधला विठ्ठल मंत्रबीज । तेणें झालें सकळही काज गा ॥ २ ॥ रामकृष्ण वासुदेवें । वैष्णव गातातीं अवघे । दिंडी टाळ प्रेमभावें । वासुदेवीं मन सामावें गा ॥ ३ ॥ शांतिक्षमादया पुरीं । वासुदेवो घरोवरीं । आनंद ओसंडला अंबरीं । प्रेमें डुले त्रिपुरारी गा ॥४॥ वासुदेवीं ज्ञेयज्ञान । ध्यानीं मनीं नारायण । वासुदेवो परिपूर्ण । केलें क्षरलेसें चैतन्य गा ॥ ५ ॥ वासुदेवें वाहानि टाळी । पातकें गेलीं अंतराळीं । वासुदेवो वनमाळी । कीर्तन ब्रह्ममेळीं गा ॥ ६ ॥ ज्ञानदेवीं वासुदेवीं । प्रीतिपान्हा उजळी दिवीं । टाळ चिपुळी धरूनि जीवीं । ध्यानमुद्रा महादेवीं गा ॥ ७ ॥

५४. घुळघुळा वाजती टाळ । झणझणा नाद रसाळ । उदो झाला पाहली वेळ । उठा वाचे वदा गोपाळ ॥ १ ॥

कैसा वासुदेव बोलतो बोल । बाळा पोटीं माय रिघेल । मेलें माणुस जीत उठवील । वेळ काळातें ग्रासील ॥ २ ॥ आतां ऐसेचि अवघे जन । होतें जाते तयापासून । जगीं जग झालें जनार्दन । उदो प्रगटला विंबलें भान ॥३॥ टाळाटाळीं लोपला नाद । अंगोअंगीं मुरला छंद । भोग भोगितांचि आटला भेद । ज्ञान गिळूनि गावा गोविंद ॥ ४ ॥ गांवा आंत बाहेर हिंडे आळीं । देवो देवीची केली चिपुळी । चरण नमतां वाजे धुमाळी । ज्ञानदेवाची कांती सावळी ॥ ९ ॥

५५. बाबा अहंकारानिशी घनदाट । गुरुवचनीं फुटली पहाट । माता भक्ति भेटली बरवंट । तिनें मज मार्ग दाविला चोखट गा ॥ १ ॥ नरहरि रामा गोविंद वासुदेवा ॥ ध्रु० ॥ एक बोल सुस्पष्ट बोलवा । वाचे हरि हरि म्हणावा । संत समागमु धरावा । तेणें ब्रह्मानंद होय आघवा गा ॥ २ ॥ आला शीतळ शांतीचा वारा । तेणें सुख झालें या शरीरा । फिटला पातकांचा थारा । कळीकाळासी धाक दरारा गा ॥३॥ अनुहात वाजती टाळ । अनुक्षीर गीत रसाळ । अनुभव तन्मय सकळ । नामा म्हणे केशव कृपाळ गा ॥ ४ ॥

५६. वासुदेवस्मरणें तुटती जन्ममरण व्याधी । अहं सोहं कोहं मूळ हा सांडी उपाधी ॥ १ ॥ रामकृष्ण वासुदेव गोपाळ वाचे आठवा । जन्म जरा तुटे वाचे आठवीत सांठवा ॥ २ ॥ चिपळ्या टाळ घुळघुळा शब्द नादे । तेणें ब्रह्मानंद हृदयीं आठवण नांदे ॥ ३ ॥ एका जनार्दनीं वासुदेव । चिंतितां यम काळदूत पळती नाम ऐकतां ॥ ४ ॥

५७. वासुदेवस्मरण पापहरणाचें मूळ । तीर्थाचें माहेर ब्रह्म

व्यापक निश्चळ । अघ नासी मुखीं स्मरतां वाचा झाली निर्मळ । त्रिविध ताप शोषुनी रूपीं स्वरूपीं सुमंगळ ॥ १ ॥ ॐनमो भगवते रामकृष्ण वासुदेवा ॥ ध्रु० ॥ जप तप अनुष्ठान व्यर्थ कासया करणें । तीर्थ व्रत यम नेम नलगे दैवता धरणें । आसन मुद्रा ज्ञान ध्यान नलगे वाराणसी मरणें । केशव माधव अच्युत वदतां होय पातक हरणें ॥ २ ॥ शरीरशोषण प्राण-निरोधन मनोजय हटयोग । गुदपीडन कुंडलिनी कलिमलदलभंग । ऊर्ध्व वायुचा श्वेत तोडोनि करि वो वनभंग । ब्रह्मरंध्रीं मिसळे परि मुमुक्षु दंग ॥३॥ मनोजय वासना तोडोनि केली विमोडी । मणिपूर नगर पाहातां दुर्गती मोडी । काम क्रोध मद मत्सर अहंकार झोडी । अखंड परमानंद सेवुमी उभवी गुढी ॥ ४ ॥ भेदभावना तोडोनि घेतला प्रेमाचा गरळा । शुद्ध नाम श्रीहरीचें निजमुखीं लागला चाळा । हरिस्मरणाचेनी वळें अंकित केलें कळिकाळां । एका जनार्दनीं अखंड सुखसोहळा ॥ ५ ॥

५८. सुखदुःखसमान सकळ जीवांचा कृपाळ । ज्ञानाचा उद्बोध भक्तिप्रेमाचा कल्लोळ ॥ १ ॥ धन्य जगीं तोचि एक हरिरंगीं नाचे । रामकृष्ण वासुदेव सदा स्मरे वाचे ॥ २ ॥ विषयीं विरक्त जया नाहीं आपपर । संतुष्ट सर्वदा स्वयें व्यापक निर्धार ॥३॥ जाणीव शहाणीव वोझें सांडोनिया दुरी । आपणं वस्तीकर वर्तत्से संसारीं ॥ ४ ॥ एका जनार्दनीं नित्य हरीचें कीर्तन । आसनीं शयनीं सदा हरीचें चिंतन ॥ ५ ॥

५९. जया परमार्थाची चाड । तेणें मांडावें लिगाड । धरुनी भजनाची चाड । नित्यनेम आदरें ॥ १ ॥ सांडी मांडी परते टाकी । वासुदेव नाम घोकी । मोक्ष येईल सुखीं ।

नाम स्मरतां आदरें ॥ २ ॥ रामकृष्ण वासुदेवा । धरी हाचि दृढ भावा । आणिकाचा हेवा । दुरी करी आदरें ॥३॥ घाली संतांसी आसनें । पूजा करीं कायावाचामनें । एका जनार्दनीं जाणें । इच्छिलें तें पुरवीं ॥ ४ ॥

६०. सुखें सेऊं ब्रह्मानंदा । गाऊं रामनाम सदा । नोहे मग बाधा । काळदूत यमाची ॥ १ ॥ करूं वासुदेव स्मरण । तेणें तुटे रे बंधन । खंडेल कर्माचें विंदन । वासुदेव जपताची ॥२॥ तीर्थयात्रे सुखें जाऊं । वाचे विठ्ठलनाम घेऊं । संतांसंगें सेऊं । वासुदेव धरणीवरी ॥ ३ ॥ लोभ ममता दवडूं आशा । उदरव्यथेचा वोळसा । न करूं आणिक सायासा । वासुदेवावांचुनी ॥४॥ मुख्य वर्माचें हें वर्म । येणें साधे सकळ धर्म । एका जनार्दनीं नाम । वासुदेव आवडी ॥ ५ ॥

६१. विषय सेवितां गा जन्ममरणाचा बाधु । विवेक गुरुवाक्य छेदी भवबंधु ॥ १ ॥ रामकृष्ण वासुदेव हरि ब्रह्मानंदें गळती गा । रामकृष्ण वासुदेव हरि देहीं विदेही झाला गा ॥२॥ गुरुवाक्य भावबळें निजबोधें पैं बुद्धि । तेणें बोधें पाहतां गा अखंड ते समाधि ॥ ३ ॥ जनीं वनीं निरंजनीं वासुदेव समान । एका जनार्दनीं चित्त चैतन्य घन ॥ ४ ॥

६२. कर जोडूनि विनवितों तुम्हां । नका करूं संसार-श्रमा । नका गुंतूं विषयकामा । तुम्ही आठवा मधुसूदना ॥ १ ॥ रे तुम्ही वासुदेव वासुदेव म्हणा ॥ ध्रु० ॥ नरदेह दुर्लभ जाणा । शत वर्षांची गणना । त्यामध्यें दुःख यातना । तुम्ही आठवा मधुसूदना ॥ २ ॥ नलगे तीर्थांचें भ्रमण । नलगे दंडण मुंडण । नलगे पंचाग्नीसाधन । तुम्ही आठवा मधुसूदन ॥ ३ ॥ हेंच

माझी विनवणी । जोडोनियां कर दोन्ही । शरण एका जनार्दनी । तुम्ही वासुदेव म्हणा अनुदिनीं ॥ ४ ॥

६३. मी वासुदेव नामें फोडितों नित्य टाहो । देखिले पाय आतां मागतों दान द्या हो । सावळें रूप माझ्या मानसीं नित्य राहो । पावन संतवृंदें सादरें दृष्टीं पाहो ॥ १ ॥ रामकृष्ण वासुदेवा । हरि रामकृष्ण वासुदेवा ॥ध्रु०॥ सांडोनि सर्व चिंता संतपदीं लक्ष लागो । मुक्त मी सर्वसंगीं सर्वदा वृत्ति जागो । भाविक प्रेमळांच्या संगतीं चित्त लागो ॥ २ ॥ अद्वैतचि चालो अक्षयीं भक्तियोग । स्वप्नींहि मानसातें नातळो द्वैतसंग । अद्वयानंद वेधें नावडो अन्यभोग । आक्रियत्वचि वाहो सत्क्रियारूपबोध ॥ ३ ॥ पाहतां विश्वमात निजरूप दाखवी । सत्कथा श्रवण कर्णीं पीयूप चाखवी । रसने नाम मंत्र सर्वदा प्रेम देई । तोषला देवराणा म्हणे या रे घेई ॥ ४ ॥ हें दान पावलें सद्गुरु शांति लिंगा । हें दान पावलें आत्मया पांडुरंगा । हें दान पावलें व्यापका अंतरंगा । हें दान पावलें एका जनार्दनीं दोप जाती भंगा ॥ ५ ॥

६४. राम राम दोन्हीं अक्षरें । सुलभ आणि सोपारें । जागा मागीलिया पहारे । शेवटिचें गोड तोंचि खरें गा ॥ १ ॥ रामकृष्ण वासुदेव । जाणवी जनासी वाजवी चिपळिया । टाळ घागऱ्या घोपें गा । रामकृष्ण वासुदेवा ॥ २ ॥ गाय वासुदेव वासुदेवा । भिन्न नाहीं आणिका नांवा । दान जाणोनियां करी हांवा । न ठवी उरी कांहीं ठवा गा ॥ ३ ॥ एक वेळां जाणविती । धरूनियां राहा चित्तीं । नेघे भार सांडी कामा हातीं । नीज घेउनियां फिरती गा ॥ ४ ॥ सुपात्रीं सर्व भाव । मी तें

सर्व वासुदेव । जाणती कृपाळ संत महानुभाव । जया भिन्न भेद नाहीं ठाव गा ।। ५ ।। शूर दान जीवे उदार । नाहीं वासुदेवी विसर । कीर्ति वाटे चराचर । तुका म्हणे तया नमस्कार गा ।। ६ ।।

६५. बोल बोले अबोले । जागे बाहेर आंत निजेले । कैसें घरांत घरकुल केलें । नेणों अंधार ना उजेडलें गा ।। १ ।। वासुदेव करितो फेरा । वाडियांत बाहेर दारा । कोणी कांहीं-तरी दान पुण्य करा । जाब न द्याल तरी जातों माघारा गा ।। २ ।। हातीं टाळ दिंडी मुखीं नाम गाणें । गजर होतो बहु मोठ्यानें । नाहीं निवडलीं थोर लहानें । नका निजों भिकेच्या भेणें गा ।। ३ ।। मी वासुदेव तत्त्वता । कळों येईल विचारितां । आहे ठाऊका सभाग्य संतां । नाहीं दुजा आणिक मागता गा ।। ४ ।। काय जागाचि निजलासी । सुनें जागवूनि दारापासीं । तुझ्या हितासाठीं करी वसवसी । भेटी न घेसी वासुदेवासी गा ।।५।। ऐसें जागाविले अवघे जन । होतें संचित तिहीं केलें दान । तुका म्हणे दुबळी कोण कोण । गेली वासुदेवा विसरून गा ।। ६ ।।

६६. रामकृष्ण गीतीं गात । टाळ चिपळया वाजवीत । छंदे आपुलिया नाचत । नीज घेऊनी फिरत गा ।। १ ।। जनीं वनीं अवघा देव । वासनेचा पुसावा ठाव । मग बोळगा तो वासुदेव । ऐसा मनीं वसूं द्यावा भाव गा ।।२।। निज नामाची थोर आवडी । वासुदेवासी लागली गोडी । मुखीं नाम उच्चारी घडोघडीं । ऐसी करा वासुदेवीं जोडी गा ।। ३ ।। अवघा सारूनि शेवट झाला । प्रयत्न न चले कांहीं केला । जागा होई सांडूनि झोंपेला । दान देई वासुदेवाला गा ।। ४ ।।

तुका म्हणे रे धन्य त्याचें जिणें। जिहीं घातलें वासुदेवा दान। तया नलगे येणें जाणें। झालें वासुदेवी राहणें गा ॥५॥

६७. गातों वासुदेव मी ऐका। चिय ठायीं ठेवुनि भावें एका। डोळे झांकुनि रात्र करूं नका। काळ करीत बैसलासे लेखा गा ॥ १ ॥ राम राम स्मरा आधीं। लाहो करा गांठ घाला मूळबंदीं। सांडा बाउगिया उपाधी। लक्ष लावुनि राहा गोविंदीं गा ॥ २ ॥ अल्प आयुष्य मानव देह शत गणिलें तें अर्ध रात्र खाय। पुढें बालत्व पीडा रोग क्षय काय भजनासी उरलें तें पाहें गा ॥ ३ ॥ क्षणभंगुर नाहीं भरंवसा। व्हा रे सावध सोडा माया आशा। कांहीं न चले मग गळां पडेल फांसा। पुढें हुशार थोर आहे ओळसा गा ॥४॥ कांहीं थोडें बहुत लागपाठ। करा भक्तिभाव धरा बळकट। तन मन ध्यान द्या लावुनियां नीट। जरी करणें असेल गोड शेवट गा ॥ ५ ॥ विनवितों सकळां जनां। कर जोडोनि थोरां लहानां। दान इतुकेंचि द्या मज दीना। म्हणे तुकयाबंधु राम म्हणा गा ॥ ६ ॥

६८. गेले टळले प्रहर तीन। काय निद्सुरा निजसी अझून। जागे होऊनि करा कांहीं दान। नका झांकूं ऐकोनि लोचन गा ॥ १ ॥ हरे रामकृष्णा। वासुदेव जाणवितसे जना। चिपळ्या टाळ हातीं वीणा। मुखीं घोष नारायणा गा ॥ २ ॥ जें ठाकेल कोणा कांहीं। फळ पुष्प अथवा तोयीं। द्या परी मीस घेऊं नका भाई। पुढें विन्मुख होतां बरें नाहीं गा ॥ ३ ॥ देवाकारणें भाव तस्मात। द्यावें नलगे फारसें वित्त। झालें एकचित्त तरी बहुत। एवढ्यासाठीं नका करूं वाताहात गा ॥ ४ ॥ आलों येथवरी बहु सायासें। करितां दान होचि

मागायास । नका भार घेऊं करूं निरास ! धर्म सार फळ संसारास गा ॥ ५ ॥ आतां मागुता येईल फेरा । हें तों न घडे या नगरा । म्हणे तुकयाबंधु भाव धरा । ओळखी नाहीं नाल अघोरा गा ॥ ६ ॥

६९. मनुराजा एक देहपुरीं । असे नांदतु त्यासी दोघी नारी । पुत्रपौत्रसंपन्न भारी । तेणें कृपा केली आम्हांवरी गा ॥ १ ॥ म्हणऊनी आलों या देशा । होतों नाहीं तरी भुललों दिशा । दाता तोही मज भेटला इच्छा । येऊनि मारग दाविला सरिसा गा ॥ २ ॥ सवें घेऊनि चौघे जण । आला कुमर सुलक्षण । कडे चुकवूनी कांटघण । ऐका आणिलीं ती कोण कोण गा ॥ ३ ॥ पुढें भक्तीनें धरिलें हातीं । मागें ज्ञान वैराग्य धर्म येती । स्थिर केलीं जीं आचपळें होतीं । सिद्ध आणानि लाविली पंथी गा ॥ ४ ॥ केले उपकार सांगों काय । बाप न करी ऐसी माय । धर्में त्याच्या हे देखियले पाय । दिले अक्षय अभय दान गा ॥५॥ होतों पीडित हिंडतां गांव । पोट भरे ना राहावया ठाव । तो येणें अवघा संदेह । म्हणे फेडियेला तुकयाचा बांधव गा ॥ ६ ॥

७०. ओले मृत्तिकेचे मंदिर । आंत सहाजण उंदीर । गुंफा करितातीं पोखर । याचा नका करूं अंगीकार गा ॥१॥ वासुदेव करितो फेरा । तूं अद्यापि कां निदसुरा । सावध होईल रे गव्हारा । भज भज तूं शारंगधरा गा ॥ २ ॥ बा तुझें तूं सोयरें । तूंचि वडील बा धोरें । तूं तुझेनि आधारें । वरकड मिळाले ते अवघे चोर गा ॥ ३ ॥ वासुदेव फोडितो टाहो । उठीं उठीं लवलाहो । हा दुर्लभ मानवदेहो । म्हणे तुकयाबंधु स्वहित लवलाहो गा ॥ ४ ॥

७१. ॐ नमो भगवते वासुदेवाय । द्वादशाक्षरी मंत्र न जपासि काह्या ।। ध्रु० ।। वोडियाणा बंध घालूनि देहुडा लागसील पावो । वोतप्रोत सांडुनि मना धरासि अहंभावो । ओंकारबिंदुचा तूं न पवसी ठावो । वोळगे वोळगे कृष्ण द्वारावतियें रावो ।। १ ।। नागिणी उत्साहें नवहि द्वारें निरोधून ! नाडित्रयामाजीं सुषुम्नासंचरण । न साधे हा मार्ग ऐसें बोलता मुनिजन । नरहरिचिंतने अहर्निशीं मुक्तिस्थान ।। २ ।। मोडिसी करचरण तेणें पावसी अंत-समो । मोहो तृष्णा न तुटे ब्रह्मविद्या केवीं गमो । मोठा हा अन्यायो जे हरिचरणीं नाहीं नमो । मोक्षाची चाड तरी मुकुंदीं मन रमो ।। ३ ।। भांबावसी झणें हें शरीर कर्दळी-स्तंभ । भस्म क्रमि विष्टा उभें आहे तों सुशोभ । भाविता कीटकी झाली भृंगी तिया क्रामिलें नभ । भावें भक्ति सुलभ वोळगा वोळगा पद्मनाभ ।। ४ ।। गति मति इंद्रियें जंव आहेती समयोग । गणितां आयुष्य न पुरे जंव हें नवचे भंग । गमला हाचि योग जे अनुसरावा श्रीरंग । गरुडध्वजप्रसादें निस्तरिजे भवतरंग ।। ५ ।। वनीं सिंह वसतां गर्जी मदु केवीं धरावा । वन्हिदग्धबीज त्यासी अंकुर केवीं फुटावा । वज्रपाणि कोपलिया गिरीं उदधि केवीं लंघावा । वदनीं हरि उच्चारी तेणें संसार केवीं भुंजावा ।। ६ ।। तेज नयनींचा भानु जेणें तेजें मीनले ते । त्याचें मानसींचा चंद्रमा तो शिंपोते अमृतें । त्याचें नाभि-कमळीं ब्रह्मा तेणें सृजिलीं सकळहीं भूतें । तें विराट स्वरूप ओळखावें विष्णुभक्तें ।। ७ ।। वाताघातें फुटे गगनीं मेघांचा मेळावा । वारिबिंदु पद्मिणीपत्रीं केवीं हो ठवावा । वानराच्या

हातीं चिंतामणी कैंवीं द्यावा । वासुदेवाचिंतनें तोचि कल्मष उठावा ॥ ८ ॥ सूक्ष्म स्थूळ भूतें चाळितां हें परमहंसु ॥ शूळपाणी देवोदेवी जयाचा रे अंशु । शुभाशुभीं कर्मीं न करी नामाचा आळसु । सुखें निरंतरीं ध्याई ध्याई हृषीकेशु ॥९॥ देव देउनी उदार भक्तां देतो अमरपदें । देतां न म्हणे साना थोर वैरियासी तेंचि दे । देहे सार्थक अंतीं वासुदेव आद्य छंदें । देखा अजामेळ उद्धरिला नामें येणें मुकुंद ॥१०॥ वाडा सायासीं मनुष्यजन्म पावावा । त्रियाला पुरुपार्थ तो कां वायां दवडावा । वाचा मनें करूनी मुरारी बोळगावा । व्रतें एकादशी करूनी परलोक ठाकावा ॥ ११ ॥ या धनाचा न धरी विश्वास जैसी तरुवरछाया । यातायाती न चुके तरी हे भोगिसील काया । या हरिभजनेंवीण तुझें जन्म जातें वायां । यालागीं वैकुंठनाथाच्या तूं चिंती पां रे पाया ॥ १२ ॥ इहींच द्वादशाक्षरीं ध्रुव अढळपद पावला । प्रल्हाद रक्षिला अग्निशस्त्रा-पासुनी जळा । बापरखुमादेवीवरु विठ्ठलु तुम्ही ध्या रे वेळोवेळां । तो कळिकाळापासुनी सोडवील अवलीळा ॥ १३ ॥

## आंधळे व पांगळे

७२. पूर्वजन्मीं पाप केलें तें हें बहु विस्तारलें । विषयसुख नाशिवंत सेवितां तिमिर कोंदलें । चौऱ्यांशीं लक्ष योनी फिरतां दुःख भोगिलें । ज्ञानदृष्टि हारपली दोन्ही नेत्र आंधळे ॥ १ ॥ धर्म जागो सदैवांचा जे बा पर उपकारी । आंधळ्या दृष्टिदाते त्याचें नांव मी उच्चारीं ॥ २ ॥ संसार दुःखमूळ चहूंकडे इंगळ । विश्रांति नाहीं कोठें रात्रंदिवस तळमळ । काम क्रोध लोभ शुनीं पाठीं लागलीं ओढाळ ।

कवणा शरण जाऊं आतां दृष्टि देईल निर्मळ ।। ३ ।। माता पिता बंधु बहिणी कोणी न पवती निर्वाणीं । इष्ट मित्र सज्जन सखे हे तों सुखाची मांडणी । एकला मी दुःख भोगी कुंभपाक जाचणी । तेथें कोणी सोडवीना एका सद्गुरुवांचुनी ।। ४ ।। साधुसंत मायबाप तिहीं केलें कृपादान । पंढरिये यात्रे नेलें घडलें चंद्रभागे स्नान । पुंडलीक वैद्यराजें पूर्वीं साधिलें साधन । वैकुंठींचें मूळपीठ डोळां घातलें तें अंजन ।। ५ ।। कृष्णांजन एक वेळां डोळां घालितां अढळ । तिमिर दुःख गेलें फिटले भ्रांति-पडळ । श्रीगुरु निवृत्तिरायें मार्ग दाविला सोज्वळ । बापरखुमा-देविवरु विठ्ठल दीनाचा दयाळ ।। ६ ।।

७३. देवा तुज चुकलों गा तेणें दृष्टी आलें पडळ । विषय-ग्रंथीं गुंतलोंसें तेणें होतसें विव्हळ । अंध मंद दृष्टि झाली गिळूं पाहे हा काळ । अवचित दैवयोगें निवृत्ति भेटला कृपाळ ।। १ ।। धर्म जागो निवृत्तीचा तेणें फेडिलें पडळ । ज्ञानाचा निजबोधु विज्ञानरूप सकळ ।। २ ।। तिहीं लोकीं विश्वरूप दिव्य दृष्टि दिधली । द्वैत हें हरपलें अद्वैतपणें माउली । उपदेश निजब्रह्म ज्ञानांजन साऊली । चिद्रूप दीप पाहे तेथें तनुमनु निवाली ।। ३ ।। दान हेंचि आम्हां गोड देहीं दृष्टि मुराली । देह हें हरपलें विदेहवृत्ति स्फुरली । विज्ञान हें प्रकटलें ज्ञेयज्ञाता निमाली । दृश्य ते तदाकार ममता तेथें बुडाली ।। ४ ।। प्रपंचु हा नाहीं जाणा एकाकारवृत्ति झाली । मी माझें हरपलें विषयांध या बोली । उपरती सद्गुरुबोधु तेथें प्रकृति संचली । धर्ममार्गें शुद्ध पंथ हातीं काठी दिधली ।। ५ ।। वेदमार्गें मुनी गेले याचि मार्गें चालिलों । न कळेचि विषयअंधा म्हणोनि उघड

बोलिलों । चालतां धनुर्धरा तरंगाकारीं हारपलों । ज्ञानदेवो निवृत्तीचा द्वैत सर्व निरसलों ॥ ६ ॥

७४. जंबुया द्वीपामाजीं एक पंढरपूर गांव । धर्माचें नगर देखा विठो पाटील त्याचें नांव । चला जाऊं तया ठाया कांहीं भोजन मागाया ॥ १ ॥ विठोबाचा धर्म जागो त्याचे चरणीं लक्ष लागो ॥ध्रु०॥ ज्यासीं नाहीं पंख पाय नेणें करावें तें काय । शुद्ध भाव धरोनियां पंढरीसी जाय । इच्छिलें फळ देतो यासी नवलाय काय ॥ २ ॥ सुदामा ब्राह्मण दुःखें दरिद्रें पीडिला । मुष्टि पोहे घेऊनि त्याचे भेटीलागीं गेला । शुद्ध भाव देखोनियां गांव सोनियाचा दिला ॥ ३ ॥ गण आणि गोत्रज सर्व हांसताती मज । गेले याचें मनुष्यपण येणें सांडियेली लाज । विनवितो शिंपी नामा संतचरणींचा रज ॥ ४ ॥

७५. पंढरपूर पाटणीं गा महाराज सार्वभौम । पांडुरंग दीनबंधु जयाचें तें नाम ॥ १ ॥ आंधळ्या जीवींचे तो जाणतो धर्म । म्हणोनि आलों गा देई माझें मज वर्म ॥ २ ॥ असोनि हात पाय डोळे जाहलों मी आंधळा । मुखीं नाम तुझें लागला वाचेसी चाळा ॥३॥ देऊनि दान मातें नाम सांगें ये काळीं । विठोबाचें दान आलें ऐसी देईन आरोळी ॥ ४ ॥ दान पावलें संत संगें भक्तीचें । एका जनार्दनीं अखंड नाम वाचे ॥ ५ ॥

७६. मृत्युलोकीं एक नगर त्याचें नांव पंढरपूर । तेथील मोकाशी उभा असे विटेवर । पुंडलिक भक्तराज शोभे चंद्रभागातीर । बोलती साधुसंत जीवा वाटे हुरहुर ॥ १ ॥ तुम्ही संत मायबाप एवढा उपकार करा । न्या मज तेथवरी दाखवा दीनांचा सोयरा ॥ २ ॥ मज नाहीं हात पाय डोळां पडली झांपड । कर्ण हे बधिर झाले वाचा बोले बोबड । नाक मुरा

गळूं लागले लाळ आणि शेंबुड । श्वानापरी गती झाली अवघे करिती हाड हाड ॥३॥ साधुसंत मायबाप जे का दयेचे सागर । भावाचें मुख्य स्थान भक्तीचें माहेर । तिहीं केलें कृपादान मस्तकीं ठेविला कर । माया मोह निरसली शुद्ध झालें कलेवर ॥ ४ ॥ बोध दिला मज सांगातें मार्ग दाविला नीट । भ्रांति हें समूळ गेली दिसूं लागली वाट ।- नाचत प्रेमछंदें लागलों सपाट । एका जनार्दनीं पावलों पंढरी पेठ ॥ ५ ॥

७७. मी माझे कल्पनेने झालोसें पांगूळ । चालतां न चलवेचि कोठें न मिळें स्थळ । हिंडलों दिशा दाही श्रम झाला केवळ । कवण ही भ्रांति वारी कैं भेटेल गुरु दयाळ ॥ १ ॥ धर्म जागो गुरुमहिमा देहीं दाविला देव । निवारूनि भवर जाळें अवघा निरसला भेव ॥ २ ॥ कर्म त्या अकर्माच्या लागतीं वाटे ठेंसा । संपत्ती विपत्तीचा मानिला भरंवसा । कन्या पुत्र आप्तजन हा तो सहज वोळसा । या भ्रमडोहीं बुडालों धांवे गुरुराया सर्वेशा ॥ ३ ॥ येऊनि गुरुनाथें माथां ठेविला करु । अज्ञानतिमिर गेलें शुद्ध मार्ग साचारू । गर्जत चालियेलों फिटला अज्ञान अंधारु । एका जनार्दनीं माझा श्रीगुरु उदारू ॥ ४ ॥

७८. पांगुळ झालों देवा नाहीं हात ना पाय । बैसलों जयावरी सैराट तें जाय । खेटितां कुंप कांटी खूंट दरडी न पाहे । आधार नाहीं कोणी मज बाप ना माय ॥ १ ॥ दाते हो दान करा जाते पंढरपुरा । न्या मज तथवरी आखमाचा सोयरा ॥ २ ॥ हिंडतां गव्हानें गा शिणलों येरझारीं । न मिळेचि दाता कोणी जन्मदुःख निवारी । कीर्ति हे संतांमुखीं तो मज दाखवा हरी । पांगुळा पाय देतां नांदे पंढरपुरीं

॥ ३ ॥ या पोटाकारणें गा झालों पांगिला जना । न सरेचि मायबाप भिके नाही खंडणा । पुढारा म्हणती एक तया नाहीं करुणा । श्वान हें लागे पाठीं आशा बहु दारुणा ॥ ४ ॥ काय मी चुकलों गा मागें नेणवेंचि कांहीं । न कळेंचि पापपुण्य तो मज आठव नाहीं । मी माजीं भुललों गा दीप पतंगाचे सोयी । द्या मज जीवदान संत महानुभाव कांहीं ॥ ५ ॥ दूरोनि आलों मी गा दुःख झालें दारुण । यावया येथवरी होतें हेंचि कारण । दुर्लभ भेटी तुम्हां पायीं झालें दरुशन । विनवितो तुका संतां दोन्ही कर जोडून ॥ ६ ॥

७९. देखत होतों आधीं मागें पुढें सकळ । मग हे दृष्टि गेली वरी आलें पडळ । तिमिर कोंदलेसे वाढे वाढतां प्रबळ । भीत मी झालों देवा काय ज्यादयाचें फळ ॥ १ ॥ आतां मज दृष्टि देई पांडुरंग मायबापा । शरण आलों आतां निवारूनियां पापा । अंजन लेववूनि करीं मारग सोपा । जाईन सिद्धपंथें अवघ्या चुकतील खेपा ॥ २ ॥ होतसे खेद चित्ता कांहीं नाठवे विचार । जात होतों जनामागें तोही सांडिला आधार । हा ना तो ठाव झाला अवघा पडिला अंधार । फिरलीं माझीं मज कोणी न देती आधार ॥ ३ ॥ जोंवरी चळण गा तोंवरी म्हणती माझा । मानिती लहान थोर देह सुखाच्या काजा । इंद्रियें मावळलीं आला बागुल आजा । कैसा विपरीत झाला तोचि देह नव्हे दुजा ॥ ४ ॥ गुंतलों या संसारें कैसा झालोंसे अंध । मी माझे वाढवूनी मायातृष्णेचा बाध । स्वहित न दिसेंचि केला आपुला वध । लागले काळ पाठीं सवें काम हे क्रोध ॥५॥ लागती चालतां गा गुणदोषांच्या ठेंसा । सांडिली वाट मार्ग

झालों निराळा कैसा । पाहतों वाट तुझी थोर करूनि आशा । तुका म्हणे वैद्यराजा पंढरीच्या निवासा ।। ६ ।।

८०. आंधळ्यापांगळ्यांचा एक विठोबा दाता । प्रसवला विश्व तोचि सर्व होय जाणता । घडी मोडी हेळामात्रे पापपुण्य संचिता । भवदुःख कोण वारी तुजवांचुनी चिंता ।। १ ।। धर्म गा जागो तुझा तूंचि कृपाळू राजा । जाणसी जीवींचे गा न सांगतां सहजा ।।२।। घातली लोळणी गा पुंडलीकें वाळवंटीं । पंढरी पुण्यठाव नीरे भीवरे तटीं । न देखें दुसरें गा झाली अदृश्य दृष्टी । बोळला प्रेमदाता केली अमृतवृष्टी ।। ३ ।। आणि उपमन्यु एक बाळ धाकुटें । न देखे न चलवे जना जना चालते वाटे । घातली लोळणी गा हरिनाम बोभाटें । पावला त्या कारणें धांव घातली नेटें ।। ४ ।। बैसोनि खोळी शुक राहे गर्भी आंधळा । शीणला येरझारीं दुःख आठवी वेळा । मागील सोसिलें तें ना भी म्हणे गोपाळा । पावला त्या कारणें लाज राखिली कळा ।। ५ ।। न देखे जो या जना तया दावी आपणा ।। वेगळा सुखदुःखा मोहो नाठवी धना । आपपर तेंही नाहीं बंधुवर्ग सज्जना । तुकया तोचि परी झाली पावें नारायणा ।। ६ ।।

८१. सहज मी आंधळा गा निज निराकार पंथें । वृत्ति हे निवृत्त झाली जन न दिसे तेथें । मी माझें हारपलें ठायीं जथींच्या तेथें । अदृश्य तोंचि झाले कांहीं दृश्य जें होतें ।। १ ।। सुखें मी निजलों गा शून्य सारूनि तेथे । त्रिकूट शिखरीं गा दान मिळे आइतें ।। २ ।। टाकिली पात्र झोळी धर्म अधर्म आशा । कोल्हाळ चुकविला त्रिगुणांचा वोळसा । न मागें मी भीक आतां हाचि झाला भरंवसा । बोळली सत्रावी गा तिणें

पुरविली इच्छा ॥ ३ ॥ ऊर्ध्वमुखें आळविला सोहं शब्दाचा नाद । अरूप जागविला दाता घेऊनि छंद । घेऊनि आला दान निजतत्त्व निजबोध । स्वरूपीं मेळविलें नांव ठेविला भेद ॥४॥ शब्द हा बहु सार उपकाराची राशी । म्हणोनि चालविला मागें येतील त्यांसी । मागोनी आली वाट सिद्ध ओळखीची तैसी । तरले तरले गा आणिकही विश्वासी ॥ ५ ॥ वर्म तें एक आहे दृढ धरावा भाव । जाणीव नागवण लागों नेदी तो ठाव । म्हणोनि संग टाकीं सेवीं अद्वैतभाव । तुका म्हणे हाचि संतीं मागें केला उपाय ॥ ६ ॥

८२. देश वेष नव्हे माझा सहज फिरत आलों । करूं सत्ता कवणावरी कोठें स्थिर राहिलों । पाय डोळे म्हणतां माझें तिहीं कैसा मोकलिलों । परदेशी नाहीं कोणी अंध पांगुळ झालों ॥ १ ॥ आतां माझी करी चिंता दान देई भगवंतां । पाठीं पोटीं कोणी निरवी सज्जन संतां ॥ २ ॥ चालतां वाट पुढें भय वाटतें चित्तीं । बहुत जणें गेलीं नाहीं आलीं मागुतीं । न देखें काय झालें कान तरी ऐकती । बैसलों संधिभागीं तुज धरूनी चित्तीं ॥ ३ ॥ भाकितों करुणा गा जैसा सांडिला ठाव । न भरे पोट कधीं नाहीं निश्चळ पाव । हिंडतां भागलों गा लक्ष चौऱ्यांशी गांव । धरूनि राहिलों गा हाचि वसता ठाव ॥४॥ भरंवसा काय आतां कोण आणी अवचिता । तैसीच झाली कीर्ति तया मज बहुतां । म्हणऊनि भारी हांका सोयी पावे पुण्यवंता । लागली भूक थोरी तूंचि कृपाळू दाता ॥५॥ संचित सांडवलें कांहीं होते तें जवळीं । वित्त गोत पूत माया तुटली हे लागावळी । निष्काम झालों देवा होतें माझे कपाळीं । तुका म्हणे तूंचि आतां माझा सर्वस्वें बळी ॥ ६ ॥

८३. भगवंता तुजकारणें मेलों जीताचि कैसी । निष्काम बुद्धि ठेली चळण नाहीं तयासी । न चलती हातपाय दृष्टि फिरली कैसी । जाणतां न देखों या क्षर आणि अक्षरासी ॥१॥ विठोबा दान दें गा तुझ्यासारिखें नामा । कीर्ति हे वाखाणिली थोर वाढली सीमा ॥२॥ भुक्ति मुक्ति तूंचि एक होसी सिद्धींचा दाता । म्हणोनि सांडवली शोक भय लज्जा चिंता । सर्वस्वें त्याग केला धांव घातली आतां । कृपादान देई देवा येउनि सामोरा आतां ॥ ३ ॥ संसारसागरु गा भवदुःखाचें मूळ । जनवाद अंथरुण माजीं केलें इंगळ । इंद्रियें वज्रघातें तपे उष्ण वरी जाळ । सोसिलें काय करूं दुर्भर हे चांडाळ ॥ ४ ॥ तिहीं लोकीं तुझें नाम वृक्ष पल्लव शाखा । वेंघलों वरी खोडा भाव धरूनी टेका । जाणवी नरनारी जागो चरम लोकां । पावती पुण्यवंत सोई आमुचिये हांका ॥ ५ ॥ नाठवे आपपर आतां काय बा करूं । सारिखा दोहीसवा हारपला विचारु । घातला योगक्षेम तुज आपुला भारु । तुकया शरणागत देई अभयकरु ॥ ६ ॥

## जोगी

८४. जग जोगी जग जोगी । जाग जाग बोलती ॥ १ ॥ जागता जगदेव । राखा कांहीं भाव ॥ २ ॥ अवघा क्षेत्रपाळ । पूजावा सकळ ॥ ३ ॥ पूजा पत्र कांहीं । फळ पुष्प तोय ॥४॥ बहुतां दिसां फेरा । आला या नगरा ॥ ५ ॥ नका घेऊं भार । धर्म तोचि सार ॥६॥ तुका मागे दान । द्यावें जी अनन्य ॥७॥

## बाळछंद

८५. अलक्ष लक्षीं मी लक्षीं । तेथें दिसती दोन्ही पक्षी ।

वेदशास्त्रां हेचि साक्षी । चंद्रसूर्यांसहित । मागेन स्वानुभाव अंगुलें । पांचां तत्त्वांचें सानुलें । व्यर्थ इंद्रियें भोगिलें । नाहीं रंगलें संतचरणीं ॥ १ ॥ बाळछंदो बाबा बाळछंदो । रामकृष्ण नित्य उदो । हृदयकळिके भाव भेदो । वृत्तिसहित शरीर निंदो । नित्य उदो तुझाचि ॥ २ ॥ क्षीरसिंधुही दुहिला । चतुर्दशरत्नीं भरला । नेघे तेथील साउला । मज अबोला प्रपंचेसी । दान दे गा उदार श्रेष्ठा । परब्रह्म तूं वैकुंठा । मुक्ति मार्गींचा चोहटा । फुकटा नेघे तया ॥ ३ ॥ पृथ्वी तळ राज्यपद । मी नेघे नेणें हेंही पद । रामकृष्ण वाचें गोविंद । हाचि छंद तुझ्या पंथे । मंत्र तीर्थ यज्ञ याग । या न करी भागाभाग । तूंचि होऊनि सर्वांग । सर्व संग मज देई ॥ ४ ॥ वृत्तिसहित मज लपवीं । माझें मन चरणीं ठेवीं । निवृत्ति पदोपदीं गोवीं । तूं गोसावी दीनोद्धरण । सात पांच तीन मेळा । या नेघे तत्त्वांचा सोहळा । रजतमाचा कंटाळा । हृदयीं जिव्हाळा हरि वसो ॥ ५ ॥ श्वेत पीत नेघें वस्त्र । ज्ञानविज्ञान नेघे शास्त्र । स्वर्ग मृत्यु पाताळ पात्र । नित्य वस्त्र हरि देई । चंद सूर्य महेंद्र पदें । ध्रुवादिकांची आनंदे । ते मी नेघे गा आल्हादें । तुझ्या ब्रीदे करीन घोप ॥६॥ कर चरणेंसि इंद्रिय वृत्ति । तुझ्या ठायीं तूंचि होती । मी माझी उरो नेदी कीर्ति । हें दान श्रीपती मज द्यावें ॥७॥ शांति दया क्षमा ऋद्धी । हेहि पाहतां मज उपाधि । तुझिया नामाची समाधीं । कृपानिधी मज द्यावी ॥ ८ ॥ बापरखुमादेवीवरू तुष्टला । दान घे घे म्हणोनि बोळला । अजानवृक्ष पाल्हाइला । मग तो बोलिला विठ्ठल हरी ॥ ९ ॥ पुंडलीकें केलें रे कोडे । तें तुवां मागितले रे निवाडे । मी तुज हृदयीं सांपडें । हें त्वां केलें

ज्ञानदेवा ॥१०॥ ज्ञानदेवें घेतलें दान । हृदयीं धरोनिया ध्यान । समाधी बैसला निर्वाण । कथाकीर्तन करितु ॥११॥ बाळछंदो बावीस जन्में । तोडिली भवाब्धीचीं कर्में । चंद्रार्क तारांगणें । रश्मी दान घेतला हरी ॥ १२ ॥

## दळण

८६. येई हो कान्हाई मी दळीन एकली । एकली दळित शिणले हात लावी पहिली ॥ धृ० ॥ वैराग्य जातें मांडुनि विवेक खुंटा थापटोनी । अनुहते दळण मांडुनि त्रिगुण वरणी घातलें ॥१॥ स्थूळ सूक्ष्म दाळियेलें देहकारणासहित । महाकारण दाळियेलें औट मात्रेसहित ॥२॥ दशा दोन्ही दाळिल्या द्वैत अद्वैतासहित । दाही व्यापक दाळियेलें अहंसोहंसाहित ॥ ३ ॥ एकवीस स्वर्ग दाळिगेले चवदा भुवनांसहित । सप्त पाताळें दाळियेलीं सप्त सागरांसहित ॥४॥ बारा सोळा दाळियेल्या सत्रावीसहित । चंद्र सूर्य दाळियेले तारांगणांसहित ॥ ५ ॥ नक्षत्र वैरण घालुनी नवग्रहांसहित । तेहतीस कोटी देव दाळियेले ब्रह्माविष्णुसहित ॥ ६ ॥ ज्ञान अज्ञान दाळियेलें विज्ञानासहित । मीतूंपण दाळियेलें जन्ममरणासहित ॥७॥ ऐसें दळण दाळियेलें दोनी तळ्यांसहित । एका जनार्दनीं कांहीं नाहीं उरलें द्वैत ॥ ८ ॥

## जातें

८७. सुंदर माझें जातें गे फिरे बहुतेकें । ओव्या गाऊं कौतुकें तू ये रे बा विठ्ठला ॥ १ ॥ जीव शिव दोनी खुंटे गे प्रपंचाचे नेटें गे । लावुनि पांचीं बोटे गे तूं ये रे बा विठ्ठला ॥ २ ॥ सासु आणि सासरा दीर तो तिसरा । ओव्या गाऊं भ्रतारा तूं ये रे बा विठ्ठला ॥ ३ ॥ बारा सोळा गडणी अवघ्या

कामिनी । ओव्या गाऊं बसूनि तूं येरे बा विठ्ठला ।। ४।। प्रपंच दळण दळिलें पीठ भरिलें । सासुपुढें ठेविलें तूं येरे बा विठ्ठला ।। ५ ।। सत्त्वाचें आधण ठेविले पुण्य वैरिलें । पाप तें उतूं गेलें तूं येरे बा विठ्ठला ।। ६ ।। जनी जातें गाईल कीर्त राहील । थोडासा लाभ होईल तूं येरे बा विठ्ठला ।। ७ ।।

## जोहार

८८. जोहार मायबाप जोहार । मी सकळ संतांचा महार । सांगतों दृढ विचार । तो ऐका की जी मायबाप ।। १ ।। माझा विचार नारदें ऐकिला । तो पुनः रूपा नाहीं आला । भीष्म ध्रुव प्रल्हाद आगळा । या विचारें बोधिलें की जी मायबाप ।।२।। उपमन्यू बिभीषण । सर्वांमाजीं अर्जुन । आणिकही ऋषी सांगेन सावध ऐका की जी मायबाप ।। ३ ।। पराशर विश्वामित्रादि जाण । या विचारें पावलें समाधान । हरिश्चंद्र शिबी सुखसंपन्न । झाले की जी मायबाप ।।४।। ऐशा विचारें चालले । ते पुनरपि नाहीं आले । एका जनार्दनीं भले । ऐक्यपण कीं जी मायबाप ।। ५ ।।

## मुका

८९. मुका झालों वाचा गेली ।। ध्रु० ।। होतो पंडित महाज्ञानी । दशग्रंथ षड्शास्त्र पुराणी । चारी वेद मुखोद्गत वाणी । गर्वामध्यें झाली सर्व हानी ।। १ ।। जिव्हा लाचावली भोजना । दुग्ध घृत शर्करा पक्वान्ना । निंदिले उपान्ना । तेणें पातलों मुखबंधना ।। २ ।। साधुसंतांची निंदा केली । हरिभक्तांची स्तुति नाहीं केली । तेणें वाचा पंगु झाली । एका जनार्दनीं कृपा लाधली ।। ३ ।।

## बहिरा

९०. बहिरा झालों या जगीं ॥ ध्रृ० ॥ नाहीं ऐकिलें हरिकीर्तन । नाहीं केलें पुराणश्रवण । नाहीं वेदशास्त्रपठण । गर्भी बहिरा झालों त्यागुणें ॥१॥ नाहीं संतकीर्ति श्रवणीं आली । नाहीं साधुसेवा घडियेली । पितृवचनासी पाठ दिधली । तीर्थ व्रतें असोनि त्यागिलीं ॥ २ ॥ माता भाउली पाचारितां । शब्द नाहीं दिला मागुता । बहिरा झालों नरदेहीं येता । एका जनार्दनीं स्मरेन आतां ॥ ३ ॥

## गौळणी

९१. त्रिभंगी देहुडा ठाव मांडूनिया माये । कल्पद्रुमातळीं वेणु वाजवीत आहे ॥ १ ॥ गोविंदु वो माये गोपाळु वो । सबाह्य अभ्यंतरीं अवघा परमानंदु वो ॥ २ ॥ सांवळे सगुण सकळां जीवांचें जीवन । घनानंद मूर्ति पाहतां हारपलें मन ॥३॥ शून्य स्थावर जंगम व्यापुनि राहिला अकळ । बापरखुमा-देविवरू विठ्ठलु सकळ ॥ ४ ॥

९२. योगियां मुनिजनां ध्यानीं । तें सुख आसनीं शयनीं ॥ १ ॥ हरिसुख फावलें रे । गोकुळींच्या गौळियां गोपी गोधना सकळां ॥ २ ॥ बापरखुमादेवीवरें विठ्ठलें । तें सुख सवंगडियां दिधलें ॥ ३ ॥

९३. तुजविण एकली रे कृष्णा न गमे राती । तंव तुवां नवल केलें वेणु घेऊनि हातीं । आलिये तेचि सोय तुझी ओळखिली गती ॥१॥ नवल हें वालभ रे कैसें जोडलें जीवा । दुसरें दुरी ठेलें प्रीति केला रिघावा ॥ २ ॥ पारु रे पारु कान्हा झणें करिसी अव्हेरु । तूं तंव हृदयींचा होसी चैतन्यचोरु । बापरखुमादेविवरू विठो करी कां अंगीकारू ॥ ३ ॥

९४. कृष्णें वेधिली विरहिणी बोले । चंद्रमा करितो उबारा गे माय । न लवा चंदनु अंगीं न घाला विंजणवारा । हरिविणें शून्य शेजारू गे माय ॥ १ ॥ माझे जिवींचे तुम्ही कां वो नेणां । माझा वळिया तो पंढरीराणा वो माय ॥ २ ॥ नंदनंदनु घडी घडी आणा । तयाविण न वांचती प्राण वो माय । बापरखुमादेविवरु विठ्ठलु गोविंदु । अमृत पान गे माय ॥ ३ ॥

९५. लक्ष लावुनि अंतरीं । कृष्णा पाहती नरनारी । लावण्यसागरु हरि । परमानंदु ॥ १ ॥ छंदे छंदे वेणू वाजे । त्रिभुवनीं घनु गाजे । उतावेळ मन माझें । भेटावया ॥ २ ॥ ब्रह्मविद्येचा पुतळा । गाई राखितो गोवळा । श्रुति नेणवे ते लीळा । वेदां सनकादिकां ॥ ३ ॥ भूतग्रामींचा परेशु । तापत्रयाचा करी नाशु । आड धरुनी गोपवेषु । वत्स राखे ॥ ४ ॥ रासक्रीडा वृंदावनीं खेळे । इंदुवदन मेळें । उद्धरी यदुकुळें । कुळदीपकें ॥५॥ निवृत्तिदासाचा दातारु । बापरखुमादेविवरु । भक्तां देतो अभय करु । क्षणक्षणामाजीं ॥ ६ ॥

९६. याति कुळ माझें गेलें हारपोनी । श्रीरंगांवाचुनी आनु नेणें ॥ १ ॥ किती वो शिकवाल मज वेळोवेळां । मी तया गोवळा रातलिये ॥ २ ॥ अष्टभोग भोगणें मातें नाहीं चाड । भक्तिप्रेम गोड लेइले गे माये ॥ ३ ॥ बापरखुमादेविवरु जीवींचा जिव्हाळा । कांहीं केलिया वेगळा नव्हे गे माये ॥ ४ ॥

९७. भक्तांकारणें येणें घेतलीसे आळी । दहा गर्भवास सोशी वनमाळी ॥ १ ॥ माझा कान्होबाचें तुम्ही नांव बरवें घ्या वो । हृदयीं धरूनी यासी खेळावया न्या वो ॥ २ ॥ कल्पनेविरहित भलतयांमागे । अभिमान सांडुनी दीनापाठीं

लागे ।। ३ ।। शोषिलें पूतना येणें मोहिये लेंकरूं । आळी न संडी बाप रखुमादेविवरू ।। ४ ।।

९८. घनु वाजे घुणघुणा । वारा वाहे रुणझुणा । भवतारकु हा कान्हा वेगीं भेटवा कां ।। १ ।। चांद वो चांदणें । चापे वो चंदनु । देवकीनंदनेवीण नावडे वो ।। २ ।। चंदनाची चोळी । माझें सर्व अंग पोळी । कान्हो वनमाळी वेगीं भेटवा कां ।। ३ ।। सुमनाची सेज । सीतळ वो निकी बोले आगीसारखीं वेगीं विझवा कां ।। ४ ।। तुम्ही गातसा सुस्वरें । ऐकों नेदावीं उत्तरें । कोकिळे वर्जावें तुम्ही बाइयांनो ।। ५ ।। दर्पणीं पाहतां । रूप न दिसे वो आपुलें । बापरखुमादेवीवरू विठ्ठलें मज ऐसें केलें ।। ६ ।।

९९. जयाचिये आवडी संसार त्यजिला । तेणें का अबोला धरिला गे माये । पायां दिधली मिठी घातली जीवें गांठी । साउमा न ये जगजेठी उभा ठेला गे माये ।। १ ।। भेटवा वो त्यासी चरण झाडीन केशीं । सगुणरूपासी मी वो भाळलियें ।।२।। क्षेमालागीं जीव उतावेळ माझा । उचलोनि चारी भुजा देईन क्षेम । कोण्या गुणें कां वो रुसला गोवळु । सुखाचा चावळु मजसी न करी गे माये ।। ३ ।। ऐसें अवस्थेचें पिसें लाविलेंसे कैसें । चित्त नेलें आपाणिया सरिसें गे माये । बापरखुमादेविवरें लाविलें पिसें । करूनि ठेविलें आपाणिया ऐसें गे माये ।। ४ ।।

१००. जीवीचिया जीवा । प्रेमभावाचिया भावा । तुजवांचूनि केशवा आनु नावडे ।। १ ।। जीवें अनुसरलिये । अझुनि कां नये । वेगीं आणावा तो सये प्राण माझा ।। २ ।। सौभाग्य सुंदरू । लावण्यसागरू । बापरखुमादेवीवरू श्रीविठ्ठलु ।। ४ ।।

१०१. पंढरपुरीचा निळा लावण्याचा पुतळा । विठो

देखियेला डोळां बाईये वो ॥ १ ॥ वेधलें वो मन तयाचिया गुणीं । क्षणभर न विसंबे विठ्ठलरुक्मिणी ॥ २ ॥ पौर्णिमेचें चांदणें क्षणक्षणां होय उणें । तैसें माझें जिणें एका विठ्ठलेंविण ॥ ३ ॥ बापरखुमादेवीवरु विठ्ठलाचि पुरे । चित्त चैतन्य मुरे बाईयें वो ॥४॥

१०२. परब्रह्म निष्काम तो हा गौळियां घरी । वाल्या वाळे अंदु कृष्ण नवनीत चोरी ॥ १ ॥ म्हणती गौळणी हरीचीं पाउलें धरा रांगत रांगत येतो हरि हा राज मंदिरा ॥ २ ॥ लपत छपत येतो हरि हा राजभुवनीं । नंदानी टाकुनि आपण बैसें सिंहासनीं ॥ ३ ॥ सांपडला देव्हारां यासी बांधा दाव्यांनीं । शंख चक्र गदा पद्म शारंगपाणी ॥ ४ ॥ बहुतां कष्टें बहुतां पुण्यें जोडलें देवा । अनंत पवाडे तुमचे न कळती मावा ॥ ५ ॥ नामा म्हणे केशवा अहो जी तुम्ही दातारा । जन्माजन्मीं द्यावी तुमची चरणसेवा ॥६॥

१०३. यशोदे घराकडे चाल मला जेवूं घाल ॥ ध्रु०॥ साध्या गव्हाची पोळी लाटी । मसा पुरणपोळी करून दे मोठी । नाहीं अडवीत गुळासाठीं । मला जेवूं घाल ॥ १ ॥ तूप लावून भाकर करी । वांगे भाजून भरीत करी । वर कांद्याची कोशिंबिरी । मला जेवूं घाल ॥ २ ॥ आई ग खडीसाखरेचे खडे । लवकर मला करून दे वडे । बाळ स्फुंदस्फुंदोनी रडे । मला जेवूं घाल ॥ ३ ॥ लहानच घे गे उंडा । लवकर भाजून दे गे मांडा । लांब गेल्या गाईच्या झुंडा । मला जेवूं घाल ॥ ४ ॥ आई मी खाईन शिळा घाटा । दह्याचा गे करून दे मठ्ठा । नाहीं माझ्या अंगीं ताठा । मला जेवूं घाल ॥ ५॥ भाकर बरीच गोड झाली । भक्षूनि भूक हारपली । यशोदेनें कृपा केली । मला जेवूं

घाल ॥६॥ आई मी तुझा एकुलता एक । गाई राखितों नऊ लाख । गाई राखूनि झिजलीं नखं । मला जेवूं घाल ॥ ७ ॥ नामा विनवी केशवासी । गाई राखितो वनासी । जाऊन सांगा यशोदेसी । मला जेवूं घाल ॥८॥

१०४. बाळ सगुण गुणाचें तान्हें गे । बाळ दिसतें गोजिरवाणे गे । काय सांगतां गार्‍हाणें गे । गोकुळींच्या नारी ॥ १ ॥ श्रीरंग माझा वेडा गे । याला नाहीं दुसरा जोडा गे । तुम्ही याची संगत सोडा गे । गोकुळींच्या नारी ॥ २ ॥ पांच वर्षाचें माझे बाळ गे अंगणीं खेळ खेळे गे । कां लटकाच घेतां आळ गे । गोकुळींच्या नारी ॥३॥ सांवळा गे चिमणा माझा गे । गवळणींत खेळे राजा गे । तुम्ही मोठ्या ढालगजा गे । गोकुळींच्या नारी ॥४॥ तुम्ही खाऊन लोण्याचा गोळा गे । आळ घेतां या गोपाळा गे । तुम्ही ठायींच्या वोढाळा गे । गोकुळींच्या नारी ॥५॥ तुम्ही लपवुनि याची गोटी गे । लागतां गे याचे पाठीं गे ही एवढीच रीत खोटी गे । गोकुळींच्या नारी ॥ ६ ॥ तुम्ही लपवून याचा भवरा गे । आळ घेता शारंगधरा गे । तुम्ही बारा घरच्या बारा गे । गोकुळींच्या नारी ॥७॥ हा ब्रह्मविधीचा जनीता गे । तुम्ही याला धरू पाहतां गे । हा कैसा येईल हातां गे गोकुळींच्या नारी ॥८॥ नामा म्हणे यशोदेसी गे । हा तुझा हृषीकेशी गे । किती छळितो आम्हांसी गे गोकुळींच्या नारी ॥९॥

१०५. राधा आणि तो मुरारी । क्रीडताती कुंजवनीं ॥१॥ कृष्ण डोलत डोलत । आले राधेमंदिरांत ॥ २ ॥ सुमनाचे शेजेवरी । राधा आणि तो मुरारी ॥ ३ ॥ आवडीने विडिये देत । दासी जनी उभी तेथ ॥४॥

१०६. वृंदावनीं वेणू कवणाचा माये वाजे । वेणूनादें गोवर्धनु गाजे । पुच्छ पसरूनी मयूर विराजे । मज पाहतां भासती यादवराजे ॥१॥ तृणचारा चरूं विसरली । गाई व्याघ्र एके ठायीं झालीं । पक्षीकुळें निवांत राहिलीं । वैरभाव समूळ विसरलीं ॥ २ ॥ यमुनाजळ स्थिर स्थिर वाहे । रविमंडळ चालतां स्तब्ध होय । शेष कूर्म वराह चकित राहे बाळा स्तन देऊं विसरली माय ॥ ३ ॥ ध्वनी मंजुळ मंजुळ उमटती । वांकी रुणझुण रुणझुण वाजती । देव विमानी बैसोनि स्तुती गाती । भानुदासा फावली प्रेमभक्ती ॥४॥

१०७. गौळणी गाऱ्हाणें सांगती यशोदेसी । दहीदूध खाऊनिया पळोनि जातो हृषीकेशी ॥१॥ लाडका हा कान्हा बाई तुझा तुला गोड वाटे । याच्या खोडी किती सांगू महीपत्र सिंधु आटे ॥२॥ मेळवोनी गोपाळ घरामध्ये शिरे कान्हा । धरूं जातां पळुनी जातो यादवांचा राणा ॥ ३ ॥ ऐसें मज यानें पिसें लावियेलें सांगूं काई । एका जनार्दनीं कायावाचामनें पायीं ॥४॥

१०८. माझा कृष्ण देखिला काय । कोणी तरी सांगा गे ॥ ध्रु० ॥ हातीं घेऊनिया फूल । अंगणीं रांगत आलें मूल । होतें सारवित मी चूल । कैसी भूल पडियेली ॥ १ ॥ माथां शोभे पिंपळपान । मेघवर्ण ऐसा जाण । त्याला म्हणती श्रीभगवान । योगी ध्यान विश्रांती ॥२॥ संगें घेऊनि गोपाळ । बाळ खेळे अळुमाळ । पायीं पोल्हारे झळाळ । गळां माळ वैजयंती ॥३॥ एका जनार्दनीं माय घरोघरांप्रती जाय । कृष्णा जाणावें तें काय । कोणी सांगा गे ॥४॥

१०९. नानापरी समजावितें परी न राहे श्रीहरी । [illegible]

भात कालवोनि दिला वेगीं झडकरी । कडेवरी घेऊनियां फिरले मी द्वारोद्वारीं ॥१॥ राधे राधे राधे राधे घेई शामसुंदरा । नेई आतां झडकरी आपुलिया मंदिरा ॥ २ ॥ क्षणभरी घरीं असतां करी खोडी शारंगपाणी । खेळावया बाहेरी जातां आळ घेती गौळणी । थापटोनि निजवितां पळोनि जातो राजद्वारा ॥३॥ राधा घेऊनि हरीला त्वरें जात मंदिरी । हृदयमंचकी पहुडविला श्रीहरी । एका जनार्दनी हरीला भोगी राधा सुंदरी ॥ ४ ॥

११०. तुझें श्रीमुख सुंदर । कुसुम शुभकांति नागर । कांसे पीतांबर मनोहर । पाहुनी भूल पडली । करुणाघना ॥ ध्रु० ॥ मुरली नको वाजवूं मनमोहना ॥ १ ॥ सरपरता होय माघारा । देहभाव बुडाला सारा । नाहीं संसारासी थारा । भेदभ्रम गेला । कमलनयना ॥२॥ ध्वनि मंजुळ ऐकिला कानीं । सर्व सुखा झाली धणी । एका जनार्दनीं ध्यानीं मनीं । एकपण जगजीवना ॥ ३ ॥

१११. मनमोहन मुरलीवाला । नंदाचा अलबेला ॥ १ ॥ भक्तासाठी तो जगजेठी । कुब्जेसी रत झाला ॥ २ ॥ विदुराघरच्या भक्षूनि कण्या । परमानंदे धाला ॥ ३ ॥ भक्तिसुखें सुखावला । एका जनार्दनीं निमाला ॥ ४ ॥

११२. कशी जाऊं मी वृंदावना । मुरली वाजवितो कान्हा ॥ १ ॥ पैलतीरी हरी वाजवी मुरली । नदी भरली यमुना ॥२॥ कांसे पीतांबर कस्तुरी टिळक । कुंडल शोभे कानां ॥ ३ ॥ काय करूं बाई कोणाला सांगू । नामाची सांगड आणा ॥ ४ ॥ नंदाच्या हरीनें कौतुक केलें । जाणें अंतरीच्या खुणा ॥ ५ ॥ एका जनार्दनीं मनीं म्हणा । देवमहात्म्य कळेना कोणा ॥६॥

११३. भुलविलें वेणुनादे । वेणु वाजविला गोविंदे ॥ १ ॥

पांगुळलें यमुनाजळ । पक्षी राहिलें निश्चळ ॥ २ ॥ तृणचरें लुब्ध झालीं । पुच्छ वाहूनियां ठेलीं ॥ ३ ॥ नाद न समाये त्रिभुवनि । एका भुलला जनार्दनीं ॥ ४ ॥

११४. अधरी धरूनी वेणु । वाजविला कोणी नेणुं ॥ १ ॥ प्रातःकाळी तो वनमाळी । घेऊनी जातो धेनु ॥ २ ॥ उभी मी राहे वाट मी पाहे । केव्हां भेटेल मम कान्हु ॥ ३ ॥ एका जनार्दनी वाजविला वेणु । ऐकतां मन झालें तल्लीनु ॥४॥

११५. तुझ्या मुरलीची ध्वनी । अकल्पित पडली कानीं । विव्हळ झालें अंतःकरणीं । मी घरधंदा विसरलें ॥ ध्रु० ॥ अहा रे सांवळिया । कैसी वाजविली मुरली ॥ १ ॥ मुरली नोहे केवळ बाण । तिनें हरिला माझा प्राण । संसार केला दाणादीन । येऊनि हृदयीं संचरली ॥ २ ॥ तुझ्या मुरलीचा सूरतान । मी विसरलें देहभान । घर सोडोनी धरिलें रान । मी वृंदावनीं गेलें ॥ ३ ॥ एका जनार्दनी गोविंदा । पतितपावन परमानंदा तुझ्या नामाचा मज धंदा । वृत्ति तंव पदीं निवर्तली ॥ ४ ॥

११६. मुरली मनोहर रे माधव ॥ ध्रु० ॥ श्रीवत्सलांच्छन हृदयीं विलासन । दीन दयाघन रे ॥ १ ॥ सुरनर किन्नर नारद तुंबर । गाती निरंतर रे ॥ २ ॥ एका जनार्दनीं त्रिभुवन मोहन । राखीत गोधन रे ॥ ३ ॥

११७. दुडीवरी दुडी गौळणी साते निघाली । गौळण गोरस म्हणों विसरली ॥ १ ॥ गोविंद घ्या कोणी दामोदरु घ्या गे । तंव तंव हासती मथुरेच्या गे ॥२॥ दुडियामाझा कान्होबा झाला भारी । उचंबळे गोरस सांडे बाहेरी ॥ ३ ॥ एका जनार्दनीं सबलस गौळणी । ब्रह्मानंदु न समाये मनीं ॥ ४ ॥

११८. खांद्यावरी कांबळी हातामधीं काठी । चारीतसे धेनु सांवळा जगजेठी ॥१॥ राधे राधे राधे राधे मुकुंद मुरारी । वाजविता वेणु कान्हा श्रीहरी ॥२॥ एक एक गौळणी एक एक गोपाळ । हातीं धरूनि नाचती रासमंडळा ॥ ३ ॥ एका जनार्दनीं रासमंडळ रचिलें । जिकडे पाहे तिकडे अवघें ब्रह्मचि कोंदलें ॥ ४ ॥

११९. ऐक ऐक सखये बाई । नवल मी सांगू काई । त्रिलोक्याचा धनी तो हा । यशोदेशी म्हणतो आई ॥ १ ॥ देवकीनें वाहिला ॥ यशोदेनें पाळिला । पांडवांचा बंदिजन होऊनियां राहिला ॥ २ ॥ ब्रह्मांडाची सांठवण । योगियांचे निजधन । चोरी केली म्हणऊन । उखळासी बंधन ॥ ३ ॥ सकळ तीर्थें जया चरणीं । सुलभ हा शूळपाणी । राधिकेसी म्हणे तुझी । करीन मी वेणीफणी ॥४॥ शरण एका जनार्दनीं । कैवल्याचा मोक्षदानीं । गाई गोप गोपीबाळा । मेळविले आपुलेपणीं ॥ ५ ॥

१२०. कृष्णमूर्ति होय गे । कळों आली सोय गे । प्राणा-चाही प्राण पाहतां सुख सांगूं काय गे ॥ १ ॥ तुळसीहार गळा गे । कस्तुरीचा टिळा गे । अर्धांगी रुक्मिणी विंझणें वारिती गोपीबाळा गे ॥२॥ पीतांबराची कांस गे । कसिली सावकाश गे । नारद तुंबर गायन करिती पुढें निज दास गे ॥ ३ ॥ भक्तकृपेची माय गे । ओळखिली विठाय गे । एका जनार्दनीं विटे जोडियेले पाय गे ॥ ४ ॥

१२१. कृष्णाला भुलविले गोपीनें ॥ ध्रु० ॥ यशोदे तुझा हा कान्हा राहीना । मी मारीन क्रोधानें ॥ १ ॥ नंदजी तुमचा कृष्ण लाडका । हाका मारितो मोठ्यानें ॥ २ ॥ घेताटी घेऊनी

नावेंत बैसला । वांचविलें देवानें ॥ ३ ॥ एका जनार्दनीं पूर्ण कृपेनें । नाहीं ऐकिलें मातेनें ॥ ४ ॥

१२२. कसा मला टाकुनी गेला राम ॥ध्रु०॥ रामाविण जीव व्याकूळ होतो । सुचत नाहीं काम ॥ १ ॥ रामाविण मज चैन पडेना । नाहीं जीवासी आराम ॥ २ ॥ एका जनार्दनीं पाहुनी डोळा । स्वरुप तुझें घनश्याम ॥ ३ ॥

१२३. तुझी संगति नाहीं कामाची । मी सुंदरा कोवळ्या मनाची । मज दृष्टि होईल साची मग तुझी घेईन चर्या ॥ १ ॥ कसें वेड लाविलें कान्हो गोवळीयां ॥ ध्रु० ॥ माझा वंश आहे मोठ्याचा । तूं तंव यातीहीन गौळ्याचा । ऐक्य झालीया नांवरूपाचा ठावचि पुसलियां ॥ २ ॥ तुझ्या अंगीची धुरट घाणी । तनु काय दिसती वोंगळवाणी । मुरली वाजविसी मंजुळवाणी । मनमोहन कान्हया ॥३॥ तुझ्या ठिकाणी अवगुण मोठा । चोरी करूनि भरिसी पोटा । व्रजनारी सुंदरा चावटा । अडविसी अवगुणिया ॥ ४ ॥ सर्व सुखाची कृष्णसंगती । वेणुनादें गाई गोप वेधती । एका जनार्दनीं हरिरूपीं रमती । त्या व्रजसुंदरीया ॥ ५ ॥

१२४. गोधनें चाराया जातो शारंगपाणी । मार्गी भेटली राधिका गौळणी । कृष्ण दान मागे निरी आसडोनी । तंव ती देखिली यशोदा जननी ॥१॥ यशोदा म्हणे नाटका हृषीकेशी । परनारीसी कैसा रे झोंबसी । येरु रुदत सांगतो मातेपासीं । माझा चेंडू लपविला नीरीपाशीं ॥ २ ॥ राधिका म्हणे यशोदे परीयेसी । चेंडू नाहीं नाहीं वो मजपासी । परि हा लटिका लबाड हृषीकेशी । निरी आसडितां चेंडू पडे धरणीसी ॥ ३ ॥ यशोदा म्हणे बाळका तुम्हीं नारी । मार्गी क्रमतां क्षण एक सारा ।

एका जनार्दनीं विनवी श्रीहरी । नाम घेतां पातकें जाती दुरी ।।४।।

१२५. कान्हया रे जगजेठी । देई भेटी एक वेळे ।।१।। काय मोकलिलें वनीं । सावजांनी वेढिले ।। २ ।। येथवरी होता संग । अंगें अंग लपविलें ।। ३ ।। तुका म्हणे पाहिले मागे । एवढ्या वेगे अंतरला ।। ४ ।।

१२६. आंत हरि बाहेर हरि । हरीनें घरीं कोंडिलें ।। १ ।। हरीनें कामा घातला चिरा । चित्तवरा मुकाविलें ।। २ ।। हरीनें जीवें केली साटी । पाडिली तुटीं सकळांसीं ।। ३ ।। तुका म्हणे वेगळा नव्हे । हरि हा भोवें भोंवताला ।। ४ ।।

१२७. कोणि एकी भुलली नारी । विकितां गोरस त्या म्हणे हरी ।।१।। देखिला डोळां बैसला मनीं । तोचि वदनीं उचारीं ।।२।। आपुलियाचा विसर भोळा । गोविंद कळा कौतुकें ।।३।। तुका म्हणे हासे जन । नाहीं कान तें ठायीं ।। ४ ।।

१२८. हरीनें माझें हरिलें चित्त । भार वित्त विसरलें ।।१।। आतां कैसी जाऊं घरा । नव्हे बरा लौकिक ।। २ ।। पारखियांसी सांगता गोष्टी । घरची कुटी खातील ।। ३ ।। तुका म्हणे निवांत राही । पाहिलें पाहीं परतोनी ।। ४ ।।

१२९. हरि तुझी कांति रे सांवळी । मी रे गोरी चांपेकळी । तुझ्या दर्शनें होईन काळी । मग हें वाळी जन मज ।।१।। उगला राहें न करीं चाळा । तुज किती सांगो रें गोवळा । तुझा खडबड कांबळा । अरे नंदबाळा आलगटा ।।२।। तुझिये अंगीं घुरट घाणी । बहु खासी दूध तूप लोणी । घरींचें बाहेरील आणोनी । मी रे चांदणी सकुमार ।।३।। मग ते हांसतील जन । धिकारिती मज देखोन अंगीचें तुझें देखोनी लक्षण । मग विटंबना होईल रे ।।४।। तुज तंव लाज भय शंका नाहीं । मज तंव सज्जन

२५३३
ग्रा. क्र. ३२५०१५
कार्य २३।१०।८५
गोळप्रो



पिशुन त्याही । आणिक मात बोलू कांहीं । कशी मीड नाहीं तुज माझी ॥५॥ वचन मोडी नेदी हात । कळले न साहेची मात । तुकयास्वामी गोपीनाथ । जीवन्मुक्त करूनी भोगी ॥ ६ ॥

१३०. गाई गोपाळ यमुनेचे तटीं । येती पाणिया मिळोनी जगजेठी । चेंडू चौगुणा खेळती वाळवंटीं । चला चला म्हणती पाहूं दृष्टी वो ॥ १ ॥ ऐशा गोपिका त्या कामातुरा नारी । चित्त विव्हळतें देखावया हरी । मिस पाणियाचें करितील घरीं । बारा सोळा मिळोनी परस्परी वो ॥ २ ॥ चिरे चोळिया त्या धुतां विसरती । ऊर्ध्व लक्ष लागलें कृष्णमूर्ति । कोणा नाठवे कोण कूळ याती । झाली तटस्थ सकळ नेत्रपातीं वो ॥ ३ ॥ दंतधावनाचा मुखामाजीं हात । वाद्यें वाजतीं नायके जनमात । करी श्रवण कृष्णवेणुगीत । स्वामीं तुकयाचा पुरवी मनोरथ वो ॥ ४ ॥

१३१. बाळपणीं हरी । खेळे मथुरेमाझारीं । पायीं घागरिया सरी । कडदोरा वांकी । मुख पाहे माता । सुख न माये चित्ता । धन्य मानवे संचिता । ओडवलें आजी ॥१॥ बाळ चांगलें वो । म्हणतां चांगलें वो । वेळ लागे तया बोलें । जीवापरीस तें वाल्हें । मज आवडतें ॥ २ ॥ मिळोनियां याती । येती नारी कुमारी बहुती । नाहीं आठव त्या चित्तीं । देहभाव कांहीं । विसरल्या घरें । तान्हीं पारठीं लेंकूरें । धाक सांडोनियां येरें । तहान भूक नाहीं ॥३॥ एकी असतील घरीं । चित्त तयापासीं परी । वेगी करोनी वोसरी । तेथें जाऊं पाहे । लाज सांडियेली वोज । नाहीं फजितीचें काज । सुख सांडोनियां सेज । तेथ धांव घाली ॥४॥ वेधियेल्या बाळा । नर नारी या सकळा । बाळा बाळा खेळवी अबला । त्याही विसरल्या । कुमर कुमारी । न भाव हे शरीरीं । दृष्टि न फिरे माघारी । तयां देखतां हे ॥ ५ ॥ वैरभाव नाहीं ।

आपपर कोणी कांहीं । शोक मोह दुःख ठायीं । तये निरसलीं । तुका म्हणे सुखी । केली आपणासारखीं । स्वामी माझा कवतुकीं । बाळवेषें खेळे ॥ ६ ॥

१३२. स्वयें सुखाचे झाले अनुभव । एक एकीपाशीं सांगतील भाव । अवघ्यां अवघा हा कैसा नवलाव । सर्व साक्षी तेथेंचि त्यांचा जीव वो ॥१॥ आपआपणाशीं करिती नवल । परि वादावाद न संडिती बोल । एका मेघश्यामें जलधर बोल । रसीं उतावीळ हृदय सखोल वो ॥२॥ एक विषय तो सकळांचा हरि । त्याच्या आवडीनें आवडी इतरी । अंध बहिर हे प्रेत लोकाचारी । त्यांची कीर्ति गायिली पुराणांतरी वो ॥३॥ स्तुति पराविया मुखें रुचिकर । प्रीति पात्राच्या गौरवीं आदर । परस्पर हें सादरा सादर । योग सज्जनांच्या सुखा नाहीं पार वो ॥ ४ ॥ भक्तिवालभ न तुटे चराचरीं । आप्तअनाप्त हें ऐशीं नाहीं उरी । दुरी जवळी संचिता ऐसें धरी । रंगा रंगा ऐसें होणें लागे हरि वो ॥५॥ तुका लाधला हें उच्छिष्ट भोजन । आला बाहेरी प्रेमें ओसंडून । कानीं पडिलें त्या जीवाचे जतन । धरी एकाभावें हृदयीं चरण वो ॥ ६ ॥

१३३. आजी नवल मी आलें येणें रानें । भेटी अवचित नंदाचिया कान्हें । गोवी सांगती वो सकळही जनें । होतें संचित आणियेलें तेणें वो ॥१॥ गेलें होऊनि न चले आतां कांहीं । साद घालितां जवळीं दुजें नाहीं । अंगीं जडला मग उरलें तें काई । आतां राखतां गुमान भलें बाई वो ॥ २ ॥ बहुत कामें मज नाहीं आराणूक । एक सारिता तो पुढें उभें एक । आजि मी टाकोनी आलें सकळीक । तंव रचिलें आणीक कवतुक वो ॥३॥

चिंता करितां हरिली नारायणें । अंगसंगें मिनतां दोघे जणें । सुखें निर्भर झालिये त्याच्या गुणें । तुका म्हणे खुंटलें येणें जाणें वो ।। ४ ।।

१३४. होतें बहुत दिवस मानसीं । आजि नवस फळले नवसीं । व्हावी भेटी ते झाली गोविंदासीं । आतां सेवा करीन निश्चयेसीं वो ।। १ ।। स्थिर स्थिर मजाचि साहे करा । बहु कष्ट सोसिल्या येरझारा । येथें आड मज न सहाये वारा । देऊनि कपाट आलें तें दुसरें वारा वो ।।२।। मूळ सत्ता हे सायासाची जोडी । नेदीं वेगळें होऊं एकी घडी । नाहीं लौकिक स्मरला आवडी । आतां येणें काळें या वो लोभें वेडी वो ।। ३ ।। उदयीं उदय साधिला अवकाश । निश्चिंती निश्चिंतीने सावकाश । धरिये गोडी बहुत आला रस । तुका म्हणे हा मागुता न ये दिवस वो ।। ४ ।।

१३५. आजी कां वो तूं दिससी दुश्चिती । म्हणिये काम नलगे तुझ्या चित्तीं । दिलें ठेवूं तें विसरसी हातीं । नेणों काय बैसला हरि चित्तीं वो ।। १ ।। सर सर परती झालीस आतां भांड । कैसें दाखविसी जगासी या तोंड । व्याली माय तें लाजविली रांड । नाहीं थार दो ठायीं झाला खंड वो ।। २ ।। आंत होतें तैसें उमटलें वरी । बाह्य संपादणा अंतरींची चोरी । नाहीं मर्यादा निःसंग बावरी । मन हें गोविंदीं देह काम करी वो ।।३ । नाहीं करीत उत्तर कोणासवें । पराधीन भोजन दिलें खावें । नाहीं अचळ सांवरावा ठावें । देखों उदासीन तुज गे देहभावें वो ।।४।। कोठें नेणों हा फावला एकांत । सदा किल-किल भोंवतीं बहुत । दोघे एकवाट बोलावया मात । नाहीं लाज

धरिली दिला हात वो ।।५।। करी कवतुक खेळ खेळे कान्हा । दावी लाघव भांडवी सासु सुना । परा भक्ति हें शुद्ध तुम्ही जाणा । तुका म्हणे ऐसें कळों यावें जना वो ।। ६ ।।

१३६. भरिला उलंडूनी रिता करी घट । मिस पाणियाचें गोविंदाची चट । चाले झडझडा उसंडूनि वाट । पाहे पाळतुनी उभा तोचि नीट वो ।। १ ।। चाळा लावियेले गोप गोपीनाथें । जाणे आवडीचे रूप जेथे जेथे । दावी बहुताच्या बहु वेष पंथे । गुणातीतें खेळ मांडियेला येथें वो ।। २ ।। मनीं आवडे तें करावें उत्तर । कांहीं निमित्ताचा पाहोनी आधार । उभा राहे कां मारिसी कंकर । मात वाढविसी उत्तरा उत्तर वो ।। ३ ।। धरिली खोडी दे टाकोनिया मागें । न ये विनोद हा कामा मशीसंगे । मिठी घालीन या जीवाचिया त्यागें । नाहीं ठाउकी पडलीं तुझीं सोंगे वो ।। ४ ।। सुख अंतरीचें बाह्य ठसठसी । म्हणे विनोद हा काय सोंग यासी । तुज मज काय सोयरीक ऐसी । नंदानंद या थोरपणें जासी वो ।। ५ ।। करी कारण तें कळों नदी कोणा । सुख अंतरीचें बाह्य रंग जाणा । मन भिनले रे तुका म्हणे मना । भोग अंतरींचा पावे नारायणा वो ।। ६ ।।

१३७. नको कांहीं उपचार माझ्या शरीरा । करूं न साहवे मज बहु होतो उबारा । मनोजन्य व्यथा वेध झाला अंतरा । लवकरी आणा नंदाचिया कुमरा ।। १ ।। सखिया देशीया तुम्ही प्राणवल्लभा । निवेदला भाव आर्तभूत या लोभा । उमटली अंगीं वो सावळी प्रभा । साच हे अवस्था कळे मज माझ्या क्षोभा ।।२।। नये कळों नेदावी हे दुजियासी मात । घडावा तयासी उत्कंठा एकांत । एकाएकी साक्षी येथें आपुलें चित्त । कोण्या काळें होईल

नेणों भाग्य उदित ।। ३ ।। स्वाद क्षीण देहभान निद्रा खंडन । पाहिले तटस्थ उन्मलित लोचन । अवघे वोगाऊन उरलें ते चरण । तुका म्हणे दर्शनापें आलें जीवन ।। ४ ।।

१३८. पडिली भुली धांवतें सैराट । छंद गोविंदाचा चोंजविते वाट । मागे सांडोनी सकळ बोभाट । वंदीं पदांबुजे ठेऊनी ललाट वो ।। १ ।। कोणी सांगा या गोविंदाची शुद्धी । होता वहिला लपाला आतां खांदीं । कोठें आड आली हे देहबुद्धि । धावा आळवा करुणा कृपानिधि वो ।। २ ।। मागे बहुतांचा अंतरला संग । मुळें जयाचिया तेणें केला त्याग । पैल पाहतां तें हरपलें अंग । खुंटली वाट नाहीसे झाले जग वो ।।३।। शोकें वियोग घडला सकळांचा । गेल्या शरण हा अन्याय आमुचा । केला उच्चार रे घडल्या दोषांचा । झाला प्रगट स्वामी तुकयाचा वो ।।४।।

१३९. काय उणे कां करितोसी चोरी । किती सांगो तुज नाइकसी हरी । परपरता तूं पळोनी जासी दुरी । अनावर या लौकिका बाहेरी वो ।।१।। माया करुणा हे करिते बहुत । किती सोसूं या जनांचे आघात । न पुरे अवसरू होंचि नित्यानित्य । तूंच सोडवी करूनी स्थिर चित्त वो ।।२।। बहुत कामे मी गुंतलिये घरीं । जासी डोळा तूं चुकवूनी हरी । करितां लागा न येसी चपळ भारी । नाहीं सायासाची उरों दिली उरों वो ।। ३ ।। तुज म्हणीये मी न संगें अनंता । नको जाऊं या डोळ्यांपरता । नलगे जोडी हे तुजविण आतां । तुकयास्वामी कान्होबा गुणभरिता वो ।। ४ ।।

१४०. घाली कवाड टळली वाड राती । कामें व्यापिली कां पहिली दुश्चिती । कोणे लागला गे सदेवैचे हातीं । आजी शून्य शेजे नाहीं दिसे पति वो ।।१।। बोले दूतिकेसी राधा हें वचन ।

मशीं लाघव दाखवी नारायण । म्हणे कोमळ परी बहु गे निर्गुण । यासीं न बोलें कळला मज पूर्ण वो ॥२॥ धाडिलें गरुडा आणिलें हनुमंता । तें पाचारिलें होऊन ये वो सीता । लाजिनली रूप न ये पालटितां । झाला भीमकी आपण राम सीता वो । सत्यभामा दान करी नारदासी । तें कळला वो मज हृषीकेशी । तुळे घालितां न ये कनक वो रासी । समतुकें एक पान तुळसी हो ॥ ४ ॥ मज भुली पडली केशापरी । आम्हां भोगुनी म्हणे मी ब्रह्मचारी । दिली वाट यमुने माये खरी । तुम्हां आम्हां न कळे अद्यापवरी वो ॥५॥ जाणें जीवींचें सकळ नारायण । असे व्यापूनी ता न दिसे लपून । राधा संबोखिली प्रीति आलिंगून । तुका म्हणे येथें भावचि कारण वो ॥ ६ ॥

१४१. धरिला पालव न सोडी माझा येणे । कांहीं करितां या नंदाचिया कान्हें । एकली न येतें मी ऐसें काय जाणें । कोठे मरलें अवघड या राणें रे ॥ १ ॥ सोडीं पालव जाऊं दे मज हरी । वेळ लागल्या रे कोपतील घरीं । सासू दारुण सासरा आहे भारी । तुज मज सांगतां नाहीं उरी रे ॥ २ ॥ सख्या बेशिया होत्या मजपासीं । तुज फावलें रे फांकतां तयांसी । होतें अंतर तर सांपडतें कैसी । एकाएकीं अंगीं जडलासी रे ॥ ३ ॥ कैसी भागली हे करितां उत्तर । शक्ति मावळल्या आसुडितां कर । स्वामी तुकयाचा भोगिया चतुर । भोग भोगी त्यांचा राखे लोकाचार वो ॥ ४ ॥

१४२. हरिरता चपळा नारी । लागवरी न रिघती ॥ १ ॥ अवघ्या संगें सर्वोत्तमा । भोगी काम भोगता ॥ २ ॥ वाचा वाच्यत्वासी नये । कोठे काय करावें ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा-ऐसा । देवपिशा उदारा ॥ ४ ॥

१४३. कोणी सुना कोणी लेकी । कोणी एकी सतंता ॥१॥ अवघियांची जगनिंद । झाली धिंद सारखी ॥२॥ अवघ्या अवघ्या चोरा । विनावरा मायबापा ॥ ३ ॥ तुका म्हणे करा सेवा । आले जीवावरी तरी ॥ ४ ॥

१४४. मैं भूली घरजानी बाट । गोरस बेचन आयें हाट ॥ १ ॥ कान्हा रे मनमोहन लाल । सबही विसरूं देखें गोपाल ॥ २ ॥ काहां पग डारूं देखे अनेरा । देखें तों सब वोहिने घेरा ॥ ३ ॥ हूं तो थकित भई रे तुका । भागा रे सब मनका धोका ॥ ४ ॥

१४५. हरिविन रहिया नजाये जिहिरा । कबकी ठाडी देखें राहा ॥ १ ॥ क्या मेरे लाल कवन चुकी भई । क्या मोहिपासिती बेर लगाई ॥ २ ॥ कोई सखी हरी जावे बुलावन । बाराहि ठारूं उसपर तन ॥ ३ ॥ तुका प्रभु कब देखे पाऊं । पासीं आऊं फेर न जाऊं ॥ ४ ॥

१४६. एकीं एकटाचि असोनी एकला । विश्वीं विश्वाकार होऊनियां ठेला । जयापरी वो तैसाची गमला । नंदनंदन हा अचोज अंबुला वो ॥ १ ॥ ऐशा गौळणी त्या बोलती परस्परीं । करूनि विस्मय आपुल्या अंतरीं । विश्वलाघविया हाचि चराचरीं । नेणों महिमा यासी म्हणों व्यभिचारी वो ॥ २ ॥ गिरि गोवर्धन येणें उचलिला । कालिया महासर्प नाथूनि आणिला । जळत वणवा वो मुखेंचि प्राशिला । गिळितां अघासुर चिरूनि सांडिला वो ॥ ३ ॥ कपट्या मामळभटा दिलें पिढें दान । शोषिली पूतना विषें पाजितांचि स्तन । उखळीं बांधितां उपटिले विमलार्जुन । भक्षुनि मृत्तिका वदनीं दाविलीं भुवनें वो ॥ ४ ॥ आणखी एक

येणें नवलावो केला । काला वाटितां विधाता ठकविला । भाग नेदितां तो वत्सें गोवळ घेऊनि आला । तैसींच आपण तेथें होऊनियां ठेला वो ॥ ५ ॥ इंद्र चंद्र महेंद्र यातेंचि पूजिती । श्रुति शास्त्रें तेंहि यातेंचि स्तविती । महासिद्ध मुनि ध्यानीं आराधितीं । निळा म्हणे तो हा जोडला सांगाती वो ॥ ६ ॥

१४७. एकलें न कंठेचि म्हणोनियां येणें । केलीं निर्माण चौदाही भुवनें । गगन चंद्र सूर्य मेघ तारांगणें । पांचही महाभूतें भौतिकें भिन्नें भिन्नें वो ॥ १ ॥ ऐसा लाघवी हा मायासूत्रधारी एकला एकटाचि झाला नानाकारी । स्थूल सूक्ष्म जीव जीवांचे अंतरीं । तो हा नंदनंदन सये बाळब्रह्मचारी वो ॥ २ ॥ याचिये नाभिकमळीं चतुरनना । याचिया निजप्रभा प्रकाश रविकिरणा । याचिया महातेज तेज हुतशना । येणेंचि पढवूनि वेद केला शहाणा वो ॥ ३ ॥ याचिया द्रावपणें समुद्रासी जळ । याचिया चपळपणें पवन हा चंचळ । याचिया अवकाशें आकाश पधळ । याचिया धृतिबळें अवनी ही अढळ वो ॥ ४ ॥ येणेंचि मेरुस्तंभ अचळ धरियेला । दिशा दिक्पाळांसी येणेंचि ठाव दिधला । विधिविधानांचा शास्त्रा बोध केला । येणेंचि सुरपति स्वर्गीं बैसविला वो ॥ ५ ॥ भोगुनि अंगना हा बाळ ब्रह्मचारी । एकला जेथें तेथें सोळा सहस्र घरीं । आम्हां तुम्हां भोगुनी अलिप्त मुरारी । निळा म्हणे ऐशा विवादती नारी वो ॥ ६ ॥

१४८. होतें बहुत दिवस आर्त वागविलें । आजि अकस्मात फळ देऊं आलें । दृष्टीं श्रीहरीचीं देखिलीं पाऊलें । घेतलें जन्म मागें सार्थक त्यांचें झालें वो ॥ १ ॥ धन्य हे आनंदाची सांपडली वेळ । तेणें संत सज्जन भेटले कृपाळ । त्यांनीं फाडियेला बुद्धीचा वो मळ । दृष्टीं दाखविला यशोदेच्चा बाळ वो ॥ २ ॥ नाना

साधनाच्या केलिया खटपटा । परि त्या न पवती वो याच्या दारवंटा । जाणों आतां जाणीव घाली आडफाटा । योगाभ्यासे सिद्धि रोधिती वाटा वो ॥ ३ ॥ यज्ञयागें सर्वभोग आड येती । करितां तपें काम क्रोध खवळती । नित्यानित्यज्ञानें अभिमान वाढती । करितां तीर्थाटनें अहंकाराची प्राप्ति वो ॥ ४ । जपतां मंत्रबीजें चळचि घाली घाला । करितां दानधर्म पुढें भोगविती फळा । सोवळें मिरवितां विधिनिषेध आगळा । आतां हेंचि धणीवरी ध्याऊं याला वो ॥५॥ ऐसें शोधियेले मार्ग नानापरी । न येती प्रतीति मग सांडियेले दुरी । आतां गाऊनि गीतीं नाचों हा मुरारी । निळा म्हणे करूं ससारा बोहरी वो ॥ ६ ॥

१४९. दिसें सगुण हा स्वरूपसुंदर । परि व्यापुनिया ठेला चराचर । देव दानवादि मानव असुर । याविण उरला ऐसा नाहीं तृणांकूर ॥ १ ॥ ऐसा गवळणी त्या अनुवाद करिती । ज्या ज्या रंगलिया याच्या अनुवृत्ती । रजनी दिवो जया याचीचि संगती । त्या त्या स्वानुभवें आपुल्या बोलती वो ॥ २ ॥ महि अंबु तेज मारुत गगन । जगा बीजरूप हाचि वो लपोन । महन्मायेचे हा अनादि कारण । देवत्रयासी हा मूळ अधिष्ठान वो ॥ ३ ॥ एकानेक झाला आपुल्याचि गुणीं । उरला भरोनियां चाऱ्हीं वाणीं खाणी । जयापरि हा तैसाचि साजणी । रूपें गुणें क्रिया मंडित भूषणी वो ॥ ४ ॥ भुवनें चतुर्दश तींही याच्या पोटीं । स्वर्गा एकविसाहि आदि हा शेवटीं । होण्या न होण्याच्या नेणोनियां गोठी । आपोआपणाचि एकट एकटी वो ॥५॥ निळा म्हणे आम्ही नेणोचि अबळा । हासों रुसों यासीं करूं गदारोळा । खेळतां खेळ यासीं भांडो वेळोवेळां । केले अपराध तो मागों गोपाळा वो ॥ ६ ॥

१५० एकीं एकपणाचा घऊनियां त्रास । झाला नानाकार स्वरूपें बहुवस । म्हणोनि दुसरेची नाढळे वो त्यास । जयां तयामाजी याचाचि रहिवास वो ॥१॥ ऐसे निजात्मया जाणोनि गोविंदा । जीवेंभावें अनुसरल्या प्रमदा । करिती सेवावृत्ति निशिदिनीं सदा । हासती रुसती करिती विनोदा वो ॥२॥ सर्वसाक्षी सर्वांहि जाणता । सर्व करूनियां म्हणवी अकर्ता । जीवी जिवाचा हा आत्माचि सर्वथा । जेथें तेथें याचि नित्य एकयात्मता वो ॥३॥ नित्य अंगसंगें भोग त्यासी देती । दृष्टि अवलोकूनि गुण त्याचे गाती । नेऊनि एकांतीं वो निजगुज बोलती । करिती काम धाम परि त्याचेपासी वृत्ति वो ॥ ४ ॥ सासु सासरिया भ्रतारासी चोरी । नणंदा जावा त्याही त्यजुनियां घरीं । देती आलिंगन निजात्मया हरी । येथूनि म्हणती संसारा बाहेरी वो ॥५॥ ऐशा निळा म्हणे झाल्या हरिरता । त्या विराजनी मुक्तिचिया माथा । नाना साधनांच्या लाजवूनि चळथा । झाल्या असोनि संसारीं नित्य मुक्ता वो ॥ ६ ॥

१५१. नव्हते एक ना दुसरे कांहीं यासी । होता लपोनियां आपुलियें कुसीं । कांहींच नोळखुनि आपआपणासि । तोचि येऊनि येथें आला अविनाशी वो ॥ १ ॥ रूप धारिलें सगुण चांगलें । ठाणमाण जेथिल तेथेंचि रेखिले । चतुर्भुज शंखचक्रातें मिरविले । मुगुटमाळा श्रवणीं सतेज कुंडलें वो ॥ २ ॥ नव्हता गावसीव पाहिला यासि कांहीं । नामरूपासि तों आधींची ठाव नाहीं । म्हणती वैकुंठ तें कायाचि झालें बाई । क्षीरसागर ना कैचि शेषशाई वो ॥३॥ नव्हता काळागोरा खुजा ना ठेंगणा । स्वरूप सुंदर ना आंधळा देखणा । कैचि जीवशिव तयासि भावना । पंचभौतिक ना नेणे पंचप्राण वो ॥ ४ ॥ नव्हता मनबुद्धि

इंद्रियांचा मेळा । कार्यकर्तृत्व हा कारणावेगळा । येणें जाणें यासि नव्हते कवण्या काळा । तोचि आला या नंदाच्या राउळा वो ॥ ५ ॥ यासि जीवेंभावें धरा घाला मिठ्या । ऐशा बोलती गौळणी गोरट्या । निळा म्हणे अवघ्या मिळोनि लहाना मोठ्या । यासि चुकाति त्या अभाग्या करंट्या वो ॥ ६ ॥

१५२. नित्यानंदापुढें आनंद तो कोण । विषय सुख बाई बापुढें तें क्षीण । जेथें न सरेची वैकुंठ सदन । शेषशायी त्रिकूट भुवन वो ॥१॥ नेघों म्हणोनियां त्यागिती परातें । घेऊं संग-सुख हरीच्या सांगातें । गाऊं वानूं रूप पाहोनि निरुतें । हासों खेळों ठायीं जेववूं सांगातें वो ॥२॥ नेघों समाधीचे सुख तुच्छ वाटें । नित्यानित्याचिये न पडों खटपटें । काय करूं ते तपाचे बोभाटें । एका हरिवीण अवघी तें फलकटें वो ॥ ३ ॥ काय जाऊनियां करू निजधामा । तेथें मी नातुडें नाढळें विश्रामा । येथें सांडूनियां तमाल मेघःशामा । नेघो नाइको आणिका दुर्गमा वो ॥ ४ ॥ स्वर्गभोग तेही न लगती असार । क्षणें होती जाती क्षणेंचि नश्वर । येथें हरीसंगें क्रीडों निरंतर । सर्वही सुखाचें हा जोडला आगर वो ॥५॥ निळा म्हणे नित्य निस्सीम स्वानु-भवें । ऐशा गोपिका त्या रंगल्या हरीसवे । अधिकाधिक हें प्रेम त्यांचें नवें । जाणोनि आवडी ते पुरविली देवें वो ॥ ६ ॥

१५३. माझ्या मीपणाचा करूनि फराळ । उरलें खावयासी बैसला सकळ . ऐशा भुकाळु हा नंदाचा गोवळ । यासि न पुरेचि ग्रासिता माझा खेळ वो ॥१॥ आतां काय देऊं नसतां जवळीं । संचित प्रारब्ध ते भक्षिलें समुळीं । कर्माकर्माच्या घेतल्या कवळी । विषयवासना त्या ग्रासिल्या निमिषमेळीं वो ॥२॥ भक्षिलें संपत्ति

विपत्तीचे भोंग । कांहीं नुरावेतांची कोण्हाचाही भाग । अवघे भक्षूनियां नुरतीं हा माग । नामरूप तेंहि नेदीचि उरो सोंग वो ॥ ३ ॥ ऐशा भक्षूनियां पूर्ण नव्हे कधीं । अवघ्या भक्षूनिया संसार उपाधी । जीवभावाचिया नुरवुनियां आधीं । केलें एका-एकीं निजरूप अनादि वो ॥ ४ ॥ आधींचि दुर्बळ मी नव्हती कांहीं जोंडी । पूर्वींच भक्षूनियां गेला वो तांतडी । आणूं कोठूनि वाढू या परवडी । हा तो भुकाळुचि सदाचा वराडी वो ॥ ५ ॥ आतां तृप्तीलागीं दिसे एक शेवटी । भावभक्ति याचे वोगरिन ताटीं । तेणेचि होईल या क्षुधेचे संतुष्टी । ऐसें निळा म्हणे विचारिलें पोटीं वो ॥ ६ ॥

१५४. कांहींच न होनियां कांहीं एक होता । नामरूपातीत आपण नेणता । होण्या न होण्याच्या नेणोनियां वार्ता । त्याचा संकल्पाचि झाला त्या प्रसवता वो ॥ १ ॥ ऐसा परि हा मूर्तिमंत झाला । विश्वीं विश्वाकार होऊनियां ठेला । भाग्यें आम्हांचिया मूर्तीं मुसावला । गाऊं वानूं ऐसा आम्हांसी फावला वो ॥ २ ॥ नव्हे पुरुष ना नारीपण जेथें । शून्या निरशून्याहि पैलाडी परते । नाकळे नाद बिंदु कळा ना ज्योति तें । परा पश्यंतींचा प्रवेश नाहीं जेथें वो ॥ ३ ॥ गुणलावण्याची उघडलीं खाणी । मंडित चतुर्भुज मुगुट माळा मणी । मुख मनोहर कुंडलें श्रवणीं । श्रीवत्सलांच्छन हृदया साजणी वो ॥ ४ ॥ घ्यावे उचलूनि जाऊं निज घरा । आजि फावला तो पाहों यदुवीरा । खेळों आदरें या खेळवूं सुंदरा । यांच्यासंगें नाहीं सुखा पारावारा वो ॥ ५ ॥ निळा म्हणे ऐशा संवादाति सुंदरी । करिती क्रीडा सर्वे घेऊनि मुरारी । सुखीं सुखरूप झाल्या कल्पवरी । पुन्हां न येती त्या फिरोन संसारी वो ॥ ६ ॥

१५५. येणें ऐकलें वो जाणेंही शेवटीं । येथें राहणेंचि नाहीं कल्पकोटी । जोडिलें धन तें न चले लक्ष कोटी । म्हणोनि आलिये या सांवळियाचे भेटीं वो ॥ १ ॥ आतां घाला वो याच्या पायांवरी । हाचि चुकवील जन्माची भोंवरी । शिणलें बहुत वो चौऱ्यायशीचे फेरीं । तोडिल चिंता हा हेचि आशा थोरी वो ॥ २ ॥ वहुत गांजियलें माया मोह भ्रमें । रततां विषयीं या विषयाच्या कामें । करितां भरोवरी रित्या मनोधर्में । यासी कृपा येतां हरील हा कर्में वो ॥ ३ ॥ कामक्रोधीं वो जाचिलें बहुत । नेदी राहो वो क्षण एक निवांत । वरी पडती वो गर्वाचे आघात । म्हणोनि विनवणी सांगा त्वरित वो ॥ ४ ॥ आशा कल्पना या मातल्या पापिणी । मनसा चिंता डंखिणी सर्पिणी । येती लहरी वो जाणिवेचि जाचणी । म्हणोनि विनविते हेंचि क्षणक्षणीं वो ॥ ५ ॥ आहे शेवटींचे माझें येथें येणें । वाटे निश्चय हा याचिया दर्शनें । राहिलें चित्तीं वो याचेचि चिंतनें । निळा म्हणें आजि ऐकिलें गाऱ्हाणें वो ॥ ६ ॥

## श्रीज्ञानेश्वरमहाराजकृत हरिपाठ

१५६. देवाचिये द्वारीं उभा क्षणभरीं । तेणें मुक्ति चारी साधियेल्या ॥ १ ॥ हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा पुण्याची गणना कोण करी ॥ २ ॥ असोनि संसारी जिव्हे वेगु करी । वेद-शास्त्र उभारी बाह्या सदा ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे व्यासाचिये खुणे । द्वारकेचे राणे पांडवां घरीं ॥ ४ ॥

१५७. चहूं वेदी जाण साहि शास्त्रीं कारण । अठराहि पुराणें हरिसी गाती ॥ १ ॥ मंथुनी नवनीता तैसें घे अनंता । वाया

व्यर्थ कथा सांडी मार्गु ॥ २ ॥ एक हरी आत्मा जीवशिवसम। वायां तूं दुर्गम न घाली मन ॥ ३ ॥ ज्ञानदेवा पाठ तरि हा वैकुंठ। भरला घनदाट हरि दिसे ॥ ४ ॥

१५८. त्रिगुण असार निर्गुण हें सार। सारासार विचार हरिपाठ ॥ १ ॥ सगुण निर्गुण गुणाचें अगुण। हरीवीण मन व्यर्थ जाय ॥ २ ॥ अव्यक्त निराकार नाहीं त्या आकार। जेथोनि चराचर हरीसी भजे ॥ ३ ॥ ज्ञानदेवा घ्यानीं रामकृष्ण मनीं। अनंत जन्मोनी पुण्य होय ॥ ४ ॥

१५९. भावेंवीण भक्ति भक्तिवीण मुक्ति। बळेंवीण शक्ति बोलूं नये ॥१॥ कैसेनि दैवत प्रसन्न त्वरित। उगा राहे निवांत शिणासि वायां ॥२॥ सायास करीसी प्रपंच दिननिशीं। हरीसीं न भजसी कोण्या गुणें ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे हरिजप करणें। तुटेल धरणें प्रपंचाचें ॥ ४ ॥

१६०. योगयागविधी येणें नव्हे सिद्धी। वायाचि उपाधि दंभ धर्म ॥ १ ॥ भावेंविण देव न कळे निःसंदेह। गुरुवीण अनुभव कैसा कळे ॥ २ ॥ तपेंवीण दैवत दिधल्याविण प्राप्त। गुजेंवीण हित कोण सांगे ॥३॥ ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात। साधूंचे संगतीं तरणोपाय ॥ ४ ॥

१६१. साधुबोध झाला तो नुरोनियां ठेला। ठायींच मुरला अनुभव ॥ १ ॥ कापुराच्या वाती उजळली ज्योति। ठायींच समाप्ती झाली जैसी ॥ २ ॥ मोक्षरेखे आला भाग्यें विनटला। साधूंचा अंकिला हरिभक्त ॥ ३ ॥ ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनीं। हरि दिसे जनीं वनीं आत्मतत्त्वीं ॥ ४ ॥

१६२. पर्वताप्रमाणें पातक करणें । वज्रलेप होणें अभक्तांसी ॥ १ ॥ नाहीं जयसी भक्ति तो पतित अभक्त । हरिसी न भजत दैवहत ॥ २ ॥ अनंत वाचाळ बरळतीं बरळ । त्यां कैसेनि गोपाळ पावे हरीं ॥ ३ ॥ ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान । सर्वां घटीं पूर्ण एक नांदे ॥ ४ ॥

१६३. संतांचे संगतीं मनोमार्ग गती । आकळावा श्रीपती येणें पंथें ॥ १ ॥ रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा । आत्मा जो शिवाचा राम जप ॥ २ ॥ एकतत्त्वनाम साधिती साधन । द्वैताचें बंधन न बाधिजे । ३॥ नामामृतगोडी वैष्णवां लाधली । योगियां साधली जीवनकळा ॥ ४ ॥ सत्वर उच्चार प्रल्हादीं बिंबला । उद्धवा लाधला कृष्णदाता ॥५॥ ज्ञानदेव म्हणें नाम हें सुलभ । सर्वत्र दुर्लभ बिरळा जाणें ॥ ६ ॥

१६४. विष्णुवीण जप व्यर्थ त्याचें ज्ञान । रामकृष्णीं मन नाहीं ज्याचें ॥१॥ उपजोनि करंटा नेणें अद्वैत वाटा । रामकृष्णीं पैठा कैसेनि होय ॥२॥ द्वैताची झाडणी गुरूवीण ज्ञान । तया कैचें कीर्तन घडेल नामीं ॥३॥ ज्ञानदेव म्हणे सगुण हें ध्यान । नामपाठ मौन प्रपंचाचें ॥ ४ ॥

१६५. त्रिवेणीसंगमीं नाना तीर्थें भ्रमी । चित्त नाहीं नामी तरीं तें व्यर्थ ॥१॥ नामासी विन्मुख तो नर पापिया । हरिवीण धांवया न पवे कोणी ॥२॥ पुराणप्रसिद्ध बोलिले वाल्मीक । नामें तिन्हीं लोक उद्धरती ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे नाम जपा हरीचें । परंपरा त्याचें कुळ शुद्ध ॥ ४ ॥

१६६. हरि उच्चारणीं अनंत पापराशी । जातील लयासी

क्षणमात्रें ॥ १ ॥ तृण अग्निमेळें समरस झालें । तैसें नामें केलें जपतां हरी ॥२॥ हरिउच्चारण मंत्र हा अगाध । पळे भूतबाधा भेणें तेथें ॥ २ ॥ ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ । न करवे अर्थ उपनिषदां ॥ ४ ॥

१६७. तीर्थ व्रत नेम भावेंवीण सिद्धि । वायांचि उपाधि करिसी जना ॥१॥ भावबळें आकळे येऱ्हवीं नाकळे । करतळीं आवळे तैसा हरी ॥ २ ॥ पारियाचा रवा घेतां भूमीवरी । यत्न परोपरी साधन तैसें ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण । दिधलें संपूर्ण माझ्या हातीं ॥ ४ ॥

१६८. समाधी हरीची समसुखेंवीण । न साधेल जाण द्वैत-बुद्धी ॥१॥ द्वैतबुद्धीचे वैभव अन्य नाहीं दुजें । एक्या केशीराजे सकल सिद्धी ॥२॥ ऋद्धिसिद्धिनिधी अवघीच उपाधि । जंव त्या परमानंदीं मन नाहीं ॥ ३ ॥ ज्ञानदेवीं रम्य रमले समाधान । हरीचें चिंतन सर्वकाळ ॥ ४ ॥

१६९. नित्य सत्यमित हरिपाठ ज्यासी । कळिकाळ त्यासी न पाहे दृष्टी ॥१॥ रामकृष्ण उच्चार अनंतराशी तप । पापाचे कळप पळती पुढें ॥ २ ॥ हरि हरि हरि हा मंत्र शिवाचा । म्हणती जे वाचा तयां मोक्ष ॥ ३ ॥ ज्ञानदेवा पाठ नारायण नाम । पाविजे उत्तम निजस्थान ॥ ४ ॥

१७०. एकनाम हरि द्वैतनाम दुरी । अद्वैतकुसरी विरळा जाणे ॥१॥ समबुद्धि घेतां समान श्रीहरी । शमदमा वैरी हरी झाला ॥ २ ॥ सर्वांघटीं राम देहादेहीं एक । सूर्य प्रकाशक सहस्ररश्मी ॥३॥ ज्ञानदेवा चित्तीं हरिपाठ नेमा । मागिलिया जन्मा मुक्त झालों ॥ ४ ॥

१७१. हरि बुद्धि जपे तो नर दुर्लभ । वाचेसि सुलभ रामकृष्ण ॥१॥ रामकृष्णनामीं उन्मनी साधिली । तयासी लाधली सकल सिद्धि ॥२॥ सिद्धि बुद्धि धर्म हरिपाठीं आले । प्रपंची निवाले साधुसंगें ॥ ३ ॥ ज्ञानदेवीं नाम रामकृष्ण ठसा । येणें दशादिशा आत्माराम ॥ ४ ॥

१७२. हरिपाठ कीर्ति मुखें जरी गाय । पवित्रचि होय देह त्याचा ॥१॥ तपाचें सामर्थे तपिन्नला अमूप । चिरंजीव कल्प वैकुंठीं नांदे ॥ २ ॥ मातृ पितृ भ्राता सगोत्र अपार । चतुर्भुज नर होऊनि ठेले ॥ ३ ॥ ज्ञान गूढ गम्य ज्ञानदेवा लाधलें । निवृत्तीने दिले माझ्या हातीं ॥ ४ ॥

१७३. हरिवंशपुराण हरिनामसंकीर्तन । हरिवीण सौजन्य नेणे कांहीं ॥१॥ तया नरा लाधलें वैकुंठ जोडलें । सकळही घडलें तीर्थाटन ॥ २ ॥ मनोमार्गे गेला तो येथे मुकला । हरिपाठीं स्थिरावला तोचि धन्य ॥ ३ ॥ ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी । रामकृष्णीं आवडी सर्वकाळ ॥ ४ ॥

१७४. नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी । पापें अनंत कोडी गेलीं त्यांची ॥ १ ॥ अनंत जन्मांचे तप एक नाम । सर्वमार्ग सुगम हरिपाठ ॥२॥ योगायोग क्रिया धर्माधर्म माया । गेले ते विलया हरिपाठीं ॥ ३ ॥ ज्ञानदेवा यज्ञयाग क्रिया धर्म । हरिवीण नेम नाहीं दुजा ॥ ४ ॥

१७५. वेदशास्त्रप्रमाण श्रुतीचें वचन । एक नारायण सार जप ॥१॥ जप तप कर्म हरिवीण धर्म । वाउगाचि श्रम व्यर्थ जाय ॥२॥ हरिपाठीं गेले ते निवांताचि ठेले । भ्रमर गुंतले सुमन-

काळिकें ॥३॥ ज्ञानदेवा मंत्र हरिनामाचें शस्त्र । यमें कुळगोत्र वर्जियेलें ॥ ४ ॥

१७६. काळवेळ नाम उच्चारितां नाहीं । दोन्हीं पक्ष पाहीं उद्धरती ॥१॥ रामकृष्णनाम सर्व दोषां हरण । जडजीवां तारण हरि एक ॥ २ ॥ हरिनाम सार जिव्हा या नामाची । उपमा त्या दैवाची कोण वानी ॥ २ ॥ ज्ञानदेवा सांग झाला हरीपाठ । पूर्वजा वैकुंठमार्ग सोपा ॥ ४ ॥

१७७. नित्यनेम नामीं ते प्राणी दुर्लभ । लक्ष्मीवल्लभ तयाजवळी ॥१॥ नारायण हरि नारायण हरि । भक्ति-मुक्ति चारी घरीं त्यांच्या ॥२॥ हरिवीण जन्म तो नर्कचि पै जाणा । यमाचा पाहुणा प्राणी होय ॥ ३ ॥ ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड गगनाहुनि वाड नाम आहे ॥ ४ ॥

१७८. सात पांच तीन दशकांचा मेळा । एकतत्त्वीं कळा दावी हरी ॥१॥ तैसें नव्हे नाम सर्व मार्गा वरिष्ठ । येथें कांहीं कष्ट न लगती ॥ २ ॥ अजपा जपणें उलट प्राणाचा । तेथेंही मनाचा निर्धारु असे ॥ ३ ॥ ज्ञानदेवा जिणें नामेंवीण व्यर्थ । रामकृष्णीं पंथ क्रमियेला ॥ ४ ॥

१७९. जप तप कर्म क्रिया नेमा धर्म । सर्वांघटीं राम भावशुद्ध ॥ १ ॥ न सोडी रे भावो टाकी रे संदेहो । रामकृष्णीं टाहो नित्य फोडी ॥ २ ॥ जात वित्त गोत कुळ शीळ मात । भजे कां त्वरित भावनायुक्त ॥ ३ ॥ ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं । जेणे वैकुंठभुवनीं घर केलें ॥ ४ ॥

१८०. जाणीव नेणीव भगवंतीं नाहीं। उच्चारणीं पाहीं मोक्ष सदा ॥१॥ नारायणहरि उच्चार नामाचा। तेथें कळिकाळाचा रीघ नाहीं ॥ २ ॥ तेथांल प्रमाण नेणवे वेदांसी। तें जीवजंतूंसी केंवि कळे ॥ ३ ॥ ज्ञानदेवा फळ नारायण पाठ। सर्वत्र वैकुंठ केलें असे ॥ ४ ॥

१८१. एकतत्त्व नाम दृढ धरीं मना। हरीसी करुणा येईल तुझी ॥१॥ तें नाम सोपारें रामकृष्ण गोविंद। वाचेसी सद्गद जपें आधीं ॥ २ ॥ नामापरतें तत्त्व नाहींरे अन्यथा। वायां आणिक पंथा जाशी झणी ॥३॥ ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरीं। धरोनी श्रीहरि जपे सदा ॥ ४ ॥

१८२. सर्वसुखगोडी सर्वशास्त्र निवडी। रिकामा अर्धघडी राहूं नको ॥१॥ लटिका व्यवहार सर्व हा संसार। वाया येरझार हरीवीण ॥२॥ नाम मंत्र जप कोटी जाईल पाप। कृष्णनामीं संकल्प धरूनि राहे ॥ ३ ॥ निजवृत्ति काढी सर्व माया तोडी। इंद्रियां सवडी लपो नको ॥४॥ तीर्थव्रतीं भाव धरी रे करुणा। शांतिदया पाहुणा हरि करी ॥ ५ ॥ ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तिदेवीं ज्ञान। समाधि संजीवन हरिपाठ ॥ ६ ॥

१८३. नामसंकीर्तन साधन पैं सोपें। जळतील पापें जन्मांतरींचीं ॥१॥ न लगती सायास जावें वनांतरा। सुखें येतो घरा नारायण ॥२॥ ठायींच बैसोनि करा एकचित्त। आवडी अनंत आळवावा ॥ ३ ॥ रामकृष्णहरि विठ्ठल केशवा। मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥४॥ यावीण असतां आणीक साधन। वाहतसे आण विठोबाची ॥५॥ तुका म्हणे सोपें आहे सर्वांहूनि। शहाणा तो धणी घेतो येथें ॥ ६ ॥

## गुरुपरंपरेचे अभंग

१८४. सद्गुरुरायें कृपा मज केली । परी नाहीं घडली सेवा कांहीं ॥१॥ सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना । मस्तकीं तो जाणा ठेविला कर ॥ २ ॥ भोजना मागती तूप पावशेर । पडिला विसर स्वप्नामाजीं ॥ ३ ॥ कांहीं कळे उपजला अंतराय म्हणोनियां काय त्वरा झाली ॥ ४ ॥ राघव चैतन्य केशव चैतन्य । सांगितली खूण माळिकेची ॥ ५ ॥ बाबाजी आपुलें सांगितले नाम । मंत्र दिला रामकृष्णहरि ॥ २ ॥ माघ शुद्ध दशमी पाहुनी गुरुवार । केला अंगीकार तुका म्हणे ॥ ७ ॥

१८५. माझिये मनीचा जाणोनियां भाव तो करी उपाय गुरुराव ॥ १ ॥ आवडीचा मंत्र सांगितला सोपा । जेणें नव्हे गुंफा कोठे कांहीं ॥ १ ॥ गेले एक पुढें उतरलें पार । हा भवसागर साधुसंत ॥ ३ ॥ जाणत्या नेणत्या ज्या जैसी आवडी । उतार सांगडी तापे पेटे ॥४॥ तुका म्हणे संतीं दाखविला तारू । कृपेचा सागरु पांडुरंग ॥ ५ ॥

१८६. घालोनियां भार राहिलों निश्चिंतीं । निरविलें संतीं विठोबासी ॥१॥ लाऊनियां हात कुरवाळिला माथा । सांगितले चिंता न करावी ॥२॥ कटीं कर समचरण साजिरे । राहिला भीवरेतीरीं उभा ॥३॥ खुंटले सायास आणिक या जीवा । धरिलें केशवा पाय तुझे ॥४॥ तुज वाटे आतां तें करी अनंता । तुका म्हणे संतां लाज माझी ॥ ५ ॥

१८७. माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव । आपणचि देव होय गुरु ॥ १ ॥ पढिये देहभाव पुरवी वासना । अंतीं तें आपणांपासीं न्यावें ॥ २ ॥ मागें पुढें उभा राहे सांभाळित । आलिया

आघात निवाराया ॥ ३ ॥ योगक्षेम त्यांचा जाणें जडभारी । वाट दावी करीं धरूनियां ॥ ४ ॥ तुका म्हणे नाहीं विश्वास ज्या मनीं । पाहावें पुराणीं विचारूनी ॥ ५ ॥

१८८. अदिनाथ उभा बीज प्रकटलें । मच्छिंद्रा लाधलें सहजस्थिती ॥१॥ तेचि प्रेममुद्रा गोरक्षा दिधली । पूर्ण कृपा केली गहिनीनाथा ॥ २ ॥ वैराग्यें तापला सप्रेमें निघाला । ठेवा जो लाधला शांतिसुख ॥३॥ निर्द्वंद्व निःशंक विचरतां महीं । सुखानंद हृदयीं स्थिरावला ॥४॥ विरक्तीचें पात्र अन्वयाचें मुख । येऊनी सम्यक अनन्यता ॥ ५ ॥ निवृत्ति गहिनीं कृपा केली पूर्ण । कुळ हें पावन कृष्णनामें ॥ ६ ॥

१८९. आदिनाथ गुरु सकळ सिद्धाचा । मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य ॥ १ ॥ मच्छिंद्रानें बोध गोरक्षासी केला । गोरक्ष वोळला गहिनीप्रती ॥ २ ॥ गहिनीप्रसादें निवृत्ति दातार । ज्ञानदेवा सार चोजविलें ॥ ३ ॥

## सोमवारचे अभंग

१९०. ॐ नमो शिवा आदि । कावडी घेतली खांदीं । मिळाली संतमांदी । त्यांचें चरणरेणु वंदी रे ॥ १ ॥ शिवनाम शीतळ मुखीं । सेवीं पां कापडिया रे । दुड दुड दुड दुड दुडु दुडु दुडु दुडु । पळ सुटला कळिकाळा बापुडिया रे ॥२॥ गुरुलिंग जंगम । तेणें दाविला आगम । आधि व्याधि झाली सम । तेणें पावलों विश्राम रे ॥ ३ ॥ जवळीं असतां जगज्जीवन । कां धांडोळीसी वन । एकाग्र करी मन तेणें होईल समाधान रे ॥४॥ देहभाव जेथें विरे । तें साधन दिधलें पुरे । बापरखुमादेवीवरें । विठ्ठलुरे विठ्ठलुरे विठ्ठलुरे ॥ ५ ॥

१९१. स्वर्ग जयाची साळोंखा । समुद्रपाळी पिंड देखा । शेषासारखी बैसका । जो आधार तिन्हीं लोकां ॥ १ ॥ लिंग देखिलें देखिलें । त्रिभुवनीं तिहीं लोकीं विस्तारिलें ॥ २ ॥ मेघधारीं स्तपन केलें । तारापुष्पीं वरी पूजिले । चंद्रफळ ज्या वाहिलें । ओवाळिलें रविदीपें ॥ ३ ॥ आत्मनैवेद्य समर्पिले । ब्रह्मानंदीं मग वंदिलें । ज्योतिर्लिंग मग ध्याइलें । ज्ञानदेवें हृदयीं ॥ ४ ॥

१९२. आम्ही कापडी रे आम्ही कापडी रे । पापें बारा वाटा पळती बापडीं रे ॥१॥ पंढरपुरीचें आम्ही कापडी रे । उत्तर पंथींचे आम्ही कापडी रे ॥२॥ आजि पाहिलें रे आजि पाहिलें रे । संतसंगति सुख झालें रे ॥ ३ ॥ समता कावडी रे समता कावडी रे । मज नामामृत भरिले आवडी रे ॥ ४ ॥ येणें न घडे रे जाणें न घडे रे । निजसुख कोंदले पाहतां चहूंकडे रे ॥ ५ ॥ नलगे दंडणें रे नलगे मुंडणे रे । नाम म्हणोनि कर्माकर्म खंडणें रे ॥ २ ॥ दुःख फिटले रे दुःख फिटले रे । बापरखुमादेविवर विठ्ठले रे ॥ ७ ॥

१९३. तुम्ही विश्वनाथ । दीन रंक मी अनाथ ॥१॥ कृपा कराल ते थोडी । पाया पडिलों बराडी ॥२॥ काय उणें तुम्हां-पासीं । मी तों अल्पाचि संतोषी ॥३॥ तुका म्हणे देवा । कांहीं भातुकें पाठवा ॥ ४ ॥

१९४. हरिहरां भेद । नाहीं करूं नये वाद ॥१॥ एक एकाचें हृदयीं । गोडी साखरेच्या ठायीं ॥२॥ भेदकासी नाड एक वेलां-टीच आड ॥३॥ वाम सव्य भाग । तुका म्हणे एकाचि अंग ॥४॥

१९५. भस्म उटी रुंडमाळा । हातीं त्रिशूळ नेत्रीं ज्वाळा

॥१॥ गजचर्म व्याघ्रांबर। कंठीं शोभे वासुकी हार ॥२॥ भूतें वेताळें नाचती। हर्षयुक्त उमापती ॥३॥ सर्व सुखाचे आगर। म्हणे नरहरि सोनार ॥४॥

१९६. शिव भोळा चक्रवर्ती। त्याचे पाय माझें चित्तीं ॥१॥ वाचे वदतां शिवनाम। तया न बाधी क्रोध काम ॥ २ ॥ धर्म अर्थ काम मोक्ष। शिवादेखतां प्रत्यक्ष ॥ ३ ॥ एका जनार्दनीं शिव। निवारी कळिकाळाचा भेव ॥ ४ ॥

१९७. कैलासींचा देव भोळा चक्रवर्ती। पार्वतीचा पती योगिराज ॥१॥ तयाचिये पायीं माझें दंडवत। घडो आणि चित्त जडो नामीं ॥२॥ जटाजूट गंगा अर्ध चंद्रभाळीं। तिजा नेत्रज्वाळीं जातवेद ॥३॥ कंठीं काळकूट डौर त्रिशूळ हातीं। सर्वांगीं विभूति शोभतसे ॥ ५ ॥ गळा रुंडमाळा खापर हस्तकीं। रामनाम मुखीं सर्वकाळ ॥५॥ गजचर्मधारी स्मशानीं राहिला। संगें भूतमेळा विराजित ॥ २ ॥ नामा म्हणे नामें नासोनियां पाप। करी सुखरूप भक्तांलागीं ॥ ७ ॥

१९८. हरिहर सांडूनि देव। धरिती भाव क्षुल्लकीं ॥ १ ॥ ऐका त्यांची विटंबना। देवपणा भक्तांची ॥ २ ॥ अंगीं कवडे घाली गळां। परडी कळाहीन हातीं ॥ ३ ॥ गळां गांठां हिंडे द्वारीं। मनुष्य परी कुतरीं ती ॥ ४ ॥ माथां शेंदुर दांत खाली। जेंगर हातीं सटवीचें ॥ ५ ॥ पूजिती विकट दोंद। पशु सोंड गजाची ॥६॥ ऐशा छंदे चुकली वाट। भाव खोटा भजन ॥ ७ ॥ तुका म्हणे विष्णु शिवा। वाचोनी देवा भजनी ते ॥ ८ ॥

१९९. आहा आहा रे भाई ॥ध्रु०॥ प्रथम नमूं तो विनायक।

ठेवूनि गुरुचरणीं मस्तक। वदेन प्रासादिक। वाणी हरिहरांचे पवाडे ॥१॥ ऐसी माझी ब्रीदावळी। दासें दासत्वें आगळी। पान्हेरीनें मार्ग मळी। जीवन घ्यारे कापडी हो ॥ २ ॥ जें सीतळाहुनी सीतळ। पातळाहुनी पातळ। प्रेमामृत रसाळ। तें सेवा अहो भाग्याचे ॥ ३ ॥ जिंकाल तरी जिंका रे अभिमान। दवडाल तरी दवडा लज्जा आणि मान। धराल ते धरा शंभूचे चरण। दावाल पण ऐसा दावा तो ॥ ४ ॥ काळा घेऊं नेदी वाव। आला तो राखे घावडाव। शुद्ध सत्त्वीं राखोनि भाव। म्हणा महादेव हर हर वाणी गर्जो द्या ॥ ४ ॥ पराविया नारी माउलीसमान। परधनीं बाटों नेदीं मन। जीवित्व तें तृणासमान। स्वामिकाजीं जाण शूर म्हणों तया ॥ २ ॥ शक्ति वेंचाविया परउपकारा। खोटें खोट्याचा पसारा। सत्य तें भवनदीचा तारा। आळस तो न करा येथें अहो सांगतों ॥७॥ व्रत करा एकादशी सोमवार। कथा पूजन हरिजागर। पुण्य तें असें गातां नाचतां बहु फार। पुन्हां बोलिला संसार नाहीं नाहीं सत्यत्वें ॥ ८ ॥ संग संतांचा करितां बरवा। उत्तमोत्तम कीर्तीचा ठेवा। पंथ तो सुपंथें चालावा। उगवा वासना लिगाड ॥९॥ तुका चालवितो कावडी। प्रवृत्ति निवृत्ति चोखडी। पुढती पुढती अधिक गोडी। भरुनि कळस भजन आवडी केशवदास नटतसे ॥१०॥

२००. विदेह आत्मालिंगा गुरुकृपेचा तुषारु। पूर्ण पूर्ण भरिला घटु हळूहळू बिंदू उदारु। वरुपला लिंगावरी तेणें तुष्टला श्रीगुरु। प्रसन्न निवृत्तिराजा ज्ञान देऊनि उदारु ॥ १ ॥ तयालागीं ज्ञानदेवो नाम गुरुकृपे पावलों। असतां इये देहीं संसारा हारपलों। ज्ञानविज्ञान कळो आलें अद्वैतरूप बुझालो। विठ्ठल नाम माझे वाचे तेणें वाग्पुष्प पावलों ॥ २ ॥ नित्य गळति नामें झालीं

गेला प्रपंच अनिवारू । उपरती देहीं झाली निमाली वासना संसारू । तपन झालें ब्रह्ममूर्ति दिननिशीं साचारू । आठवितां मागील भावो अवघा पारुषला उदारू ॥ ३ ॥ विज्ञानेसी ज्ञान गेलें एकरूप परिचार । ज्योतिमाजी काळिका एक दीप झाला आकार । वृत्ति ते निवृत्ति झाली माया मारुनि केलें घर । निवृत्ति गुरु माझा घट स्थापिला त्यासमोर ॥ ४ ॥ ज्ञानदेवें घटमठ निरोपिली हरिभक्ति । उडाली पक्षपाती इंद्रियां तेथें नाहीं गती । विराले अभिमान ममता झाली समाप्ती । खुंटलिया उर्मी दाही तपन झालें लिंगाप्रती ॥ ५ ॥

२०१. आदि आत्मज्योतीर्लिंगा लांबियेला घटु । स्थावरिलें मायावस्त्र लिंगावरी प्रविष्टु । तपन नाम ध्वनी इंद्रिया केलें सपाटू ॥ १ ॥ हळूहळू गळती गळे गळों लागली सकळें । उच्चारितां कृष्णनाम भेणें पळिजे कळिकाळे ॥ २ ॥ त्रिगुण सुटल्या गांटी घटु विराला सघन । पंचतत्त्वें एके ठाईं आत्मा नांदे परिपूर्ण । जीवाशिव हारपले एक दिसे चैतन्य । आत्माराम विदेहिया श्रीगुरूनें सांगितली खुण ॥ ३ ॥ गळाति लागीं अपाय मोठे विरळा जाणे हेचि खुण । नरदेह अवचितें जो साधकु होय नारायण । परामानंदें गळाति गळे पांचहि तत्त्वें हारपोन ॥ ४ ॥ निवृत्ति सखा माझा दीनदयाळु श्रीगुरु । अळंकापुरीं स्थापियेलें दिधला विठ्ठल उच्चारू । समाधि जीवन माझे वरी अजानवृक्ष तरु । जंववरी चंद्रसूर्य तंववरी कीर्तिघट स्थिरू ॥ ५ ॥ गाती वाती साधु मुनि छंद घटमठीं चित्त । विरेल देहबुद्धि ज्ञानदाता देईल उचित । विज्ञानेंसी गोष्टी सांगे ऐसें पद पावत । बापरखुमादेविवरु लांबविला घटु ज्ञानदेव सांगत ॥ ६ ॥

## मंगळवारचे अभंग

२०२. रंगा येई वो ये रंगा येई वो ये । विठाई विठाई माझे कृष्णाई कान्हाई ॥१॥ वैकुंठवासिनी वो जगत्रयजननी । तुझा वेधु माझे मनीं वो ॥ २ ॥ कटीं कर विराजित मुगुट रत्नजडित । पीतांबरु कासिला तैसा येई कां धांवत ॥ ३ ॥ विश्वरूप विश्वंभरे कमळनयन कमळाकरे । तुझें ध्यान लागो बापरखुमादेविवरे वो ॥ ४ ॥

२०३. चौक भरियेला आसनीं । पाचारिली कुळस्वामिनी । वैकुंठवासिनी । ये धांवोनि झडकरी ॥१॥ रंगा येई वो विठाई । सांवळिये डोळसे । तुझें श्रीमुख साजिरे । ते मी केधवा देखेन ॥२॥ रज तम धुपारती । पंचप्राणांची आरती । अवघी सारोनी आरती । ये धांवती झडकरी ॥३॥ मन मारोनियां मेंढा मुठीं । आशा मनसा तृष्णा सुटी । भक्ति भाव नैवेद्य तार्टी । भरोनि केला हाकारा ॥४॥ डांका अनुहात गजरे । येऊनि अंगासि संचरे । आपुला घेऊनी पुरस्कार । आरोग्य करी तुकयासी ॥५॥

२०४. कनवाळू कृपाळू भक्तांलागीं मोही । गजेंद्राचा धांवा तुवां केला विठाई ॥ १ ॥ पांडुरंगे ये वो पांडुरंगे । जीवाचे जीवलगे ये वो पांडुरंगे ॥ २ ॥ भक्तांच्या कैवारे कष्टलीस विठ्ठले । अंबऋषीकारणें जन्म दहा घेतले ॥ ३ ॥ प्रल्हादाकारणें स्तंभीं अवतार केला । विदारुनि दैत्यप्रेमपान्हा पाजिला ॥ ४ ॥ उपमन्याकारणें कैसी धांवसी लवलाहीं । पाजी प्रेमपान्हा क्षीरसागराठायीं ॥ ५ ॥ कौरवी पांचाळी सभेमाजी आणिली । वस्त्रहरणीं वस्त्रें कैसी झाली माउली ॥ ६ ॥ दुर्वास पातला धर्मा छळावया वनां । धांवसी लवलाहीं शाखा देठ

घेऊनी ॥ ७ ॥ कपाळू माऊली भुक्ति मुक्ति भांडार । करी माझा अंगीकार तुका म्हणे विठ्ठले ॥ ८ ॥

२०५. अनादि निर्गुण प्रगटली भवानी । मोह महिषासुर मर्दनालागुनी । त्रिविध तापांची करावया झाडणी । भक्तांलागीं तूं पावसी निर्वाणीं ॥ १ ॥ आईचा जोगवा जोगवा मागेन । द्वैत मारूनि माळ मी घालीन । हातीं बोधाचा झेंडा मी घेईन । भेदरहित वारीसा जाईन ॥ २ ॥ नवविध भक्तीच्या नवरात्रा । करूनि पोटीं मागेन ज्ञानपुत्रा । धरीन सद्भाव अंतरींच्या मित्रा । दंभ सासऱ्या सांडीन कुपात्रा ॥ ३ ॥ पूर्ण बोधाची घेईन परडी । आशा तृष्णेच्या पाडीन दरडी । मनोविकार करीन कुर्वंडी । अद्भुतरसाची भरीन दुरडी ॥ ४ ॥ आतां साजणी झालें मी निःसंग । विकल्प नवऱ्याचा सोडियेला संग । काम क्रोध झोडियेले मांग । केला मोकळा मारग सुरंग ॥ ५ ॥ ऐसा जोगवा मागुनी ठेविला । जाऊनी नवस महाद्वारीं फेडिला । एकपणें जनार्दन देखियला । जन्ममरणाचा फेरा चुकविला ॥ ५ ॥

२०६. पिंडांड ब्रह्मांड अंतरीं दैवत भिन्नाकृति वो । शोधोनि पाहतां अवघें चराचर व्यापक घनसंभूती वो । भेदभाव त्रिगुणाचा रजतमसत्त्वाची आरती वो । ऐसें जाणोनी । केली उभवणी । द्वैत सारुनी । परी तो मनीं एक हरि अंकिला । तुज म्यां फुलवरा बांधिला ॥१॥ जय जगदंबे पूर्णकदंबे जगद्बोध देह तुज अर्पिला । तुज म्यां फुलवरा बांधिला ॥ ध्रु० ॥ आई भवानी थोर जाणोनी तुज म्यां उपासिलें वो । हातीं परडी देऊनी तिनें मज भिकेसि लावलें वो । खुळा पांगळा करूनि

आपणाजवळीं बैसविलें वो । उदो अस्तुचें भरें । फिरे गरगरे । भूत वावरे । मज व्यर्थ शीण वाटला ॥ २ ॥ नवस करोनि खंडोबासी मुरळी होऊनि बैसले वो । आपुले जे कां सखे सज्जन ते विवंचूनि भरी भरले वो । वारी मागतां पोट भरेना बहु श्रम पावले वो । श्वानाचिये परी । वृथा गुरगुरी । जाय चाचरी । परी तो हरी नाहीं देखिला ॥ ३ ॥ माझे घरीं पाहुणा भैरव येऊनि बैसला वो । त्रिगुणाचा त्रिशूळ घेऊनि प्रपंच विस्तारिला वो । जोगी बोलावूनि पतर भरूनि भराड म्यां घातला वो । ऐशी वरदळे । सोशिली बळें । झालीं निर्फळें । सुखाचा लेश नाहीं देखिला ॥४॥ मुंजाबासी डांक घालुनी मेसाई आळविली वो । त्रिगुणाची तिवई करूनि त्यावरी बैसविली वो । धूप दीप नैवेद्य दाऊनि पंचारती केली वो । तिने मज नाडिले । दुःख भोगिलें सुख नासलें । मग म्यां ढकलून दिले तिला ॥ ५ ॥ ऐशी दैवतें केली अनंते नवस बहू फेडिले वो । परि ते फलकट झाले शेवटी गळा येऊनि पडिले वो । बहु जाचिलें दुःख भोगिलें चौदिशी व्यापिलें वो । झाले मी उदास । धरली कास । सोडुनि आस । पंढरी पाहुनी जीव हर्षला ॥ ६ ॥ वैकुंठीचे निधान त्याचे असती जे प्रियकर वो । त्यांची गांठ पडली तेणें दिधला अभय कर वो । त्यांचे संगती गेलें भक्तीनें देखिलें भीमातीर वो । परात्पर सोयरा । पुंडलिक बरा । दिधला थारा । येणें मज बुडतां हात दिधला ॥७॥ डोळा घालुनि अंजन घेऊनि गेले मज राउळी वो । विटेवरी जगदंबा एकाएकी नयनी देखिली वो । मनोभाव वरदळ वृत्ती देहाची खुंटली वो । एका जनार्दनीं भलें । द्वैत हरपलें । ऐक्य संचलें । जन्ममरणाचा पट फाटला ॥ ८ ॥

२०७ माझें कुळींची कुळस्वामिनी। विठाई जगत्रयजननी। येई वो पंढरपूरवासिनी। ठेविलें दोनी कर जघनी। उभी सखी सजणी ॥१॥ येई पुंडलिक वरदायिनी। विश्वजननी। रंगा येई वो ॥ध्रु०॥ मध्यें सिंहासन घातलें। प्रमाण चौक हें साधिले। ज्ञानकळस वर ठेविले। पूर्ण भरियले। धूप दीपिले। सुवासें करूनी ॥२॥ सभामंडप शोधिली। भक्ति चांदवा दिधला। उदो उदो शब्द गाजला। रंग माजला। वेद बोलिला। मूळची ध्वनी ॥३॥ शुक सनकादिक गोंधळी। जीवाशिव घेऊनी संबळी गाती हरीची नामावळी। मातले बळी। प्रेमकल्लोळीं। सुखाचें सदनीं ॥४॥ ऐसा गोंधळ घातिला। भला परमार्थ लुटिला। एका जनार्दनीं भला। ऐक्य साधिला। ठाव आपुला। लाभ त्रिभुवनीं ॥ ५ ॥

२०८. अनादि अंबिका भगवती। बोध परडी घेऊनी हातीं। पोत ज्ञानाचा पाजळती। उदो उदो भक्त नाचती ॥ १ ॥ गोंधळा येई वो जगदंबे। मूळपीठ तूं अंबे ॥ ध्रु० ॥ व्यास वसिष्ठ शुक गोंधली। नाचताती सोहं मेळीं। द्वैतभाव विसरूनि बळी। खेळती अंबे तुझे गोंधळी ॥२॥ मुकुटमणी पुंडलिक। तेहतीस कोटी देवनायक। गोंधळ घालिती सकौतुक। एका जनार्दनी नाचे देख ॥ ३ ॥

## बुधवारचे अभंग

२०९. विठ्ठल नाहीं जये शरीरीं। वायां कां गा जन्मलें संसारीं। विठ्ठल नाहीं जये नगरीं। तें अरण्य जाणावें ॥ १ ॥ विठ्ठल नाहीं जये देशीं। स्मशान भूमी ते परियेसी। रा-

शशीवीण दिशा जैसी । रसना तैसी विठ्ठलेंविण ॥ २ ॥ विठ्ठला वेगळें जितुकें कर्म । विठ्ठला वेगळा जितुका धर्म । विठ्ठला वेगळे बोलती ब्रह्म । तितुकाही श्रम जाणावा ॥ ३ ॥ सच्चिदानंदघन । पंढरिये परिपूर्ण । कर ठेवोनियां जघन । वाट पाहे भक्तांची ॥ ४ ॥ विठ्ठलेवीण देवो म्हणती । ते संसार पुढती पावती । विठ्ठलावीण तृप्ती । नाहीं प्रतीती विठ्ठलेंवीण ॥ ५ ॥ श्रीगुरु निवृत्तीनें दिधलें । तें प्रेम कोणे भाग्यें लाधलें । बापरखुमादेविवरु विठ्ठले । ऐसें केलें ज्ञानदेवा ॥ ६ ॥

२१०. विठ्ठल नाम नुच्चारिसी । तरीं रवरव कुंडीं पडसी ॥ १ ॥ विठ्ठल नाम उच्चारीं । आळसु न करीं क्षणभारीं ॥ २ ॥ विठ्ठल नाम तीन अक्षरें । अमृतपान केलें शंकरें ॥३॥ रखुमादेविवरा विठ्ठलें । महापातकी उद्धारिले ॥ ४ ॥

२११. पांडुरंगकांती दिव्य तेज झळकती । रत्नकीळ फांकती प्रभा । अगणित लावण्य तेज पुंजाळलें । न वर्णवे तेथींची शोभा ॥ १ ॥ कानडा वो विठ्ठलु कर्नाटकु । तेणें मज लाविला वेधु । खोळ बुंथी घेऊनि खुणाची पालवी । आळविल्या नेदी सादू ॥ २ ॥ शब्देंवीण संवादु दुजेवीण अनुवादु । हें तंव कैसेंनि गमे । परेही परतें बोलणें खुंटलें । वैखरी कैसेनि सांगे ॥ ३ ॥ पायां पडूं गेलें तंव पाउलचि न दिसे । उभाचि स्वयंभू असे । समोर कीं पाठीमोरा हें न कळे । ठकचि पडिलें कैसें ॥४॥ क्षेमालागीं जीव उतावीळ माझा । म्हणवुनी स्फुरताती बाहो । क्षेम देऊं गेलें तंव मीचि मी एकली । आसावला जीव राहो ॥ ५ ॥ बापरखुमादेविवरु हृदयींचा जाणुनी । अनभवु सौरसु केला । दृष्टीचा डोळा पाहों मी गेलियें । तंव भीतरीं पालटु झाला ॥ ६ ॥

२१२. श्रम धरिसी या देहाचा । विठ्ठल म्हणे कां रे वाचा ।। १ ।। पडोन जाईल कलेवर । विठ्ठल उच्चारीं पां सार ।। २ ।। बापरखुमादेविवरु अभय करु । मस्तकीं ठेविला हा निर्धारू ।। ३ ।।

२१३. कांहीं नेणोनियां आन । एक विठ्ठलची जाण ।। १ ।। पुढती पुढती मन । एक विठ्ठलची जाण ।। २ ।। गुरुगम्य हे तयाची खूण । एक विठ्ठलचि जाण ।। ३ ।। बुझसी तरी तूंचि निर्वाण । एक विठ्ठलाचि जाण ।। ४ ।। हेचि भक्ति हेचि ज्ञान एक विठ्ठलाचि जाण ।। ५ ।। बापरखुमादेविवरा विठ्ठलाचि आण । एक विठ्ठलाचि जाण ।। ६ ।।

२१४. सार सार सार विठोबा नाम तुझें सार । म्हणोनि शूळपाणी जपताहे वारंवार ।। १ ।। आदि मध्य अंती निज-बीज ओंकार । ध्रुव प्रल्हाद अंबऋषी मानिला निर्धार ।। २ ।। भुक्ति मुक्ति सुखदायक साचार । पतित अज्ञान जीव तरले अपार ।। ३ ।। दिवसोंदिवस व्यर्थ जात संसार । बापरखुमा-देविवरा विठ्ठलाचा आधार ।। ४ ।।

२१५. नेणों ब्रह्म मार्ग चुकलें । उघडे पंढरपुरा आलें । भक्तें पुंडलिकें देखिलें । उभें केले विटेवरी ।। १ ।। तो हा विठोबा निधान । ज्याचें ब्रह्मादिकां ध्यान । पाऊले समान । विटेवरी शोभती ।। २ ।। रूप पाहतां डोळसु । सुंदर पाहतां गोपवेषु । महिमा वर्णिता महेशु । तेणें मस्तकीं वंदिला ।। ३ ।। भक्ति देखोनि लांचावला । जाऊं नदी केला उभा । निवृत्तिदास म्हणे विठ्ठला । जन्मोजन्मीं न विसंबे ।। ४ ।।

२१६. विठ्ठल विठ्ठल मंत्र सोपा । करी पापा निर्मूळ ।। १ ।।

भाग्यवंता छंद मनीं । कोड कानीं ऐकती ॥ २ ॥ विठ्ठल हें दैवत भोळे । चाड काळें न धरावी ॥ ३ ॥ तुका म्हणे भलते याती । विठ्ठल चित्तीं शुद्ध ते ॥ ४ ॥

२१७. नकळें तें कळों येईल उगलें । नामें या विठ्ठलें एकाचिया ॥ १ ॥ न दिसें तें दिसो येईल उगलें । नामें या विठ्ठलें एकाचिया ॥ २ ॥ न बोलों तें बोलों येईल उगलें । नामें या विठ्ठलें एकाचिया ॥ ३ ॥ न भेटें तें भेटों येईल आपण । करितां चिंतन विठोबाचें ॥ ४ ॥ अलभ्य तो लाभ होईल अपार । नाम निरंतर म्हणतां वाचे ॥ ५ ॥ तुका म्हणे जीव आसक्त सर्वभावें । तरतील नामें विठोबाच्या ॥ ६ ॥

२१८. आनंद अद्वय नित्य निरायम । जें का निजध्येय योगियांचें ॥ १ ॥ ते हे समचरण साजिरे विटेवरी । पाहा भीमातीरीं विठ्ठलरूप ॥ २ ॥ पुराणासीं वाड श्रुति नेणती पार । झालें साकार पुंडलिका ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्यातें सनकादिक ध्यात । तें आमुचें कुलदैवत पांडुरंग ॥ ४ ॥

२१९. विठ्ठल हा चित्तीं । गोड लागे गातां गीतीं ॥ १ ॥ आम्हां विठ्ठल जीवन । टाळ चिपुळिया धन ॥ २ ॥ विठ्ठल विठ्ठल वाणी । अमृत हें संजीवनी ॥ ३ ॥ रंगला या रंगीं । तुका विठ्ठल सर्वांगीं ॥ ४ ॥

२२०. विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी । विठ्ठल तोंडी उच्चारा ॥ १ ॥ विठ्ठल अवघ्या भांडवला । विठ्ठल बोला विठ्ठल ॥ २ ॥ विठ्ठल नाद विठ्ठल भेद । विठ्ठल छंद विठ्ठल ॥ ३ ॥ विठ्ठल सुखा विठ्ठल दुःखा । तुकया मुका विठ्ठल ॥ ४ ॥

२२१. विठ्ठल विठ्ठल येणें छंदें । ब्रह्मानंदें गर्जावें ॥ १ ॥ वाजे टाळ टाळ्या टाळी । होय होळी विघ्नांची ॥ २ ॥ विठ्ठल आदि अवसानीं । विठ्ठल मनीं स्मरावा ॥ ३ ॥ तुका म्हणे विठ्ठल वाणी । वदा कानीं आइका ॥ ४ ॥

२२२. एक गावूं आम्ही विठोबाचें नाम । आणिकांचें काम नाहीं आतां ॥१॥ मोडूनियां वाटा सूक्ष्म दुस्तर । केला राज्य-भार चाले ऐसा ॥ २ ॥ लावुनि मृदंग श्रुति टाळघोष । सेवुं ब्रह्मरस आवडीनें ॥ ३ ॥ तुका म्हणे महापातकी पतित । होती जीवन्मुक्त हेळामात्रे ॥ ४ ॥

२२३. बोलवा विठ्ठल पाहावा विठ्ठल । करावा विठ्ठल जीवभाव ॥ १ ॥ येणें सोसें मन झालें हावभरी । परत माघारी येत नाहीं ॥ २ ॥ बंधनापासूनि उकलल्या गांठी । देतां आली मिठी सावकाश ॥ ३ ॥ तुका म्हणे देह भरिला विठ्ठलें । काम क्रोधें केलें घर रितें ॥ ४ ॥

२२४. अनंत रूपांचें हें सार । अनंत तीर्थांचें माहेर । अनंती अनंत अपार । तो हा कटीं कर ठेवूनि उभा ॥ १ ॥ धन्य धन्य पांडुरंग । सकळ दोषा होय भंग । पूर्वज उद्धरती सांग । पंढरपूर देखलिया ॥ २ ॥ निरा भीवरा पडतां दृष्टी । स्नान करितां शुद्ध सृष्टी । अंतीं तो वैकुंठप्राप्ती । ऐसें परमेष्ठी बोलिला ॥ ३ ॥ तेथें एक शीत दिधल्या अन्न । कोटी कुळांचें होय उद्धरण । कोटी याग केले पूर्ण । ऐसें माहिमान तीर्थांचे ॥ ४ ॥ नामा म्हणे धन्य जन्म । ज्यासी पंढरीचा नेम । तया अंती पुरुषोत्तम । जीवें भावें न विसंबे ॥ ५ ॥

२२५. जरी हें आकाश वर पडो पाहे । ब्रह्मगोळ भंगा

जाये । वडवानळ त्रिभुवन खाये । तरी मी तुझीच वाट पाहें गा विठोबा ॥ १ ॥ न करी आणिकांचा पांगिला । नामधारक तुझाचि अंकिला ॥ २ ॥ सप्त सागर एकवट होती । जरी हे विरूनि जाय क्षिती । पंचमहाभुते प्रळय पावती । परि मी तुझाची सांगाती गा विठोबा ॥ ३ ॥ भलतैसे वर पडो भारी । नाम न संडी न टळे निर्धारीं । जैसी पतिव्रता प्राणेश्वरी । विनवी भानुदास अवधारीं गा विठोबा ॥ ४ ॥

२२६. दोन्ही हात ठेवुनि कटीं । उभा भीवरेच्या तटीं । कष्टलासी साटीं । भक्तिकाजें विठ्ठला॥१॥ भागलासी मायबापा । बहु श्रम केल्या खेपा । आम्हांलागी सोपा । दैत्यां काळ कृतांत ॥ २ ॥ होतासी क्षीरसागरीं । मही दाटली असुरीं । म्हणो-नियां घरीं । गौळयांचे अवतार ॥ ३ ॥ केला पुंडलीके गोवा । तुज पंढरीये देवा । तुका म्हणे भावा— । साठीं हातीं सांपडसी॥४॥

२२७. भवसागर तरता । कां रे करितसां चिंता । पैल उभा दाता । कटीं कर ठेवनिया ॥ १ ॥ त्याचे पायीं घाला मिठी । मोल न घे जगजेठी । भावा एकासाठीं । खांदा वाहे आपुल्या ॥ २ ॥ सुखें करावा संसार । परि न संडावें दोन्ही वार । दया क्षमा घर । चोजवीत येतील ॥ ३ ॥ भुक्ति मुक्तीची चिंता । नाहीं दैन्य दरिद्रता । तुका म्हणे दाता । पाडुरंग वोळगिल्या ॥ ४ ॥

## गुरुवारचे अभंग

२२८. उभारिला ध्वज तिहीं लोकांवरी । ऐसी चराचरीं

कीर्ती ज्यांची ॥ १ ॥ ते हे निवृत्तिनाथ ज्ञानेश्वर सोपान । मुक्ताबाई ज्ञानदीप्तीकळा ॥ २ ॥ धरुनी सगुण रूपें केली बाळ-क्रीडा । बोलविला रेडा निगम वाचे ॥ ३ ॥ बैसोनिया वरी चालविली भिंती । चांगदेवाप्रती दिली भेटी ॥ ४ ॥ मग वास केला अळंकापुरासी । पिंपळ द्वारासी कनकाचा ॥ ५ ॥ निळा म्हणे ज्यांच्या नामें करिता घोष । नातळती दोष कळिकाळाचे ॥ ६ ॥

२२९. तिन्ही देव जैसे परब्रह्मीचे ठसे । जगीं सूर्य तैसे प्रकाशले ॥ १ ॥ धन्य तो निवृत्ति धन्य तो सोपान । धन्य हा निधान ज्ञानदेव ॥ २ ॥ उपजतांची ज्ञानी हें वर्म जाणोनि । आले लोटांगणी चांगदेव ॥ ३ ॥ संस्कृताची गांठी उघडोनि ज्ञानदृष्टी । केलीसे मराठी गीतादेवी ॥ ४ ॥ प्रत्यक्ष पैठणीं भटीं केला वाद । रेड्यामुखीं वेद बोलविला ॥ ५ ॥ नामा म्हणे सर्व सुकृतें लाहिजे । एक वेळां जाईजे अळंकापुरा ॥ ६ ॥

२३०. नमो ज्ञानेश्वरा नमो ज्ञानेश्वरा । निवृत्ति उदारा सोपानदेवा ॥ १ ॥ मुक्ताबाई नमो त्रिभुवन पावती । आद्य-त्रयजननी देवांचिये ॥ २ ॥ जगदोद्धारालागीं धरिले अवतार । मिरविला बडिवार सिद्धाईचा ॥ ३ ॥ निळा शरणागत म्हणवी आपुला । संतीं निरविला देऊनि हातीं ॥ ४ ॥

२३१. म्हैसीपुत्रामुखें बोलवणें श्रुती । चालवणें भिंती बैसोनिया ॥ १ ॥ नव्हे हा सामान्य महिमा संतांचा । नैवेद्य हातींच मूर्ति जेवी ॥ २ ॥ उदकामाजी वह्या ठेऊनि कोरड्या । दाखवणें रोकड्या विश्वजनां ॥ ३ ॥ निळा म्हणे तिहीं संगेचि तारणें । दीनें उद्धरणें नवल कोण ॥ ४ ॥

२३२. पशुमुखें वेदाच्या श्रुती । पढवा कीर्ती तुमचिये ॥१॥ अचेतन भिंती चालवणें । हेंही करणें विचित्र ॥ २ ॥ तेरा दिवस उदकीं ठेवा । कागद देवा कोरडे ॥ ३ ॥ निळा म्हणे नारायण । ब्राह्मणजन तुम्हां घरीं ॥ ४ ॥

२३३ यात्रे अलंकापुरा येती । ते आवडती विठ्ठला ॥ १ ॥ पांडुरंगे प्रसन्नपणें । दिधलें देणें या ज्ञाना ॥ २ ॥ भूवैकुंठ पंढरपुर । त्याहुनि थोर महिमा या ॥ ३ ॥ निळा म्हणे जाणोनि संत । येति धांवत प्रतिवर्षीं ॥ ४ ॥

२३४. शिव तो निवृत्ति विष्णु ज्ञानदेव पाहीं । सोपान तो ब्रह्मा मूळ माया मुक्ताई ॥ १ ॥ धन्य धन्य धन्य धन्य निवृत्ति राया । धन्य ज्ञानदेव सोपान सखया ॥ २ ॥ प्रत्यक्ष पैठणीं भेटां दाविली प्रचिती । रेडियाच्या मुखें वदविली वेदश्रुति ॥ ३ ॥ चौदाशें वरुषांचे तपीतीररहिवासी । गर्व हरविला चालविले भिंतीसी ॥ ४ ॥ धन्य कान्होपात्रा आजि झाली भाग्याची । भेटी झाली ज्ञानदेवाची म्हणोनिया ॥ ५ ॥

२३५. सर्व सुखाची लहरी । ज्ञानाबाई अलंकापुरी ॥ १ ॥ शिवपीठ हें जुनाट । ज्ञानाबाई तेथें मुगुट ॥ २ ॥ वेदशास्त्रें देती ग्वाही । म्हणती ज्ञानाबाई आई ॥ ३ ॥ ज्ञानाबाईचे चरणीं । शरण एका जनार्दनी ॥ ४ ॥

२३६. चला आळंदीला जाऊं । ज्ञानेश्वरा डोळां पाहूं ॥१॥ होतील संतांचिया भेटी । सांगूं सुखांचिया गोष्टी ॥२॥ ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर । मुखीं म्हणतां चुकती फेर ॥ ३ ॥ जन्म नाहीं रे आणिक । तुका म्हणे माझी भाक ॥ ४ ॥

२३७. कैवल्याचा पुतळा । प्रगटला भूतळा । चैतन्याचा

जिव्हाळा । ज्ञानोबा माझा ॥ १ ॥ साधकांचा मायबाप दरुशने हरे ताप । सर्वांभूतीं सुखरूप । ज्ञानोबा माझा ॥ २ ॥ ज्ञानियांचा शिरोमणि । वंद्य जो कां पूज्यस्थानीं । चिंतकांचा चिंतामणी । ज्ञानोबा माझा ॥ ३ ॥ चालविली जड भिंती । हरली चांगयाची भ्रांती । मोक्षमार्गींचा सांगती । ज्ञानोबा माझा ॥४॥ रेड्यामुखीं वेद बोलाविला । गर्व द्विजांचा हरविला । शांतिरूप प्रगटला । ज्ञानोबा माझा ॥ ५ ॥ ब्रह्मसाम्राज्यदीपिका । वर्णियेली गीतेची टीका । विठोबाचा प्राणसखा । ज्ञानोबा माझा ॥ ६ ॥ गुरुसेवेलागीं जाण । शरण एका जनार्दन । त्रैलोक्याचे जीवन ज्ञानोबा माझा ॥ ७ ॥

२३८. ज्ञानदेव चतुराक्षरी जप हा करीं तूं सर्वज्ञा । ज्ञानाज्ञानविरहित ब्रह्मप्राप्तीची संज्ञा । ज्ञाता ज्ञेय निजांग होय ऐशी प्रतिज्ञा । ज्ञानाग्नीने पापें चळतीं हे ज्याची आज्ञा ॥ १ ॥ ज्ञानदेव ज्ञानदेव म्हणतां ज्ञान देव देतो । वासुदेवचि होतो अखंड वदनीं वदे तो ॥ ध्रु० ॥ नररुपें विष्णु अवतरला हा भगवान । नदी वापी कूप पाहतां उदक नोहे भिन्न । नवल हेंचि पशु म्हैसा करी वेदाध्ययन । नमन करूनि सद्भावें जपतां होय विज्ञान ॥ २ ॥ देवाधिदेव भगवान भक्तांप्रति वर दे । देतां वर ब्रह्मांडीं ब्रह्मानंद वो कोंदे । देशिकराज दयानिधि अलंकारपुरीं जो नांदे । देशभाषा ज्ञानदेवी गीताग्रंथ वदे ॥ ३ ॥ वक्ते श्रोते ग्रंथपठणें पावती समभाव । वर्णू जातां अगणित महिमा होतो जीव शिव । वंदुनि अनन्य एका जनार्दनीं धरी भाव । वर्षती निर्जर ज्ञानदेव नामें पुष्पांचा वर्षाव ॥ ४ ॥

२३९. आळंदी हें गांव पुण्यभूमी ठाव । दैवताचें नांव सिद्धेश्वर ।। १ ।। चौऱ्यांशीं सिद्धांचा सिद्धबेटी मेळा । तो सुखसोहळा काय वानूं ।। २ ।। विमानांची दाटी पुष्पांचा वरुषाव । स्वर्गाहूनि देव करिताती ।। ३ ।। नामा म्हणे देवा चला तया ठाया । विश्रांती घ्यावया कल्पवरी ।। ४ ।।

२४० जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ । अंगीं ऐसें बळ रेडा बोले ।। १ ।। करील तें काय नोहे महाराज । परि पाहे बीज शुद्ध अंगीं ।। २ ।। जयानें घातली मुक्तींची गवादी । मेळविली मांदी वैष्णवांची ।। ३ ।। तुका म्हणे तेथें सुखा काय उणे । राहे समाधानें चित्ताचिया ।। ४ ।।

२४१. ज्ञानियांचा राजा गुरु महाराज । म्हणती ज्ञानदेव तुम्हां ऐसें ।। १ ।। मज पामरा हें काय थोरपण । पायींची वाहाण पायीं बरी ।। २ ।। ब्रह्मादिका जेथें तुम्हां वोळगणें । इतर तुळणें काय पुढें ।। ३ ।। तुका म्हणे नेणों युक्तिचिया खोली । म्हणोनि ठेविली पायीं डोई ।। ४ ।।

२४२. सदाशिवाचा अवतार स्वामी निवृत्ति दातार ।। १ ।। महाविष्णुचा अवतार । सखा माझा ज्ञानेश्वर ।। २ ।। ब्रह्मा सोपान तो झाला भक्तां आनंद वर्षला ।। ३ ।। आदिशक्ति मुक्ताबाई । दासी जनी लागे पायीं ।। ४ ।।

टीप : यानंतर गुरुपरंपरेचे अभंग म्हणावेत.

## शुक्रवारचे अभंग

२४३. तू विटेवरी सखये बाई हो करीं कृपा । माझें मन लागों तुझ्या पायीं हो करीं कृपा । तूं सावळे सुंदरी हो करीं

कृपा । लावण्य मनोहरी हो करी कृपा । निजभक्तां करुणा करी हो करीं कृपा । पंढरपुरीं राहिलों । डोळां पाहिली । संती देखिली । वरुनि विठाई वरुनि विठाई ॥ १ ॥ सच्चिदानंद अंबाबाई हो करी कृपा । उजळ कुळदीपा । बोध करी सोपा । येऊनी लवलाही येऊनी लवलाही ॥ २ ॥ तुझा देव्हारा मांडिला हो करीं कृपा । चौक आसनीं कळस ठेविला हो करीं कृपा । प्रेमचांदवा वर दिधला हो करीं कृपा । ज्ञान गादी दिली बैसावया हो करीं कृपा । वरि बैसविली आदि माया हो करी कृपा। काम क्रोध मद मत्सर । दंभ अहंकार । त्यांचें बळ फार । सर्व सुख देई सर्व सुख देई ॥ ३ ॥ शुक सनकादिक गोंधळी हो करी कृपा । नाचताती प्रेमकल्लोळीं हो करीं कृपा । उदो उदो शब्द आरोळी हो करीं कृपा । पुढे पुंडलिक दिवटा हो करीं कृपा । त्यानें मार्ग दाविला निटा हो करीं कृपा । आई दाविली मूळपीठा हो करीं कृपा । बापरखुमादेविवरु । सुखसागरू त्याला नमस्कारू । सर्व सुख देई ॥ ४ ॥

२४४. पति जन्मला माझ्ये उदरी । मी झालें तयाची नोवरी ॥ १ ॥ पतिव्रता धर्म पाहा माझा । सर्वापरि पति भोगिजे वोजा ॥ २ ॥ निर्गुण पति आवडे मज । आधीं माय पाठीं झालिये भाज ॥ ३ ॥ मी मायराणी पतिव्रता शिरोमणी । ज्ञानदेवो निरंजनीं क्रीडा करी ॥ ४ ॥

२४५. निर्गुण निराकार दादा माहूर माझे गांव । शकुन सांगावया आलें यमाई माझें नाव । तये नगरी वस्ती केली मी तरी आलें एकभावें । ऐसा माझा शकुन दादा चित्त देऊन एकावें ॥ १ ॥ कैकाय कैकाय बाबा दुरील माझा देश । शकुन

सांगावया मी आले कलियुगास । ब्रह्माविष्णु महेश पुसती शकुन आम्हांस । ऐसें निदान आम्हीं सांगितलें त्यांस ॥ २ ॥ धरित्री आकाश मज देखतां उत्पत्ती । चंद्र सूर्य दादा मज देखतां होती । ब्रह्माविष्णुमहेश मज देखतां उपजती । जेथें आहे शिव तेथे आदि शक्ती ॥ ३ ॥ दाही अवतार मज देखतां झाले । अकराही रुद्र दादा होऊनियां गेले । अठ्याऐंशीं सहस्र ऋषी मज देखतां जन्मले । ब्रह्मादि तेहतीस कोटी खेळविले ॥ ४ ॥ अठ्ठावीस युगें झाली चक्रवर्ती । कौरव पांडव गेले दादा नेणों किती । छप्पन्न कोटी यादव गेले दादा कोणी पंथीं । आम्ही तुम्ही जाऊं मागें कोणी न राहाती ॥ ५ ॥ पृथ्वीमध्यें दादा एक विपरीत होईल । बहीण भावा दोघा-जणांचा विवाह लागेल । पांचा वरुषांची बाळा भ्रतार मागेल । साहा वरुषांची नारी गर्भिण होईल ॥ ६ ॥ आणिक एक दादा माझा ऐकावा बोल । पृथ्वीवरुता वारा थोर झुंजाट सुटेल । थोर थोर दादा पर्वत उडोनि जातील । अठराही जाती एके ठिकाणी जेवतील ॥ ७ ॥ कलियुगाची दादा ऐकावी थोरी । पुत्र तो होईल पित्याचा वैरी । भ्रतार सोडोनी घरोघरीं फिरतील नारी । ऐसा माझा शकुन दादा ऐका निर्धारी ॥ ८ ॥ आणिक एक दादा माझें एका उत्तर । आकार जाईल अवघा होईल निराकार । जाती चंद्र सूर्य मग पडेल अंधःकार । धरित्री आकाश जाईल मग कैंचा दिनकर ॥ ९ ॥ आणिक एक शकुन माझा ऐकावा संती । तुम्ही मूळ पीठीं राहणे नांव माझें आदिशक्ती । अंबेचा व्यवहार त्राहे त्राहे आदिमूर्ति । एका जनार्दनी प्रसन्न झाली आदिशक्ती ॥ १० ॥

२४६. सुवेळ सुदिन तुझा गोंधळ मांडिला वो । ज्ञान-वैराग्याचा वरती फुलवरा बांधिला वो । चंद्र सूर्य दोन्ही यांचा पोत पाजळिला वो । घालूनि सिंहासन वरुते घट स्थापियेला वो ॥ १ ॥ उदो बोला उदो उदो सद्‍गुरु माउलीचा वो ॥ ध्रु. ॥ प्रवृत्तीचे आणि निवृत्तीचे घालुनि शुद्ध आसन वो । ध्येय ध्याता ध्यान प्रक्षाळिले चरण वो । कायावाचामनें एकविध केले अर्चन वो । द्वैतअद्वैतभावें दिलें आचमन वो ॥ २ ॥ भक्ति वैराग्य ज्ञान याहीं पूजियेली अंबा वो । सद्रूप चिद्रूप पाहुनी प्रसन्न जगदंबा वो । एका जनार्दनी शरण मुळकदंबा वो । त्राहे त्राहे अंबे तुझा दास आहे उभा वो ॥ ३ ॥

२४७. सुदिन सुवेळ तुझा मांडिला गोंधळ वो । पंचप्राण दिवटे दोन्ही नेत्रांचे हिल्लाळ वो ॥ १ ॥ पंढरपूर निवासे तुझे रंगी नाचत असे वो । नवस पुरवी माझ्या मनींची जाणोनियां इच्छा वो ॥२॥ मांडिला देव्हारा तुझा त्रिभुवनामाझारी वो । चौक साधियेला नाभिकळस ठेविला वरी वो ॥३॥ बैसली देवता पुढें वैष्णवांचें गाणें वो । उद्‍गारें गर्जती कंठीं तुळशीचीं भूषणें वो ॥ ४ ॥ स्वानंदाचे ताटीं धूप दीप पंचारती वो । ओंवाळली माता विठाबाई पंचभूतीं वो ॥ ५ ॥ तुझें तुज पावलें आतां नवस पुरवी माझा वो । तुका म्हणे राखे आपुलिया शरणागता वो ॥६॥

२४८. सुंदर मुख साजिरें कुंडलें मनोहर गोमटीं वो । नागर नागरखोपा केशर कस्तुरी मळवटीं वो । विशाळ व्यंकटनेत्र वैजयंती तळपे कंठीं वो । कांस पीतांबराची

चंदन सुगंध साजे उटी वो ॥ १ ॥ अति बरवंटा बाळा आली सुलक्षणा गोंधळा वो । राजस तेजोंरासी मिरे शिरोमणी वेल्हाळा वो । कोटी रविशशिप्रभा तेजें लोपल्या सकळा वो । नकळे ब्रह्मादिकां अनुपम्य हिची लीला वो ॥ २ ॥ सांवळी सकुमार गोरी भुजा शोभती चारी वो । सखोल वक्षस्थळ सुढाळ पदक झळके वरी वो । कटी क्षुद्र घंटिका शब्द करिताती माधुरी वो । गर्जती चरणी वाकी अभिनव संगीत नृत्य करी वो ॥ ३ ॥ अष्टांगीं मंडित काय वर्णानी रूप ठेवणी वो । सोलीव शुद्ध रसाची ओतीव लावण्याची खाणी वो । सर्व कळासंपन्न मंजुळ बोले हास्यवदनी वो बहु रूपे नटली आदिशक्ति नारायणी वो ॥ ४ ॥ घटस्थापना केली पंढरपुर महानगरीं वो । अस्मानी मंडप दिला तिन्ही तळांवरी वो आरंभिला गोंधळ हिनें चंद्रभागेतीरीं वो । आली भक्तिकाजा कृष्णाबाई योगेश्वरी वो ॥ ५ ॥ तेहतीस कोटी देव चांमुडा अष्ट कोटी भैरव वो । आरत्या कुरंवड्या करिती पुष्पांचा वरुषाव वो । नारद तुंबर गायन ब्रह्मानंदें करिती गंधर्व वो । वंदी चरणरज तेथे तुकयाचे बांधव वो ॥ ६ ॥

२४९. फुगडी फू गे बाई फू । निजब्रह्म तूं गे बाई परब्रह्म तूं गे ॥ ध्रु० ॥ मन चित्त धू । विषयावरी थू ॥१॥ एक नाम मांडी । दुजाभाव सांडी ॥ २ ॥ हरि आला रंगी । सज्जनांचे संगीं ॥ ३ ॥ सकळ पाहे हरि तोचि चित्तीं धरी ॥ ४ ॥ नमन लल्लाटीं संसारेंसीं साटी ॥ ५ ॥ वामदक्षिण । चहूं भुजीं

आलिंगन ॥ ६ ॥ ज्ञानदेव गोडी । केली संसार फुगडी ॥७॥

२५०. पवित्र सुदिन उत्तम दिवस दसरा । सांपडला तो साधा आजि मुहुर्त बरा । गर्जा जयजयकार हरि हृदयीं धरा । आळस नका करूं सांगतों लहाना थोरां ॥ १ ॥ याहो याहो बाईयानो निघाले हरि । सिलंगणा वेगी घेउनी आरत्या करी । ओवाळूं श्रीमुख वंदूं पाउलें शिरीं । आम्हां दैव आलें येथें घरीच्या घरीं ॥ २ ॥ अक्षय मुहूर्त औटामध्ये साधतें । मग येरी गर्जे जैसें तैसें होत जाते । म्हणोनि मागें पुढें कोणी न पाहावें येथें । सांडा परतें काम जाऊं हरीसांगातें ॥ ३ ॥ बहुतां बहुतां रीतीं चित्ती धरा हें मनीं । नका गई करूं आइकाल ज्या कानीं । मग हें सुख तुम्ही कधीं न देखाल स्वप्नी । उरेल हाय हाय मागें होईल कहाणी ॥ ४ ॥ एसियास वंचता त्याच्या अभाग्य पार । नाहीं नाहीं नाहीं सत्य जाणा निर्धार । मग हे वेळ घटिका नये अजरामर । कळलें असो द्या मग पटतील विचार ॥ ५ ॥ जयासाठीं ब्रह्मादिक झाले ते पिसे । उच्छिष्टाकारणें देव जळीं झाले मासे । अर्धांगीं विश्वमाते लक्ष्मी वसे । तो हा तुकयाबंधु म्हणे आलें अनायासे ॥ ६ ॥

## शनिवारचे अभंग

२५१. शरण शरण हनुमंता । तुज आलों रामदूता ॥ १ ॥ काय भक्तीच्या त्या वाटा । मज दावाव्या सुभटा ॥ २ ॥ शूर आणि धीर । स्वामीकाजीं तूं सादर ॥ ३ ॥ तुका म्हणे रुद्रा । अंजनीचिया कुमरा ॥ ४ ॥

२५२. काम घातला बांदोडीं । काळ केला देशोधडी ॥१॥ तया माझे दंडवत । कपिकुळीं हनुमंत ॥ २ ॥ शरीर वज्रा ऐसें । कवळी ब्रह्मांडा जो पुच्छे ॥ ३ ॥ रामरायाच्या सेवका । शरण आलों म्हणे तुका ॥ ४ ॥

२५३. हनुमंत महाबळी । रावणाची दाढी जाळी ॥ १ ॥ तया माझा नमस्कार । वारंवार निरंतर ॥ २ ॥ करोनि उड्डाण । केलें लंकेचे शोधन ॥३॥ जाळियेली लंका । धन्य धन्य म्हणे तुका ॥ ४ ॥

२५४. केली सीताशुद्धी । मूळ रामायणाआधीं ॥ १ ॥ ऐसा प्रतापी गहन । सकळ भक्तांचें भूषण ॥ २ ॥जाऊनि पाताळा । केली देवांची अवकळा ॥ ३ ॥ रामलक्ष्मण । नेले आणिले चोरून ॥ ४ ॥ जोडूनियां कर उभा सन्मुख समोर ॥ ५ ॥ तुका म्हणे जपें । वायुसुता जातीं पापें ॥ ६ ॥

२५५. मी तों अल्पमती हीन । काय वर्णू तुमचे गुण । उदकीं तारिले पाषाण । हें महिमान नामाचें ॥ १ ॥ नाम चांगलें चांगलें । माझे कंठीं राहो भलें । कपिकुळ उद्धारिलें । मुक्त केलें राक्षसां ॥ २ ॥ द्रोणागिरी कपीहातीं । आणविला सीतापती । थोर केली ख्याती भरतभेटी समयीं ॥ ३ शिळा होती मनुष्य झाली । थोर कीर्ती वाखाणिली । लंका दहन केली । हनुमंतें काशानें ॥ ४ ॥ राम जानकीजीवन । योगियांचे निजध्यान । राम राजीवलोचन । तुका चरण वंदितो ॥ ५ ॥

२५६. पैल आला राम रावणासी सांगती । काय निदसुरा

निजलासी भूपती ॥ १ ॥ अवघे लंकेमाजी झाले रामाचे दूत । व्यापले सर्वत्र बाहेरी भीतरी आंत ॥ २ ॥ अवघे अंगलग तुझे बधियले वीर । होई शरणागत किंवा युद्धासी सादर ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐक्याभावे रामासी भेटी । करूनि घेई आतां या संबंधेसी तुटी ॥ ४ ॥

२५७. पैल आला रामराणा । लंका दिधली बिभीषणा ॥ १ ॥ नळ नीळ जांबुवंत । मध्यें चाले रघुनाथ ॥ २ ॥ भोंवतें वानरांचें थाट । पुढें गर्जताती भाट ॥३॥ केला अयोध्या प्रवेश । म्हणे नामा विष्णुदास ॥ ४ ॥

२५८. जन्मजन्मांतरीं असेल पुण्यसामुग्री । तरीच नाम जिव्हाग्री येईल श्रीरामाचें ॥ १ ॥ धन्य कुळ तयाचें रामनाम हेंचि वाचे । दोष जातील जन्माचे श्रीराम म्हणतांचि ॥ २ ॥ कोटी कुळांचे उद्धरण मुखीं राम नारायण । रामकृष्णस्मरण धन्य जन्म तयाचें ॥ ३ ॥ नाम तारक सांगडी नाम न विसंबे अर्ध-घडी । तप केलें असेल कोडी तरीच नाम येईल ॥ ४ ॥ ज्ञान-देवीं अभ्यास मोठा । नामस्मरण मुखावाटा । पूर्वज गेलें वैकुंठा हरि हरि स्मरतां ॥ ५ ॥

२५९. मन हें राम झालें मन हें राम झालें । प्रवृत्ति ग्रासुनि कैसें निवृत्तीसी आलें ॥ १ ॥ श्रवण कीर्तन पादसेवन कैसें विष्णुस्मरण केलें ॥ २ ॥ अर्चन वंदन दास्य सख्य आत्मनिवे-दन केलें ॥ २ ॥ यम नियम प्राणायाम प्रत्याहार संपादिले । ध्यान धारणा आसन मुद्रा कैसे समाधीशी आलें ॥ ३ ॥ बोधीं

बोधिल बोधिता नये ऐसें झालें । बापरखुमादेवीवर विठ्ठलें माझें मीपण हरपलें ।। ४ ।।

२६०. राम म्हणतां रामचि होईजे । पदीं बैसोनि पदवी घेईजे ।। १ ।। ऐसें सुवचनीं आहे । विश्वासें अनुभव पाहे ।।२ ।। रामरसाचिया चवी । आन रस रुचती केवीं ।। ३ ।। तुका म्हणे चाखोनि सांगे । मज अनुभव आहे अंगें ।। ४ ।।

२६१. रामकृष्ण नामें ये दोन्ही साजिरी । हृदयमंदिरीं स्मरा कां रे ।। १ ।। आपुली आपण करा सोडवण । संसारबंधन तोडा वेगीं ।। २ ।। ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण माळा । हृदयीं जिव्हाळा श्रीमूर्ति राया ।। ३ ।।

२६२. झालें रामराज्य काय उणें आम्हांसी । धरणी धरी पीक गाई वोळल्या म्हैसी ।। १ ।। राम वेळोवेळां आम्ही गाऊं ओवियें । दळितां कांडितां जेवितां गे बाईये ।। २ ।। स्वप्नींही दुःख कोणी न देखे डोळां । नामाच्या गजरें भय सुटलें काळा ।। ३ ।। तुका म्हणे रामें सुख दिलें आपुलें । तयां गर्भ-वासा येणें जाणें खुंटलें ।। ४ ।।

## रविवारचे अभंग

२६३. खेळ मांडियेला वाळवंटीं घाई । नाचती वैष्णव भाई रे । क्रोध अभिमान केला पावटणी । एकएकां लागती पायीं रे ।। १ ।। नाचती आनंदकल्लोळीं । पवित्र गाणें नामावळी रे । कळिकाळावरि घातली कास । एक एकाहूनि बळी रे ।। २ ।। गोपीचंदनउटी तुळसीच्या माळा । हार मिरवती गळां रे । टाळ

मृदंग घाई पुष्पवरुषाव । अनुपम्य सुखसोहळा रे ।। ३ ।। लुब्धलीं नादीं लागली समाधी । मूढ जन नर लोकां रे । पंडित ज्ञानी योगी महानुभाव । एकाचि सिद्धसाधकां रे ।। ४ ।। वर्णाभिमान विसरली याती । एकएकां लोटांगणीं जाती रे । निर्मळ चित्तें झाली नवनीतें । पाषाणा पाझर सुटती रे ।। ५ ।। होतो जयजयकार गर्जत अंबर । मातले वैष्णववीर रे । तुका म्हणे सोपी केली पायवाट । उतरावया भवसागर रे ।। ६ ।।

२६४. भीमातीरीं एक वसविलें नगर । त्याचे नाव पंढरपूर रे । तेथील मोकाशी चार भुजा त्यासीं । बाईला सोळा हजार रे ।। १ ।। नाचत जाऊं त्याच्या गांवा रे खेळिया । सुख देईल विसावा रे । पुढे गेले ते निधाई झाले । वानितील त्यांची सीमा रे । ।। २ ।। बळियां आगळा पाळी लोकपाळा । रीघ नाहीं कळिकाळा रे । पुंडलिक पाटील केली कुळवाडी । तो झाला भवदुःखावेगळा रे ।। ३ ।। संत सज्जनीं मांडलीं दुकानें । जें जया पाहिजे तें आहे रे । भुक्ति मुक्ति फुकाचसाठीं । कोणी तयाकडे न पाहे रें ।। ४ ।। दोन्हीच हाट भरले घनदाट । अपार मिळाले वारकरी रे । नवजों म्हणती आम्ही वैकुंठा । जिहीं देखिली पंढरी रे ।। ५ ।। बहुत दिवस होती मज आस । आजीं घडलें सायासीं रे । तुका म्हणे होय तुमचेनी पुण्यें । भेटी तया पायांसी रे ।। ६ ।।

२६५. नव्हे तेंचि कैसें झालें रे खेळिया । नाहीं तेंचि दिसूं लागलें रे । अरूप होतें तें रूपासी आलें । जीव शिव

नाम पावलें रे ।। १ ।। आपुलीच आवडी धरूनि खेळिया । आप आपणातें व्यालें रे । जोपनाकारणें केली बायको । तिनें एवढें वाढविलें रे ।। २ ।। ऐक खेळिया तुज सांगितलें ऐसें जाणुनि खेळ खेळे रे ।। ध्रु० ।। ब्राह्मणाचें पोर एक खेळासी भ्यालें । ते बारा वर्षे लपालें रे । कांपत कांपत बाहेर आलें । तें नागवेंचि पळून गेलें रे ।। ३ ।। सहातोंड्या एक संभूचें बाळ । त्यानें बहुताचि बळ आथियेलें रे । खेळ खेळतां दगदगी व्यालें । तें कपाट फोडुनि गेलें रे ।। ४ ।। चहुंतोंड्याचा पोर एक नाऱ्याही जाण । तो खेळियांमाजी आगळा रे । कुचाळी करूनि पोरें भांडवी । आपणा राहे वेगळा रे ।। ५ ।। गंगा गौरी दोघी भांडवी । संभ्यासी धाडिलें वना रे । खेळ खेळें परि डायीं न सांपडे । तो एक खेळिया शहाणा रे ।। ६ ।। खेळियामाजी हनुम्या शहाणा । न पडे कामव्यसनीं रे । कामचि नाहीं तेथें क्रोधचि कैंचा । तेथें कैंचें भांडण रे । रामा गड्याची आवडी मोठी । म्हणूनि लंके पेणें रे ।। ७ ।। यादवांचा पोर एक गोप्या भला । तो बहुताचि खेळ खेळला रे । लहान थोर अवघीं मारिलीं । खेळचि मोडुनि गेला रे ।। ८ ।। ऐसे खेळिया कोट्यानुकोटी । गणित नाहीं त्याला रे । विष्णुदास नामा म्हणे वडील हो । पाहा देहीं शोधुनि रे ।। ९ ।।

२६६. एके घाई खेळतां न पडसी डाई । दुचाळ्यानें ठकसील भाई रे । त्रिगुणांचे फेरी थोर कष्टी होसी । या चौघांची तरी धरीं सोई रे ।। १ ।। खेळ खेळोनियां निराळाची

राही । सांडी या विषयाची घाई रे । येणेंचि खेळें बसवंत होसी । ऐसें सत्य जाण माझ्या भाई रे ॥२॥ शिंपियाचा पोर एक खेळिया नामा । तेणें विठ्ठल बळवंत केला रे । आपुल्या सवंगडीयां शिकवूनी घाई । तेणें सतत फड जागविला रे । एके घाई खेळतां चुकेची कोठें । तया संतजन मानवले रे ॥ ३ ॥ ज्ञानदेव मुक्ताबाई वटेश्वर चांगा । सोपान आनंदें खेळती रे । कान्हो गोवारी त्यांनीं बसवंत केला । आपणा भोंवतीं नाचती रे । सकळिकां मिळोनि एकचि घाई । त्याच्या ब्रह्मादिक लागती पायीं रे ॥ ४ ॥ रामा बसवंत कबीर खेळिया । जोडा बरवा मिळाला रे । पाचा सवंगडीयां एकचि घाई । तेथें नारद बरवा उमटला रे । ब्रह्मादिक सुरवर मिळोनियां त्यांनीं । तोही खेळिया निवडिला रे ॥ ५ ॥ ब्राह्मणाचा पोर खेळिया एका भला । तेणें जन खेळकर केला रे । जनार्दन बसवंत करूनियां येणें । वैष्णवांचा मेळ मिळविला रे । एकाचि घाई खेळतां खेळतां । आपजाचि बसवंत झाला रे ॥ ६ ॥ आणिके खेळिये होऊनियां गेले । वर्णावया वाचा मज नाहीं रे । तुका म्हणे गडे हो हुशारूनी खेळा । पुढिलांची धरूनिया सोई रे । एकाचि घाई खेळता जो चुकला । तो पडे संसार डाई रे ॥ ७ ॥

२६७. बाराहि सोळा गडियांचा मेळ । सतरावा बसवंत खेळिया रे । जतिस्पद राखों जाणें टिपरिया घाई । अनुहत वाय मांदळा रे ॥ १ ॥ नाचत पंढरिये जाऊं रे खेळिया ।

विठ्ठल रखुमाई पाहूं रे ॥ २ ॥ सा चहुं वेगळा अठरा निराळा । गाऊं वाजवूं एक चाळा रे । विसरती पक्षी चारा नेघे पाणी । तारुण्य देहभाव बाळा रे ॥ ३ ॥ आनंद तेथींचा मुकियासी वाच । बहिरे ऐकती कानीं रे । आंधळ्यासी डोळे पांगळ्यासी पाय । तुका म्हणे वृद्ध होती तरणे रे ॥ ४ ॥

२६८. अहवंघा सोहंवाघा प्रेमनगरा वारी । सावध होऊनि भजनीं लागा देव करा कैवारी ॥ १ ॥ मल्हारीची वारी । माझ्या मल्हारीची वारी ॥ २ ॥ इच्छा मुरळीस पाहूं नका पडाल नर्कद्वारीं । बोधबुधली ज्ञानदिवटी उजळा महाद्वारीं ॥ ३ ॥ आत्मनिवेदन भरित रोडगा निवतिल हारोहारीं । एका जनार्दनीं धन्य खंडेराव त्यावरी कुंचा वारी ॥ ४ ॥

३६९. अनंत जुगाचा देव्हारा । निजबोधाचा घुमारा । अवचित भरला वारा या मल्हारी देवाचा ॥१॥ शुद्ध सत्त्वाचा कवडा मोठा । बोध बिरडे बांधला गांठा । गळा वैराग्याचा पट्टा । वाटा देऊं भक्तीच्या ॥ २ ॥ हृदय कोटंबा सांगातें । घोळ वाजवूं अनुहातें । ज्ञानभांडाराचें पोतें । रितें नव्हे कल्पांतीं ॥ ३ ॥ लक्ष चौऱ्यांशी घरें चारी । या जन्माची केली वारी । प्रसन्न झाला देव मल्हारी । सोहंभावीं राहिलों ॥ ४ ॥ या देवाचें भरतां वारें । अंगीं प्रेमाचें फेपरें । गुरु गुरु करी वेडेचारें । पहा तुके भुंकविलें ॥ ५ ॥

२७०. पिंगळा महाद्वारीं बोली बोलतो देखा । डौर फिरवितो डुगडुग ऐका ॥धृ०॥ वरल्या आळीला तुम्ही सावध

२५३२ २४७१२ २९।१०।८५

राहावे । पाटीलबुवाला मग लावून लग्न । चिंता मरेल वा मग पडेल ठावे ॥ १ ॥ मधल्या आळीला एक बायको फिरे । तिजला तुम्ही साधा मग पडेल पुरे । नाहीं तरी पाटलोबा तिची पळतील गुरें ॥ २ ॥ आणिक एक वारे सुटेल तांतडी । पाटीलबुवाची मग पडेल माडी । तिचीं पांच पोरें लागतील देशोधडी ॥ ३ ॥ आणिक एक एका कैचें नवल झालें । गांवच्या पांड्यांनीं पाटलास नागविलें । साऱ्या कागदाचें शून्य एकचि केलें ॥ ४ ॥ हिंडता फिरतांना एक शकुन सांगे । त्याच्या सत्तेने ह्या आळीस वागे । संतांघरचा बा एक तुकडा मागे ॥५॥ हें जरी न ऐकाल तरी दुसरा येईल । सरते शेवटीं बा काळ बांधून नेईल । एका जनार्दनीं बा आमुचें काय जाईल ॥ ६ ॥

२७१. वारी बो वारी । देई कां गा मल्हारी । त्रिपुरारी हरी । तुझे वारीचा मी भिकारी ॥१॥ वाहन तुझें घोड्यावरी । वरी बैसली म्हाळसा सुंदरी । वाघ्या मुरळी नाचती परोपरी । आवडी ऐसी पाहीन जेजुरी ॥ २ ॥ ज्ञान कोटबा घेऊनी आलों द्वारीं । बोध भंडार लाविन परोपरी । एका जनार्दनी विनवी श्रीहरी । वारी देऊनी प्रसन्न मल्हारी ॥ ३ ॥

२७२. वडाच्या पानीं एक उभाविलें देऊळ आधीं कळसु मग पाया हो । देव पुजों गेलों तंव देऊळ उडालें पान नाहीं तेथें वडु रे ॥ १ ॥ चेत जाणा तुम्ही चेत जाणा । टिपरी वडाच्या साइ हां ॥ २ ॥ पाषाणाचा देवो पाषाणाचा भक्तु पोहती मृगजळ डोहीं हो । वांझेचा पुत्र एकु पाहों लागला

तो तारी देव भक्ता हो ॥ ३ ॥ भवाब्धिसागर नुतरवे ते पडिले रोहिणी डोहीं हो । न संपडे आत्मा बुडाले संदेहीं ते गुंतले मायाजळीं हो ॥ ४ ॥ विरुळा जाणें पोहते खुणें केला मायेसी उपावो हो बापरखुमादेविवरु विठ्ठल विसावा तेणें नेलें पैं थडी वो ॥ ५ ॥

## नाटाचे अभंग

२७३. विठ्ठल आमुचें जीवन । आगम निगमाचें स्थान । विठ्ठल सिद्धीचे साधन । विठ्ठल ध्यान विसावा ॥ १ ॥ विठ्ठल कुळींचें दैवत । विठ्ठल चित्त गोत चित्त । विठ्ठल पुण्य पुरुषार्थ । आवडे मात विठ्ठलाची ॥ २ ॥ विठ्ठल विस्तारला जनीं । सप्तही पाताळें भरूनी । विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं । विठ्ठल मुनि मानसी ॥ ३ ॥ विठ्ठल जीवाचा जिव्हाळा । विठ्ठल कृपेचा कोंवळा । विठ्ठल प्रेमाचा पुतळा । लावियेले चाळा विश्व विठ्ठलें ॥ ४ ॥ विठ्ठल मायबाप चुलता । विठ्ठल भगिनी आणि भ्राता । विठ्ठलेंविण चाड नाही गोता । तुका म्हणे आतां नाहीं दुसरे ॥ ५ ॥

२७४. बरवा झाला वेवसाव । पावलों चिंतिलाचि ठाव । दृढ पायीं राहिला भाव । पावला जीव विश्रांती ॥ १ ॥ बरवा फळला शकुन । अवघा निवारिला सीण । तुमचें झालिया दास्पण । जन्ममरण नाहीं आता ॥ २ ॥ बरव झालें आलों या ठाया । होतें संचित ठायींचें पाया । देहभाव पालटली काया । पडली छाया ब्रह्मींची ॥ ३ ॥ जोडिलें हें न सरे धन ।

अविनाश आनंदघन । अमूर्तता मधुसूदन । समचरणी देखियेला ॥४॥ जुनाट जुगादिचें नाणें । बहुता काळाचें ठेवणें । लोपलें होते पारिखेपणें । ठाव चळणें चुकविला ॥ ५ ॥ आता या जिवाचियासाठीं । न सोडी पडलिया मिठी । तुका म्हणे सीणलों जगजेठी । न लवी दिठी दुसऱ्याची ॥ ६ ॥

२७५. मी तंव अनाथ अपराधी । कर्महीन मतिमंदबुद्धी । तुज म्यां आठविलें नाहीं कधीं । वाचे कृपानिधी मायबापा ॥१॥ नाहीं ऐकिलें गाईलें गीत । धरिली लाज सांडिलें हित । नावडे पुराण बैसले संत । केली बहुत परनिंदा ॥२॥ नाहीं केला करविला परोपकार । नाहीं दया आली पीडितां पर । करूं नये तो केला व्यापार । वाहिला भार कुटुंबाचा ॥ ३ ॥ नाहीं केलें तीर्थाचें भ्रमण । पाळिला पिंड कर चरण । नाहीं संतसेवा घडल दान । पूजावलोकन मूर्तीचें ॥ ४ ॥ असंगसंगें घडले अन्याय । बहुत अधर्म उपाय । न कळे हित करावे तें काय । नये बोलूं आठवूं तें ॥ ५ ॥ आप आपण्या घातकर । शत्रु झालों मी दावेदार । तूं तंव कृपेचा सागर । उतरी पार तुका म्हणे ॥ ६ ॥

२७६. आतां पावेन सकळ सुखें । खादलें कदा तें न देखें । अवघें सरलें पारिखें । सकळ देखें माहियेर ॥१॥ जवळी विठ्ठल रखुमाई । बहिण बंधु बाप आई । सकळ गोताचीच साई । पारिखें काई ऐसें नेणिजे ॥ २ ॥ जगदाकारी झाली सत्ता । वारोनी गेली पराधीनता । अवघें आपुलेंचि आतां । लाज आणि चिंता दुरावली ॥ वावरे इच्छा वसे घरीं । आपुले सत्तेचे

माहेरीं । करवी तैसें आपण करीं । भीड न धरी चुकल्याची ॥४॥ सोसिला होता सासुरवास । बहुतांचा बहुत दिवस । बहु कामें पुरविला सोस । आतां उदास आपुल्यातें ॥ ५ ॥ करिती कौतुक लाडें । मज बोलाविती कोडें । मायबाप उत्तरें गोडें । बोलें बोबडें पुढें तुका ॥ ६ ॥

२७७. सर्व सुखाचिया आशा जन्म गेला । क्षण एक मुक्ति यत्न नाहीं केला । हिंडतां दिशा सीण पावला । माया वेष्टिला जीव माझा ॥ १ ॥ माझें स्वहित नेणती कोणी । कांहींच न करिती भजवांचूनि । सज्जन तंव सुखाची मांडणी । नेणती कोणी आदि अंत ॥ २ ॥ काय सांगों गर्भींची यातना । मज भोगितां नारायणा । मांस मळ मूत्र जाणा । तुज क्षणाक्षणा ध्यात असे ॥ ३ ॥ मज चालतां प्रयाणकाळीं । असतां न दिसती जवळीं । मृत्तिके मृत्तिका कवळी । एकले मेळीं संचिताचे ॥ ४ ॥ आतां मज ऐसें करीं गा देवा । कांहीं घडें तुझी चरणसेवा । तुका विनवीतसे केशवा । चालवी दावा संसारें ॥ ५ ॥

२७८. अगा ए सावळ्या सगुणा । गुणनिधिनाम नारायणा । आमची परिसावी विज्ञापना । सांभाळीं दीना आपुलिया ॥ १ ॥ बहु या उदराचे कष्ट । आम्हासी केलें कर्मभ्रष्ट । तुमची चुकविली वाट । करीं वटवट त्या निमित्यें ॥ २ ॥ झालों पांगिला जनासी । संसाराची आंदणी दासी । न कळे कधीं सोडविसी । दृढ पाशीं बहु बांधलों ॥ ३ ॥ येथें तो न ये आठव कांहीं । विसावा तो क्षण एक नाहीं । पडिलों आणिके प्रवाहीं । हित तों

कांहीं दिसेचिना ॥४॥ जीवित्व वेचिलें वियोगें । हिंडतां प्रवास वाउगें । कांहीं व्याधि पीडा रोगें । केलिया भोगें तडातोडी ॥५॥ माझा मीच झालों शत्रु । कैचे पुत्र दारा कैचा मित्रु । कासया घातला पसारू । अहो जगद्गुरु तुका म्हणे ॥ ६ ॥

२७९. आतां मज धरवावी शुद्धि । येथुनि परतवावी बुद्धि । घ्यावें सोडवूनी कृपानिधी । सांपडलों संधी काळचक्रीं ॥ १ ॥ करसील तरी नव्हे काई । राईचा डोंगर पर्वत राई । आपुले करुणेची साई । करीं वो आई मजवरी ॥ २ ॥ मागील काळ अज्ञानपणें । सरला स्वभावें त्या गुणें । नेणें आयुष्य होतें उणें । पुढील पेणें अंतरलों ॥३॥ आतां मज वाटतसे भय । दिवसेंदिवस चालत जाय । तेथें म्यां येऊनी केलें काय । नाहीं तुझे पाय आठविलें ॥ ४ ॥ करूनी अपराध क्षमा । होतील केले पुरुषोत्तमा । आपुले नामीं द्यावा प्रेमा । सोडवी भ्रमापासुनियां ॥५॥ हृदय वसो तुमच्या गुणीं । ठावें पायापें चरणीं । करूं हा रस सेवन वाणी । फिटे तों धणी तुका म्हणे ॥ ६ ॥

२८०. जेणें हा जीव दिला दान । तयाचें करीन चिंतन । जगज्जीवन नारायण । गाईन गुण तयाचे ॥ १ ॥ जो या भीवरेच्या तिरीं । कट धरूनियां करीं । पाउलें समचि साजिरीं । अंतरीं धरोनी राहेन ॥ २ ॥ जो या आसुरांचा काळ । भक्तजन-प्रतिपाळ । खेळे हीं लाघवें सकळ । तयाच्या भाळ पायांवरी ॥३॥ जो या गोपाळांच्या मेळीं । खेळ खेळे वनमाळी । रसातळा नेला बळी । राहे पाताळीं स्वामी माझा ॥ ४ ॥ जो हा लावण्यपुतळा ।

जयाचें अंगीं सकळ कळा । जयाचे गळां वैजयंती माळा । तया वेळोवेळां दंडवत ॥ ५ ॥ जयाचें नाम पाप नासी । लक्ष्मी ऐसी जयाची दासी । जो हा तेःजपुंज रासी । सर्वभावे त्यासी तुका शरण ॥ ६ ॥

२८१. काय मी उद्धार पावेन । काय कृपा करील नारायण । ऐसें तुम्ही सांगा संतजन । करा समाधान चित्त माझें ॥ १ ॥ काय हें खंडईल कर्म । पारुपतील धर्माधर्म । कामधानें तें कळेल वर्म । म्हणउनी श्रम वाटतसे ॥ २ ॥ काय हे स्थिर राहेल बुद्धि । कांहीं अरिष्ट न येल कीं मधीं । धरिलें जाईल तें सिद्धी । शेवट तो कधीं मज न कळे ॥ ३ ॥ काय ऐसें पुण्य होईल गांठीं । घालीन पायीं देवाचे मिठी । मग तो कुरवाळील जगजेठी । दाटईन कंठीं सद्गदीत ॥ ४ ॥ काय हे निवतील डोळे । सुख तें देखोनी सोहळे । संचित कैसें ते न कळे । होतील डोहाळे वासनेसीं ॥ ५ ॥ ऐसी चिंता करीं सदा सर्वकाळ । रात्रंदिवस हेचि तळमळ । तुका म्हणे नाहीं आपुलें बळ । जेणें फळ पावेन निश्चयेसी ॥ ६ ॥

२८२. तूंचि अनाथाचा दाता । दुःख मोह नासावया चिंता । शरण आलों तुज आतां । तारीं कृपावंता माय बापा ॥ १ ॥ संतसंगती देईं चरणसेवा । जेणें हा तुझा विसर न पडावा । हाचि भाव माझिया जीवा । पुरवीं देवा मनोरथ ॥ २ ॥ मज भाव प्रेम देईं प्रीति । गुण नाम वर्णावया स्तुती । विघ्ना सोडवूनि हातीं । विनंती माझी परिसावी हे ॥ ३ ॥ आणिक कांहीं नाहीं मागणें । सुख संपत्ति राज्यचाड धनें । सांकडे न

पडे तुज जेणें । दुजें भक्तीवीण मायबापा ।। ४ ।। जोडानी कर पायीं ठेवितों माथा । तुका विनवी पंढरीनाथ । रंगीं वोढवावी रंगकथा । पुरवी मनोरथा मायबापा ।। ५ ।।

२८३. सेंदरीं हेंदरीं दैवतें । कोण तीं पूजी भुतेंखेतें । आपुल्या पोटा जीं रडते । मागतीं शितें अवदान ।। १ ।। आपुलें इच्छे आणिकां पीडी । काय तें देईल बराडी । कळों ही आली तयाची जोडी । अल्प रोकडी बुद्धि अधिरा ।। २ ।। दासीचा पाहुणेर उखीतें । धणी देईल आपुल्या हातें । करुणा भाषण उचितें । हें तों रितें सतत शक्तिहीन ।। ३ ।। काय तें थिल्लरीचे पाणी । ओठ न भिजे न फिटे धणी । सीण तरी आदीं अवसानीं । क्षोभे पुनश्चरणीं दिलें फळ ।। ४ ।। विलेपनें बुजविती तोंड । भार खोळ वाहती उदंड । करविती आपआपणया दंड । ऐसियास भांड म्हणे देव तो ।। ५ ।। तैसा नव्हे नारायण । जगव्यापक जनार्दन । तुका म्हणे त्याचें करा चिंतन । वंदूं चरण येती सकळ ।। ६ ।।

२८४. विषय ओढी भुलले जीव । आतां यांची कोण करील कीं । नुपजे नारायणीं भाव । पावोनि ठाव नरदेह ।। १ ।। कोण सुख धरिलें संसारीं । पडोनि काळाचे आहारीं । माप या लागलें शरीरीं । झालियारी सळे ओढिती ।। २ ।। बापुडीं होतीं शेवटीं । आयुष्यासवें झालिया तुटी । भोगिले मागें पुढेंही कोटी । होईल भेटी जन्मासी ।। ३ ।। झुंपिलें घाणा बांधोनि डोळे । मागे जोडी आर तेणेंही पोळे । चालिलों किती

तें न कळे । दुःखें आरंबळे भूक तहान ।। ४ ।। एवढें जयाचें निमित्त । प्रारब्ध क्रियमाण संचित । तें हें देह मानूनी अनित्य । न करित कां नित्य नामस्मरण ।। ५ ।। तुका म्हणे न वेचितां मोल । तो हा यासी महाग विठ्ठल । वेचितां फुकाचेचि बोल । केवढें खोल अभागिया ।। ६ ।।

२८५. आले हो संसारा तुम्ही एक करा । मुक्तिमारग हळूचि धरा । काळदंड कुंभयातना थोरा । कां रे अघोरा दचकर्मी ना ।। १ ।। नाहीं त्या यमासी करुणा । बाहेर काढितां कुडी प्राणा । ओढाळ सांपडे जैसे धान्या । चोर यातना धरिजेतो ।। २ ।। नाहीं दिलें पावईल कैसा । चालतां पंथें तेणें वळसा । नसेल ठाऊकें ऐकतो कैसा । नेती बंद जैसा धरोनियां ।। ३ ।। क्षण एक नागीवा पायीं । न चलवे तया कारितां कांहीं । ओढिती कांटवणा सोई । अग्निस्तंभ बाहीं कवटाळविती ।। ४ ।। देखोनि अंगें कांपती । तये नदीमाजीं चालविती । लागे ठाव ना न चलवे बुडाविती । वरी मारिती यमदंड ।।५ ।। तहान भूक न साहावे वेळ । तो राखितो किती एक काळ । पिंड पाळूनि कैसा सीतळ । तो तप्तभूमीं ज्वाळ लोळविती ।। ६ ।। म्हणउनि करा कांहीं सायास । व्हावेल तरीं व्हा रे उदास । करवेल तर करा नामघोष । सेवा भक्तिरस तुका म्हणे ।। ७ ।।

२८६. न बोलसी तेंही कळलें देवा । लाजसीं आपुलिया नांवा । तुज मी घालीत नाहीं गोवा । भीड केशवा कासयाची ।। १ ।। उतरीं आपुला हा भार । मजशीं बोलोनी उत्तर । माझा तुज नव्हे

अंगिकार । मग विचार करीन मी ॥२॥ दात्या आणि मागत्यासी । धर्मनिती तरी बोलिली ऐसी । यथानुक्ति ठाकेल तैसी । बांधी दोघांसीं विन्मुखता ॥३॥ म्हणोनि करितों मी आस । तुझिया वचनाची वास । धीर हा करूनि सायास । न टळे नेमास आपुलिया ॥४॥ तुम्हां म्यां घेतल्यावाचून । येथूनी न वजें वचन । हाचि माझा नेम सत्य जाण । आहे नाहीं म्हण तुका म्हणे ॥५॥

२८७. आतां मी न पडे सायासीं । संसार दुःखाचिये पाशीं । शरण रिघेन संतांसी । ठाव पायांपाशीं मागेन त्यां ॥ १ ॥ न कळे संचित होतें काय । कोण्या पुण्य तुझे लाधती पाय । आतां मज न विसंबें वो माय । मोकलूनी धाय विनवी-तसें ॥२॥ बहुत जाचलों संसारें । मोहमायाजाळाच्या विखारें । त्रिगुण येताती लहरें । तेणें दुःखें थोर आक्रंदलों ॥३॥ आणिक दुःखें सांगों मी किती । सकल संसाराची स्थिति । न साहे पाषाण फुटती । भय कांप चित्तीं भरलासे ॥ ४ ॥ आतां मज न साहावे सर्वथा । संसारगंधीची हे वार्ता । झालों वेडा असोनी जाणता । पावे अनंता तुका म्हणे ॥ ५ ॥

२८८. आतां तुज कळेल तें करीं । तारिसी तरी तारीं मारीं । जवळीं अथवा दुरी धरीं । घालीं संसारी अथवा नको ॥ १ ॥ शरण आलों नेणतपणें । भाव आणि भक्ति कांहींच नेणें । मतिमंद सर्वज्ञाने । बहु रंक उणें रंकाहुनि ॥ २ ॥ मन स्थिर नाहीं माझिये हातीं । इंद्रियें धांवतां नावरती । सकळ खुंटालिया युक्ति । शांति निवृत्ति जवळीं नाहीं ॥ ३ ॥ सकळ निवेदिला भाव । तुझिये पायीं ठेविला जीव । आतां करीं कळे तो उपाव । तूंचि सर्व ठाव माझा देवा ॥ ४ ॥ राहिलों धरूनि

विश्वास । आधार नेटीं तुझी कास । आणिक नेणें मी सायास । तुका म्हणे यास तुझें उचित ॥ ५ ॥

२८९. देवा तूं कृपाकरुणासिंधु होसी मायबाप आमचा बंधु । जीवनसिद्धि साधनसिंधु । तोडिसि भवबंधु काळपाश ॥१॥ शरणागता वज्रपंजर । अभयदाना तूं उदार । सकळां देवा तूं अगोचर । होसी अविकार अविनाश ॥ २ ॥ मागली स्तुति करता फार । ते मी काय तें गव्हार । जाणावया तुझा विचार । नको अंतर देऊं आतां ॥३॥ नेणें भाव परि म्हणवितों तुझा । नेणे भक्ति परि करितों पूजा । आपुलिया नामाचिया काजा । तुज केशीराजा लागे धांवणें ॥ ४ ॥ तुझिया बळें पंढरीनाथा । झालों निर्भर तुटली व्यथा । घातला भार तुझिया माथां । न भीं सर्वथा तुका म्हणे ॥ ५ ॥

२९०. कोण सुख धरोनी संसारीं । राहों सांग मज वा हरी । अवघ्या नाशिवंता परी । थिता दुरी तूंही अंतरसी ॥१॥ प्रथम केला गर्भी वास । काय तें सांगावें सायास । दुःख भोगिलें नवही मास । आलों जन्मास येथवरी ॥ २ ॥ बाळपण गेलें नेणतां । तारुण्यदशे विषयव्यथा । वृद्धपणीं प्रवर्तली चिंता । मरे मागुता जन्म धरीं ॥ ३ ॥ क्षण एक तोही नाहीं विसावा । लक्ष चौऱ्यांशी घेतल्या धावा । भोवंडिती पाठीं लागल्या हांवा । लागो आगी नांवा माझ्या मीपणा ॥४॥ आतां पुरे ऐसी भरोवरी । रंक होऊनी राहेन द्वारीं । तुझा दास मी दीन कामारी । तुका म्हणे करीं कृपा आतां ॥ ५ ॥

२९१. सुख या संतसमागमें । नित्य दुणाव तुझिया नामें । दहन होती सकळ कर्में । सर्वकाळ प्रेमें डुल्लतसों ॥ १ ॥

म्हणोनी नाहीं कांहीं चिंता । तूंचि आमुचा माता–पिता । बहिणी बंधु आणि चुलता । आणिकां गोतां सर्वांठायीं ॥ २ ॥ ऐसा हा सकळा निर्धार । माझा तुज न पडे विसर । अससी देऊनियां धीर । बाह्य अभ्यंतर मजजवळीं ॥ ३ ॥ दुःख तें कैसे नये स्वप्नासी । भुक्ति मुक्ति झाल्या कामारी दासी । त्यांचें वर्म तूं आम्हांपासीं । सुखें राहिलासी प्रेमाचिया ॥ ४ ॥ जेथें तुझ्या कीर्तनाचा घोष । जळतीं पापें पळती दोष । काय तें उणें आम्हां आनंदास । सेवूं ब्रह्मरस तुका म्हणे ॥ ५ ॥

२९२. न पवे सन्निध वाटते चिंता । वरि या बहुतांची सत्ता । नुगवे पडत जातो गुंता । कर्मा बळिवंता सांपडलों ॥ १ ॥ बहु भार पडियेला शिरीं । मी हें माझें मजवरी । उघड्या नागविलों चोरीं । घारिच्याघरीं जाणत जाणतां ॥ २ ॥ तुज मागणें इतुलें आतां । मज या निरवावे संतां । झाला कंठस्फोट आळवितां । उदास आतां न करावें ॥ ३ ॥ अति हा निकट समय । मग म्यां करावें तें काय । दिवस गेलिया ठाकईल छाय । उरईल हाय रातिकाळीं ॥ ४ ॥ होईल संचिताची सत्ता । अंगा येईल पराधीनता । ठाव तो न दिसे लपतां । बहु चिंता प्रवर्तली ॥ ५ ॥ ऐसी या संकटाचे संधीं । धांव घालावी कृपानिधी । तुका म्हणे माझी बळबुद्धि सकळ सिद्धी पाय तुझे ॥ ६ ॥

२९३. देवा तूं आमुचा कृपाळ । भक्तप्रतिपाळ दीनवत्सल । माय तूं माउली स्नेहाळ । भार सकळ चाळविसी ॥ १ ॥ तुज लागली सकळ चिंता । राखणें लागे वांकडे जातां । पुढती निरविसी संतां । नव्हे विसंबता धीर तुज ॥ २ ॥ आम्हां भय चिंता नाहीं धाक । जन्ममरण कांहीं एक । झाला इहलोकीं परलोक ।

आलें सकळिक वैकुंठ ।। ३ ।। न कळे दिवस की राती । अखंड लागलीसे ज्योती । आनंद लहरींची गती । वर्णू मी किती तया सुखा ।। ४ ।। तुझिया नामाचीं भूषणें । तोयें मज लेवविलीं लेणें । तुका म्हणे तुझिया गुणें । काय तें उणें एक आम्हां ।।५।।

२९४. अतां धर्माधर्मी कांहीं उचित । माझें विचारावें हित । तुज मी ठाउका पतित । शरणागत परि झालों ।। १ ।। येथें राया रंका एकी सरी । नाहीं भिन्नाभिन्न तुमच्या घरीं । पावलों पाय भल्या परीं । मग बाहेरी न घालावें ।। २ ।। ऐसें हें चालत आलें मागें । नाहीं मी बोलत वाउगें । आपुलीया पडिल्या प्रसंगें । कीर्ति हें जगें वाखाणिजेति ।। ३ ।। घालोनियां माथा बैसलो भार । सांडिला लौकिक वेव्हार । आधीं हें विचारिली थार । अविनाशपर पद ऐसें ।। ४ ।। येथें एक वर्म पाहिजे धीर । परि म्यां लेखिलें असार । देह हा नाशिवंत जाणार । धरिलें सार नाम तुझें ।। ५ ।। केली आराणूक सकळां हातीं । धरावें तें धरिलें चित्तीं । तुका म्हणे सांगितलें संतीं । देई अंतीं ठाव मज देवा ।। ६ ।।

२९५. बरवें झालें आलो या जन्मासी । जोड जोडिली मनुष्यदेहा ऐसी । महा लाभाची उत्तम रासी । जेणे सर्व सुखासी पात्र होईजे ।। १ ।। दिलीं इंद्रियें हात पाय कान । डोळे मुख बोलाया वचन । जेणें तूं जोडसी नारायण । नासे जीवपण भवरोग ।। २ ।। तिळेंतिळें पुण्य सांचा पडे । तरि हें बहुतां जन्मीं जोडे । नाम तुझें वाचेसी आतुडे । समागम घडे संतांचा ।। ३ ।। ऐसिये पावविलों ठायीं । आतां मी काय होऊं उतराई । एवढा जीव ठेवीन पायीं । तूं वो माझे आई पांडुरंगे

॥ ४ ॥ फेडिला डोळियांचा कवळ । धुतला गुणदोषांचा मळ । लावूनी स्तनीं केलों सीतळ । निजविलों बाळ निजस्थानीं ॥ ५ ॥ नाहीं या आनंदासी जोडा । सांगतां गोष्टी लागती गोडा । आलासी आकारा आम्हच्या चाडा । तुका म्हणे भिडा भक्तीचिया ॥ ६ ॥

२९६. अल्प भाव अल्प मती । अल्प आयुष्य नाहीं हातीं । अपराधाची वोलिलो मूर्ती । अहो वेदमूर्ती परियेसा ॥ १ ॥ किती दोषां देऊं परिहार । गुणदोषें माळिलें अंतर । आदि वर्तमान भविष्याकार । लागे अंतपार ऐसें नाहीं ॥ २ ॥ विविध कर्म चौऱ्यांशी फेरा । त्रिविध भोग या शरीरा । कर्मकोठार पांजरा । जन्म जरा मरण सांठवण ॥ ३ ॥ जीवा नाहीं कुडीचें लाहातें । ये भिन्न भिन्न पंचभूतें । रचतें खचतें संचितें । असार रितें फलकट ॥ ४ ॥ पुत्र पत्नी सहोदर । मायबाप गोताचा पसर । मिळतीं काष्ठें लोटतां पूर । आदळे दूर होती खल्लाळीं ॥ ५ ॥ म्हणोनि नासावें अज्ञान । इतुकें करीं कृपादान । कृपाळू तूं जनार्दन । धरूनी चरण तुका विनवी ॥ ६ ॥

२९७. ऐसी हे गर्जवुं वैखरी । केशवा मुकुंदा मुरारी । राम कृष्ण नामें वरीं । हरी हरी दोष सकळ ॥ १ ॥ जनार्दना जगजीवना । विराटस्वरूपा वामना । महादादि मधुसूदना । भवबंधना तोडितिया ॥ २ ॥ चक्रपाणी गदाधरा । असुरमर्दना वीर्यवीरा । सकळमुगुटमणि शूरा । अहो दातारा जगदानिया ॥ ३ ॥ मदनमूर्ति मनमोहना । गोपाळगोपिकारमणा । नट-नाट्यकौशल्य कान्हा । अहो संपन्ना सर्वगुणें ॥ ४ ॥ गुणवंता आणि निर्गुणा । सर्वसाक्षी सर्वजाणा । करोनी अकर्ता आपणा ।

नेदी अभिमाना आतळों ॥ ५ ॥ कासयानें घडे याची सेवा । काय एक समर्पावें या देवा । वश्य तो नव्हे वांचूनि भावा । पाया वेगळे जीवा न करी तुका ॥ ६ ॥

२९८. होतों तें चिंतीत मानसीं । नवस फळले नवसीं । जोडी ते नारायणा ऐसी । अविट ज्यासी नाश नाहीं ॥ १ ॥ धरिलें जीवें न सोडी पाय । आलें या जीवित्वाचें काय । कैं हे पात्रिजती ठाय । लाविली सोय संचितानें ॥ २ ॥ मज तों पडिली होती भुली । चित्ताची अपसव्य चाली । होती मृगजळें गोवी केली । दृष्टी उघडली बरवें झालें ॥ ३ ॥ आतां हा सिद्धि पावो भाव । मध्यें चांचल्य न व्हावा जीव । ऐसी तुम्हां भाकीतसे कींव । कृपाळुवा जगदानिया ॥ ४ ॥ कळों येतें आपुले बुद्धी । ऐसें तों न घडे कधीं । एवढे आघात ते मधीं । लज्जा रिद्धी उभी आड ठाके ॥ ५ ॥ कृपा या केली संतजनीं । माझी अळंकारिली वाणी । प्रीति हे लाविली कीर्तनीं । तुका चरणी लोळतसे ॥ ६ ॥

२९९. मज ते हांसतील संत । जिहीं देखिलेती मूर्तिमंत । म्हणोनि उद्वेगलें चित्त । आहाच भक्त ऐसा दिसे ॥ १ ॥ ध्यानीं म्यां वर्णावेतीं कैसे । पुढें एकीं स्तुति केली असे । येथूनि जीव निघत नसे । ऐसिये आसे लागलोंसें ॥ २॥ कासया पडिला जीव धडा । उगाचि वेडा आणि वांकडा । आम्हां लेकरांसी पीडा । एका मागें जोडा दुसऱ्याचा ॥ २ ॥ सांगा कोणाचा अन्याय । ऐसें मी धरितों पाय । तूं तंव समाचि सकळां माय । काय अन्याय एका माझा ॥ ४ ॥ नये हा जरी कारणा । तरी कां व्यालेती नारायणा । वचन द्यावें जी वचना । मग अज्ञाना समजावीं ॥५॥ बहुत दिवस केला बोभाट । पाहतां श्रमलों

वाट । तुका म्हणे विस्तारलें ताट । काय वीट आला नेणों स्वामीया ।। ६ ।।

३००. बरवें झालें आजीवरी । नाहीं पडिलों मृत्यूचें आहारीं । वांचोन आलों एथवरी । उरलें तें हरि तुम्हां समर्पण ।। १ ।। दिला या काळें अवकाश । नाहीं पावले आयुष्या नाश । कार्या कारण उरलें शेष । गेलें तें भूस जावो परतें ।। २ ।। बुडणें खोटें पावतां थडी । स्वप्नीं झाली ओढाओढी । नासली जागृती घडी । साच जोडी शेवटीं गोड घास ।। ३ ।। तुम्हां पावविली हाक । तेणें निसरला धाक । तुमचें भातें हें कवतुक । जे शरणागत लोक रक्षावे ।। ४ ।। रवीच्या नांवें निशीचा नाश । उदय होतांचि प्रकाश । आतां कैचा आम्हां दोष । तूं जगदीश कैवारी ।।५।। आतां जळो देह सुख दंभ मान । न करी तयाचें साधन । तूं जगदीश नारायण । आलो शरण तुका म्हणे ।। ६ ।।

३०१. आतां माझा नेणों परता भाव । विसावोनि ठायीं ठेविला जीव । सकळ लाभांचा हा ठाव । ऐसा वाव झाला चित्ताठायीं ।। १ ।। भांडवल गांठीं तरि विश्वास । झालों तें झालों निश्चयें दास । न पाहें मागील वास । पुढती सोस सेवेचाचि ।। २ ।। आहे तें निवेदिलें सर्व । माझा मोडियेला गर्व । अकाळीं काळ आघवें पर्व । झाला भरंवसा कृपे लाभाचा ।। ३ ।। वेव्हारीं वेव्हारा अनंत । नाहीं यावांचूनी जाणत । तरी हें समाधान चित्त । लाभहानी नाहीं येत अंतरा ।। ४ ।। करूनी नातळों संसारा । अंग भिन्न राखिला पसारा । कळवळा तो जीवनीं खरा । बीजाचा थारा दुरी आघात ।। ५ ।। बहुमतापासूनी निराळा । होऊनि राहिलों

सांवळा । बैसला रूपाचा कळवळा । तुका म्हणे डोळां लेईलों तें ॥ ६ ॥

३०२. बरवें झालें लागलों कारणीं । तुमचे राहिलों चरणीं । फेडीन संतसंगती धणी । गर्जेईल गुणीं वैखरी ॥ १ ॥ न वंचे शरीर सेवेसी । काया वाचा आणि मनेंसीं । झालों संताची आंदणी दासी । केला ते विशीं निभाग ॥ २ ॥ जीवनीं राखिला जिव्हाळा । झालों मी भजसीं निराळा । पंचभूतांचा पुतळा । सहज लीळा वर्ततसे ॥ ३ ॥ जयाचें जया होईल ठावें । लाहो या साधियेला भावें । ऐसें होतें राखियेलें जीवें । येथूनि देवें भोवंडूनी ॥ ४ ॥ आस निरसली ये खेपे । अवघे पंथ झाले सोपे । तुमचे दीनबंधु कृपे । दुसरें कांपें सत्ताधाकें ॥५॥ अंकिलेपणें आनंदरूप । आतळों नयें पुण्य पाप । सारूनी ठेविले संकल्प । तुका म्हणे आपेंआप एकाएकीं ॥ ६ ॥

३०३. अवघ्या दशा येणें साधती । मुख्य उपासना सगुण भक्ती । प्रकटे हृदयींची मूर्ती । भावशुद्धी जाणोनियां ॥१॥ बीज आणि फळ हरीचें नाम । सकळ पुण्य सकळ धर्म । सकळां कळांचें हें वर्म । निवारी श्रम सकळही ॥ २ ॥ जेथें कीर्तन हें नामघोष । करिती निर्लज्ज हरीचे दास । सकळ वोथंबले रस । तुटती पाश भवबंधाचे ॥ ३ ॥ येती अंगा वसती लक्षणें । अंतरीं देवें धरिलें ठाणें । आपणाचि येती तयाचें गुणें । जाणें येणें खुंटे वस्तीचें ॥ ४ ॥ न लगे सांडावा आश्रम । उपजले कुळींचें धर्म । आणिक न करावे श्रम । एक पुरे नाम विठोबाचें ॥ ५ ॥ वेदपुरुष नारायण । योगियांचें ब्रह्म शून्य । मुक्त आत्मा परिपूर्ण । तुका म्हणे सगुण भोळ्या आम्हां ॥ ६ ॥

३०४. श्रीअनंता मधुसूदना । पद्मनाभा नारायणा । जगव्यापक जनार्दना । आनंदघना अविनाशा ॥ १ ॥ सकळ देवाधिदेवा । कृपाळुवा जी केशवा । महानंदा महानुभवा । सदाशिवा सहजरूपा ॥ २ ॥ चक्रधरा विश्वंभरा । गरुडध्वजा करुणाकरा । सहस्रपादा सहस्रकरा । क्षीरसागरा शेषशयना ॥ ३ ॥ कमलनयना कमलापति । कामिनीमोहना मदनमूर्ती । भवतारका धारित्या क्षिती । वामनमूर्ती त्रिविक्रमा ॥ ४ ॥ आगा ये सगुणा निर्गुणा । जगज्जनित्या जगज्जीवना । वसुदेव-देवकीनंदना । बाळरांगणा बाळकृष्णा ॥ ५ ॥ तुका आला लोटांगणी । मज ठाव द्यावा जी चरणीं । हेचि करीतसे विनवणी । भवबंधनीं सोडवावें ॥ ६ ॥

३०५. माझा तंव खुंटला उपाव । जेणें तुझे आतुडती पाव । करूं भक्ति तरि नाहीं भाव । नाहीं हातीं जीव कवणेंवीशीं ॥१॥ धर्म करूं तरि नाहीं चित्त । दान देऊं तरि नाहीं वित्त । नेणें पुजों ब्राह्मण अतीत । नाहीं भूतदया पोटा हातीं ॥ २ ॥ नेणें गुरुदास्य संतसेवन । जप तप अनुष्ठान । नव्हे वैराग्य वनसेवन । नव्हे दमन इंद्रियांसी ॥३॥ तीर्थ करूं तरि मन नये सवें । व्रत करूं तरि विधि नेणें स्वभावें । देव जवळी आहे म्हणों मजसवें । तरि आपपरावें न वचे ॥ ४ ॥ म्हणोनी झालों शरणागत । तुझा दास मी अंकित । यास न लगे संचित । झालों निश्चिंत तुका म्हणे ॥५॥

३०६. तरी म्या आळवावें कोणा । कोण हे पुरवील वासना । तुजवांचून नारायणा । लावीं स्तना कृपावंते ॥ १ ॥ आपुला न विचारी सीण । न धरी अंगसंगें भिन्न । अंगीकारिलें राखे दीन । देई जीवन आवडीचें ॥२॥ माझिया मानसीं हे आस । नित्य सेवावा ब्रह्मरस । अखंड चरणींचा वास । पुरवी आस

याचकाची ॥ ३ ॥ माझिया संचितासा ठेवा । तेणें हें वाट दाविली देवा । एवढ्या आदराचा हेवा । मागे सेवादान आवडीचे ॥ ४ ॥ आळवीन करुणावचनीं । आणिक गोड नलगे मनीं । निद्रा जागृती आणि स्वप्नीं । धरिलें ध्यानीं मनीं रूप ॥ ५ ॥ आतां भेट न भेटतां आहे । किंवा नाहीं ऐसें विचारूनी पाहे । लागला झरा अखंड आहे । तुका म्हणे साहे केलें अंतरीं ॥ ६ ॥

३०७. हेंचि भवरोगाचें औषध । जन्म जरा तुटे व्याध । आणिक कांहीं नव्हे बाध । करील वध षड्वर्गा ॥ १ ॥ सावळें रूप ल्यावें डोळां । सहा चौ अठरांचा मेळा । पद्र लागों नेदी खळा । नाम मंत्र माळा विष्णुसहस्र ॥ २ ॥ भोजना न द्यावें अन्न । जेणें चुके अनुपान । तरीच घेतल्याचा गुण । होईल जाण सत्य भाव ॥३॥ नये गिवों आपुलिया घरा । बाहेर लागों नये वारा । बहु बोलणें तें सारा । संग दुसरा वर्जावा ॥ ४ ॥ पासीं तें एक द्यावें वरी । नवनीताची होईल परी । होईल घुसळिलें तें निवारी । सार भीतरी नाहीं तया ॥ ५ ॥ न्हायें अनुतापीं पांघरें दिशा । स्वेद निघों दे दे अवघी आशा । होसील आधीं होतासी तैसा । तुका म्हणे दशा भोगी वैराग्य ॥ ६ ॥

३०८. मागुता हाचि जन्म पावसी । भोगिलें सुख दुःख जाणसी । हें तों न घडे रे सायासी । कां रे अंध होसी जाणोनियां ॥१॥ लक्ष चौऱ्याशी न चुके फेरा । गर्भवासीं यातना थोरा । येऊनी पडती संदेहपुरा । वोळसा थोर मायाजळीं ॥२॥ पशु काय पाप पुण्य जाणती । उत्तम मध्यम भोग भोगिती । कांहीं एक उपजतां मरती । बहिरी अंध होती पांगुळ मुकीं ॥३॥ नरदेह निधान लागलें हातीं । उत्तम सार उत्तम गती । देवचि

होईल म्हणती ते होती । तरि कां चित्तीं न धरावें ।। ४ ।। क्षण एक मन स्थिर करूनि । सावध होई डोळे उघडूनी । पाहे वेद बोलिले पुराणी । तुका विनवणी करीतसे ।। ५ ।।

३०९. दास्य करी दासाचें । उणें न साहे तयाचें । वाढिलें ठायीचें । भाणें टाकोनियां धांवें ।। १ ।। ऐसा कृपेचा सागर । विटे उभा कटी कर । सर्वस्वें उदार । भक्तांलागीं प्रगटे ।। २ ।। हृदयी श्रीवत्सलांच्छन । मिरवी भक्तांचे भूषण । नाहीं तयाचा सीण । सुख धरिलें लातेचें ।। ३ ।। सत्यभामा दान करी । उजुर नाहीं अंगीकारी । सेवकाच्या शिरीं । धरूनी चाले पादुका ।। ४ ।। राखे दारवंटा बळीचा । सारथी झाला अर्जुनाचा । दास सेवकांचा । होय साचा अंकित ।। ५ ।। भिडा न बोले पुंडलीकासीं उभा मर्यादा पाठीसीं । तुका म्हणे ऐसी । कां रे न भजा माउली ।। ६ ।।

३१०. हरि तैसे हरीचे दास । नाहीं तयां भय मोह चिंता आस । होऊनी राहती उदास । बळकट कांस भक्तीची ।। १ ।। धरूनी पाय त्यजिलें जन । न लगे मान मृत्तिका धन । कंठीं नामामृत पान । न लगे आन ऐसें झालें ।। २ ।। वाव तरी उदंडाचि पोटीं । धीर सिंधु ऐसे जगजेठी । काम क्रोध न सुटे मिठी । गिन्हे तरी वेठीं राबविती ।। ३ ।। बळे तरी नागविती काळा । लीन तरी सकळांच्या तळा । उदरा तरी देहासी सकळां । जाणोनि काळा सर्व नेणते ।। ४ ।। संसार तो तयांचा दास । मोक्ष तो पाहातसे वास । रिद्धिसिद्धि देशवटा त्रास । न शिवती यास वैष्णवजन ।। ५ ।। जन्ममृत्युस्वप्नांस।रिखें । आप त्यां न दिसे पारखें । तुका म्हणे अखंडित सखें । वाणी वदे मुखें प्रेमामृताची ।। ६ ।।

३११. बहुत जाचलों संसारीं । वसे गर्भी मातेच्या उदरीं । लक्ष चौऱ्यांशी योनिद्वारीं । झालों भिकारी याचक ॥ १ ॥ जिणें पराधीन आणिकां हातीं । दृढ पांशी बहु बांधलों संचितीं । प्रारब्ध क्रियमाण सांगतीं । भोंवडिती सत्ता आपुलिया ॥ २ ॥ न भरे पोट नाहीं विसावा । नाहीं नेम एक ठाव गांवा । नाहीं सत्ता न फिरे ऐसी देवा । लाही जीवा खापरीं तडफडी ॥३॥ काळ बहुत गेले ऐसिया रीती । आणिक पुढेंही नेणों किती । खंडना नाहीं पुनरावृती । मज कल्पांतीं तरी वेगळे ॥ ४ ॥ ऐसें दुःख कोण हरील माझें । कोणा भार घालूं आपुलें ओझें । भवसिंधुतारक नाम तुझें । धांवसी काजें आडलिया ॥ ५ ॥ आतां धांव घाली नारायणा । मजकारणें रंका दीना । गुण न विचारी अगुणा । तुका करुणा भाकीतसें ॥ ६ ॥

३१२. जंव हें सकळ सिद्ध आहे । हात चालावया पाय । तंव तूं आपुलें स्वहित पाहे । तीर्थयात्रे जाय चुको नको ॥ १ ॥ जंव काळ असे दुरी ठेला । तंव तूं हरिगुण गाय आइक वहिला । मनीं भाव धरूनी भला । न वंचे त्याला चुको नको ॥ २ ॥ जोडोनी धन न घाली माती । ब्रह्मवृंदें पूजन यती । सत्य आचरण दया भूतीं सांगाती चुको नको ॥ ३ ॥ दशा यौवन बाणली अंगीं । पांगिला नव्हे विषयसंगीं । काम क्रोध लोभ मोह त्यागीं । राहे संतसंगीं चुका नको ॥ ४ ॥ मग तेथें न चले कांहीं । सत्ता संपदा राहेल ठायींच्या ठायीं । संचित जाईल ग्वाहीं । तुका म्हणे तई यमआज्ञा ॥ ५ ॥

३१३. चांगलें नाम गोमटें रूप । निवती डोळे हरती ताप । विठ्ठल हा जप । प्रगट स्वल्प अति सार ॥ १ ॥ शस्त्र हें निर्वाणींचा बाण । निकट समयो अवसान । कोठें

योजेल दश दान । खंडी नारायण दुःख चिंतनें ॥ २ ॥ सकळ श्रेष्ठाचें हे मत । पावें सिद्धी पाववी अनंत । म्हणोनि व्हावे शरणागत । आहे उचित एवढेंचि ॥ ३ ॥ म्हणोनि रुसलों संसारा । सर्प हा विखार हा पांढरा । तुजशी अंतर रे दातारा । याचि दावेदारानिमित्त ॥ ४ ॥ येणें मज भोगविल्या खाणीं । नसता छंद लाविला मनीं । माजलों मीं माझें भ्रमणीं । झालीं बोडणी विटंबना ॥ ५ ॥ पावलों केलियाचा दंड । खाणीं भोगिल्या याती उदंड । आतां केला पाहिजे खंड । तुका दंडवत घाली देवा ॥ ६ ॥

३१४. तुझिया पार नाहीं गुणां । माझी अल्प मती नारायणा । भवतारका जी सुजाणा । एक विज्ञापना पायांपासीं । ॥ १ ॥ काय जाणावें म्यां दीनें । तुझिये भक्तीचीं लक्षणें । घड तें तोंड धुऊं नेणें । परि चिंतनें काळ सारीं ॥ २ ॥ न लवीं आणिक कांहीं पिसें । माझिया मना वायां जाय ऐसें । चालवीं आपुल्या प्रकाशें । हातीं सारिसें धरोनियां ॥ ३ ॥ तुज हे समर्पिली काया । जीवें भावें पंढरीराया । सांभाळीं समविषम डाया । करीं छाया कृपेची ॥ ४ ॥ चतुर तरी चतुरां राव । जाणतां तरीं जीवांचा जीव । न्यून तो कोण एक ठाव । आरुष भाव परि माझा ॥ ५ ॥ होतें ते माझे भांडवल । पायांपें निवेदिले बोल । आदर ऐसें पाविजें मोल, तुका म्हणे साच फोल तूं जाणसी ॥ ६ ॥

३१५. कां हो माझा मानियेला भार । ऐसा तव दिसतसे फार । अनंत पावविलीं उद्धार । नव्हेचि थार मज शेवटीं ॥१॥ पाप बळिवंत गाढें । तुजही राहों सकतें पुढें । मागील कांहीं राहिलें ओढे । नवल कोडें देखियेलें ॥ २ ॥ काय मानिती संत-

जन । तुमचें हीनत्व वचन । कीं वृद्ध झाला नारायणा । न चले पण आधील तो ।। ३ ।। आतां न करावी चोरी । बहुत न धरावें दुरी । पडदा काय घरच्या घरीं । धरिलें दुरीं तेव्हां धरिलें ।। ४ ।। नको चाळवू अनंता । कासया होतोसी नेणता । काय तूं नाहीं धरीत सत्ता । तुका म्हणे आतां होईल प्रगट ।। ५ ।।

३१६. तुळसी माळा घालुनी कंठीं । उभा विटेवरी जगजेठी । अवलोकोनी पुंडलीका दृष्टीं । असे भीमातटीं पंढरीये ।। १ ।। भुक्तिमुक्ति जयाच्या कामारी । रिद्धिसिद्धि वोळगती द्वारीं । सुदर्शन घरटी करी । काळ कांपे दुरी धाके तया ।। २ ।। जगज्जननी असें वाम भागीं । भीमकी शोभली अर्धांगीं । जैसी विद्युल्लता झळके मेघीं । दर्शनें भंगी महा दोष ।। ३ ।। सुखसागर परमानंदु । गोपी गोपाळा गोधना छंदु । पक्षीश्वापदां जयाचा वेधु । वाहे गोविंदु पांवा छंदे ।। ४ ।। मुखमंडित चतुर्भुजा । मनमोहन गरुडध्वजा । तुका म्हणे स्वामी माझा । पावे भक्तकाजा लवलाहीं ।। ५ ।।

३१७. हातींचें न संडावें देवें । शरण आलों जीवेंभावें । आपुलें ऐसें म्हणावें । करितीं जीवें निंबलोण ।। १ ।। बैसतां संतांचें संगती । कळो आले कमळापती । आपुली कोणीच नव्हतीं । निश्चय चित्तीं दृढ झाला ।। २ ।। येती तुझीया भजना आड । दाविती प्रपंचाचें कोड । कनिष्ठीं रुचि ठेवूनि गोड । देखत नाड कळतसे ।। ३ ।। मरती मेलां नेणों किती । हाचि लाभ तयाचें संगतीं । म्हणोनि येतों काकुळती । धीर तो चित्तीं दृढ द्यावा ।। ४ ।। सुखें निंदोत हे जन । न करीं तयांसीं वचन । आदिपिता तूं नारायण । जोडी चरण तुमचे ते ।। ५ ।। आपलें आपण न करूं हित । करूं हें प्रमाण सचित । तरी मी नष्टाचे

पतित । तुका म्हणे मज संत हांसती ॥ ६ ॥

३१८. आतां येथें बळें पंढरीनाथ। जवळीं राहिला तिष्ठत। पाहतां न कळे जयाचा अंत। तोचि हृद्यांत घालूं आतां ॥१॥ विसरोनि आपला देहपणभाव। नामोंचि भुलविला पंढरीराव। न विचारी याती कुळ ठाव। लागावया पाव संतांचे ॥ २ ॥ वरें वर्म आलें आम्हुचिया हातां। हिंडावें धुंडावें न लगतां। होय अविनाश साहाकारी दाता। चतुर्भुज सत्ता परि धाके ॥३॥ होय आवडी साना थोर। रूप सुंदर मनोहर। भक्तिप्रिय लोभापर। करी आदर याचकपणें ॥ ४ ॥ तें वर्म आलें आम्हुच्या हाता। म्हणोनि शरण रिघालों संतां। तुका म्हणे पंढरीनाथा। न सोडी आतां जीवें भावें ॥ ५ ॥

३१९. आइक पांडुरंगा एक मात। कांहीं बोलणें आहे एकांत। आम्हां जरी तारील संचित। तरी उचित काय तुझें ॥१॥ उसणे फेडितां धर्म तो कोण। काय तया मानवेल जन। काय गा मिरवुनी भूषण। वायां थोरपण जनांमध्यें ॥ २ ॥ अन्न जरि न मिळे तयासी देणें। अगांतुक पात्र उचित दान। उपकार तरी धन्वंतरीपणें। जरी देणें घेणें नाहीं आशा ॥२॥ शूर तो तयासी बोलिजे जाणा। पाठीसी घालुनी राखे दीना। पार पुण्या नाहीं त्या भूषणा। ऐक नारायणा वचन हें ॥४॥ आता पुढें बोलणें तें कांहीं। मज तारिसील तरीच सही। वचन आपुलें सिद्धी नेई। तुका म्हणे तई मज कळसी ॥ ५ ॥

३२०. चांगला तरी पूर्ण काम। गोड तरी याचेंचि नाम। दयाळु तरी अवघा धर्म। भला तरी दासां श्रम होऊं नेदी ॥ १ ॥ उदार तरी लक्ष्मीयेसी। जुंजार तरी कळिकाळासी। चतुर तरी गुणांचीज रासी। जाणतां तयासी तोचि एक ॥ २ ॥

जुनाट तरी बहुकाळा । न कळे जयाची लीळा । नेणता गोवळीं गोवळा । लाघवी अबळां भुलवणा ॥ ३ ॥ गांढ्या तरी भावाचा अंकित । बराडी तरी उच्छिष्टासी प्रीत । ओंगळ तरी कुब्जेशीं रत । भ्याड अनंत बहु पापा ॥ ४ ॥ खेळ तो येणेंचि खेळतां । नट तो येणेंचि आवगावा । लपोनि जीवीं न कळे जीवा । धरितां देवा नातुडसी ॥ ६ ॥ उंच तरी बहुताचि उंच । नीच तरी बहुताचि नीच । तुका म्हणे बोलिलों साच । नाहीं आहाच पूजा केली ॥ ६ ॥

३२१. काय आम्ही भक्ती करणें कैसी । काय एक वाहावें तुम्हांसी । अवघा भरोनि उरलासी । वाणीं खाणीं रसीं रूपी गंधीं ॥ १ ॥ कैसें करूं इंद्रियां बंधन । पुण्यपापाचें खंडण । काय व्रत करूं आचरण । काय तुजाविण उरणें तें ॥ २ ॥ काय डोळे झाकुनिया पाहों । मंत्र जप काय ध्यावों । कवणें ठायीं धरूनि भाव । काय तें वाव तुजाविण ॥ ३ ॥ काय हिंडों कवण दिशा । कवणें ठायीं पाय ठेवूं कैसा । काय तूं नव्हेसी नकळे ऐसा । काय मीं कैसा पाहें आतां ॥ ४ ॥ तुझिया नामाची सकळ । पूजा अर्चन मंत्र माळ । धूप दीप नैवेद्य फळ तांबूल । वाहूं पुष्पांजळ तुका म्हणे ॥ ५ ॥

३२२. शरीर दुःखाचें कोठार । शरीर रोगांचें भांडार । शरीर दुर्गंधीची थार । नाहीं अपवित्र शरीराऐसें ॥ १ ॥ शरीर उत्तम चांगलें । शरीर सुखाचें घोसुलें । शरीर साध्य होय केलें । शरीरें साधलें परब्रह्म ॥ २ ॥ शरीर विटाळाचें आळें । माया मोह पाश जाळें । पतन शरीराच्या मुळें । शरीर काळें व्यापिलें ॥ ३ ॥ शरीर सकळही शुद्ध । शरीर निधींचाही निध । शरीरें तुटे भवबंध । वसे मध्यभागीं देव

शरीरा ।। ४ ।। शरीर अविद्येचा बांधा । शरीर अवगुणांचा रांधा । शरीरीं वसे बहुत बाधा । नाहीं गुण सुधा एक शरीरीं ।।५।। शरीरा दुःख नेदावा भोग । न द्यावे न करी त्याग । शरीर वोखटें ना चांग । तुका म्हणे वेग करी हरिभजनीं ।। ६ ।।

३२३. इतुलें करीं भलत्या परी । परद्रव्य परनारी । सांडूनि अभिलाष अंतरीं । वर्ते वेव्हारी सुखरुप ।। १ ।। न करी दंभाचा सायास । शांति राहे बहुवस । जिव्हे सेवीं सुगंधरस । न करी आळस रामनामीं ।। २ ।। जनमित्र होईं सकळांचा । अशुभ न बोलावी वाचा । संग न धरावा दुर्जनाचा । करीं संताचा सायास ।। ३ ।। करिसी देवावीण आस । अवघीं होईल निरास । तृष्णा वाढविसी बहुवस । कधीं सुखास न पवसी ।। ४ ।। धरूनि विश्वास करीं धीर । करितां देव हाचि निर्धार । तयाचा वाहे योगक्षेमभार । नाहीं अंतर तुका म्हणे ।। ५ ।।

३२४. संसारसिंधु हा दुस्तर । नुल्लंघवे उल्लंघितां पार । बहुत वाहाविले दूर । न लगेचि तीर पैलथडी ।।१।। किती जन्म झाला फेरा । गणित नाहीं जी दातारा । पडिलों आवर्तीं भोंवरा । बहु थोरा वोळसिया ।। २ ।। वाढलों परि नेणती बुद्धि । नाहीं परतली धरिली शुद्धी । मग म्यां विचारावें कधीं । ऐसी संधी सांडोनियां ।। ३ ।। अनेक खाणी आहार निद्रा । भयमैथुनाचाचि थारा । बालत्व तारुण्य जरा । प्रधान पुरा भोग तेथ ।। ४ ।। ऐसीं उल्लंघूनी आलों स्थळें । बहु या भोवंडिलों काळें । आतां हें उगवावें जाळें । उजेडावें बळें दिवसाच्या ।। ५ ।। सांडीं या संसाराची वाट । बहु येणें भोगविले कष्ट । दावी सत्या ऐसें नष्ट । तुका म्हणे भ्रष्ट झालों देवद्रोही ।। ६ ।।

३२५. विठ्ठल भीमातीरवासी । विठ्ठल पंढरीनिवासी ।

विठ्ठल पुंडलीकापासी । कृपादानासीं उदार ।। १ ।। विठ्ठल स्मरणा कोंवळा । विठ्ठल गौरवीं आगळा । आधार ब्रह्मांड सकळा । विठ्ठल लीळाविग्रही ।। २ ।। उभाचि परि न मनी सीण । नाहीं उद्धरितां भिन्न । समर्थाचें घरीं एकचि अन्न । आर्तभूता क्षणोक्षणा सांभाळी ।। ३ ।। रुचीचे प्रकार । आणिताती आदरें । कोठेंही न पडे अंतर । थोरासी थोर धाकुटा धाकुट्या ।। ४ ।। करितां बळ धरितां नये । झोंबतां डोळा मनच होय । आपुल्या उद्देशाची सोय । जाणें हृदयनिवासी ।।५।। पान्हा तरी आल्या अंतर तेथें । तो नाहीं भरिलें रितें । करितों सेवन आइतें । तुका म्हणे चित्तें चित्त मेळवूनी ।। ६ ।।

३२६. ताप हें हरण श्रीमुख । हरी भवरोगा ऐसें दुःख । अवलोकिनां उपजे सुख । उभे सन्मुख दृष्टीपुढें ।। १ ।। न पुरे डोळियाची धणी । सखोल कृपेचीच खाणी । स्तवितां न पुरे वेदवाणी । तो हा समचरणीं कृपानिधी ।। २ ।। रामकृष्ण ध्यान वामन नरसिंही । उग्र आणि सौम्य कांहींच नाहीं । सांपडे भरलीये वाहीं । भाव शुद्ध पाही यांचे भातुकें ।। ३ ।। गुणगंभीर चतुर सुजाण । शूर धीर उदार नारायण । व्यापक तरी त्रिभुवन । मनमोहन लावण्य हें ।। ४ ।। ठाण हें साजिरें सुंदर । अविनाश अविकार । अनंत आणि अपरंपार । तो हा कटीं कर धरिताहे ।। ५ ।। जयाची वाणी सुमनमाळा । परमामृत जिव्हाळा । अनंत अंगीं अनंत कळा । तुका जवळा चरणसेवक ।। ६ ।।

३२७. अगा ये वैकुंठनायका । अगा ये त्रैलोक्यतारका । अगा ये जनार्दना जगव्यापका । अगा पालक भक्तांचिया।। १।। अगा ये वसुदेवदेवकीनंदना । अगा ये गोपिकारमणा । अगा

बळिबंधा वामना । अगा निधाना गुणानिधी ॥ २ ॥ अगा ये द्रौपदीबांधवा । अगा ये सखया पांडवा । अगा जीवाचिये जीवा । अगा माधवा मधुसूदना ॥ ३ ॥ अगा महेश्वरा महाराजा । अगा श्रीहरी गरुडध्वजा । अगा सुंदरा सहस्रभुजा । पार मी तुझा काय वर्णू ॥४॥ अगा अंबरूपोपरं परा । निरालंब निर्विकारा । अगा गोवर्धनधरणीधरा । अगा माहेरा दीनाचिया ॥ ५ ॥ अगा धर्मराया धर्मशीळा । अगा कृपासिंधु कृपाळा । अगा प्रेमाचिया कल्लोळा । सकळकळाप्रवीणा ॥ ६ ॥ अगा चतुरा सुजाणा । मधुरगिरा सुलक्षणा । अगा उदार असुरमर्दना । राखे शरणा तुकयाबंधु ॥ ७ ॥

३२८. देवा मी चांडाळ चांडाळ । म्हणतां लागताहे वेळ । नसे पाहतां भूमंडळ । ऐसा अमंगळ खळ दुसरा ॥ १ ॥ जन्मा उपजलियापासूनि असत्य कर्म तें अझूनी । सत्य आचरण नेणें स्वर्प्नीं । निखळ खाणी अवगुणांची ॥ २ ॥ भक्ति दया अथवा कथा । कानीं न साहवे वार्ता । अखंड विषयांची वेथा । अधम पुरता अधमाहुनी ॥ ३ ॥ काम क्रोध दंभ अहंकार । गर्व ताठा मद मत्सर । यांचें तरी माहेरघर । परउपकार वैरी जैसा ॥४॥ निंदा द्वेष घात विश्वास । करितां नाहीं केला आळस । करूं नये ते केले संतउपहास । अभक्ष तेंही भक्षिलें ॥ ५ ॥ पाळिलें नाहीं पितृवचन । सदा परद्वारीं परधनीं ध्यान । बोलों नये घडलें ऐसें अन्योन्यविण । दासीगमन आदिकरूनी ॥ ६ ॥ काया मनें वाचा इंद्रियांसी । सकळ पापांचीच राशी । तुकयाबंधु म्हणे ऐसियासी । आलों हृषीकेशी तुज शरण ॥ ७ ॥

३२९. काय काय करितों या मना । परी नाइके नारायणा । करूं नये त्याची विटंबना । पतना नेऊं आदरिलें ॥ १ ॥

भलतिया सर्वे धावे सैराट । वाट आडवाट दरे दरकुट । न विचारीं कुडें कांहीं कपट । घाट बळकट मांडियेला ॥ २ ॥ न पुरती भ्रमणा दाही दिशा । सप्तही पाताळें आकाशा । घाली उडी बळाचि देखोनि फांसा । केलों या देशा पाहुणा ॥३॥ चेतवूनी इंद्रियें सकळ । आशा तृष्णा कल्पना काम क्रोध काळ । दुराविलीं शुद्ध बुद्धि केली राळ । ऐसें चांडाळ अनिवार हें ॥ ४ ॥ आतां काय ऐसें करावें यासी । बहु जाचिलों केलों कासावीसी । तुकयाबंधु म्हणे हृषीकेशी धांव मज ऐसी परी जाली ॥ ५ ॥

३०. एक मागणें हृषीकेशी । चित्त द्यावें सांगतो वचनासी । मज अंतर तुझ्या चरणासी । न पडे ऐसी कृपा करीं ॥ १ ॥ नको दुजी बुद्धि आणिक । रिद्धिसिद्धि परलोक । तूं स्वामी मी सेवक । खंडणा नको करूं ऐसी ॥ २ ॥ मना येईल तो जन्म देई । भलते कुळीं भलते ठायीं । तें मी सांकडें घालीत नाहीं । हृदयींहुनी तुवां न वजावें ॥ ३ ॥ इतुकें करीं भलत्यापरी । भलत्याभावें तुझे द्वारीं । राहेन दास होऊनी कामारी । वदो वैखरी नित्य नाम ॥ ४ ॥ नको विचारूं दुसरें आतां । शरण आलों जी पंढरीनाथा । तुकयाबंधु म्हणे रे अच्युता । आहेसि तूं दाता दानशूर ॥ ६ ॥

३३१. तूं बळिया शिरोमणी । आह्मी माजी ये त्रिभुवनीं वनीं । रिघालों पाठीं तुझी म्हणऊनि । आतां करीन मी अमल तें ॥ १ ॥ तूं देवा प्रतापदिनकर । सुराअसुरांचा सुर । महावीरां वीरा धनुर्धर । मी तो पामर काय तेथें ॥ २॥ कृपासिंधु दीनवत्सल । फोडिली देवांची बंदीशाळा । संहारूनी राक्षसदळ । शरणागत राज्यीं स्थापिला ॥ ३ ॥ उपक्रम करावा बहुत । तरी तूं जाणसी धर्मनीत । उचित काय तें अनुचित ।

राखें शरणागत आलों आता ॥ ४ ॥ किती म्यां काय विनवावें । शरण आलों जीवेंभावें । तुकयाबंधु म्हणे करावें । क्षेम अवघें येणें काळें ॥ ५ ॥

३३२. उभा देखिला भीमातिरीं । कर मिरविलें कटावरी । पाउलें तरी समचि साजिरीं । नाम तरि अनंत अतिगोड ॥ १ ॥ शंखचक्रांकित भूषणें । जडितमेखळा चिद्रत्नें । पीतांबर उटी शोभे गोरेपणें । लोपली तेणें रवितेजें ॥ २ ॥ श्रवणीं कुंडलें देती ढाळ । दशांगुळीं मुद्रिकामाळ । दंत ओळी हिरे झळाळ । मुख निर्मळ सुखरासी ॥३॥ कडीं कडदोरा वांकी वेळा । बाहीं बाहु-वटे पदक गळा । मृगनाभीं रेखिला टिळा । लवती डोळां विद्यु-ल्लता ॥ ४ ॥ सुंदरपणाची साम्यता । काय वर्णू ते पावे आतां । तुकयाबंधु म्हणे रे अच्युता । धन्य ते माता प्रसवली ॥ ५ ॥

३३३. कई देखतां होईन डोळीं । सकळां भूतीं मुर्ति सांवळी । जीवा नांव भूमंडळीं । जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं ॥ १ ॥ ऐसी कृपा करील नारायण । जीव जगाचा होईन । प्रेमसागरीं बुडइन । होईल स्नान अनुतापीं ॥२॥ ऐसा कई येईन देवास । दृश्य नासोनी जाईल आस । सदा संतचरणीं देहाचा वास । सेवीन शेष धणीवरी ॥ ३ ॥ कई नवसा येतील अंकुर । सुखा नाहींसा होईल पार । अमृत तें पृथ्वी जळ सागर । वाहती पूर आनंदाचे ॥ ४ ॥ प्रसन्न दया क्षमा शांती । कई नवविधा होईल भक्ति । भोगीन वैराग्यसंपत्ती । मनोरथ कळती तई पुरले ॥५॥ तुकया-बंधु म्हणे सांग । नव्हे तुजविण निरसेना पांग । म्हणोनी घातलें साष्टांग । पांडुरंगा चरणावरी ॥ ६ ॥

## ताटीचे अभंग

३३४. योगी पावन मनाचा । साहे अपराध जनाचा ॥ १ ॥ विश्व रागें झालें वन्ही । संतीं सुखें व्हावें पाणी ॥ २ ॥ शब्द-शस्त्रें झाले क्लेश । संतीं मानवा उपदेश ॥ ३ ॥ विश्वपट ब्रह्म-दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ४ ॥

३३५. सुखसागरीं वास झाला । उंच नीच काय त्याला ॥ १ ॥ अहो आपण जैसें व्हावें । देवें तैसेंचि करावें ॥ २ ॥ ऐसा नटनाट्य खेळ । स्थिर नाहीं एक वेळ ॥ २ ॥ एकापासूनि अनेक झालें । त्यासी पाहिजे सांभाळिलें ॥ ४ ॥ शून्य साक्षित्वें समजावें । वेद ओंकाराच्या नांवें ॥ ५ ॥ एकें उंचपण केलें । एक अभिमान गेलें ॥ ६ ॥ इतुकें टाकुनि शांति धरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ७ ॥

३३६. वरी भगवा झाला नामें । अंतरी वश केला कामें ॥ १ ॥ त्याला म्हणूं नये साधू । जगीं विटंबना बाधू ॥ २ ॥ आपआपणा शोधूनि घ्यावें विवेक नांदे त्यांच्यासवें ॥ ३ ॥ आशा दंभ अवघे आवरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ४ ॥

३३७. संत तोचि जाणा जगीं । दया क्षमा ज्याचे अंगीं ॥ १ ॥ लोभ अहंता नये मना । जगीं विरक्त तोचि जाणा ॥ २ ॥ इह पर लोकीं सुखी । शुद्धज्ञान ज्याचे मुखीं ॥ ३ ॥ मिथ्या कल्पना मागें मारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ४ ॥

३३८. एक आपण साधू झाले । येर कोण वायां गेले ॥ १ ॥ उठे विकार ब्रह्मीं मूळ । अवघे मायेचे गाबाळ ॥ २ ॥ माया नुरे जेव्हां । विश्व ब्रह्म होईल तेव्हां ॥ ३ ॥ ऐसा उमज आदीं

अंतीं । मग सुखी व्हावें संतीं । चिंता क्रोध मागें सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ५ ॥

३३९. ब्रह्म जैसें तैशापरी । आम्हां वडील भूतें सारीं ॥१॥ हात आपुला आपणा लागे । त्याचा करूं नये खेद ॥ २ ॥ जीभ दातांनीं चाविली । कोणें बत्तिशी ताडिली ॥ ३ ॥ थोर दुखावलें मन । पुढें उद्दंड शहाणे ॥ ४ ॥ चणे खावे लोखंडाचे । मग ब्रह्मपदीं नाचें ॥५॥ मन मारुती उन्मन करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ६ ॥

३४०. सुखसागर आपण व्हावे । जग बोधें निववावें ॥१॥ बोधा करूं नये अंतर । साधु नाहीं आपपर ॥२॥ जीव जीवासी पै द्यावा । मग करूं नये हेवा ॥ ३ ॥ तरुणोपाय चित्तीं धरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ४ ॥

३४१. अहो क्रोधें यावें कोठें । अवघे आपण निघोटें ॥१॥ ऐसें कळलें उत्तम । जन तेंचि जनार्दन ॥ २ ॥ ब्रीद बांधिलें चरणीं । नवे दावितां करणीं ॥ ३ ॥ वेळ क्रोधाचा उगवला । अवघा योग फोल झाला ॥ ४ ॥ ऐसी थोर दृष्टी धरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ५ ॥

३४२. सांडी कल्पना उपाधी । तीच साधुला समाधी ॥१॥ वाद घालावा कवणाला । अवघा द्वैताचा हो घाला ॥ २ ॥ पुढें उमजेना काय । बुडत्याचे खालीं पाय ॥ ३ ॥ एक मन चेष्टा करी । भूतें बापुडीं शेजारीं ॥ ४ ॥ अवघी ईश्वराची करणी । काय तेथें केलें कोणीं ॥ ५ ॥ पुन्हां शुद्ध मार्ग धरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ६ ॥

३४३. गिरी गव्हारें कशासाठीं । रागें पुरविली पाठी ॥१॥

ऐसा नसावा संन्यासी । परमार्थाचा जो कां द्वेषी ॥ २ ॥ घर बांधिलें डोंगरीं । विषयीं हिंडे दारोदारीं ॥ ३ ॥ काय केला योगधर्म । नाहीं अंतरीं निष्काम ॥ ४ ॥ गंगाजळ हृदय करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ५ ॥

३४४. शुद्ध ज्याचा भाव झाला । दुरी नाहीं देव त्याला ॥१॥ अवघीं साधनें हातवटी । मोलें मिळत नाहीं हाटीं ॥ २ ॥ अहो आपण तैसें व्हावें । अवघें अनुमानूनि घ्यावें ॥ ३ ॥ ऐसें केलें सद्गुरुनाथें । बापरखुमादेवीकांतें ॥ ४ ॥ तेथें कोणी शिकवावे । सार साधूनिया घ्यावें ॥ ५ ॥ लाडिवाळ मुक्ताबाई । जीव मुद्दल ठायींचें ठायीं ॥६॥ तुम्ही तरून विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ ७ ॥

## श्रीकृष्णजन्माचे अभंग

३४५. पापी जे अभक्त दैत्य ते माजले । धरणीसीं झालें ओझें त्यांचें ॥ १ ॥ दिधलासे त्रास ऋषि मुनि सर्वां । न पूजिती देवा कोणी एक ॥ २ ॥ राहियेले यज्ञ मोडिलें कीर्तन । पळाले ब्राह्मण दैत्यां भेणें ॥ ३ ॥ वत्सरूपी पृथ्वी ब्राह्मयापाशीं जाय । नेत्रीं वाहे तोय सांगतसे ॥ ४ ॥ बुडाविला धर्म अधर्म झाला फार । सोसवेना फार मज आतां ॥ ५ ॥ ब्रह्मा इंद्र आणि बरोबरी शीव । चालियेले सर्व क्षीराब्धीशीं ॥ ६ ॥ नामा म्हणे आतां करितील स्तुती । सावधान चित्तीं परिसावें ॥ ७ ॥

३४६. वासुदेवा हृषिकेशा माधवा मधुसूदना । करिताती स्तवना पुरुषसूक्तें ॥ १ ॥ पद्मनाभा त्रिलोकेशा वामना शेषशायी । आम्हां कोणी नाहीं तुजवीण ॥ २ ॥ जनार्दना हरि

श्रीवत्सला गरुडध्वजा । पाव अधोक्षजा आतां आम्हां ॥ ३ ॥ वराहा पुंडरीका नृसिंहा नरांतका । वैकुंठनायका देवराया ॥ ४ ॥ अच्युता शाश्वता अनंता अजअव्यया । कृपेच्या अभया देई आम्हां ॥ ५ ॥ नारायणा देवाध्यक्षा कैठभभंजना । करी रे मर्दना दुष्टाचिया ॥ ६ ॥ चक्रगदाशंखपाणि नरोत्तमा । पाव पुरुषोत्तमा दासा तुझ्या ॥ ७ ॥ रामा हयग्रीवा भीमा रौद्रोद्भवा । आश्रय भूतां सर्वां तुझा असे ॥ ८ ॥ श्रीधरा श्रीपति चतुर्बाहो मेघःशामा । लेकुरें आम्ही आम्हां पाव त्वरें ॥ ९ ॥ नामा म्हणे ऐसें करितां स्तवन । तोषला भगवान क्षीराब्धींत ॥ १० ॥

३४७. आकाशीची वाणी सांगे सकळांसी । तळमळ मानसीं करूं नका ॥ १ ॥ देवकीच्या गर्भा येईल भगवान । रक्षील ब्राह्मण गाई भक्त ॥ २ ॥ उतरील भार मारील दैत्यांसी । आनंद सर्वांसी करील तो ॥ ३ ॥ रोहिणी उदरीं शेष बळिभद्र । यादव समग्र व्हा रे तुम्ही ॥ ४ ॥ ऐकोनियां ऐसें आनंद मानसीं । येती स्वस्थळासी नामा म्हणे ॥ ५ ॥

३४८. शेषाप्रती बोले लक्ष्मीचा तो वर । चला अवतार घेऊं आतां ॥ १ ॥ पृथ्वीवरी दैत्य माजले ते फार । गाऱ्हाणें सुरवर सांगू आले ॥ २ ॥ शेष म्हणे मज श्रम झाले फार । यालागीं अवतार मी न घेचि ॥ ३ ॥ राम अवतारीं झालें लक्षुमण । सेविलें अरण्य तुम्हांसवें ॥ ४ ॥ चौदा वर्षांवरी केलें उपोषण । जाणतां आपण प्रत्यक्ष हें ॥ ५ ॥ नामा म्हणे ऐसें वदे धरणीधर । हासोनी श्रीधर काय बोले ॥ ६ ॥

३४९. पूर्वी तूं अनुज झालासी कनिष्ठ । सोसियेले कष्ट मज-

सर्वें ॥ १ ॥ आतां तूं वडील होई गा सर्वज्ञा । पाळीन मी आज्ञा तुझी बा रे ॥ २ ॥ देवकी उदरीं राहावें जावोनी । मायेसी मागुनी पाठवितो ॥ ३ ॥ योगमाया तुज काढील तेथून । घालील नेऊन गोकुळासी ॥ ४ ॥ लक्ष्मीसी सांगें तेव्हां हृषीकेशी । कौंडण्यपुरासीं जावें तुम्हीं ॥ ५ ॥ नामा म्हणे ऐसा करूनि विचार । घ्यावया अवतार सिद्ध असे ॥ ६ ॥

३५०. वसुदेवा देत देवकी बहीण । लग्नामध्यें विघ्न झालें ऐका ॥ १ ॥ आकाशाची वाणी सांगतसे कंसा । मानी भरंवसा हा बोलण्याचा ॥ २ ॥ आठवा इचा पुत्र वधील तुजसी । ऐकोनी मानसीं क्रोधावला ॥ ३ ॥ घेऊनियां खड्ग माराया धांवला । हात तो धरीला वसुदेवें ॥ ४ ॥ देईन मी पुत्र सत्य माझें माना । ठेवा बंदीखानीं दूता सांगे ॥ ५ ॥ पुण्य सरावया भेटे देवऋषी । वधी बाळकांसी ठेवूं नको ॥ ६ ॥ होतांचि प्रसूत नेऊनियां देत । सहाही दुराचारी ॥ धन्य त्याचें ज्ञान न करीच शोक । वधितां बाळक नामा म्हणे ॥ ८ ॥

३५१. सातवा जो गर्भ योगमाया नेत । आश्चर्य करीत मनामाजी ॥ १ ॥ रोहिणी उदरीं नेवोनि घातला । न कळे कोणाला देवावीण ॥ २ ॥ कंसाचिया भेणें यादव पळाले । ब्राह्मण राहिले अरण्यांत ॥ ३ ॥ नाहीं कोणा सुख तळमळ मानसीं । वधील दुष्टांसी कोण आतां ॥ ४ ॥ विश्वाचा जो आत्मा कळलें तयाला । दावितसे लीला संभूतीची ॥ ५ ॥ अहर्निशीं ध्यान भक्तांचे मानसीं । स्थापील धर्मासी नामा म्हणे ॥ ६ ॥

३५२. देवकीचें तेज दिसे जैसा सूर्य । कंसाचें हृदय जळ-

तसे ॥ १ ॥ हरणें पळती देखोनियां व्याघ्र । कांपे थरथर तयापरी ॥ २ ॥ अजासर्पन्यायें कीटकभ्रमर । दिसती नारीनर कृष्णरूप ॥ ३ ॥ जेवितां बोलतां शेजेसी तो निज । आला आला मज मारावया ॥ ४ ॥ नाशील हा आतां दैत्यांचें तें बंड । फाटलीसे गांड तेव्हां त्याची ॥ नामा म्हणे भय लागलेंसे ध्यान । चराचरीं कृष्ण दिसतसे ॥ ६ ॥

३५३. विमानांची दाटी अंतरिक्षीं देव । करिताती सर्व गर्भस्तुति ॥ १ ॥ सतरा अक्षरांत असे मूर्ती । यज्ञेशा तुजप्रती नमो नमो ॥ २ ॥ सहाजणें भांडती नवजणीं स्थापिती । न कळे कोणाप्रती अंत तुझा ॥ ३ ॥ अठराजणें तुझी वर्णिताती कीर्ति । गुणातीत श्रीपति नमो तुज ॥ ४ ॥ चौघां जणां तुझा न कळेचि पार । श्रमसी वारंवार आम्हांपाठीं ॥ ५ ॥ अठ्यांशी सहस्र वर्णिताती तुज । ब्रह्मांडाचें बीज तुज नमो ॥ ६ ॥ जन्म-मरणाचें नाहीं तया भय । आठविती पाय तुझे जे कां ॥ ७ ॥ नवजणी तुझ्या पायीं लोळताती । परब्रह्म मूर्ति तुज नमो ॥ ८ ॥ नामा म्हणे ऐसी करिताती स्तुती । पुष्पें वाहूनि जाती स्वस्थळांसी ॥ ९ ॥

३५४. मयूरादि पक्षी नृत्य करीताती । नद्या वाहताती दोन्हीं थड्या ॥ १ ॥ भूमीवर सडे केशर कस्तुरी । आनंद अंतरीं सकळांच्या ॥ २ ॥ विमानांची दाटी सरवर येती । गंधर्व गाताती सप्तस्वरें ॥ ३ ॥ मंद मंद मेघ गर्जना करिती । वाद्यें वाजताती नानापरी ॥ ४ ॥ नामा म्हणे स्वर्गी नगारे वाजती । अप्सरा नाचती आनंदानें ॥ ५ ॥

३५५. दशरथे मारिला तोचि होता मास । वर्षा ऋतू असे कृष्णपक्ष ॥ १ ॥ वसुनाम तिथी बुधवार असे । शुक्र सांगतसे परीक्षिती ॥ २ ॥ रोहिणी नक्षत्र दोन प्रहर रात्र । माथा घाली अस्त्र रक्षपाळां ॥ ३ ॥ नवग्रह अनुकूल सर्वांचें जें मूळ । वसुदेव कपाळ धन्य धन्य ॥ ४ ॥ जयाचा हा वंश तयासी आनंद । माझ्या कुळीं गोविंद अवतरला ॥ ५ ॥ अयोनीसंभव नोहे कांहीं श्रमी । नामयाचा स्वामी प्रगटला ॥ ६ ॥

३५६. फिरविली दोनी । कन्या आणि चक्रपाणि ॥ १ ॥ झाला आनंदी आनंद । अवतरले गोविंद ॥ २ ॥ तुटलीं बंधनें । वसुदेव देवकीचीं दर्शनें ॥ ३ ॥ गोकुळासी आलें । ब्रह्म अव्यक्त चांगलें ॥ ४ ॥ नंद दसवंती । धन्य देखिले श्रीपति ॥ ५ ॥ निशीं जन्मकाळ । आले अष्टमी गोपाळ ॥ ६ ॥ आनंदली मही । भार गेला सकळही ॥ ७ ॥ तुका म्हणे कंसा । आट मोविला वोळसा ॥ ८ ॥

३५७. कृष्ण गोकुळीं जन्मला । दुष्टां चळकांप सुटला ॥ १ ॥ होतां कृष्णाचा अवतार । आनंद करिती घरोघर ॥ २ ॥ सदा नाम वाचे गाती । प्रेमें आनंद नाचती ॥ ३ ॥ तुका म्हणे हरती दोष । आनंदानें करिती घोष ॥ ४ ॥

३५८. गोकुळींच्या सुखा । अंतपार नाहीं लेखा ॥ १ ॥ बाळकृष्ण नंदाघरीं । आनंदल्या नरनारी ॥ २ ॥ गुढिया तोरणें । करिती कथा गाती गाणें ॥ ३ ॥ तुका म्हणे छंदें । येणें वेधिली गोविंदें ॥ ४ ॥

३५९. अनंत ब्रह्मांडें उदरीं । हरी हा बाळक नंदाघरीं ॥ १ ॥ नवल केव्हडें केव्हडें । न कळे कान्होबाचें कोडें ॥ २ ॥ पृथ्वी

जेणें तृप्त केली । त्यासी यशोदा भोजन घाली ॥ ३ ॥ विश्व-व्यापक कमळापती । त्यासी गौळणी कडिये घेती ॥ ४ ॥ तुका म्हणे नटधारी । भोग भोगुनी ब्रह्मचारी ॥ ५ ॥

## श्रीरामजन्माचे अभंग

३६०. कुळगुरु वसिष्ठ सांगे नृपवरा । असती गरोदर तुझ्या कांता ॥ १ ॥ धर्मशास्त्र ऐसें डोहळे पुसावे । त्यांचे पुरवावे मनोरथ ॥ २ ॥ ऐकोनियां ऐसें आनंद मानसीं । कैकयी सदनासी जाता झाला ॥३॥ मंचकी बैसली होती ते पापिणी । देखतां नयनीं पहुडली ॥ ४ ॥ सुंदरपणाचा अभिमान मनीं । त्यावरी गर्भिणी नामा म्हणे ॥ ५ ॥

३६१. राजा म्हणे इच्छा तुझिये मानसीं । डोहळे मजसीं सांग आतां ॥ १ ॥ येरी म्हणे ऐसें वाटतसे जीवा । कनिष्ठासी द्यावा राज्यपट ॥ २ ॥ ज्येष्ठासी धाडावें दुरी दिगंतरा । नये समाचार त्याचा आम्हां ॥ ३ ॥ जनांत हें निंद्य वेदबाह्य कर्म । करितां अधर्म पाप बहु ॥ ४ ॥ माझिये मस्तकीं ठेवावा हा दोष । तुम्हांकडे लेश नाहीं नाहीं ॥ ५ ॥ निंदितील जन मज वाटे सुख । ऐकतांची दुःख राया झालें ॥ ६ ॥ घृश्विराचे पेंवीं तक्षक पडत । घालिताती घृत अग्निमुखीं ॥ ७ ॥ ऐसीं व्यथा होय नामा म्हणे त्यासी । उठिला त्वरेसी तेथोनियां ॥ ८ ॥

३६२. येतसे दशरथ सुमित्रामंदिरीं । देखतां सामोरी येती झाली ॥ १ ॥ न माये आनंद तियेचे मानसीं । ठेवी मस्त-कासी चरणांवरी ॥ २ ॥ घालोनी आसन प्रक्षाळी चरण । सर्वांगीं लेपून तीर्थोदकें ॥ ३ ॥ गंध धूप दीप पुष्पांचिया माळा । अर्पूनी तांबुला उभी राहे ॥ ४ ॥ कैकयीचें दुःख

विसरला राव । पाहोनियां भाव सुमित्रेचा ॥ ५ ॥ होती जे डोहळे तुझिये मानसीं । सांग मजपासी पतिव्रते ॥६॥ प्राणनाथा ऐसें वाटतसें जीवा ! वडिलांची सेवा अहर्निशीं ॥ ७ ॥ आवडे हे एक नावड आणिक । द्यावें मज एक हेंचि आतां ॥ ८ ॥ ऐकतांचि एसें कांतेचें वचन । आनंदें निमग्न मन होय ॥ ९ ॥ घेऊनियां हातीं रत्नांचे भूषण । टाकी ओंवाळून नामा म्हणे ॥ १० ॥

३६३. दशरथ राजा उठिला तेथूनी । कौसल्येसदनीं जाता झाला ॥ १ ॥ पाहातसे दृष्टी तेव्हां श्रावणारी । न माये अंतरीं तेज तिचे ॥ २ ॥ तुझिये मानसी होती जे डोहाळे । सांग वो वेल्हाळे मजपासी ॥ ३ ॥ उदरांत असे भक्तांचा कैवारी । तेथें कैची उरी देहभावा ॥ ४ ॥ सदा समाधिस्थ रामरूप झाली । कौसल्या माउली नामा म्हणे ॥ ५ ॥

३६४. न बोलेचि कांहीं इसीं काय झालें । भूतें झडपिलें निश्चयेंसी ॥१॥ माझिये अदृष्टीं नाहीं हा नंदन । म्हणोनियां विघ्न ओढवलें ॥ २ ॥ निवारीं हें विघ्न वैकुंठनायका । रक्षीं या बाळका सुदर्शनें ॥ ३ ॥ तुझा मी किंकर आजि अंबुजाक्षा । द्यावी मज भिक्षा हेचि आतां ॥ ४ ॥ नामाचा उच्चार एकतांचि कानीं । नेत्र उघडोनि पाहती झाली ॥ ५ ॥ राजा म्हणे कां हो ऐसी अवस्था । कां हो भ्रम चित्ता झाला असे ॥ ६ ॥ विश्वाचा मी आत्मा स्वयें असे राम । मजमाजीं भ्रम कैंचा असे ॥ ७ ॥ अवतार महिमा वानी वेद माझा । सुरवरांच्या काजा नामा म्हणे ॥ ८ ॥

३६५. रावणें हें केलें लग्नामाजी विघ्न । असे कीं स्मरण

तुजलागीं ॥ १ ॥ आणी रे धनुष्य मारीन रावणा । लंका बिभीषणा देईन मी ॥ २ ॥ अंगद सुग्रीव जांबुवंत वीरा । हनुमंत पाचारा लवकरी ॥ ३ ॥ टाकानी पर्वत बुजवा रे सागरा । पायवाट करा जावयासी ॥ ४ ॥ लंकेपुढें मोठें माजवीन रण । तोडीन बंधन सुरवरांचें ॥ ५ ॥ विश्वामित्र याग नेईन मी सिद्धी । मारीन कुबुद्धि दोघा जणा ॥ ६ ॥ खर दूषणाचा घेईन मी प्राण । धनुष्य मोडीन भुजाबळें ॥ ७ ॥ ध्याती मज त्याची बहुत आवडी । न विसंबे घडी त्यासी एक ॥ ८ ॥ बोलिला वाल्मिक तैसेंचि करीन । वर्तोनि दावीन नामा म्हणे ॥ ९ ॥

३६६. परब्रह्म पूर्ण आलें माझे घरीं । न कळे अंतरीं नृपाचिया ॥ १ ॥ करीतो बडबड होती भूतचेष्टा । पाचारा वसिष्ठा लवकरी ॥ २ ॥ येऊनि वसिष्ठ पाहे कौसल्येसी । नावरती तियेसी अष्टभाव ॥ ३ ॥ राजा म्हणे कैसें विपरीत झालें । वसिष्ठा झडपिलें महाभूतें ॥ ४ ॥ श्रावणवधाचें अघ नाहीं जळालें । दुजें हें निर्मिले प्रारब्धासी ॥ ५ ॥ ऐकतांचि हासे सावध होऊनि । बोलतसे झणीं नामा म्हणे ॥ ६ ॥

३६७. विरंचीचा बाप क्षीरसागरवासी । ध्याती योगी त्यासी निरंतर ॥ १ ॥ परेहूनिपर वैखरीहूनि दुरी । कौसल्येचे उदरीं तोचि असे । बोलियेलें जें जें नव्हे असत्य वाणी । न येऊं दे मनीं शंका कांहीं ॥ ३ ॥ माझें हें संचित धन्य धन्य आतां । पाहीन मी कांता लक्ष्मीच्या ॥ ४ ॥ धन्य धन्य धन्य अयोध्येचे लोक । वैकुंठनायक पाहतील ॥ ५ ॥ धन्य पशुपक्षी श्वापदें तरुवर । राजा रघुवीर पाहतील ॥ ६ ॥ त्रैलोक्यांत धन्य तूंचि एक नृपा । नामयाच्या बापा पाहशील ॥ ७ ॥

३६८. उत्तम हा चैत्रमास । ऋतु वसंताचा दिवस ।। १ ।। शुक्लपक्षीं हीं नवमी । उभे सुरवर ते व्योमीं ।। २ ।। माध्या-न्हासी दिनकर । पळभरी होय स्थिर ।। ३ ।। धन्य मीच त्रिभुवनीं । माझे वंशीं चक्रपाणि ।। ४ ।। सुशोभित दाही दिशा । आनंद नरनारी शेषा ।। ५ ।। नाही कौसल्येसी भान । गर्भी आले नारायण ।। ६ ।। अयोनी संभव । प्रगटला हा राघव ।। ७ ।। नामा म्हणे डोळां । पाहीन त्रिभुवनत्रयपाळा ।। ८ ।।

## श्रीहनुमानजन्माचे अभंग

३६९. देवांगना हातीं आणविला शृंगी । यज्ञ तो प्रसंगीं आरंभिला ।। १ ।। विभांडका क्रोध आला असे भारी । अयोध्या भीतरीं वेगीं आला ।। २ ।। राजा दशरथ सामोरा जाऊनी । अति प्रीति करूनी सभे नेला ।। ३ ।। पुत्र स्नुषा दोन्हीं देखता नयनीं । आनंदला मनीं म्हणे नामा ।। ४ ।।

३७०. आनंदोनी म्हणे राया धन्य केलें । इच्छिलें सोहळे पुरवीन ।। १ ।। यज्ञाचा आरंभ करीं लवलाह्यां । पुसोनी आचार्या वसिष्ठांसी ।। २ ।। सर्व ऋषीजन मिळाले सकळ । मंत्रांचा कल्लोळ करितातीं ।। ३ ।। नामा म्हणे शृंगी मुख्यत्वें शोभला । आरंभिला तेणें जेव्हां ।। ४ ।।

३७१. आरंभिला यज्ञ संतोष सर्वत्र । आनंदें नगर दुम-दुमीत ।। १ ।। यज्ञनारायण संतोष पावला । प्रत्यक्ष तो आला कुंडांतूनि ।। २ ।। पायास तें पात्र घेऊनियां करीं । शृंगीस झड-करी बोलतसे ।। ३ ।। विलंब करतां विघ्न ओढवेल । सत्वर वहिले भाग करा ।। ४ ।। नामा म्हणे देव येईल पोटासीं । ऐसें गूज त्यासी अग्नी सांगे ।। ५ ।।

३७२. विभाग सत्वर वसिष्ठानें केले । राया बोलाविलें

सान्निधचि ॥ १ ॥ प्रथम तो भाग कौसल्येसी दिला । तेणें क्रोध आला कनिष्ठेसी ॥ २ ॥ येतांचि तो क्रोध विघ्न ओढवलें । मुखीं झडपिला पिंड घारीं ॥ ३ ॥ आसडोनी पिंड घारीनें पैं नेला । नामा म्हणे घातिला अंजनी करीं ॥ ४ ॥

३७३. पिंड घारीनें झडपिला अंजनीनें तो सेविला ॥ १ ॥ अंजनीच्या तपासाठीं । महारुद्र आलें पोटीं ॥ २ ॥ चैत्र शुद्ध पौर्णिमेमी । सूर्योदय समयासी ॥ ३ ॥ महारुद्र प्रगटला । नामा म्हणे म्या वंदिला ॥ ४ ॥

## मदालसा

३७४. उपदेश मदालसा देहो निर्मिला कैसा । आलासी कवण्या वाटां मातेचिया गर्भवासा । जो पंथ वोखटा रे पचलासी कर्मकोठा । अविचार बुद्धि तुझी पुत्रराया अदटा ॥ १ ॥ पर्ये दे मदालसा सोहं जो जो रे बाळा । निजध्यानीं निज पा रे लक्ष लागो दे डोळा । निज तें तूं विसरलासी होसी वरपडा काळा ॥२॥ नवमास कष्टलासी दहाव्यानें प्रसूत झाली । येतांचि कर्मजाळ तुझी मान अडकली । आकांतु तें जननीये दुःखें धाय मोकली । स्मरे त्या हरिहरा ध्यायीं कृष्णमाउली ॥३॥ उपजोनि दुर्लभु रे मायबापा झालासी । वाढविती थोर आशा थोर कष्टी सायासी । माझें माझें म्हणोनियां झणी वायां भुललासी । होणार जाणार रे बाण नको गुंफो भवपाशीं ॥४॥ हा देहो नाशिवंत मळमूत्राचा बांधा । वरी चर्म घातलें रे कर्म कीटकाचा सांदा । रवरव दुर्गंधी रे अमंगळ तिचा बांधा । स्मरे त्या हरिहरा शरण जाई गोविंदा ॥ ५ ॥ या देहाचा भरंवसा पुत्रा न धरावा ऐसा । माझें माझें म्हणोनियां बहु दुःखाचा वळसा । बहुत ठाकियेले मृगजळाच्या आशा । तृष्णा ते सांडूनियां योगी गेले वनवासा ॥ ६ ॥ या

पोटाकारणें रे काय न करिजे एक। लागीं सोय धरी रें तिहीं भुलविले लोक। ठायींचे नेमियेलें त्यांचें आयुष्य भविष्य। लल्लाटीं ब्रह्मरेखा नेणती तें ब्रह्मादिक ॥ ७॥ जळींचीं जळचरें रे जळींचिया रमती। भुललीं तीं बापुडीं रे ते कांहीं नेणती। जंव नाहीं पुरली रे त्यांची आयुष्यप्राप्ती। वरि घालुनि भोंवरा जाळ बापा तयातें गिंवासिती ॥ ८॥ पाक्षिणी पाक्षिया रे निरंजनीं ये वनीं। पिलिया कारणें रे गेलीं चराया दोन्ही। अवचिती सांपडली रे पराधिया लागुनी। गुंतुनियां मोहोंपाशीं प्राण त्याजिती दोन्ही ॥ ९॥ मृग हा चारिया रे अतिमानें सोकला अविचार बुद्धि त्याची परतोनि मागुती आला। तंव त्या पाराधियानें गुणीं बाणु लाविला। आशा रे त्यजूनियां थिता प्राण मुकला ॥ १०॥ अठराभार वनस्पती। फली फुली बोळती। बावी त्या पोखरणी नदी गंगा वाहती। ज्या घरीं कुलस्त्रिया राज्य राणीव संपत्ति। हें सुख सांडू-नियां कासया योग सेविती ॥ ११॥ हें सुख सांडुनियां कोण फळ तयासी। कपाट लंघुनियां योगी ध्याती कवणासी। योग तो सांग मज कवण ध्यान मानसी। सर्वत्र गोविंदु रे हृदयीं ध्यायी हृषीकेशी ॥ १२॥ इतुकिया उपरी रे पुत्रा घेई उपदेशु। नको भुलो येणें भ्रमें जिवित्वाचा होईल नाशु। क्षीरा नीरा पारखी रे परमात्मा राजहंसु। निर्गुण निर्विकार पुत्रा सेवी ब्रह्मरसु ॥ १३॥ इतुकिया उपरी रे पुत्र मातें विनविता झाला। संसार सोहळा थोरा कष्टी जोडला। पंचभूतें निवती येथे म्हणोनि विश्वासु केला। वोखटा गर्भवासु कवणा कार्या रचिला ॥ १४॥ गर्भीची यातना रे पुत्रा ऐके आपुलया कानीं। येतां जातां येणें पंथें

सांगाती नाहीं रे कोणी। अहंभावो प्रपंचु पुत्रा सांडी रे दोन्ही। चौऱ्यांशी जीवयोनी प्रवर्तले मुनिजन तत्क्षणीं ॥ १५॥ वाहतां महापुरीं रे पुत्रा काढिले तुज। रक्षिलासी प्रसिद्ध सांपडलें ब्रह्मबीज। मग तुज ओळखी नाहीं कां रे नेणसी निज। आपेंआप सद्गुरु कृपा करील सहज ॥ १६ ॥ उपजत रंगणा रे पुत्रा तुवां जावें वना। बैसोनि आसनीं रे पाहे निर्वाणीच्या खुणा। प्राणासी भय नाहीं तापत्रयाचारणा। मग तुज सौरसु पाहा परब्रह्मम्हीच्या खुणा ॥ १७ ॥ बैसोनि आसनी रे पुत्रा दृढ होईं मनीं। चेतवी तूं आपणापें चेतविते कुंडलिनी। चालतां पश्चिम पंथें जाई चक्र भेदुनि। सतरावी जीवनकळा पाहे आत्मा हा चितुनी ॥ १८ ॥ मग तूं देखसी त्रिभुवन स्वर्ग मृत्यू पाताळ। नको भुलों येणें भ्रमें सांडी विषय पाल्हाळ। आपणापें देखपा रे स्वरूप नाहीं वेगळें। परमात्मा व्यापकु रे पाहा परब्रह्म सांवळें ॥ १९ ॥ इतुकिया उपरि रे पुत्रा ते विनवी जननी। परियेसी माउलिये संतोषलों तत्क्षणीं। इंद्रायणी महातटीं विलासलों श्रीगुरुचरणीं। बोलियेले ज्ञानदेवो संतोषलों वो मनीं ॥ २० ॥

३७५. श्रीगुरु देवराया प्रणिपातू जो माझा। अनादि मूळ तूंचि विश्वव्यापका बीजा। समाधि घेई पुत्रा स्वानंदाचिया भाजा पालखीं पहुडलिया नाशिवंत रे माया ॥ १ ॥ जाग रे पुत्रराया जाई श्रीगुरुशरण। देह तूं व्यापिलासी चुकवी जन्म-मरण। गर्भवासु वोखटा रे तेथें दुःख दारुण। सावध होई कां रे गुरुपुत्र तूं सुजाण ॥ २ ॥ मदालसा म्हणे पुत्रा ऐक बोलणें माझें। चौऱ्यांशीं घरामाजी मन व्याकुळ तुझें। बहुत सिणतोसि पाहतां विषयासी वोझें। जाण हें स्वप्नरूप येथें नाहीं बा

दुजें ॥ ३ ॥ सांडी रे सांडी बाळा सांडी संसारछंदु । माशिया मोहळ रे रचियेला रे कंदु । झाडुनि नेला तया फुकटाचि वेधु । तैसी परी होईल तुज उपदेशें आनु ॥ ४ ॥ सत्त्व हे रज तम तुज लाविती चाळा । काम क्रोध मद मत्सर तुज गोविती खेळा । यासवें झणें जासी सुकुमारा रे बाळा । अपभ्रंशीं घालतील मुकशील सर्वस्वाला ॥ ५ ॥ कोसलियानें घर सुदृढ पैं केलें । निर्गमु न विचारतां तेणें सुख मानियेलें । झालें रे तुज तैसें यातायाती भोगविलें । मोक्षद्वार चुकलासी दृढकर्मे जोडलें ॥ ६ ॥ सर्पे पैं दर्दुर धरियेला रे मुखीं । तेणेंहि रे माशी धरियेली पक्षी । तैसा नव्हे ज्ञानयोगु आपआपणाते भक्षी । इंद्रियां घाली पाणी संसारीं होई रे सुखी ॥७॥ पक्षिया पक्षिणी रे निरंजनीं ये वनीं । पिलिया कारण रे गेली चराया दोन्ही । मोहोजाळें गुंतली रे प्राण दिधले टाकुनी । संसार दुर्घट हा विचारु पाहे परतुनी ॥८॥ जाणत्या उपदेशु नेणतां भ्रांती पडिला । तैसा नव्हे ज्ञानप्रकाशु ज्ञानदेवो अनुवादाला । अनुभवीं गुरुपुत्र तोचि स्वयें बुझाला । एक त्या उद्धरणा गायक सहज उद्धरला ॥ ९ ॥

३७६. मदालसा म्हणे पुत्रा तूं मुक्त होतासी । संसार माया मोह कां रे बद्ध झालासी । सिद्ध तें विचारी पां जेणें सुखिया होसी ॥ १ ॥ चेई तूं रे तानुलिया जाई श्रीगुरुशरण । देहभावीं व्यापलासी मग तुज शिकवील कवण । अज्ञानपण सांडुनिया तूं चुकवी जन्ममरण । गर्भवास वोखटा रे गर्भी दुःख दारुण ॥ २ ॥ जागृति आणि निद्रा तुज स्वप्नीं भरू । सुषुप्ती वेळोवेळां तुज पाडिला विसरु । तें जंव नेणसी रे तंव तुज नाहीं निर्धारु ॥ ३ ॥ देह तंव नाशिवंत तुं कां रे भुल- लासी । अखंड ते विचारी पां जेणें सुखया होसी । दुःख तें

आठवी रे गर्भीं काय भोगिसी । जठराग्नि कृमी कुंडीं वेळोवेळां पडसी ॥ ४ ॥ कोसलियानें घर रे सुदृढ पै केलें । रिगुनिगु न विचारितां तेणें सुख मानिलें । झालें बाळा तुज तैसें यातायाति भोगविलें । मोक्षद्वार चुकलासी सकळही कर्में संचिलें ॥ ५ ॥ सर्पी दर्दुर धारियेला रे मुखीं । तंव तेणें माशी तोंडीं धरियेली शेखीं । तैसा हा मायामोहो तुज कां रे नुपेक्षी । इंद्रियें व्यापुनियां संसारीं सुखीदुःखीं ॥ ६ ॥ मृगजळ रे जैसें हेलावत पै दिसे । तैसी हें भ्रांति माया तुज नाथिली आभासें । उत्पत्ति प्रळय दोन्ही ये तरी तुज सरिसे । स्थिर होऊनि विचारीं पां आणिक नाहीं बा तैसें ॥ ७ ॥ मृग पक्षी कीटकु पतंगु होसी । आक्षेपीं संचर रे नाना योनी पावसी । पूर्ण ज्ञान सुख जेणें तें तूं कां रे नेणसी । अविनाश तेंचि तूं रे वायां सबळ कां करिसी ॥ ८ ॥ परब्रम्ह बाप तुझा इच्छा माया हे तुझी । अंश रे तूं तयाचा सबळ कां रे बुद्धि तुझी । अज्ञान तुज व्याली ते नव्हे कां रे वांझी । तेणें तूं भुललासी ऐक शिकवण माझी ॥ ९ ॥ परतत्त्वा आणि तुज बाळा नाहीं रे भिन्न । अनादि तूं आहसि रे परि हें न देखे मन । अकर्म कर्म केलें तेणें झालें आज्ञान । निष्कर्म होय जेणें तें तूं करीं कां रे ज्ञान ॥ १० ॥ पुत्र म्हणे वो माते मी अनादि कैसा । मी माझें जाणता वो मी अज्ञान कैसा । उकलु केवीं होय तुज कैसा भरंवसा । जीवनमुक्त होय दृष्टि दाखवी तैसा ॥ ११ ॥ पाप पुण्य दोन्हीं मजसवेंचि असती । करणी माते थोर त्याची ते आहे चालती । उकलु केवीं होय तें सांग मजप्रती । बुझावी वो माझे माते ऐसें करी विनंती ॥ १२ ॥ केलीं कर्में जरि तुवा न सांडिवो पाठी ।

कवण ते प्रकासील हें विपरीत गोष्टी । उकलु केवीं होय तें सांग मजप्रती । जेणें मी दृढ होय ते बुद्धि देई वो लाठी ॥ १३ ॥ अनंत कर्में माते घडलीं वो मज । तीं तंव न संडिती ऐसें ज्ञान पै तुज । तरी म्यां काय कीजे केवीं पावणें सहज । दुर्घट वाट आहे कशानि निफजेल काज ॥ १४ ॥ उठीं पुत्रा जाईं बाळा तीर्थें रे हिंड । साधु आणि संत येथें असती बा उदंड । तयामाजीं आत्मज्ञानी जो कां न बोले वितंड । तो तूं गुरु करीं तो तुज बुझवील प्रचंड ॥ १५ ॥ ज्ञान विज्ञान रे गुरु मुखीं बुझसीं । विचारूनि अनुभवु आपेंआप जाणसी । जेणें झालें अनंत सिद्ध तें तूं कां रे नेणसी । हरिहरब्रह्मादिक तेही ध्याती तयासी ॥ १६ ॥ नव्हतां बाळा नादबिंदु तें तूं रे सहज । तेथोंचि तूं होतासी ऐसें ज्ञान पै तुज । तेथेंचि तूं लीन होई करीं आपुलें काज । संसार स्वाभिमानानें घेई तेथींचें व्याज ॥ १७ ॥ उपजतां गर्भ अंध जया नाहीं प्रकाशु । पूर्वी तो योगभ्रष्टु चुकवीं गर्भवासु । गुरुवचनीं भजें पुत्रा परब्रह्मीं करीं वासु । अमृत सेवीं पा रे म्हणी होसी उदासु ॥ १८ ॥ तुज ऐसें रत्न बाळा कवणें रें केलें । आणिक अनंत जीव चराचर भुललें । तेणें रे इच्छामात्रें क्षणामाजी रचिलें । तें तूं रे नेणसीच येवढें कैसें चुकविलें ॥ १९ ॥ सांडीं बाळा काम क्रोधु हा दुर्जन विचारु । जिहीं तुज अंतराविलें त्याचा करीं कां संहारु । गुरुचरणीं भजें पुत्रा तो तुज देईल विचारु । अविनाशपद पावसी मग होईल निर्धारु ॥ २० ॥ सहज यम नेम गुरुकृपा रे करीं । आसनें प्राणायामु प्रत्याहार उदरी । धारणा होईल तुज मग ध्यान विचारीं । समाधी होई पुत्रा तूं जाण निरंतरीं ॥ २१ ॥ षड्चक्रा वेगळें रे तें जाणिजे कैसें । अनुभवें जाणसी रे

तुज सहजें प्रकाशें । तैसा हा ज्ञानयोगु गुरुकृपा रे दिसे । अज्ञान निरसूनियां ज्ञान पै समरसें ॥ २२ ॥ अव्यक्त तिहीं लोकींचें तुजमाजी रे असे । त्रैलोक्य जयामाजि तै तुज पै दिसे । अविनाशपद होसी मग अज्ञान नासे । तुजमाजि अमूर्त रे आपेआप प्रकाशे ॥ २३ ॥ अव्यक्त अगोचर तुज होईल निरंतर । इंद्रियें स्थिर होतीं हे तुझे अंकुर । अविनाशपद होसी मग नाहीं येरझार । अष्ट महासिद्धि जया वोळगति तुझें द्वार ॥ २४ ॥ ऋद्धिसिद्धी मायासिद्धि यासि दिधली । तुर्याचिया उपरि रे ज्ञान उन्मनी देखिली । आशापाश सबळ माया जीवबुद्धि निमाली । गर्भवास चुकला रे कैसी बुद्धि स्फुरली ॥ २५ ॥ संतोषानि कृपादृष्टि पैं लाधावेला । आत्मतत्त्व बोधु तुज प्रकाशु रे झाला । समरसीं सोहं सिद्धि प्रबोधु निमाला । निवृत्ति प्रसादें रे ज्ञानदेवो बोलिला ॥ २६ ॥

## एकादशीचे अभंग

३७७. एकादशीस अन्नपान । जे नर करिती भोजन । श्वानविष्ठेसमान । अधम जन ते एका ॥ १ ॥ ऐका व्रताचें माहिमान । नेमें आचरती जन । गाती ऐकती हरिकीर्तन । ते समान विष्णुसीं ॥ २ ॥ अशुद्ध विटाळशीचे खेळ । विडा भक्षितां तांबूल । सांपडे सबळ । काळाहातीं न सुटे ॥ ३ ॥ सेज बाज विलास भोग । करिती कामिनीचा संग । तया जोडे क्षयरोग । जन्मव्याधी बळिवंत ॥ ४ ॥ आपण नवजे हरिकीर्तना । आणिकां वारी जातां कोणा । त्याच्या पापें जाणा । ठेंगणा तो महामेरु ॥ ५ ॥ दंडी यमदूत । झाले तयाचे अंकित । तुका म्हणे व्रत । एकादशी चुकलिया ॥ ६ ॥

३७८. पंधरा दिवसां एक एकादशी । कां रे न करिसी व्रतसार ॥ १ ॥ काय तुझा जीव जातो एका दिसें । फराळाच्या मिसें धणी घेसी ॥ २ ॥ स्वहित कारण मानवेल जन । हरि-कथा पूजन वैष्णवांचे ॥ ३ ॥ थोडे तुज घरीं होती उजगरे । देउळासी कां रे मरसी जातां ॥ ४ ॥ तुका म्हणे कां रे सकुमार झालासी । काय जाब देसी यमदुतां ॥ ५ ॥

## द्वादशीचे अभंग

३७९. शरण शरण एकनाथा । पायी माथा ठेविला ॥ १ ॥ नका पाहूं गुण दोष । झालों दास पायांचा ॥ २ ॥ आतां उपे-क्षितां मज । तरी ते लाज कवणासी ॥ ३ ॥ तुका म्हणे भागवत । केलें श्रुत सकळां ॥ ४ ॥

३८०. संत जाती हरिकीर्तना । त्यांच्या वाहीन मोचे वाहाणा ॥ १ ॥ हेंचि भवसिंधूचें तारूं । तेणें उतरूं पैलपारू ॥ २ ॥ जन्मोजन्मींचें भेषज । ते हे संतचरणरज ॥ ३ ॥ संतचरणींच्या पादुका । झाला जनार्दन एका ॥ ४ ॥

३८१. गातो एका ध्यातों एका । अंतरबाहीं पाहातों एका ॥ १ ॥ अगुणी एका सगुणी एका । गुणातीत पाहातों एका ॥ २ ॥ जनीं एका वनीं एका । निरंजनीं देखों एका ॥ ३ ॥ संतजना पढिये एका । जनार्दना कडिये एका ॥ ४ ॥

३८२. करूनी आइतें सत्यभामा मंदिरीं । वाट पाहे तों टळोनी गेली रात्रीं । न येतां देव येती काम लहरी । पडिली दुश्चिती तंव तो कवाड टिमकारी वो ॥ १ ॥ सर परता कळला तुझा भाव । कार्यापुरतें दाविसी लाघव । बोलतोसी ते अवघी तुझी माव । जाणोनि आलासी उजाडता समयो रे ॥ २ ॥

मीच वेडी तुजलागीं बोल नाहीं । दानावेळें विटंबना झाली काई । मागुती रुद्रासी भेटी दिली तई । विश्वास तो तुझ्या बोला अझुनि तरी नाहीं रें ॥ ३ ॥ भ्रम होता तो अवघा कळों आला । मानवत होतें मी भला भला । नष्ट क्रिया नाहीं मा तुझिया बोला । तुकयाबंधुस्वामी कानडया कौसल्या ॥ ४ ॥

३८३. उंच नीच कांहीं नेणें भगवंत। तिष्ठे भाव भक्त देखोनियां ॥१॥ दासीपुत्र कण्या विदुराच्या भक्षी । दैत्यांदरीं रक्षी प्रल्हादासी ॥२॥ चर्म रंगूं लागे रोहिदासासंगें । कबीराचे मागें शेले विणी ॥३॥ सजन कसाया विकूं लागे मांस । माळ्या सांवत्यास खुरपूं लागे ॥४॥ नरहरी सोनारा घडूं फुंकूं लागे। चोखामेळ्यासंगें ढोरे ओढी ॥५॥ नामयाचे जनीसवें वेचीं शेणी । धर्माघरीं पाणी वाहे झाडी ॥ ६ ॥ नाम्यासवें जेवी नव्हे संकोचित । ज्ञानियाची भिंत अंगी ओढी ॥७॥ गौळियाचे घरीं अंगें गाई वळी । द्वारपाळ बळीद्वारीं झाला ॥८॥ अर्जुनाचे रथीं होय हा सारथी । भक्षी पोहे प्रीतीं सुदाम्याचे ॥ ९ ॥ यंकोबाचें ऋण फेडी ऋषीकेशी । अंबऋषीचे सोसी गर्भवास ॥ १० ॥ मीराबाईसाठीं घेतो विष प्याला । दामाजीचा झाला पाडेवार ॥११॥ घडी माती वाहे गोऱ्या कुंभाराची । हुंडी त्या मेहत्याची अंगें भरी ॥ १२ ॥ पुंडलीकासाठीं अझुनी तिष्ठत । तुका म्हणे मात धन्य त्याची ॥१३॥

३८४. श्रवणें कीर्तनें झाले ते पावन । सनकादिक जाण परमभक्त ॥ १ ॥ झाली ते विश्रांति याचकां सकळां । जीवीं जीवनकळा श्रीमूर्ति रया ॥२॥ पादसेवनें अक्रूर झाला ब्रह्मरूप । प्रत्यक्ष स्वरूप गोविंदाचे ॥३॥ सख्यपणें अर्जुन नरनारायण ।

२५३२ २४७१ २३/१०/८५

सृष्टी जनार्दन एकरूप ॥४॥ दास्यत्व निकट हनुमंतें पैं केलें । म्हणोनि देखिले रामचरण ॥५॥ बळी आणि भीष्म आणि प्रल्हाद नारद । बिभीषण वरद चंद्रार्क ॥ ६ ॥ व्यास आणि वशिष्ठ वाल्मीकादिक । आणिक पुंडलिक शिरोमणी ॥ ७ ॥ शुकादिक योगी रंगले श्रीरंगीं । परीक्षितीच्या अंगीं ठसावलें ॥८॥ उद्धव यादव आणि ते गोपाळ । गोपिकांचा मेळा ब्रह्मरूप ॥ ९ ॥ अनंत भक्तराशी तरले वानर । ज्ञानदेवा घर चिदानंदीं ॥१०॥

३८५. अंगीकार ज्यांचा केला नारायणें । निंद्य तेही तेणें वंद्य केले ॥ १ ॥ अजामेळ भिल्ली तारिली कुंटणी । प्रत्यक्ष पुराणीं वंद्य केली ॥ २ ॥ ब्रह्महत्या राशी पातकें अपार । वाल्मीक किंकर वंद्य केला ॥३॥ तुका म्हणे येथे भजन प्रमाण । काय थोरपण जाळावें तें ॥ ४ ॥

३८६. स्मरतां निवृत्ति पावलों विश्रांती । संसाराची शांती झाली माझ्या ॥१॥ नामिता ज्ञानदेवा पावलों विसावा । अंतरींचा हेवा विसरलों ॥ २ ॥ सुखाचा निधान तो माझा सोपान । विश्रांतीचें स्थान मुक्ताबाई ॥ ३ ॥ चांगदेव माझा आनंदाचा तारूं । सुखाचा सागरु वटेश्वर ॥ ४ ॥ सुखाचा सागर विसोबा खेचर । नरहरि सोनार प्राण माझा ॥ ५ ॥ आठवितां नाम पावलों विश्रामा । मोक्षमार्गी आम्हां वाट झाली ॥ ६ ॥ परिसा भागवत जीवा आवडता । गोरा आणि सांवता सखे माझे ॥७॥ जन जसवंत सुरदास संत । नित्य प्रणि-पात वैष्णवासीं ॥ ८ ॥ वंदूं भानुदास वैष्णवांचे कुळीं । ज्यासी वनमाळी मागें पुढें ॥ ९ ॥ बाळपणी जेणें भानु आराधिला ।

वंश निरविला देवराया ॥ १० ॥ धन्य त्याचा वंश धन्य त्याचें कुळ । परब्रह्म केवळ त्याचे वंशीं ॥ ११ ॥ एका जनार्दनीं संतांचें स्तवन । जनीं जनार्दन नमियेला ॥ १२ ॥

३८७. पंढरीये माझें माहेर साजणी । ओविया कांडणी गाऊं गीती ॥ १ ॥ राही रखुमाई सत्यभामा माता । पांडुरंग पिता माहियेर ॥ २ ॥ उद्धव अक्रूर व्यास अंबऋषि । भाई नारदासी गौरवीन ॥३॥ गरुड बंधु लाडिवाळ पुंडालीक । यांचे कवतुक वाटे मज ॥ ४ ॥ मज बहुत गोत संत आणि महंत । नित्य आठवित ओवियेसी ॥ ५ ॥ निवृत्ति ज्ञानदेव सोपान चांगया । जिवलगा माझिया नामदेवा ॥६॥ नागो जागामित्रा नरहरि सोनार । रोहिदास कबीरा सोयरीया ॥ ७ ॥ परिसा भागवत सूरदास सांवता । गाईन नेणता सकळीकांसीं ॥ ८ ॥ चोखा मेळा संत जिवाचे सोयरे । न पडे विसर यांचा घडी ॥ ९ ॥ जीवींच्या जीवना एका जनार्दना । पाठक हा कान्हा मीराबाई ॥ १० ॥ आणिकही संत महानुभव मुनी । सकळां चरणीं जीव माझा ॥ ११ ॥ आनंदें ओविया गाईन मी त्यांसी । जाती पंढरीसी वारकरी ॥ १२ ॥ तुका म्हणे बळिया मायबाप । हर्षे नांदे सये घराचारी ॥ १३ ॥

३८८. निवृत्ति शोभे मुगुटकार । ज्ञान सोपान वटेश्वर ॥ १ ॥ विठ्ठ पंढरीचे राणे । ल्याले भक्तांचीं भूषणें ॥ २ ॥ खेचर विसा जगामित्र नागा । कुंडलें जोडा विठोबा जोगा ॥३॥ बहु शोभे बहुवाट । गोरा सांवता दिकूपाट ॥ ४ ॥ कंठीं जाणा एक विंद । तो हा जोगा परमानंद ॥ ५ ॥ गळां शोभे वैजयंती । तिसी मुक्ताई म्हणती ॥६॥ अखंड शोभे माझ्या बापा ।

पदकीं शोभे नामा शिंपा ॥ ७ ॥ कटीसूत्र कटावरी तो हा सोनार नरहरि ॥८॥ कांसे कसिला पितांबर। तो हा जाणावा कबीर ॥ ९ ॥ जानू जघन सरळ । ते हे कान्होपात्रा विशाळ ॥ १० ॥ दंतपंक्ति झळाळ । तो हा कान्हया रसाळ ॥ ११ ॥ चरणींच्या क्षुद्र घंटा । नामयाचा नारा विठा ॥ १२ ॥ वामचरणींचा तोडर। परिसा रुळतो किंकर ॥ १३ ॥ चरणीं वीट निर्मळ । तो हा झाला चोखामेळ ॥ १४ ॥ चरणातळील उर्ध्वरेखा । झाला जनार्दन एका ॥ १५ ॥

३८९. पुण्यवंत व्हावें । घेतां सज्जनांचीं नांवें ॥ १ ॥ नेघे माझी वाचा तुटी । महालाभ फुकासाठीं ॥ २ ॥ विश्रांतीचा ठाव । पायीं संतांचिया भाव ॥ ३ ॥ तुका म्हणे पापें । जाती संतांचिया जपें ॥ ४ ॥

३९०. रत्नजडित सिंहासन । वरी बैसले आपण ॥ १ ॥ कुंचे ढळती दोन्हीं बाहीं । जवळीं रखुमाई राही ॥ २ ॥ नाना उपचारीं सिद्धि वोळगती कामारी ॥ ३ ॥ हातीं घेऊनि पादुका। उभा बंदिजन तुका ॥ ४ ॥

३९१. झाले ज्ञानेश्वर वाणी । आले सामुग्री घेऊनी ॥ १ ॥ पर्वकाळ द्वादशी । दिली सामुग्री आम्हांसी ॥ २ ॥ ज्ञानदेवाचे चरणीं । शरण एका जनार्दनीं ॥ ३ ॥

३९२. उठोनि प्रातःकाळीं ओढितां कांचोळी । जातो वेळोवेळीं महाद्वारीं ॥ १ ॥ अहो जी दातारा विनंती अवधारा । तुम्हीं यावें घरा भोजनासी ॥ २ ॥ रखुमाईमातें तुम्हीं यावें तेथें । सामुग्री सांगातें चालवावी ॥ ३ ॥ सडा संमार्जन हें माझें करणें । उदक भरीन सुगंधसीं ॥ ४ ॥ शेष

पत्रावळी काढीन उष्टावळीं । नित्य वेळोवेळीं हेंचि काम ।। ५ ।। नामा म्हणे देवा तुमचे तुम्ही जेवा । प्रसाद तो ठेवा सेवकासी ।। ६ ।।

## क्षीरापतींचे अभंग

३९३. क्षीसागरींचें नावडे सुख । क्षीरापती देखे देव आला ।। १ ।। कवळ कवळ पाहा हो । मुख पसरूनि धांवतो देवो ।। २ ।। एकादशी देव जागरा आला । क्षीरापतीलागीं टोकत ठेला ।। ३ ।। द्वादशी क्षीरापती ऐकोनि गोष्टी । आवडीं देव दतसे मिठी ।।४।। क्षीरापती घालितां वैष्णवां मुखीं । तेणें मुखें देव होतसे सुखी ।। ५ ।। क्षीरापती सेवितां आनंदु । स्वानंदें भुलला नाचे गोविंदु ।। ६ ।। क्षीरापती सेवितां वैष्णवा लाहो । मुखामाजी मुख घालितो देवो ।। ७ ।। क्षीरापती चारा जनार्दनमुखीं । एका एकीं तेणें होतसे सुखी ।। ८ ।।

३९४. पाहे प्रसादाची वाट । द्यावें धुवोनियां ताट ।। १ ।। शेष घेऊनी जाईन । तुमचें झालिया भोजन ।। २ ।। झालों एकसवा । तुम्हां आळवोनी देवा ।। ३ ।। तुका म्हणे चित्त । करूनि राहिलों निवांत ।। ४ ।।

३९५. पावला प्रसाद आतां विठो निजावें । आपुलाले श्रम कळों येताती भावें ।। १ ।। आतां स्वामी सखे निद्रा करा गोपाळा । पुरले मनोरथ जातों आपुल्या स्थळा ।।२।। तुम्हांसी जागवूं आम्हीं आपुलिया चाडा । शुभाशुभ कर्मे दोष हराया पीडा ।। ३ ।। तुका म्हणे दिलें उच्छिष्टाचें भोजन । नाहीं निवडिलें आम्हां आपुलिया भिन्न ।। ४ ।।

## काल्याचे अभंग

३९६. ये दशे चरित्र केलें नारायणें । रांगतां गोधनें राखिताहे ॥ १ ॥ हें सोंग सारिलें या रूपें अनंतें । पुढेंहि बहुत करणें आहे ॥ २ ॥ आहे तुका धर्मसंस्थापनें । केला नारायणें अवतार ॥ ३ ॥

३९७. मेळवुनि सगळे गोपाळ । कांहीं करितो विचार ॥१॥ चला जाऊं चोरूं लोणी । आजि घेऊं चंद्रधणी ॥२॥ वेळे लावियेला अझुनी । एका करितां गडे हो ॥३॥ वाट काढिली गोविंदीं । मागें गोपाळांची मांदी ॥ ४ ॥ अवघाचि बावरे । कळों नेदी कोणा फिरे ॥५॥ घर पाहोनि एकांताचें । नवाविधा नवनीताचें ॥ ६ ॥ रिघे आपण भीतरीं । पुरवी माथुलिच्या हरी ॥ ७ ॥ बोलों नेदी म्हणे स्थिर । खुणा दावी खा रे क्षीर ॥ ८ ॥ जोगावल्यावरी । तुका करितो चाकरी ॥ ९ ॥

३९८. याल तर या रे लागें । अवघे माझ्या मागें मागें ॥ १ ॥ आजि देतों पोटभरी । पुरे म्हणाल तोंवरी ॥ २ ॥ हळूं हळूं चला । कोणी कोणाशीं न बोला ॥ ३ ॥ तुका म्हणे सांडा धाट । तेणें नका भरूं पोटें ॥ ४ ॥

३९९. शिंकें लावियेलें दुरी । होतों तिघांचे मी वरी ॥ १ ॥ तुम्ही व्हा रे दोहींकडे । मुख पसरूनी गडे ॥ २ ॥ नाहाती त्या धारा । घ्या रे दोहींच्या कोंपरा ॥ ३ ॥ तुका म्हणे हातीं टोका । अधिक उणें नेदी एका ॥ ४ ॥

४००. पळाले ते भ्याड । त्यांसी येथें झाला नाड ॥ १ ॥ धीट घेती धणीवरी । शिंकीं उतरितो हरी ॥ २ ॥ आपुलिया

भ्रती । पडली विचारांती रितीं ॥ ३ ॥ तुका लागे घ्या रे पायां । कैं पावाल या ठाया ॥ ४ ॥

४०१. घालें मन पोट । केला गड्यांनीं बोभाट ॥ १ ॥ ये रे ये रे नारायणा । बोलों अबोलण्या खुणा ॥ २ ॥ खांद्यावरी भार । ती शिणती बहु फार ॥ ३ ॥ तुकयाच्या दातारें । नेलीं सुखीं केली पोरें ॥ ४ ॥

४०२. पाहाती गौळणी । तंव पालथीं दुधाणीं ॥ १ ॥ म्हणती नंदाचिये पोरें । आजि चोरी केली खरें ॥ २ ॥ त्याविण हे नासी । नव्हे दुसरीया ऐसी ॥ ३ ॥ सवें तुका मेला । त्यानें अगुणा आणिला ॥ ४ ॥

४०३. आतां ऐसें करूं । दोघां धरूनिया मारूं ॥ १ ॥ मग टाकिती हे खोडी । तोंडीं लागलीसे गोडी ॥ २ ॥ कोंडूं घरामधीं । न बोलोनीं जागो बुद्धी ॥ ३ ॥ बोलाविती देवा । तुका गडियांचा मेळावा ॥ ४ ॥

४०४. चला वळूं गाई । बैसों जेऊं एके ठायीं ॥ १ ॥ बहु केली वणवण । पायपिटी झाला सीण ॥ २ ॥ खांदीं भार पोटीं भूक । काय खेळायाचें सुख ॥ ३ ॥ तुका म्हणे धांवें । मग अवघे बरवें ॥ ४ ॥

४०५. अवघ्या सोडियेल्या मोटा । आजिचा दहींकाला सोमटा ॥ १ ॥ घ्या रे घ्या रे दहींभात । आम्हां देतो पंढरी-नाथ ॥ २ ॥ मुदा घेऊनियां करीं । पेंधा वाटितो शिदोरी ॥ ३ ॥ भानुदास गीतीं गात । प्रसाद देतो पंढरीनाथ ॥ ४ ॥

४०६. घ्या रे भोकरे भाकरी । दहीभाताची शिदोरी । ताक सांडा दुरी । असेल तें तयापें ॥ १ ॥ येथें घ्यावें तैसें द्यावें । थोडें परी निरें व्हावें । सांगतों रे ठावें । असो द्या रे

सकळां ॥ २ ॥ माझें आहे तैसें पाहे । नाहीं तरी घरा जाये । चोरोनियां माये । नवनीत आणावें ॥ ३ ॥ तुका म्हणे घरीं । माझे कोणीं नाहीं हरी । नका करूं दुरी । मज पायां वेगळे ॥ ४ ॥

४०७. काल्याचिये आसे । देव जळीं झाले मासे । पुसोनियां हांसे । टिरीसांगातें हात ॥ १ ॥ लाजे त्यासी वांटा नाहीं । जाणें अंतरींचें तेही । दान होतां कांहीं । होऊं नेदी वेगळे ॥ २ ॥ उपाय अपाय यापुढें खोटें निवडितां कुडे । जोडूनियां पुढें । हात उभे नुपेक्षी ॥ ३ ॥ तें घ्या रे सावकाशें । जया फावेल तो तैसें । तुका म्हणे रसें । प्रेमाचिया आनंदें ॥४॥

४०८. आजि ओस अमरावती । काला पाहावया येती । देह विसरती । देहभाव आपुला ॥ १ ॥ आनंद न समाये मेदिनी । चारा विसरल्या पाणी । तटस्थ त्या ध्यानीं । गाई झाल्या श्वापदें ॥ २ ॥ जे या देवांचें दैवत । उभे आहे या रंगांत । गोपाळांसहित । क्रीडा करी कान्होबा ॥ ३ ॥ तया सुखाची शिराणी । तीच पाऊलें मेदिनी । तुका म्हणे मुनी । धुंडितां न लभती ॥ ४ ॥

४०९. चला बाई पांडुरंगा पाहू वाळवंटीं । मांडियेला काला भोंवती गोपाळांची दाटी ॥ १ ॥ आनंदे कवळ देती एका मुखीं एक । न म्हणती सान थोर अवघीं सकळीक ॥ २ ॥ हमामा हुंबरी पांवा वाजविती मोहरी । घेतलासे फेर माजी घालूनियां हरी ॥ ३ ॥ लुब्धल्या नारी नर अवघ्या पशुयाती । विसरली देहभाव शंका नाहीं चित्ती ॥ ४ ॥ पुष्पांचा वर्षाव झाली आरतियांची दाटी । तुळसी गुंफोनिया माळा घालतील कंठी ॥ ५ ॥ यादवांचा राणा गोपी मनोहर कान्हा । तुका म्हणे सुख वाटे देखोनियां मना ॥ ६ ॥

४१०. कंठीं धरिला कृष्णमणी । अवघा जनीं प्रकाश ।।१।। काला वांटूं एकमेकां । वैष्णवा निका संभ्रम ।। २ ।। वाकुलिया ब्रह्मादिकां । उत्तम लोकां दाखवूं ।। ३ ।। तुका म्हणे भूमंडळीं । आम्ही बळीं वीर गाढे ।। ४ ।।

४११. उपजोनियां पुढतीं येऊं । काला खाऊं दहीभात ।। १ ।। वैकुंठीं तो ऐसें नाहीं । कवळ कांहीं काल्याचे ।। २ ।। एकमेकां देऊं मुखीं । सुखी घालूं हुंबरी ।। ३ ।। तुका म्हणे वाळवंट । बरवें नीट उत्तम ।। ४ ।।

४१२. आतां जेऊं हेंचि जेऊं । सवें घेऊं सिदोरी ।। १ ।। हरिनामाचा खिचडी काला । प्रेमें मोहिला साधनें ।। २ ।। चवीं चवीं घेऊं घास । ब्रह्मरस आवडी ।। ३ ।। तुका म्हणे गोड लागे । तों तों मागे रसना ।। ४ ।।

४१३. चुराचुराकर माखन खाया । गौलनका नंद कुंवर कन्हैया ।। १ ।। काहे बराई दिखावत मोही । जानतहुं प्रभुपना तेरा सबही ।। २ ।। और बात सुन उखलसुगला । बांधलिया आपना तूं गोपाला ।। ३ ।। फेरत बन बन गाऊं धरावत । कहे तुकयाबंधु लकरी ले ले हात ।। ४ ।।

## निवडक अभंग

४१४. शकळ मंगळानिधी । श्रीविठ्ठलाचे नाम आधी ।।१।। म्हणा कां रे म्हणा कां रे जना । श्रीविठ्ठलाचें नाम वाचे ।। २ ।। पतीतपावन साचें । श्रीविठ्ठलाचें नाम वाचें ।। ३ ।। बापरखुमादेविवरु साचें । श्रीविठ्ठलाचें नाम वाचें ।। ४ ।।

४१५. आरंभीं आवडी आदरें आलें नाम । तेणें सकळ सिद्धि जगीं झालें पूर्णकाम ॥ १ ॥ रामकृष्ण गोविंद गोपाळा । तूं माय माउली जीवांचा जिव्हाळा ॥ २ ॥ तुझियेनि नामें सकळ संदेह फिटला । बापरखुमादेविवरा श्रीविठ्ठला ॥ ३ ॥

४१६. दोहीं बाहीं संतांची सभा । सिंहासनीं उभा श्रीविठ्ठल ॥ १ ॥ गाती नारद तुंबर प्रेमें । हरीचीं नामें गर्जती ॥ २ ॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु उभा । त्रैलोक्याची शोभा शोभतसे ॥ ३ ॥

४१७. पन्नास अक्षरीं करिसी भरोवरी । शेखीं तुझें तोंड तुज वैरी रया ॥ १ ॥ यापरी नामाची बोढ मांडुनी । दवडूनी घालीं परता ॥२॥ रकारापुढें एक मकार मांडीं कां । उतरसी सम तुका शंभूचिया ॥ ३ ॥ बापरखुमादेविवरा विठ्ठलु हृदयीं । आपुली आण बाहीं त्रिभुवनीं रया ॥ ४ ॥

४१८ गाते श्रोते आणि पाहाते । चतुर विनोदी दुश्चिते । सोहंभावी पूर्ण ज्ञाते । या सकळातें विनवणी ॥ १ ॥ करा विठ्ठल-स्मरण । नामरूपीं अनुसंधान । जाणोनि भक्तां भवलक्षण । जघनप्रमाण दाविती ॥२॥ पुंडलीकाच्या भावार्था । गोकुळींहुनि घाला येता । निजप्रेमभाक्ति भक्तां । घ्या घ्या आतां म्हणतसे ॥ ३ ॥ मी माझें आणि तुझें । न धरीं टाकीं परतें ओझें । भावबळें फळतीं बीजें । बापरखुमादेविवरु विठ्ठलीं ॥ ४ ॥

४१९. परिमळाची धांव भ्रमर ओढी । तैसी तुझी गोडी लागो मज ॥ १ ॥ अविट गे माय विटेना । जवळीच आहे

परि भेटेना ॥ २ ॥ तृषा लागलिया जीवनातें ओढी । तैसी तुझी गोडी लागो या जीवा ॥ ३ ॥ बापरखुमादेविवरा विठ्ठलीं आवडी । गोडियेसी मिळोनि गेली ॥ ४ ॥

४२०. दीप दीपिका शशी तारा होतुका कोटीवरी रे । परि नसरे निशि नुगवे दिवसु दिनकरनाथें जयापरी रे ॥१॥ नुद्धरिजे नुद्धरिजे गोपाळेंविण नुद्धरिजे ॥२॥ नगर भ्रमतां जन्म जावो परि प्रवेशु एक्या द्वारें रे । तैसे याजिजो भजिजो पूजिजो परि उकलु नंदाकमरु रें ॥ ३ ॥ सर्वावयवीं शरीर सांग परि विरहित एका जीवें रे । तैसा धिक् तो श्रोता धिक् तो वक्ता जो वाळिला विठ्ठलदेवें रे ॥४॥ गळित शिर हें कलेवर रे उदकेंविण सरिता भयंकर रे । रविशशिवीण अंबर तैसें हरिविण जिणें तें असार रे ॥ ५ ॥ अंतःकरणीं रुक्मिणीरमणु परि त्या श्वपचाहि बंधन न घडे न घडे न घडे रे । येरु यति हो कां भलतैसा परि तो भवाग्निहूनि न सुटे न सुटे रे ॥ ६ ॥ शिखीपक्षी पत्रीं डोळे जेविं अबाळ जळद पटल रे । तैसीं गोकुळपाळकबाळविणें कर्मे सकळ विफळ रे ॥ ७ ॥ यम नियम प्राणायाम प्रत्याहार हे सकळ उपाय परि अपाय रे । जंव तमालनील घनःसावळा हृदयीं ठाण मांडूनि न राहे रे ॥ ८ ॥ मी उत्तम पैल हीनु भूतीं द्वेषाद्वेष ठेले रे । केलेनि कर्में उफरवां निपजे सुख तें दुरी ठेलें रे ॥ ९ ॥ आतां असोत हे भेदाभेद आम्ही असों एक्या बोधें रे । बापरखुमादेविवरु विठ्ठल निवृत्ती मुनिराया प्रसादें रे ॥१०॥

४२१. आनंदले वैष्णव गर्जती नामें । चौदाही भुवनें भरली परब्रह्में ॥१॥ नरहरि नरहरि नारायणा । सनकसनंदनमुनिजन

वंदना ॥ २ ॥ गातां वातां नाचतां प्रेमे उल्हासें । चरचरींचे दोष नाशियले अनायासें ॥३॥ हरि मना हरि चित्ती हरि अंकु शरीरीं । तयाते देखोनि हरि चान्ही बाह्या पसरीं ॥४॥ आंघ्रिरेणु ज्याच्या उद्धारितो पतिता । प्राकृतवाणी केवि वानूं हरिभक्तां ॥५॥ तीर्थे पावन जिहीं धर्म केला धडौती । कैवल्य-कल्पद्रुम ते त्रिजगतीं ॥६॥ मत्स्यकूर्मादिक ज्याचे महिमेसी आले । धन्य वैष्णव तेज रविशशिसी पाहाले ॥७॥ बापरखुमा-देविवरा पठयंती जिया तनु । तया संतचरणीं स्थिर हो कां मनु ॥८॥

४२२. संत भेटती आजि मज । तेणें मी झालों चतुर्भुज । दोन्ही भुजा स्थूळीं सहज । दोन्ही सूक्ष्मी वाढल्या ॥ १ ॥ आलिंगन सुख वाटे। प्रेम चिदानंदीं घोटें । हर्षे ब्रह्मांड उतटे । समूळ उठे मीपण ॥२॥ या संतांसी भेटतां । हरे संसाराची व्यथा । पुढतां पुढती माथा । अखंडित ठेवीन ॥३॥ या संतांचें देणें कल्पतरुहूनि दुणें । परिसा परीस अगाध देणें । चिंतामणी ठेंगणा ॥ ४ ॥ या संतांपरीस उदार । त्रिभुवनीं नाहीं थोर मायबाप सहोदर । इष्टमित्र सोईरे ॥५॥ कृपाकटाक्षें न्याहाळिलें । आपुले पदीं बैसविलें । बापरखुमादेविवरें विठ्ठलें । भक्तां दिधलें वरदान ॥ ६ ॥

४२३. अकार उकार मकार करिती हा विचार । परि विठ्ठल अपरंपार न कळे रया ॥ १ ॥ संतांचें संगती प्रेमाचा कल्लोळ । आनंदें गोपाळ माजी खेळे ॥ २ ॥ भाळे भोळे भक्त गाताती सावडे त्यांचें प्रेम आवडे । विठोबासी ॥३॥ बापरखुमा देविवरु परब्रह्म पुतळा । तेथील हे कळा निवृत्ति जाणें ॥ ४ ॥

४२४. पूर्वजन्मीं सुकृतें थोर केलीं । तीं मज आजि फळासि आलीं ॥१॥ परमानंदु आजि मानसीं । भेटी झाली या संतांसीं ॥२॥ मायबाप बंधु सखे सोयरे । यांतें भेटावया मन न धरे ॥३॥ एकएका तीर्थाहूनी आगळें । तयामाजी परब्रह्म सांवळें ॥४॥ निर्धनामी धनलाभु झाला । जैसा अचेतनीं प्राण प्रगटला ॥५॥ वत्स विघडलिया धेनु भेटली । जैसी कुरंगिणी पाडसा मीनली ॥ ६ ॥ हें पियुषापरतें गोड वाटत । पंढरीरायाचे भक्त भेटत ॥७॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलें । संत भेटतां भवदुःख फिटलें ॥८॥

४२५. उंच पताका झळकती । टाळ मृदुंग वाजती । आनंदे प्रेमें गर्जती । भद्र जाती विठ्ठलाचे ॥१॥ आले हरिचे विनट । वीर विठ्ठलाचे सुभट । भेणें जाहले दिप्पट । पळती थाट दोषांचे ॥२॥ तुळसीमाळा शोभती कंठीं । गोपीचंदनाच्या उटी । सहस्र विघ्नें लक्ष कोटी । बारा वाटा पळताती ॥३॥ सतत कृष्णमूर्ति सांवळी । खेळे हृदयकमळीं । शांतिक्षमा तया जवळीं । जीवें भावें अनुसरल्या ॥४॥ सहस्र नामाचें हतियार । शंखचक्राचें शृंगार । अति बळ वैराग्याचें थोर । केला मार षड्वर्गा ॥ ५ ॥ ऐसे एकांग वीर । विठ्ठल रायाचे डिंगर । बापरखुमादेविवर । तिहीं निर्धारीं जोडिला ॥६॥

४२६. कुंचे पताकांचे भार आले वैष्णव डिंगर । भेणें पळती यमकिंकर । नामें अंबर गर्जतसे ॥१॥ आले हरिदासांचें थाट । कळिकाळा नाहीं वाट । विठ्ठलनामें करिती बोभाट । भक्ता वाट सापडली ॥२॥ टाळ घाळ चिपळिया नाद । दिंडी पताका

मकरंद । नाना बागडियाचें छंद । कवच अभेद नामाचें ॥३॥ वैष्णव चालिले गर्जत । महावीर ते अद्भूत । पुढें यमदूत पळत । परला अंत महादोषा ॥४॥ निवृत्ति संत हा सोपान । महावैष्णव कठीण । मुक्ताबाई तेथें आपण । नारायण जपतसे ॥५॥ ज्ञानदेव वैष्णव मोठा । विठ्ठलनामें मुक्तपेठा । स्नान दान घडे श्रेष्ठा । वैकुंठवाटा संत गेले ॥६॥

४२७. काय करिसी सकळ देवांचे वैभव विलास । माझिया स्वामीविण ते अवघे उद्वस रया ।१।। तपन त्या कमळा कमळीं विकासु । सुकवी मयंकु काय करिसी सुधांशु ॥ २ ॥ सातांहि वारांचे दिवसु एकियाचि सुरिजे । तैसें सर्वी सर्वपण माजीयें न श्रीराजे ॥३॥ सर्वज्ञ सुंदर देव होतुकां भलतैसे । परि जडातें चेष्टविते आणिकां पैं नसे ।४॥ जया नांव नाहीं रूप चिन्ह कांहीं । नाम रूप चिन्ह स्वयेंचि पाहीं ॥५॥ बापरखुमादेवींवरु आहे तैसाचि पुरे । काय करिसी आणिकां देवांचीं गोवारें रया ॥ ६ ॥

४२८. रुणुझुणु रुणुझुणु रें भ्रमरा । सांडीं तूं अवगुणु रे भ्रमरा ॥१॥ चरण कमळदळु रे भ्रमरा । भोगीं तूं निश्चळु रे भ्रमरा ॥२॥ सुमन सुगंधु रे भोंवरा । परिमळ विद्गदु रे भोंवरा ॥३॥ सौभाग्य सुंदरु रे भ्रमरा । बापरखुमादेविवरु रे भ्रमरा ॥४॥

४२९. आकार स्थूळ नाशिवंत । हें तरी जाईल भूमिआंत । तयावरि हरि चालत । तेणें होईल कृतकृत्य ॥१॥ देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढ भावो ॥ २ ॥ दूजा गुण आपीं मिळे । तरी मी होईन गंगाजळ । हरि अभिषेक अनुदिनीं । सुखें सर्वांगावरी खेळे ॥३॥ तिजा गुण तेजरूप । तरि

मी होईन महादीप । हरि रंगणीं दीपमाळा । दीप उजळीन समीप ॥ ४ ॥ वायु व्यापक चौथा गुण । तरि मी विंजणा होईन । हरि अष्टांगें निववीन । ऐसा दृढ धरीन खुणा ॥ ५ ॥ आकाश पांचवा गुण । तरी मी आसादीं राहेन । बापरखुमा-देविवरा । अखंड तुझें अनुसंधान ॥ ६ ॥

४३०. निमिष नलगे मन वेधितां । येवढी तुझी स्वरूपता ॥१॥ विठोबा नेणे कैसी भेटी । उरणें नाहीं जिवेसाठीं ॥२॥ उरणें उपाधि कारणें । तें सर्व नेमिलें दर्शनें ॥ ३ ॥ निवृत्तिदास वेगळें । सांगवया नाहीं उरलें ॥ ४ ॥

४३१. पैल तो गे काऊ कोकताहे । शकुन गे माये सांगताहे ॥ १ ॥ उडरे उडरे काऊ तुझे सोन्याने मढविन पाऊ । पाहुणे पंढरीराऊ घरां कैं येती ॥ २ ॥ दहिंभाताची उंडी लावीन तुझ्या तोंडीं । जीवाचा्दिवे त्याची गोडी सांग वेगीं ॥ ३ ॥ दुधें भरूनी वाटी लावीन तुझे ओठीं । सत्य सांगे गोठी विठो येईल काई ॥ ४ ॥ आंबया डाहाळी फळें चुंबी रसाळीं । आजिचे रे काळीं शकुन सांगें ॥ ५ ॥ ज्ञानदेव म्हणे जाणिजे ये खुणे । भेटती पंढरी राणे शकुन सांगे ॥ ६ ॥

४३२. कान्होबा तुझी घोंगडी चांगली । आम्हांसी कां दिली वाकुळी रे ॥ ध्रु० ॥ स्वगत सच्चिदानंद मिळोनी शुद्धसत्त्व गुण विणली रे । षड्गुण गोंडे रत्नजडित तुज श्यामसुन्दरा शोभली रे ॥ १ ॥ काम कर्म अविद्या त्रिगुण पंचभूतांनीं विणली रे । रक्त रेत दुर्गंधी जंतु नरक मुताने भरली रे ॥ २ ॥ षड्विकार षड्वैरी मिळोनी तापत्रयानें विणली रे । नवा ठायीं फाटुनि गेली ती त्वां आम्हांसि दिधली रे ॥३॥ ऋषी मुनी ध्यातां मुनीं

नाम गातां संदेहवृत्ती विणली रे । बापरखुमादेविवरु विठ्ठलें त्वत्पदीं वृत्ति मुरली रे ॥ ४ ॥

४३३. यम नियम पाप पुण्य आम्हांसीं । आपण भलतें करिसी । तुझिया थोरपणा विहनि असावें कवणें शंकावें रायासी । प्रत्यक्ष जगीं बाटली नारी तिचें स्मरण लोकांसी । पुराणीं डांगोरा पिटिताती हें पतिव्रतापण तयेसी रया ॥ १ ॥ आवडे तें करिसी देवा कवण करी तुझा हेवा रे ॥ ध्रु० ॥ बहुता परी उणें ऐकिजे पांडवा सांगों या गोष्टी । पांचांपासुनि जन्मले पांचैजण एक पत्नीच्या पोटीं । गोत्र वधु करूनि राज्य करिती विश्वासी वंद्य शेवटीं । जन्मेजया ऐसें बोलिला सत्य तो पापिया झाला कुष्टी ॥२॥ प्राण जाई तंव बोभाइला तुज । पतन तया दशरथा । गणिका एक पाखिरू पोखिलें होतें पाचारिलें प्राण जातां । कीं तयेसी ऊर्ध्वगति ऐसीं बोलतीं पुराणें कासया न मिळे पाहतां । बोलणें खुंटलें तुजपासीं देवा वेव्हारु नाहीं सर्वथा ॥ ३ ॥ तपाचा जो राशी पुण्यपणें थोर । तीर्थरूप सर्वां तीर्थां मंत्राचा अवतार । देव आणि शक्ति सूर्य तैसा विचारितां । तो मांडव्य ऋषि वाहिला सुळीं एक ऊ जाला वाधिता । पुत्रा पाचारिलें पापिये दुर्जनें तो वैकुंठीं अजामेळू सरतारे रे ॥ ४ ॥ यज्ञमुखीं अवदानें देती त्या वारिसी वांकडें तोंड । लोणी चोरावया जासी घरोघरीं उघाडिसी त्यांचीं कवाडें । छप्पन्न कोटी यादव संगाति हे तुझे ते त्वां केले शापावरपडे । कोळियानें तुज विंधिलें पायीं त्यासी सायुज्यता कोडें रया ॥ ५ ॥ अष्टांगयोगें शरीर दंडिले तुजलागीं झालीं पिसीं । पुत्रदारा धन सांडुनिया जन हिंडताती वनवासी । गाती वाती पूजिती तूतें त्यांसी निजपद सायासीं । विष पाजूं आली

पूतना राक्षसी सायुज्यता देणें तियेसि रया ॥ ६ ॥ वारया मोट बांधेल कोण आकाशासि कुंप कायसा । सूर्यापुढें दिवा लाऊनियां चालणें वाउगाची शिण जैसा । विचित्र तुझें रूप अव्हेरून जासी सर्वेशा । ज्ञानदेव म्हणे देवाधिदेवा । जन भांबाविला ऐसा मावा रया ॥ ७ ॥

४३४. परियेसीं गव्हारा सादर । कर्मे निर्वंश झाले सगर । भिल्लें विंधिले शारंगधर । झाला पुरंदर सहस्रनयन ॥ १ ॥ कर्मे मन्मथ झालासे राख । कर्मे चंद्रासि घडला दोष । कर्मे भार वाहती कूर्म शेष । कर्मे खरमुख ब्रह्मा देखा ॥ २ ॥ कर्मे वासुकी लंके दिवटा । कर्मे हनुमंता उदरीं कांसोटा । कर्मे शुकदेव गर्भी कष्टा । पाताळ वाटा बळी गेला ॥३॥ कर्मे दशरथ वियोगें मेला । कर्मे श्रीराम वनवासा गेला । कर्मे रावण क्षयो पावला । वियोग घडला सीतादेवी ॥ ४ ॥ कर्मे दुर्योधनादि रणी नासले । कर्मे पांडव महापंथे गेले । कर्मे सिंधु जळ शोषिलें । नहुष झाला सर्प देखा ॥५॥ कर्मातें शंभु मानी आपण । किती पळसी कर्माभेण । बापरखुमादेविवरा विठ्ठला शरण । केली कर्मे निवारी नारायण ॥ ६ ॥

४३५. उपजोनि संसारीं आपुला आपण वैरी । मी माझें शरीरीं घेऊनि ठेला । या देहातें म्हणे मी पुत्र दारा धन माझें । परि काळाचें हें खाजें ऐसें नेणतु गेला ॥ १ ॥ कामक्रोधमद मत्सराचेनि गुणे । बांधला आपण नेणें भ्रमित जैसा । मिथ्या मोह फांसा शुक नळिके जैसा । मुक्त परि अपैसा पळों नेणे ॥ २ ॥ जळचरु आमिष गिळी जैसा का लागलासे गळीं । आपआपणापें तळमळी । सुटिका नाहीं तसें आरंभीं विषयसुख । गोड वाटे इंद्रियां ।

फळपाकीं पापिया दुःख भोगी ॥३॥ राखोंडी फुंकितां दीप नलगे जयापरी । तैसा शब्द ब्रह्मकुमारी ज्ञान न पवे । व्रत तप दान तीर्थ भजन वेंचिलें । पोटा दंभाच्या खटपटा सिणतु गेला ॥४॥ मृगजळाची नदी दुरूनी देखोनि धावे । परी गंगोदक न पवे तान्हेलां जैसा । तैसें विषयसुख नव्हेचि हित । दुःख भोगितो बहुत परि सावधान नव्हे ॥५॥ परतोनि न पाहें धांवतो सैरा । करितो येरझारा संसारींच्या । ज्ञानदेव म्हणे बहुतां जन्मांचा अभ्यासु । तरीच होय सौरसु परब्रह्मीं ॥ ६ ॥

४३६. नाम प्रल्हाद उच्चारी । तया सोडवी नरहरी । उचलुनि घेतला कडियेवरी । भक्त सुखें निवाला ॥ १ ॥ नाम बरवया बरवंट । नाम पवित्र आणि चोखट । नाम स्मरे नीळकंठ । निजसुखें निवाला ॥२॥ जें धुरुसी आठवलें । तेंचि उपमन्यें घोकिलें । तेंचि गजेंद्रा लाधलें । हित झालें तयाचें ॥३॥ नाम स्मरे अजामेळ । महापातकी चांडाळ । नामें झालासे सोज्ज्वळ । आपणांसहित निवाला ॥४॥ वाटपाडा कोळीकु । नाम स्मरे तो वाल्मीकु । नामें उद्धरिलें तिन्ही लोकु । आपणांसहित निवाला ॥ ५ ॥ ऐसे अनंत अपार । नामें तरलें चराचर । नाम पवित्र आणि परिकर । रखुमादेविवराचें ॥ ६ ॥

४३७. अंडज जारज स्वदज उद्भिज आटे । हरिनाम नाटे तें बरवें ॥ १ ॥ जें नाटे तें नाम चित्तीं । रखुमादेविपति श्रीविठ्ठलाचें ॥ २ ॥ शरीर आटे संपत्ति आटे । हरिनाम नाटे तें बरवें ॥ बापरखुमादेविवराचें नाम नाटें । युगें गेलीं परि उभा विटे ॥ ४ ॥

४३८. सोनयाचा दिवस आजि अमृतें पाहाला । नाम आठवितां रूपीं प्रगट पैं झाला ॥ १ ॥ गोपाळा रे तुझें ध्यान

सांगो मना । आनु न दिसे हरि जगज्जीवना ॥ २ ॥ हनुमंतु गरुड विनटलों तुझ्या पायीं । बापरखुमादेवीवरावांचुनि आन नेणें कांहीं ॥३॥

४३९. जें शंभूनें धरिलें मानसीं । तेंचि उपदेशिलें गिरिजेसी ॥१॥ नाम बरवें बरवें । निज मानसीं धरावें ॥ २ ॥ गंगोदकाहूनि निकें । गोडी अमृत झालें फिकें ॥ ३ ॥ शीतळ चंदनाहुनी बरतें । सुंदर सोनियाहुनि परतें ॥ ४ ॥ भुक्तिमुक्तिदायक । भवबंधन मोचक ॥५॥ बापरखुमादेवीवरें । सुलभ नाम दिधलें सोपारें ॥६॥

४४०. कर्म आणि धर्म आचरिजे जयालागीं । साधक शिणले साधन साधितां अभागी ॥१॥ गोड तुझें नाम विठोबा आवडतें मज । दुजें उच्चारितां मना येत असे लाज ॥ २ ॥ भुक्ति आणि मुक्ति नामापासीं प्रत्यक्ष । चाऱ्ही वेद साही शास्त्रें देताती साक्ष ॥३॥ काया वाचा चित्त चरणीं ठेविलें गहाण । बापरखुमादेविवरा विठ्ठलाची आण ॥४॥

४४१. अशौचिया जपो नये । आणिकातें ऐको नये । ऐसिया मंत्रातें जग बिहे । त्याचें फळ थोडें परि क्षोभणें बहु । ऐसा मंत्रराज नव्हे रे ॥ १ ॥ नारायण नाम नारायण नाम । नारायण नाम म्हणकारे रे ॥२॥ बाहय उभारावी त्यावरी काहाळ लावावी । गातिया ऐकातिया उणीव येवों नेदावी । उत्तमापासूनि अंत्यजवरी । मुक्तीची सेवा मागावीरे रे ॥ ३ ॥ काय कराल यागें न सिणावें योगें हे तों व्यसनचीं वाउगें । नरहरि नरहरि उदंड वाचा म्हणाल तरि कळिकाळ राहेल उगेरे रे ॥४॥ चरणीं गंगा जन्मली अहिल्या उद्धरली नामें प्रतिष्ठा पावली

गिरिजा । सकाळिकां साधना वरिष्ठ हे नाम मा मनीं भाव न धरीं दुजारे रे ॥५॥ तीर्थी भजिजाल अमरीं पूजिजाल तुम-चिया भावासारिखा देवा होईल । बापरखुमादेवीवरू विठ्ठलु तुमचा ऋणवै म्हणतां नलजरे रे ॥६॥

४४२. पांचासहित लयातीत झालिये वो । प्रेमभक्ति अनुसरलें काळ्या रूपासी ॥ १ ॥ ठायींचाचि काळा अनादि बहु काळा । म्हणोनि वेदा चाळा लाविला गे माये ॥ २ ॥ बाप रखुमादेविवरें जन्मावेगळें केलें । म्हणोनि भाज झालें बाईये वो ॥ ३ ॥

४४३. आपुलेनि भारें श्रीरंगी डोलत गेलें । तंव अवचितें पांचारिलें पाठिमोरें ॥१॥ चैतन्य चोरिलें माझें चैतन्य चोरलें । अवघें पारुपलें दीन देह ॥ २ ॥ बापरखुमादेविवरु दीनानाथ भेटला । विठ्ठलीं विठ्ठल झाला देह माझा ॥ ३ ॥

४४४. निरखित निरखित गेलिये । पाहे तंव तन्मय झालिये ॥१॥ उन्मनी मन निवालें । सावळें परब्रह्म भासलें ॥२॥ रूप येवोनियां डोळां बैसलें । पाहे तव परब्रह्म अवतरलें ॥ ३ ॥ बापरखुमादेविवरें विठ्ठलें । मूस आतुनियां मेण सांडिलें ॥ ४ ॥

४४५. आजि संसार सुफळ झाला ग माये । देखियेले पाय विठाबाचे ॥१॥ तो मज व्हावा तो मज व्हावा । वेळोवेळां व्हावा पांडुरंग ॥ २ ॥ बापरखुमादेविवरू न विसंबे सर्वथा । निवृत्तीनें तत्त्वतां सांगितलें ॥३॥

४४६. श्रीगुरुसारिखा असतां पाठीराखा । इतरांचा लेखा व कोण रे ॥ १ ॥ राजयाची कांता काय भीक मागे । मना-चियांजोगे सिद्धी पावे ॥ २ ॥ कल्पतरू तळवटीं जो कोणी

बसला। काय वाणी त्याला सांगिजो जी ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे तरलों तरलों। आतां उद्धरिलों गुरुकृपें ॥ ४ ॥

४४७. इवलेंसें रोप लावियेलें द्वारीं। त्याचा वेलु गेला गगनावरी ॥ १ ॥ मोगरा फुलला मोगरा फुलला। फुलें वेचितां अति भारू कळियासी आला ॥ २ ॥ मनाचिये गुंतीं गुंफियेला शेला। बापरखुमादेविवरु विठ्ठलीं अर्पिला ॥ ३ ॥

४४८. माझ्या जीवींची आवडी। पंढरपुरा नेईन गुढी ॥ १ ॥ पांडुरंगीं मन रंगलें। गोविंदाचे गुणीं वेधिलें ॥ २ ॥ जागृती स्वप्न सुषुप्ति नाठवे। पाहतां रूप आनंदी आनंद साठवे ॥ ३ ॥ बापरखुमादेविवरु सगुण निर्गुण। रूप विटेवरी दाविलें खुण ॥ ४ ॥

४४९. तुझी सेवा करीन मनोभावें वो। माझें मन गोविंदीं रंगलें वो ॥ १ ॥ नवसिये नवसिये नवसिये वो। पंढरीचे दैवतें विठ्ठले नवसिये वो ॥ २ ॥ बापरखुमादेविवरे विठ्ठले वो। चित्त चैतन्य चोरुनि नेलें वो ॥ ३ ॥

४५०. तूं माझा स्वामी मी तुझा रंक। पाहतां न दिसे वेगळीक ॥ १ ॥ मी तूं पण जाऊं दे दुरी। एकचि घोंगडें पांघरूं हरि ॥ रखुमादेविवरा विठ्ठलराया। लागेन मी पायां वेळोवेळीं ॥ ३ ॥

४५१. वाराणसी यात्रे जाईन। प्रयागतीर्थ पाहीन। त्रिवेणिये स्नान करीन। परी मी वीट नव्हेन ॥ १ ॥ विठोबा पायींची वीट। मी कई वा होईन ॥ २ ॥ गोदावरी यात्रे जाईन बारा वरुषाचें फळ लाहीन। अष्टक तीर्थीं स्नान करीन।

परी मी वीट नव्हेन ॥ ३ ॥ मल्लिकार्जुन यात्रे जाईन । श्रीशैल्य शिखर पाहीन । पाताळगंगें स्नान करीन । परी मी वीट नव्हेन ॥ ४ ॥ मातापुर याचे जाईन । सह्याद्री पर्वत पाहीन । गहनगंगे स्नान करीन । परी मी वीट नव्हेन ॥ ५ ॥ कोल्हापुरीं यात्रे जाईन । महालक्ष्मी पाहीन । विशाळ तीर्थी स्नान करीन । परी मी वीट नव्हेन ॥ ६ ॥ एका अंगुष्ठीं तप करीन । पृथ्वी पात्रचि लाहीन । देह कर्वतीं देईन । परी मी वीट नव्हेन ॥ ७ ॥ बहुता पुण्याच्या सायासीं । चरण जोडले विटेसी । निवृत्तिदासु म्हणे परीयेसी । परी मी वीट नव्हेन ॥ ८ ॥

४५२. जोडोनियां जोडी जेणें हुंडारिली दुरी । भिकेची आवडी तया नावडे पंढरी ॥ १ ॥ करंटे कपाळ ज्याचें नाम नयें वाचे । सदैव सभाग्य तोचि हरिरंगीं नाचे ॥२॥ आपण न करी यात्रा दुजियासी जावो नेदी । विषयाचा लंपट शिकवी कुविद्या कुबुद्धी ॥३॥ ऐसें जे जन्मोनी नर भोगिती अघोर । न करिती तीर्थयात्रा तया नरकी बिढार ॥ ४ ॥ पुडलीकें भक्तें तारिलें विश्वजानां । वैकुंठीची मूर्ती आणिली पंढरपूर पाटणा ॥ ५ ॥ काया वाचा मनें जीवें सर्वस्वें उदार । बापरखुमादेविवरा विठ्ठलाचा वारिकर ॥ ६ ॥

४५३. वाजतसे बोंब कोणी नायकती कानीं । हरि हरि न म्हणती तया थोर झाली हानी ॥ १ ॥ उठा उठा जागा पाठीं भय आलें मोठें । पंढरीवांचूनि दुजा नाहीं कोठें ॥ २ ॥ तापत्रय अग्नीचा लागला वोणवा । कवण रिघे आड कवण करी सावाधावा ॥ ३ ॥ देखोनि ऐकोनि एक अंध बहिर झाले । विषयाचें लंपट बांधोनि यमपुरीस नेले ॥ ४ ॥ आजा मेला

पणजा मेला बाप मसणा नेला। देखत देखत नातु पणतु तोही तैसा झाला ॥ ५ ॥ व्याघ्र लासी भूतें हीं लागताती पाठीं। हरिभजन न करितां सकळें घाल्‍ पाहे पोटीं ॥ ६ ॥ संतसंग धरा तुम्ही हरिभजन करा। पाठी लागलासे काळ दांत खातो करकरां ॥ ७ ॥ बापरखुमादेविवरा विठ्ठला शरण। भावें न रिघतां न चुके जन्ममरण ॥ ८ ॥

४५४. हें नव्हे आजिकालिचें। युगें अठ्ठाविसांचें। मज निर्धारितां साचें हा मृत्युलोकुचि नव्हे। हाचि मानी रे निर्धारु। येर सांडि रे विचारु। जरी तूं पाहासी परात्परु। तरी तूं जाये पंढरिये ॥ १ ॥ बाप तीर्थ पंढरी। भूवैकुंठ महीवरी। भक्त पुंडलिकाचे द्वारीं। कर कटावरी राहिला ॥ २ ॥ काशी अयोध्या अवंती। कांची मथुरा माया गोमती। ऐसीं तीर्थे इत्यादिकें आहेती। परि सरी न पवती ये पंढरी ॥ ३ ॥ हाचि मानि रे विश्वासु। येर सांडी रे हव्यासु। जरि तूं पाहासी वैकुंठवासु तरि तूं जाये पंढरिये ॥४॥ आड वाहे भीमा। तारावया देह आत्मा। पैलथडीये परमात्मा। मध्यें राहिला पुंडलीक ॥ ५ ॥ या तिहींचें दरुशन। प्राण्या नाहीं जन्ममरण। पुनरपि आगमन। येथें बोलिलेंचि नाहीं ॥ ६ ॥ पंढरी म्हणजे भूवैकुंठ। ब्रह्म तंव उभेचि दिसताहे नीट। या हरिदासांसी वाळवंट। जागरणासी दिधलें ॥ ७ ॥ म्हणोनि कराकरा रे क्षीरापति। नटा नटा कीर्तनवृत्ति। ते नर मोक्षातें पावती। ऐसें बोलती सुरनर ॥ ८ ॥ हें चोविसा मूर्तींचें उद्धरण। शिवसहस्रनामासी गहन। हेंचि हरिहराचें चिंतन। विश्ववंद्य हे मूर्तीतें ॥ ९ ॥ तो हा देवाधिदेव बरवा।

पांडुरंग सदाशिवाचा निज ठेवा। बापरखुमादेविवरु पंचविसावा। चोविसा मूर्ती वेगळा ॥ १० ॥

४५५. तुज सगुण म्हणों कीं निर्गुण रे। सगुण निर्गुण एकु गोविंदु रे ॥ १ ॥ अनुमाने ना अनुमाने ना। श्रुति नेति नेति म्हणती गोविंदु रे ॥ २ ॥ तुज स्थूळ म्हणों कीं सूक्ष्म रे। स्थूळ सूक्ष्म एकु गोविंदु रे ॥ ३ ॥ तुज आकारु म्हणों कीं निराकारु रे। आकारु निराकारु एकु गोविंदु रे ॥ ४ ॥ तुज दृश्य म्हणों कीं अदृश्य रे। दृश्य अदृश्य एकु गोविंदु रे ॥ ५ ॥ निवृत्तिप्रसादें ज्ञानदेव बोले। बापरखुमादेविवरु विठ्ठलु रे ॥ ६ ॥

४५६. सत्यज्ञानानंत गगनाचें प्रावर्ण। नाहीं रूप वर्ण गुण जेथें ॥ १ ॥ तो हा रे श्रीहरि पाहिला डोळेभरी। पाहते पाहणें दुरी सारोनियां ॥ २ ॥ ज्ञानदेव म्हणे ज्योतीची निज ज्योती। ते हे उभी मूर्ति विटेवरी ॥ ३ ॥

४५७. तुझी आण वाहीन गा देवराया। बहु आवडसि जीवांपासूनियां ॥ १ ॥ कानडिया विठोबा कानडिया। बहु आवडसि जीवांपासूनियां ॥२॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु राया। बहु आवडसि जीवांपासूनियां ॥ ३ ॥

४५८. तृप्ती भुकेली काय करूं माये। जीवनीं जीवन कैसें तान्हेजत आहे ॥ १ ॥ मन धालें परी न धाये। पुढत पुढती राजा विठ्ठलु पाहे ॥ २ ॥ निरंजनीं अंजन लेईजेत आहे। आपुलें निधान कैसें आपणचि पाहे ॥ ३ ॥ निवृत्ति गार्हस्थ्य मंडलें आहे। निष्काम अपत्य प्रसवत जाये ॥ ४ ॥ त्रिभुवनीं आनंदु न माये गे माये। आपआपु परमानंद वोसंडतु आहे

॥५॥ बापरखुमादेविवरु विठ्ठल गे माये। देहभाव सांडुनि भोगिजत आहे ॥ ६ ॥

४५९. बरवा वो हरि बरवा वो। गोविंद गोपाळ गुण गरुवा वो ॥ १ ॥ सांवळा वो हरि सांवळा वो। मदनमोहन कान्हो गोवळा वो ॥२॥ पाहतां वो हरि पाहतां वो। ध्यान लागले या चित्तां वो ॥ ३ ॥ पाढिये वो हरि पाढिये वो। बापरखुमादेविवरु घडिये वो ॥ ४ ॥

४६०. राम बरवा कृष्ण बरवा। सुंदर बरवा बाइयांनो ॥ १ ॥ केशव बरवा माधव बरवा गोपाळ बरवा बाइयांनो ॥ २ ॥ बापरखुमादेविवरु त्रिभुवनीं गरुवा। विठ्ठलु बरवा बाइयांनो ॥ ३ ॥

४६१. अष्टांगयोगें न सिणिजें। यम नेम निरोध न कीजे रया ॥१॥ वाचा गीत गाइजे वाचा गीत गाइजे। गातां वाचा श्रवणीं ऐकिजें रया ॥२॥ गीताछंदें अंग डोलिजे। लीला विनोदें संसार तरिजे रया। ३ ॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु नामें। जोडें हा उपावो कीजे रया ॥ ४ ॥

४६२. रसनें वो रसु मातृके वो माये ॥ ध्रु० ॥ रमणिये माये रमणिये। रामनामामृत रस पी जिव्हे ॥१॥ निवृत्तिदासा-प्रिय। माय रमणिय माय रमणिये ॥ २ ॥

४६३. सकळ धर्मांचें कारण। नामस्मरण हरिकीर्तन। दया क्षमा समाधान। संतजन साधिती ॥१॥ निजधर्म हा चोखडा। नाम उच्चारु घडाघडां। भुक्ति मुक्तींचा रोकडा। हा भव-सिंधुतारक ॥२॥ लावण्य मान्यता विद्यावंत। सखे स्वजन पुत्र कलत्र। विषयभोग वयसा व्यर्थ। देहासहित मरणांतीं ॥ ३ ॥

जें जें देखणें सकळ। ते हें स्वप्नींचें मृगजळ। म्हणोनि चिंती चरणकमळ। रखुमादेविवरा विठ्ठलाचे ॥ ४ ॥

४६४. माझ्या कान्हाचे तुम्ही नांव भरी घ्यावो। हृदयीं धरोनि यासी खेळावया न्यावो ॥१॥ भक्तांकारणें येणें घेतलीसे आळी। दहा गर्भवास सोशी वनमाळी ॥ २ ॥ कल्पनेविरहित भलतया मागे। अभिमान सांडूनि दीनापाठीं लागे ॥ २ ॥ शोषिली पुतना येणें मोडियेले तरू। आळी न संडीं बापरखुमादेविवरु ॥ ४ ॥

४६५. आपुलेनि रंगे येती होती ये साजणी। तंव एके वनवासीं आळंगिलें गे माये ॥ १ ॥ बोलेना बोलो देईना। तेथें पाहणें तें अवघें पारुषलें गे माये ॥२॥ आपुलें केलें कांहीं नचले वो आतां। बापरखुमादेविवरा विठ्ठलां देखतां ॥ ३ ॥

४६६. कानीं घालुनियां बोटें नाद जे पाहावे। न दिसतां जाणावें नऊ दिवस ॥ १ ॥ भोंवया पाहतां न दिसे जाणा। आयुष्यासी गणना सात दिवस ॥ २ ॥ डोळां घालुनियां बोटचक्र जें पाहावें। न दिसतां जाणावें पांच दिवस ॥ ३ ॥ नासाग्रीचें अग्र न दिसे नयनीं। तरी तेचि दिनीं म्हणा रामकृष्ण ॥ ४ ॥ ज्ञानदेव म्हणे हें साधूंचें लक्षण। अंतकाळीं आपण वेगीं पाहा ॥ ५ ॥

४६७. अवघाची संसार सुखाचा करीन। आनंदें भरीन तिन्ही लोक ॥ १ ॥ जाईन गे माये तया पंढरपुरा। भेटेन माहेरा आपुलिया ॥ २ ॥ सर्व सुकृतांचें फळ मी लाहीन। क्षेम मी देईन पांडुरंगीं ॥ ३ ॥ बापरखुमादेविवरा विठ्ठलाची भेटी। आपुलिये संवसाटीं करूनि ठेला ॥ ४ ॥

४६८. पाहे पां ध्वजेचें चिरगुट। राया जतन करितां कष्ट ॥१॥ तैसा मी एक पतित। परि तुझा मुद्रांकित ॥२॥ मसीपत्र तें केवढें। रावो चालवी आपल्यापाडें ॥३॥ बापरखुमादेविवरा। सांभाळावें आपल्या ब्रीद्रा ॥ ४ ॥

४६९. गुरु हा संतकुळींचा राजा। गुरु हा प्राणविसावा माझा। गुरुवीण देव दुजा। पाहतां नाहीं त्रिलोकीं ॥ १ ॥ गुरु हा सुखाचा सागरु। गुरु हा प्रेमाचा आगरु। गुरु हा धैर्याचा डोंगरु। कदाकाळीं डळमळीना ॥ २ ॥ गुरु वैराग्याचें मूळ। गुरु हा परब्रह्म केवळ। गुरु सोडवी तात्काळ। गांठ लिंगदेहाची ॥ ३ ॥ गुरु हा साधकांशीं साह्य। गुरु हा भक्तांलागीं माय। गुरु हा कामधेनु गाय। भक्तांघरीं दुभतसे ॥ ४ ॥ गुरु घाली ज्ञानांजन। गुरु दाखवी निज धन। गुरु सौभाग्य देऊन। साधुबोध नांदवी ॥ ५ ॥ गुरु मुक्तीचें मंडन। गुरु दुष्टांचें दंडन। गुरु पापाचें खंडन। नानापरी वारितसे ॥ ६ ॥ काया काशी गुरु उपदेशी। तारक मंत्र दिला आम्हासी। बापरखुमादेविवरासी। ध्यान मानसीं लागलें ॥ ७ ॥

४७०. नित्य धर्म नाम पाठ। तेचि वैकुंठींची वाट। गुरुभजनीं त्याचा जो विनट। तोचि हरिभक्तु जाणावा ॥ १ ॥ धन्य धन्य धन्य त्याचा वंश। धन्य तो आला जन्मास। तया जवळीं हृषीकेश। सर्वकाळ नांदतु असे ॥२॥ रामकृष्ण स्मरण जप। तोचि तयाचें अमूप तप। तो वास करील कोटी कल्प। वैकुंठपीठ नगरीसीं ॥३॥ ज्ञानदेवीं जप केला। हरि समाधीसी साधिला। हरिमंत्रें प्रोक्षिला। सर्व संसार निर्धारें ॥ ४ ॥

४७१. मन हें धालें मन हें धालें पूर्ण विठ्ठलाचि झालें । अंतर्बाह्य रंगुनि गेलें विठ्ठलची ॥ १ ॥ विठ्ठल म्हणतां हरलें पाप पदरीं आलें पुण्य माप । धाला दीनाचा मायबाप विठ्ठलची ॥ २ ॥ विठ्ठल जळीं स्थळीं भरला ठाव कोठे नाहीं उरला । आजि म्यां दृष्टीसें पाहिला विठ्ठलची ॥ ३ ॥ ऐसा भाव धरूनि मनीं विठ्ठल आणिला निजध्यानीं । अखंड वदो माझी वाणी विठ्ठलची ॥ ४ ॥ तो हा चंद्रभागे तीरा पुंडलीकें दिधला थारा । बापरखुमादेविवरा जडलें पायीं विठ्ठलची ॥ ५ ॥

४७२. घरदार वोखटें त्यजूं म्हणसी तरी शरीराएवढें जाड । मायबाप वोखटीं त्यजूं म्हणसी तरी अहंकार अविद्येचे कोड । बंधु सखे त्यजूं म्हणसी तरी काम क्रोध मद मत्सर अवघड । बहिणी पाठीच्या त्यजूं म्हणसी आशा तृष्णा मायाचे बंड रया ॥१॥ त्यजिलें तें काय कासया म्हणजे सांग पां मजपासीं ऐसें । जया भेणें तूं जासीं वनांतरा तंव तुजाचि सरिसे रया ॥२॥ स्त्री वोखटी त्यजूं म्हणसी तरीं कल्पनेएवढी मोत्की । पुत्र अपत्य त्यजूं म्हणसी तरी इंद्रियांसी नाहीं निवृत्ति । सकळ गणगोत त्यजूं म्हणसी तरी हे अष्टधा प्रकृति । अवघेचि त्यजूं पाहे म्हणसी तरी मना नाहीं निज शांति रया ॥ ३ ॥ अवघींचि तुज जवळीं दुमदुमित असतां वरीं वरी मुंडिसी विटंबना । सहज संतोषें असोनि जैसा तैसा परि तो सद्गुरु पाविजे खुणा । आपुले आश्रमीं स्वधर्मी असतां सर्वत्र एकुचि जाणा । बापरखुमादेविवरु विठ्ठलु इतुकिया साठीं नेईल वैकुंठभुवना ॥ ४ ॥

४७३. कां सांडिसी गृहाश्रम । कां सांडिसी क्रियाकर्म । कासया सांडिसी कुळींचे धर्म । आहे तें वर्म वेगळेंची ॥ १ ॥

भस्म उधळण जटाभारू । अथवा उदास दिगंबरू । न धरी लोकांचा आधारू । आहे तो विचारू वेगळाची ।। २ ।। जप तप अनुष्ठान । क्रिया कर्म यज्ञ दान । कासया इंद्रियां बंधन आहे तें निधान वेगळेंची ।। ३ ।। वेदशास्त्र जाणीतलें । आगमीं पूर्ण ज्ञान झालें । पुराण मात्र धांडोळिले । आहे तें राहिलें वेगळेंची ।। ४ ।। शब्दब्रह्में होसी आगळा । म्हणसी न भिये कळिकाळा । बोधेंविण सुख सोहळा । आहे तो जिव्हाळा वेगळाची ।। ५ ।। याकारणें श्रीगुरुनाथु । जंव मस्तकीं न ठेवी हातु । निवृत्तिदास असे विनवितु । तंव निवांतु केविं होय ।।६।।

४७४. जंववरीरे तंववरी जंबुक करी गर्जना । जंव त्या पंचानना देखिलें नाहीं बाप ।। १ । जंववरीरे तंववरी वैराग्याच्या गोष्टी । जंव सुंदर वनिता दृष्टी देखिली नाहीं बाप ।। २ ।। जंववरीरे तंववरी मैत्रत्व संवाद । जंववरी अर्थेसि संबंध पाडिला नाहीं बाप ।। ३ ।। जंववरीरे तंववरी युद्धाची मात । जंव परमाईचा पूत देखिला नाहीं बाप ।। ४ ।। जंववरीरे तंववरी समुद्र करी गर्जना । जंव अगस्ती ब्राह्मणा देखिलें नाहीं बाप ।। ५ ।। जंववरीरे तंववरी बाधी हा संसार । जंव रखुमा-देविवरा देखिला नाहीं बाप ।। ६ ।।

४७५. दुर्लभु रे दुर्लभु रे दुर्लभु संसारु तुम्ही कां नेणां । आहारनिद्रेसाठीं दवडितां माणुसपणा ।। १ ।। आड ना विहिरी बाधी ना पोखरणी । सरिता ना सागर कल्पतरू रानोरानीं ।। २ ।। बावो याची खूण ज्ञानदेवो जाणे । तयाचें करणें तें अधिकाचि होणें ।। ३ ।।

४७६. मोक्ष मेल्या पाठीं आम्हांसी होईल । ऐसें जे म्हणतील अतिमूर्ख ॥ १ ॥ दीप गेल्यावरी कैचा जीं प्रकाश । झांका झांकीं त्यास कासयाची ॥२॥ जंववरी देह आहे तंववरी साधन । करूनियां ज्ञान सिद्ध करा ॥ ३ ॥ गृह दग्ध न होतां शिंपीजे उदक । शेखी तो निष्टंक काय कीजे ॥ ४ ॥ आहे मी हा कोण करावा विचार । म्हणे ज्ञानेश्वर निवृत्तीचा ॥ ५ ॥

४७७. अनुपम्य मनोहर । कांसे शोभे पितांबर । चरणीं ब्रीदाचा तोडर । देखिला देवो ॥ १ ॥ योगियाचीं कसपटी । दावितसे नेत्रपुटीं । उभा भिवरेच्या तटीं । देखिला देवो ॥२॥ बापरखुमादेविवरु पुंडलिका अभयकरू । परब्रह्म साहाकरु । देखिला देवो ॥ ३ ॥

४७८. सुखाचें हें सुख श्रीहरि मुख । पाहतांहीं भूक तहान गेली ॥ १ ॥ भेटली भेटली विठाई माउली । वासना निवाली जिवांतील ॥२॥ चंद्रासी चकोर मेघासी मयूर । वाटे तैसा भर आनंदाचा ॥ ३ ॥ नामा म्हणे पाप आणि ताप दुःख । गेलें झालें सुख बोलवेना ॥ ४ ॥

४७९. आषाढी कार्तिकी हेचि आम्हां सुगी । शोभा पांडुरंगीं घनवटे ॥ १ ॥ संतांचीं दर्शनें हेंचि पीक जाणा । देतां आलिंगन देह निवे ॥२॥ देह निवे किती नवल सांगावें । जीवासी दुणावे ब्रह्मानंद ॥ ३ ॥ नामा म्हणे त्यासी मूळ पांडुरंग । त्यांचेनि अव्यंग सुख आम्हां ॥ ४ ॥

४८०. सुखालागीं जरी करिसी तळमळ । तरी तूं पंढरीसी जाय एक वेळ ॥ १ ॥ तेथें अवघाची सुखरूप होसी । जन्मोजन्मींचे श्रम विसरसी ॥ २ ॥ चंद्रभागे करितां स्नान ।

तुझे दोष पळती रानोरान ।। ३ ।। लोटांगण घालोनि महाद्वारीं । कान धरोनि नाच गरुडपारीं ।।४ ।। नामा म्हणे उपमा काय द्यावी । माझ्या विठोबाची इडा पीडा घ्यावी ।। ५ ।।

४८१. पंढरीच्या सुखा अंत पार नाहीं लेखा । शेषा सहस्र-मुखा न वर्णवेचि ।। १ ।। पंढरीच्या सुखा तोचि अधिकारी । जन्मोजन्मीं वारी घडली तया ।। २ ।। पंढरीस जातां प्रेम उचं-बळत । आनंदें गर्जत नामघोष ।। ३ ।। विश्वमूर्ति विठो विश्वं-भर देखें । विसरला दुःखे देहभाव ।। ४ ।। नामा म्हणे त्याचा होईन चरणरज । नुपेक्षील मज पांडुरंग ।।५।।

४८२. ज्ञानराज माझी योग्यांची माउली । जेणें निगम-वल्ली प्रगट केली ।।१।। गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी । ब्रह्मा-नंदलहरी प्रगट केली ।। २ ।। अध्यात्मविद्येचें दाविलेंसे रूप । चैतन्याचा दीप उजाळिला ।। ३ ।। छपन्न भाषेचा केलासे गौरव भवार्णवीं नाव उभारीली ।।४।। श्रवणाचे मिषें बैसावे येऊनी । साम्राज्य भुवनीं सुखी नांदे ।। ५ ।। नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओंवी अनुभवावी ।।६।।

४८३. नाचूं कीर्तनाचे रंगीं । ज्ञानदीप लावूं जगीं ।। १ ।। सर्व सांडुनी माझाई । वाचे विठ्ठल रखुमाई ।।२।। परेहून परतें घर । तेथें राहूं निरंतर ।। ३ ।। सर्वांचें जें अधिष्ठान । तेंचि माझें रूप पूर्ण ।।४।। अवघी सत्ता आली हाता । नामयाचा खेचर दाता ।।५।।

४८४ तूं माझी माउली मी वो तुझा तान्हा । पाजीं प्रेम पान्हा पांडुरंगे ।।१।। तूं माझी माउली मी तुझें वासरूं । नको पान्हा चोरूं पांडुरंगे ।।२।। तूं माझी हरिणी मी तुझें पाडस ।

तोडीं भवपाश पांडुरंगे ॥३॥ तूं माझी पाक्षिणी मी तुझें अंडज। चारा घाली मज पांडुरंगे ॥ ४ ॥ नामा म्हणे होसी भक्तीचा वल्लभ। मागें पुढें उभा सांभाळिसी ॥ ५ ॥

४८५. देह जावो अथवा राहो। पांडुरंगीं दृढ भावो ॥१॥ चरण न सोडी सर्वथा। तुझी आण पंढरीनाथा ॥ २ ॥ वदनीं तुझें मंगळनाम। हृदयीं अखंडित प्रेम ॥ ३ ॥ नामा म्हणे केशवराजा। केला नेम चालवी माझा ॥ ४ ॥

४८६. मनुष्य करिसी तरी भक्तीचेनि मिषें। तुझे द्वारीं वसें ऐसें करी ॥ १ ॥ श्वान करिसी तरी उच्छिष्टाचेनि मिषें। तुझे द्वारीं वसें ऐसें करी ॥ २ ॥ पक्षी करिसी तरी चारियाचेंनि मिषें। तुझे द्वारीं वसें ऐसें करी ॥ ३ ॥ झाड करिसी तरी तुळसीचेनि मिषें। तुझे द्वारीं वसें ऐसें करी ॥४॥ वृक्ष करिसी तरी मंडप मेखाचेनि मिषें। तुझे द्वारीं वसें ऐसें करी ॥५॥ पाषाण करिसी तरी रंग शिळेचेनि मिषें। तुझे द्वारीं वसें ऐसें करी ॥६॥ उदक करीसी तरी सडियाचेनि मिषें। तुझे द्वारीं वसें ऐसें करी ॥ ७ ॥ नामा म्हणे विठो कीर्तनाचेनि मिषें। तुझे द्वारीं वसें ऐसें करी ॥ ८ ॥

४८७. मुंगी व्याली शिंगी झाली तिचें दूध किती। सतरा रांजण भरून गेलें प्याले बारा हत्ती ॥ १ ॥ आम्ही लटिकें न बोलूं वर्तमान खोटें ॥ २ ॥ लटिकें गेलें कटकें तेथें गाडग्यातवढें राळें। उडत चिमणी चरत चाले तिचे वाटी एवढें डोळे। शेळी करी घुसळण तेथें मांजर काढी लोणी। उंदीर गेले देशांतरा ताकें भरल्या गोणी ॥४॥ पाण्यांत कासव गीत गाय वनांत कोल्हा नाचे। सावज मनी संतोपला खोकड पुस्तक

वाचे ॥ ५ ॥ कांतणीं घरीं लग्न लागलें सरडा करणीक कांडीं । बागुल वंध्या कण्या परणी घुबड मांडे रांधी ॥ ६ ॥ बाभुळीचे खोडी माशाने केलें कोटें । सशानें सिंह ग्रासिला बेडूक आलें लोटें ॥ ७ ॥ विष्णुदास नामा म्हणे ऐका त्यांची ख्याति । लटिका म्हणतील त्याचे पूर्वज नरका जाती ॥ ८ ॥

४८८. सद्‌गुरुनायकें कृपा मज केली । निजवस्तु दाविली माझी मज ॥ १ ॥ माझें सुख मज दाविलें डोळां । दिधली प्रेमकळा ज्ञानमुद्रा ॥ २ ॥ उतराई व्हावें कवण्या गुणें । जन्मा नाहीं येणें ऐसें केलें ॥ ३ ॥ नामा म्हणे निकी दाविली सोय । न विसरावे पाय विठोबाचे ॥ ४ ॥

४८९. तुझिया सत्तेनें वेदांसि बोलणें । सूर्यासी चालणें तुझिया बळें ॥१॥ ऐसा तूं समर्थ ब्रह्मांडाचा धनी । वर्म जाणूनि शरण आलों ॥ २ ॥ मेघांनी वर्षावें पर्वतीं बैसावें । वायूनें विचारावें सत्ते तुझे ॥ ३ ॥ नामा म्हणे कांहीं न हाले साचार । प्रभू तूं निर्धार पांडुरंग ॥ ४ ॥

४९०. पंढरीचा वास चंद्रभागे स्नान । आणिक दर्शन विठोबाचें ॥ १ ॥ हेंचि घडो मज जन्मजन्मांतरीं । मागणें श्रीहरि नाहीं दुजें ॥२॥ मुखीं नाम सदा संतांचें दर्शन । जनीं जनार्दन ऐसा भाव ॥३॥ नामा म्हणे तुझें नित्य महाद्वारीं । कीर्तन गजरीं सप्रेमाचें ॥४॥

४९१. संतभार पंढरींत । कीर्तनाचा गजर होत ॥१॥ तेथें असे देव उभा । जैसी समचरणांची शोभा ॥२॥ रंग भरे कीर्तनांत । प्रेमें हरिदास नाचत ॥३॥ सखा विरळा ज्ञानेश्वर । नाम-

याचें जो जिव्हार । ऐशा संतां शरण जावें । जनी म्हणे त्याला ध्यावें ।। ५ ।।

४९२. गंगा गेली सिंधूपासीं । त्यानें अव्हेरिलें तिसीं ।। १ ।। तरी ते सांगावें कवणाला । ऐसें बोलें बा विठ्ठला ।। २ ।। जळ कोपे जळचरा । माता अव्हेरी लेंकुरा ।। ३ ।। जनी म्हणे शरण आलें । अव्हेरितां ब्रीद गेलें ।। ४ ।।

४९३. विठो माझा लेंकुरवाळा । संगें लेकुरांचा मेळा ।। १ ।। निवृत्ति हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी ।। २ ।। पुढें चालें ज्ञानेश्वर । मागे मुक्ताई सुंदर ।। ३ ।। गोरा कुंभार मांडीवरी । चोखा जीवा बरोबरी ।। ४ ।। बंका कांडियेवरी । नामा करांगुळी धरी ।।५।। जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ।।६।।

४९४. पुण्यवंत पाताळ लोकीं नेला । दरिद्री तो भाग्यवंत केला । चारट्याचा बहुमान वाढविला । कीर्तिवानाचा अपमान केला ।।१।। धुंद झाला तुझा दरबार ।। धृ० ।। वैरियासी दिधली मोक्षसिद्धी । कपटिया दिधली महानिधी । सेवकाच्या ढुंगा न मिळे चिंधी । चाळकासी त्रैलोक्य भावें वदी ।। २ ।। पतिव्रता ती वृथा गुंतविली । वेश्या गणिका ती सत्यलोका नेली । कळी स्वकुळा लावियेली । यादववृंदा ही गोष्ट बरी नाहीं केली ।।३।। सत्त्ववानाचा बहु केला छळ । कीर्तिवानाचें मारियेलें बाळ । सखा म्हणविसी त्याचे नासी बळ । जनी म्हणे मी जाणे तुझे खेळ ।। ४ ।।

४९५. धरिला पंढरीचा चोर । गळां बांधोनियां दोर ।। १ ।। हृदय बंदिखाना केला । आंत विठ्ठल कोंडिला ।। २ ।। शब्दें केली जडाजुडी । विठ्ठलपायीं घातली बेडी ।। ३ ।। सोहं

शब्दाचा मारा केला । विठ्ठल काकुळती आला ॥४॥ जनी म्हणे बा विठ्ठला । जीवें न सोडी मी तुला ॥ ५ ॥

४९६. कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ॥ १ ॥ लसुण मिरची कोथिंबरी । अवघा झाला माझा हरि ॥ २ ॥ मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ॥ ३ ॥ सांवता म्हणे केला । विठ्ठलपायीं गोंविला गळा ॥ ४ ॥

४९७. जें सुख क्षीरसागरीं ऐकिजे । तें या वैष्णवांमंदिरीं देखिजे ॥ १ ॥ धन्य धन्य ते वैष्णवमंदिर । जेथें नामघोष होय निरंतर ॥२॥ दिंडी पताका द्वारीं तुळसीवृंदावनें । मन निवताहे नामसंकीर्तनें ॥ ३ ॥ ज्याच्या दरुशनें पाप ताप जाये । भानुदास तयासी गीती गाये ॥ ४ ॥

४९८. ब्रह्मी स्फुरें जें स्फुरण शुद्ध सत्त्वाचें लक्षण । तों तूं लक्षी लक्ष्यातीत परिपूर्ण रे ॥ १ ॥ कान्हू सच्चिदानंदु शब्द अरुता रे । त्याही परता तूं निजानंदु रे ॥ २ ॥ जेथें नाहीं गुणागुण नाहीं कार्यासी कारण । गुणीं तो तूं गुणातीत परिपूर्ण रे ॥ ३ ॥ एका एकी जनार्दन भेद भाष्य वचन । तो तूं शब्दासीं गिळून राहिलासी रे ॥ ४ ॥

४९९. सर्व सुखाची लहरी । ज्ञानाबाई अलंकापुरी ॥ १ ॥ शिवपीठ हें जुनाट । ज्ञानाबाई तेथें मुगुट ॥ २ ॥ वेदशास्त्र देती ग्वाही । म्हणती ज्ञानाबाई आई ॥३॥ ज्ञानाबाईचे चरणीं । शरण एका जनार्दनीं ॥ ४ ॥

५००. उदार भक्त उदार भक्त । त्रैलोकी मात जयाची

॥ १ ॥ केला भगवद्गीते अर्थ । ऐसे समर्थ तिहीं लोकीं ॥२॥ बोलाविला रेडा चालविली भिंती । चांगदेवातें उपदेशिती ॥३॥ एका जनार्दनीं समर्थ ते भक्त । देव त्यांचा अंकित दास होय ॥ ४ ॥

५०१. भाव धरूनियां वाचीं ज्ञानेश्वरी । कृपा करी हरि तयावरी ॥ १ ॥ स्वमुखें आपण सांगे तो श्रीविष्णु । श्रीगीता हा प्रश्नु अर्जुनेसी ॥ २ ॥ तेचि ज्ञानेश्वरी वाचे वदतां साचे । भय कळिकाळाचें नाहीं तया ॥३॥ एका जनार्दनीं संशय सांडोनी । दृढ धरी मनीं ज्ञानेश्वरी ॥ ४ ॥

५०२. गीता गीता गीता वाचे जे म्हणती । नाहीं पुनरावृत्ति तया नरां ॥ १ ॥ नित्य नेम वाचे वदतां अक्षरें । भवसिंधु तरे अर्धक्षणीं ॥ २ ॥ एका जनार्दनीं जयाचा हा नेम । तया पुरुषोत्तम न विसंबे ॥ ३ ॥

५०३. भक्तिप्रेमाविण ज्ञान नको देवा । अभिमान नित्य नवा तयामाजी ॥ १ ॥ प्रेमसुख देई प्रेमसुख देई । प्रेमेवीण नाहीं समाधान ॥ २ ॥ रांडवेनें जेविं शृंगार केला । प्रेमवीण झाला ज्ञानी तैसा ॥ ३ ॥ एका जनार्दनीं प्रेम अति गोड । अनुभवी सुरवाड जाणतील ॥ ४ ॥

५०४. गवळण म्हणती यशोदेला कोठें गे सांवळा । कां रथ शृंगारिला सांगे वो मजला । अक्रूर उभा असे बाई गे साजणी ॥१॥ या नंदाच्या आंगणीं मिळाल्या गौळणी ॥ ध्रु० ॥ बोले नंदाची पट्टराणी सद्गदीत होउनी । मथुरेसी चक्रपाणी जातो गे साजणी ।

विठ्ठल झालें मन वचन ऐकोनी ॥२॥ अक्रूरा चांडाळा तुज कोणी धाडिला । कां घात करूं आलासी वधीसी सकळां । अक्रूरा तुझे नाम तैसीच करणी ॥३॥ रथीं चढले वनमाळी आकांत गोकुळीं । भूमि पडल्या व्रजबाळी कोण त्या सांभाळी । नयनींच्या उदकानें भिजली धरणी ॥४॥ देव बोले अक्रूरासी वेगें हांकी रथासी या गोपींच्या शोकासी न पहावे मजसी । एका जनार्दनीं रथ । गेला निघोनि ॥ ५ ॥

५०५. अगाध तुझी लीला अकळ कैसेनी कळे । ब्रह्मा भृंगी धरूनी तुझे स्वरूप सांवळें ॥ १ ॥ तुज कैसे भजावें आपणा काय देखावें । तुजमाजीं राहूनि कैसें सेवावें ॥ २ ॥ अगा देव तूं आम्हां म्हणसी मानवी । हेम अलंकार वेगळे निवडावें कैवी ॥ ३ ॥ एका जनार्दनीं सबाह्याभ्यंतरीं नांदे । मिथ्या स्वप्नजात जेविं जाय ते बोधे ॥ ४ ॥

५०६. झाली संध्या संदेह माझा गेला । आत्माराम हृदयीं शेजे आला ॥ध्रु०॥ गुरुकृपा निर्मळ भागिरथी । शांति क्षमा यमुना सरस्वती । असीपदें एकत्र जेथें होती । स्वानुभव स्नान हें मुक्तस्थिती ॥ १ ॥ सद्बुद्धीचें घालूनि शुद्धासन । वरी सद्गुरुची दया परिपूर्ण । शमदम विभूति चर्चुनी जाण । वाचे उच्चारी केशव नारायण ॥२॥ बोध पुत्र निर्माण झाला जेव्हां । ममता म्हातारी मरोनि गेली तेव्हां । भक्ति बहीण धांवूनि आली गांवा । आतां संध्या कैसी मी करूं केव्हां ॥३॥ सहज कर्में झालीं ती ब्रह्मार्पण । जन नोहे हा अवघा जनार्दन । ऐसें ऐकतां निवती साधुजन । एका जनार्दनीं बाणली निज खुण ॥ ४ ॥

५०७. सगुण चरित्रें परम पवित्रें सादर वर्णावीं । सज्जन वृंदें मनोभावें आधीं वंदावीं ॥१॥ संतसंगें अंतरंगें नाम बोलावें । कीर्तनरंगीं देवा सन्निध सुखें डोलावें ॥ २ ॥ भक्ति-ज्ञानाविरहित गोष्टी इतरा न कराव्या । प्रेमभरें वैराग्याच्या युक्ति विवराव्या ॥ ३ ॥ जेणें करूनी मूर्ति ठसावी अंतरीं श्रीहरीची । ऐसी कीर्तन मर्यादा आहे संतांच्या घरची ॥ ४ ॥ अद्वय भजनें अखंड स्मरणें वाजवी करटाळी । एका जनार्दनी मुक्त होय तत्काळीं ॥५॥

५०८. ज्ञानदेवें उपदेश करुनियां पाही । सोपान मुक्ताई बोधियली ॥१॥ मुक्ताईनें बोध खेचरासीं केला । तेणें नामियास बोधियेलें ॥२॥ नाम्याचें कुटुंब चांगा वटेश्वर । एका जनार्दनीं विस्तार मुक्ताईचा ॥३॥

५०९. जो निर्गुण निराभास । जेथूनि उद्‌भव शबल ब्रह्मास। आदिनारायण म्हणती ज्यास । तो सर्वांस आदिगुरु ॥१॥ तयाचा ब्रह्मा अनुग्रहीत । ब्रह्मा अत्रीस उपदेशीत । अत्री पाद प्रसादीत । श्रीअवधूत दत्तात्रय ॥२॥ दत्तात्रय परंपरा । सहस्रार्जुना यदु दुसरा । जनार्दन शिष्य तिसरा । केला खरा कलियुगीं ॥ ३ ॥ जनार्दनकृपेस्तव जाण । समूळ निरसलें भवबंधन । एका जनार्दनीं शरण । झाली संपूर्ण परंपरा ॥४॥

५१०. अवघेंचि त्रैलोक्य आनंदाचें आतां । चरणीं जगन्नाथा चित्त ठेलें ॥१॥ माय जगन्नाथ बाप जगन्नाथ । अनाथांचा नाथ जनार्दन ॥२॥ एका जनार्दनीं एकपणें उभा । चैतन्याची शोभा शोभतसे ॥ ३ ॥

५११. धणी न पुरे गुण गातां । रूप दृष्टीं न्याहाळितां ।।१।। बरवा बरवा पांडुरंग । कांतीं सांवळी सुरंग ।। २ ।। सर्व मंगळांचे सार । सुख सिद्धींचे भांडार ।। ३ ।। तुका म्हणे सुखा । अंतपार नाहीं लेखा ।। ४ ।।

५१२. गुणा आला विटेवरी पितांबरधारी सुन्दर ।। १ ।। डोळे कान त्याचे ठायीं । मन पायीं राहो हे ।। २ ।। निवारोनी जाय माया । ऐसी छा... जयाची ।।३।। तुका म्हणें समध्यान । हे चरण सुकुमार ।। ४ ।।

५१३. देव ते संत देव संत । निमित्त त्या प्रतिमा ।। १ ।। मी तों सांगतसें भावें । असो ठावें सकळां ।। २ ।। निराकारी ओस दिशा । येथें इच्छा पुरतसे ।। ३ ।। तुका म्हणे रोकडे केणें । सेवितां येणें पोट धाय ।। ।।

५१४. पतिव्रता नेणें आणिकांचे स्तुती । सर्वभावें पति ध्यानीं मनीं ।। १ ।। तैसें माझें मन एकविध झालें । नावडे विठ्ठलेविणे दुजे ।। २ ।। सूर्यविकासिनी नेघें चंद्रकळा । गाय ते कोकिळा वसंतेसी ।। ३ ।। तुका म्हणे बाळ मातेपुढें नाचे । बोल आणिकांचे नावडती ।। ४ ।।

५१५. आणिकांचे स्तुति आम्हां ब्रह्महत्या । एकावांचुनि त्या पांडुरंगा ।।१।। आम्हां विष्णुदासा एकविध भाव । न म्हणो या देव आणिकांसी ।। २ ।। शतखंड माझी होईल रसना । जरी या वचना पालटेन ।। ३ ।। तुका म्हणे मज आणिका संकल्पें । अवघींच पापें घडतील ।। ४ ।।

५१६. पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण । आम्हां नारायण तैशा-

परी ॥ १ ॥ सर्वभावें लोभ्या आवडें हें धन । आम्हा नारायण तैशापरी ॥ २ ॥ तुका म्हणे एकविध झालें मन । विठ्ठलावांचूनि नेणें दुजें ॥ ३ ॥

५१७. आणिक दुसरें मज नाहीं आतां । नेमिलिया चित्ता-पासूनियां ॥ १ ॥ पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं । जागृती स्वप्नीं पांडुरंग ॥ २ ॥ पडिलें वळण इंद्रियां सकळां । भाव तो निराळा नाहीं दुजा ॥३॥ तुका म्हणे नेत्रीं केली ओळखण । तटस्थ तें ध्यान विटेवरीं ॥ ४ ॥

५१८. आम्ही नामाचे धारक । नेणों प्रकार आणिक । सर्व-भावें एक विठ्ठलाचि प्रमाण ॥ १ ॥ नलगे जाणावें नेणावें । गावें आनंदे नाचावें प्रेम सुख घ्यावें । वैष्णवांचे संगती ॥ २ ॥ भावबळें घालूं कास । सज्जाचिता दवडूं आस । पायीं निज-ध्यास । म्हणवूं दास विष्णूचे ॥ ३ ॥ भय नाहीं जन्म घेतां । मोक्ष-पदा हाणों लाता । तुका म्हणे सत्ता । करूं निकट सेवेची ॥४॥

५१९. येऊनि संसारीं । मी तो एक जाणें हरी ॥ १ ॥ आणिक कांहीं नेणें धंदा । नित्य ध्यातसें गोविंदा ॥ २ ॥ काम क्रोध लोभ स्वार्थ । अवघा माझा पंढरीनाथ ॥ ३ ॥ तुका म्हणे एक । धणी विठ्ठल मी सेवक ॥ ४ ॥

५२०. कन्या सासुऱ्यासी जाये । मागें परतोनि पाहे ॥१॥ तैसें झालें माझ्या जीवा । केव्हां भेटसी केशवा ॥ २ ॥ चुक-लिया माये । बाळ हुरूहुरू पाहे ॥ ३ ॥ जीवनावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ॥ ४ ॥

५२१ जन हे सुखाचे दिल्याघेतल्याचे । अंतकाळींचे नाहीं कोणी ॥ १ ॥ झाल्या हीन शक्ति नाक डोळे गळती । सांडोनी पळती रांडा पोरें ॥ २ ॥ बाईल म्हणे खर मरता तरी बरें । नासिलें हें घर थुंकोनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे माझीं नव्हतील कोणी । तुज चक्रपाणीवांचुनियां ॥ ४ ॥

५२२. फिरविलें देऊळ जगामाजी ख्याती । नामदेवा हातीं दूध प्याला ॥ १ ॥ भरियेली हुंडी नरसी मेहेत्याची । धनाजी जाटाची शेतें पेरी ॥ २ ॥ मीराबाईसाठीं घेतो विष प्याला । दामाजीचा झाला पडेवार ॥ ३ ॥ कबीराचे मागें । विणूं लागे शेले । उठविलें मूल कुंभाराचें ॥ ४ ॥ आतां तुम्ही दया करा पंढरीराया । तुका विनवी पायां वेळोवेळा ॥ ५ ॥

५२३. धर्म रक्षावया अवतार घेसी । आपुल्या पाळीसी भक्तजना ॥ १ ॥ अंबऋषीसाठीं जन्म सोसियेले । दुष्ट निर्दाळिले किती एक ॥ २ ॥ धन्य कृपासिंधु म्हणतील । आपुला तूं बोल साच करी ॥ ३ ॥ तुका म्हणे तुज वर्णिती पुराणें । होय नारायण दयासिंधु ॥ ४ ॥

५२४. देव वसे चित्तीं । त्याची घडावी संगती ॥ १ ॥ ऐसें आवडतें मना । देवा पुरवावी वासना ॥ २ ॥ संतजनासवें भेटी । न हो अंगसंगे तुटी ॥ २ ॥ तुका म्हणे जिणें । भलें संत संघटणें ॥ ४ ॥

५२५. दुर्बुद्धि ते मना । कदा नुपजो नारायणा ॥ १ ॥ आता मज ऐसे करीं । तुझे पाय चित्तीं धरीं ॥ २ ॥ उपजला भावो । तुमचे कृपें सिद्धी जावो ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां । लाभ नाहीं या परता ॥ ४ ॥

५२६. ठाकलोंसे द्वारीं । उभा याचक भिकारी ॥ १ ॥ मज भीक कांहीं देवा । प्रेमभातुकें पाठवा ॥ २ ॥ याचकाचा भार । घेऊं नये येरझार ॥ ३ ॥ तुका म्हणे दान । सेवा घेतल्या-वांचून ॥ ४ ॥

५२७. लक्ष्मीवल्लभा । दीनानाथा पद्मनाभा ॥ १ ॥ सुख वसे तुझे पायीं । मज ठेवीं तेचि ठायीं ॥ २ ॥ माझी अल्प ही वासना । तूं तो उदारांचा राणा ॥३॥ तुका म्हणे भोगें । पीडा केली धांव वेगें ॥ ४ ॥

५२८. लहानपण दे गा देवा । मुंगी साखरेचा रवा ॥ १ ॥ ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ॥ २ ॥ ज्याचे अंगीं मोठेपण । तया यातना कठिण ॥ ३ ॥ तुका म्हणे जाण । व्हावें लहानाहूनि लहान ॥ ४ ॥

५२९. संसारतापें तापलों मी देवा । करितां या सेवा कुटुंबाची ॥ १ ॥ म्हणऊनि तुझे आठविले पाय । ये वो माझे माय पांडुरंगे ॥ २ ॥ बहुतां जन्मींचा झालों भारवाही । सुटिजे हें नाहीं वर्म ठावें ॥ ३ ॥ वेढियेलों चारीं अंतर्बाह्यात्कारीं । कणव न करी कोणी माझी ॥४॥ बहु पांगविलों बहु नागविलों । बहु दिवस झालों कासाविस ॥ ५ ॥ तुका म्हणे आतां धांव घालीं वेगीं । ब्रीद तुझे जगीं दीनानाथा ॥ ६ ॥

५३०. आम्हांसाठीं अवतार । मत्स्यकूर्मादि सूकर ॥ १ ॥ मोहें धांवें घाली पान्हा । नांव घेतां पंढरीराणा ॥ २ ॥ कोठें न दिसे पाहतां । उडी घाली अवचिता ॥ ३ ॥ सुख ठेवी आम्हांसाठीं । दुःख आपणचि घोटी ॥ ४ ॥ आम्हां घाली

पाठीकडे । आपण कळिकाळासी भिडे ॥५॥ तुका म्हणे कृपानिधी । आम्हां उतरीं नावेमधीं ॥६॥

५३१. कई ऐसी दशा येईल माझ्या अंगा । चित्त पांडुरंगा झुरतसे ॥१॥ नाठवूनि देह पायांचें चिंतन । अवसान तें क्षण नाहीं मध्यें ॥२॥ काय ऐसा पात्र होईन लाभासी । कई हृषीकेसी तुष्टतील ॥३॥ तुका म्हणे धन्य मानीन संचित । घेईन नित्यानित्य प्रेमसुख ॥ ४ ॥

५३२. सत्य तूं सत्य तूं सत्य तूं विठ्ठला । कां गा हा दाविला जगदाकार ॥१॥ सांभाळी सांभाळी आपुली हे माया । आम्हांसी कां भयभीत केलें ॥ २ ॥ रूप नाहीं त्यासी ठेवियेलें नाम । लटकाची श्रम वाढविला ॥३॥ तुका म्हणे कां गा झालासी चतुर । होतासी निष्ठुर निर्विकार ॥४॥

५३३. आम्हां घरीं धन शब्दांचींच रत्नें । शब्दांचींच शस्त्रें यत्न करूं ॥१॥ शब्दाचि आमुच्या जीवाचें जीवन । शब्द वाटूं धन जनलोकां ॥२॥ तुका म्हणे पाहा शब्दचि हा देव । शब्देंचि गौरव पूजा करूं ॥३॥

५३४. घेईन मी जन्म याजसाठीं देवा । तुझी चरणसेवा साधावया ॥१॥ हरिनाम कीर्तन संतांचें पूजन । घालूं लोटांगण महाद्वारीं ॥ २ ॥ आनंदें निर्भर असो भलते ठायीं । सुखदुःखा नाहीं चाड आम्हां ॥ ३ ॥ आणिक सायास न करीं न धरीं आस । होईन उदास सर्वभावें ॥४॥ मोक्ष आम्हां घरीं कामारी ते दासी । हो सांगी तैसा तुका म्हणे ॥५॥

५३५. बरा देवा कुणबी केलों । नाहींतरी दंभें असतों मेलों

॥१॥ भलें केलें देवराया । नाचे तुका लागे पायां ॥ २ ॥ विद्या असती कांहीं । तरी पडतो अपायीं ॥ ३ ॥ सेवा चुकतों संतांची । नागवण हे फुकाची ॥४॥ गर्व होता ताठा । जातों यमपंथें वाटा ॥५॥ तुका म्हणे थोरपणें । नरक होती अभिमानें ॥६॥

५३६. रात्रीदिवस आम्हां युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ॥१॥ जीवाही आगोज पडती आघात । येऊनियां नित्य नित्य वारूं ॥२॥ तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळें । अवघीयांचें काळें केलें तोंड ॥३॥

५३७. होईन भिकारी । पंढरीचा वारकरी ॥ १ ॥ हाचि माझा नेम धर्म । मुखीं विठोबाचे नाम ॥२॥ हेचि माझी उपासना । लागे संतांच्या चरणा ॥३॥ तुका म्हणे देवा । करीन ते भोळी सेवा ॥४॥

५३८. इहलोकींचा हा देह । देव इच्छिताती पाहे ॥ १ ॥ धन्य आम्ही जन्मा आलों । दास विठोबाचे झालों ॥२॥ आयुष्याच्या या साधनें । सच्चिदानंद पदवी घेणें ॥३॥ तुका म्हणे पावटणी । करूं स्वर्गाची निशाणी ॥ ४ ॥

५३९. किती वेळां जन्मा यावें । किती व्हावें फजीत ॥१॥ म्हणऊनि जीव म्याला । शरण गेला विठोबासी ॥ २ ॥ प्रारब्ध पाठीं गाढें । नसरे पुढें चालतां ॥३॥ तुका म्हणे रोकडी हें । होती पाहे फजीती ॥४॥

५४०. कृष्ण माझी माता कृष्ण माझा पिता । बहिणीबंधु चुलता कृष्ण माझा ॥ १ ॥ कृष्ण माझा गुरु कृष्ण माझें तारूं । उतरी पैल पारूं भवनदी ॥ २ ॥ कृष्ण माझें मन ।

कृष्ण माझें जन । सोईरा सज्जन कृष्ण माझा ॥३॥ तुका म्हणे माझा श्रीकृष्ण विसावा । वाटे न करावा परता जीवा ॥ ४ ॥

५४१. गाढवाचे घोडे । आम्ही करूं दृष्टीपुढें ॥ १ ॥ चघळी वाहाणा । माघारिया बांडा सुना ॥ २ ॥ सोंग संपादणी तरी करूं शुद्ध वाणी ॥ ३ ॥ तुका म्हणे खळ । करूं समर्थ निर्मळ ॥ ४ ॥

५४२. दिनरजनी हाचि धंदा । गोविंदाचे पवाडे ॥ १ ॥ संकाल्पिला देह देवा । सकळ हेवा तये ठायीं ॥ २ ॥ नाहीं अवसान घडी । सकळ जोडी इंद्रियां ॥ ३ ॥ कीर्ति मुखें गर्जे तुका । करी लोकां सावध ॥ ४ ॥

५४३. धर्मांचें पाळण । करणें पाखांड खंडण ॥ १ ॥ हेंचि आम्हां करणें काम । बीज वाढवावें नाम ॥२॥ तीक्ष्ण उत्तरें । हातीं घेऊनि बाण फिरे ॥ ३ ॥ नाहीं भीड भाड । तुका म्हणे साना थोर ॥ ४ ॥

५४४. धन्य देह गांव पुण्यभूमि ठाव । तेथें नांदे देव पांडुरंग ॥ १ ॥ धन्य क्षेत्रवासी लोक ते दैवाचे । उच्चारिती वाचे नामघोष ॥ २ ॥ कर कटी उभा विश्वाचा जनिता । वामांगीं ते माता रखुमादेवी ॥ ३ ॥ गरूडापारीं उभा जोडूनियां कर । अश्वत्थ समोर उत्तरामुख ॥ ४ ॥ दक्षिणे शंकर लिंग हरेश्वर । शोभे गंगानीर इंद्रायणी ।।५॥ लक्ष्मीनारायण बल्लाळाचें बन । तेथें अधिष्ठान सिद्धेश्वर ॥ ६ ॥ विघ्नराज द्वारीं बहिरव बाहेरी । हनुमंत शेजारी सहित दोघे ॥ ७ ॥ तेथें वास तुका करितो कीर्तन । हृदयीं चरण विठोबाचे ॥ ८ ॥

५४५. मऊ मेणाहूनि आम्ही विष्णुदास । कठिण वज्रास भेदू ऐसे ॥१॥ मेले जित असो निजालिया जागे । जो जो जें जें मागे तें तें देऊं ॥ २ ॥ भले तरी देऊं गांडीची लंगोटी । नाठाळाचे काठी देऊं माथा ॥ ३ ॥ मायबापाहुनि बहु माया-वंत । करूं घातपात शत्रुहुनि ॥४॥ अमृत तें काय गोड आम्हां-पुढें । विष तें बापुडें कडू किती ॥ ५ ॥ तुका म्हणे आम्ही अवघेचि गोड । जया पुरे कोड त्याचे परी॥ ६ ॥

५४६. मागें बहुता जन्मीं । हेचि करीत आलों आम्ही । भयतापश्रमीं । श्रमले जे निववूं त्या ॥१॥ गर्जों हरीचे पवाडे । मिळों वैष्णव बागडे । पाझर रोकडे । काढूं पाषाणामध्यें ॥ २ ॥ भाव शुद्ध नामावळी । हर्षें नाचों पिटूं टाळी । घालूं पायातळीं । कळिकाळ त्याबळें ॥ ३ ॥ काम क्रोध बंदीखानी । तुका म्हणे दिले दोन्ही । इंद्रियांचे धनी । आम्ही झालों गोसावी ॥ ४ ॥

५४७. वेद अनंत बोलिला । अर्थ इतकाचि साधिला ॥१॥ विठोबासी शरण जावें । निजनिष्ठें नाम गावें ॥ २ ॥ सकळ शास्त्रांचा विचार । अंतीं इतकाची निर्धार ॥ ३ ॥ अठरा पुराणीं सिद्धान्त । तुका म्हणे हाचि हेत ॥ ४ ॥

५४८. न मिळो खावया न वाढो संतान । परि हा नारायण कृपा करो ॥ १ ॥ ऐसी माझी वाचा मज उपदेशी । आणिक लोकांसी हेंचि सांगे ॥ २ ॥ विटंबो शरीर होत कां विपत्ति । परि राहो चित्तीं नारायण ॥ ८ ॥ तुका म्हणे नाशिवंत हें सकळ । आठवे गोपाळ तेंचि हित ॥ ४ ॥

५४९. श्रीसंतांचिया माथा चरणावरी । साष्टांग हे करी

दंडवत ॥१॥ विश्रांतीं पावलों सांभाळा उत्तरीं । वाढलें अंतरीं प्रेमसुख ॥२॥ डौरली हे काय कृपेच्या वोरसे । नव्हे अनारिसें उद्धरलों ॥ ३ ॥ तुका म्हणे मज न घडतां सेवा। पूर्वपुण्यठेवा वोढवला ॥ ४ ॥

५५०. अर्भकाचेसाठीं । पंतें हातीं धरिली पाटी ॥ १ ॥ तैसें संत जगीं । क्रिया करूनी दाविती अंगीं ॥ २ ॥ बाळकाचे चाली । माता जाणूनि पाऊल घाली ॥ ३ ॥ तुका म्हणे नाव। जनासाठीं उदकी ठाव ॥ ४ ॥

५५१. अवघा तो शकुन । हृदयीं देवाचे चरण ॥ १ ॥ येथें नसतां वियोग । लाभा उणें काय मग ॥ २ ॥ संग हरीच्या नामाचा । शुचिर्भुत सदा वाचा ॥ ३ ॥ तुका म्हणे हरीच्या दासा । शुभ काळ दाही दिशा ॥ ४ ॥

५५२. आलिंगनें घडे । मोक्ष सायुज्यता जोडे ॥१॥ ऐसा संतांचा महिमा । झाली बोलायाची सीमा ॥ २ ॥ तीर्थें पर्वकाळ । अवघीं पायांपें सकळ ॥३॥ तुका म्हणे देवा । त्यांची केली पावे सेवा ॥ ४ ॥

५५३. ऐसा ज्याचा अनुभव । विश्वदेव सत्यत्वें ॥ १ ॥ देव तयाजवळीं असे । पाप नासे दर्शनें ॥ २ ॥ काम क्रोधा नाहीं चाली । भूतीं झाली समता ॥३॥ तुका म्हणे भेदाभेद गेले वाद खंडोनी ॥ ४ ॥

५५४. उजळलें भाग्य आतां । अवघी चिंता वारली ॥१॥ संतदर्शनें हा लाभ। पद्मनाभ जोडला ॥२॥ संपुष्ट हे हृदयपेटीं करूनि पोटीं सांठवूं ॥ ४ ॥ तुका म्हणे होता ठेवा । तो या भावा सांपडला ॥ ४ ॥

५५५. काय वानूं आतां न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसे ।। १ ।। थोरीव सांडिली आपुली परिसें । नेणे शिवों कैसें लोखंडासी ।।२।। जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टविती परउपकारें ।। ३ ।। भूतांची दया हे भांडवल संतां । आपुली ममता नाहीं देहीं ।। ४ ।। तुका म्हणे सुख पराविया सुखें । अमृत हें मुखें स्रवतसे ।।५।।

५५६. काय सांगों आतां संतांचे उपकार । मज निरंतर जागविती ।।१।। काय द्यावें त्यांसी व्हावे उतराई । ठेवितां हा पायीं जीव थोडा ।। २ ।। सहज बोलणें हित उपदेश । करूनि सायास शिकविती ।। ३ ।। तुका म्हणे वत्स धेनुवेच्या चित्तीं । तैसें मज येती सांभाळीत ।। ४ ।।

५५७. कोणा पुण्यें यांचा होईन सेवक । जिहीं द्वंद्वादिक दुराविलें ।।१।। ऐसें वर्म मज दावीं नारायणा । अंतरींच्या खुणा प्रकटोनी ।। २ ।। बहु अवघड आहे संतभेटी । तरी जगजेठी करुणा केली ।।३।। तुका म्हणे मग नये वृत्तीवरीं । सुखाचे शेजारी पहुडेन ।।४।।

५५८. जे कां रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।।१।। तोचि साधु ओळखावा । देव तेथचि जाणावा ।। २ ।। मृदु सबाह्य नवनीत । तैसे सज्जनाचे चित्त ।।३।। ज्यासी अपंगिता नाहीं । त्यासी धरी जो हृदयीं ।। ४ ।। दया करणें जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ।। ५ ।। तुका म्हणे सांगूं किती । तोचि भगवंताची मूर्ती ।। ६ ।।

५५९. तुम्ही संत मायबाप कृपावंत । काय मी पतित कीर्ति वानूं ।। १ ।। अवतार तुम्हां धराया कारण । उद्धराया

जन जड जीव ॥२॥ वाढावया सुख भक्ति भाव धर्म । कुळाचार नाम विठोबाचें ॥३॥ तुका म्हणे गुण चंदनाचे अंगीं । तैसे तुम्ही जगीं संतजन ॥ ४ ॥

५६०. पवित्र तो देह वाणी पुण्यवंत । जो वदे अच्युत सर्वकाळ ॥ १ ॥ तयाच्या चिंतनें तरतील दोषी । जळतील रासी पातकांच्या ॥२॥ देव इच्छी रज चरणींची माती । धांवत चालती मागें मागें ॥३॥ काय त्या उरलें वेगळें आणिक । वैकुंठनायक जया कांठीं ॥ ४ ॥ तुका म्हणे देवभक्तांचा संगम तेथें ओघ नाम त्रिवेणीचा ॥ ५ ॥

५६१. पाप ताप दैन्य जाय उठाउठी । झालिया भेटी हरिदासांची ॥ १ ॥ ऐसें बळ नाहीं आणिकांचें अंगीं । तपें तीर्थें जगीं दानें व्रतें ॥ २ ॥ चरणींचे रज वंदी शूळपाणी । नाचती कीर्तनीं त्यांचे माथा ॥ ३ ॥ भव तरावया उत्तम नाव । भिजों नेदीं पाय हात कांहीं ॥ ४ ॥ तुका म्हणे मन झालें समाधान । देखिल्या चरण वैष्णवांचे ॥ ५ ॥

५६२. भक्त ऐसे जाणां जे देहीं उदास । गेले आशापाश निवारुनि ॥ १ ॥ विषय तो त्यांचा झाला नारायण । नावडे धन जन माता पिता ॥ २ ॥ निर्वाणीं गोविंद असे मागें पुढें । कांहींच सांकडें पडों नेदी ॥ ३ ॥ तुका म्हणे सत्यकर्मा व्हावें साह्य । घातलिया भय नरका जाणें ॥ ४ ॥

५६३. शुद्ध बीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥ १ ॥ मुखीं अमृताची वाणी । देह देवाचे कारणीं ॥ २ ॥ सर्वांग निर्मळ । चित्त जैसें गंगाजळ ॥ ३ ॥ तुका म्हणे जाती । ताप दर्शनें विश्रांती ॥ ४ ॥

५६४. संतचरणरज लागतां सहज । वासनेचें बीज जळोन जाय ॥ १ ॥ मग रामनामीं उपजे आवडी । सुख घडोघडी वाढों लागे ॥ २ ॥ कंठीं प्रेम दाटे नयनीं नीर लोटे । हृदयीं प्रगटे नामरूप ॥ ३ ॥ तुका म्हणे साधन सुलभ गोमटें । परि उपतिष्ठे पूर्वपुण्यें ॥ ४ ॥

५६५. संतांनीं सरता केलों तैशापरी । चंदनातें बोरी व्यापियेली ॥ १ ॥ गुण दोष याति न विचारी काहीं । ठाव दिला पायीं आपुलिया ॥ २ ॥ तुका म्हणे आलें समर्थाच्या मना । तरी होय राणा रंक त्याचा ॥ ३ ॥

५६६. सर्व सुखें आजि येथेंचि वोळलीं । संतांचीं देखिलीं चरणांबुजें ॥ १ ॥ सर्व काळ होतों आठवीत मनीं । फिटली ते धणी येणें काळें ॥ २ ॥ तुका म्हणे वाचा राहिली कुंठित । पुढें झालें चित्त समाधान ॥ ३ ॥

५६७. नव्हती ते संत करितां कवित्व । संतांचे ते आप्त नव्हती संत ॥ १ ॥ येथें नाहीं वेश सरतें आडनांव । निवडे घावडाव व्हावा अंगीं ॥ २ ॥ नव्हती ते संत धरितां भोपळा । पांघरतां वाकळ नव्हती संत ॥३॥ नव्हती ते संत करितां कीर्तन । सांगतां पुराण नव्हती संत ॥ ४ ॥ नव्हती ते संत वेदाच्या पठणें । कर्म आचरणें नव्हती संत ॥ ५ ॥ नव्हती संत करितां तप तीर्थाटण । सेविलिया वन नव्हती संत ॥ ६ ॥ नव्हती संत माळा मुद्रांच्या भूषणें । भस्म उधळणें नव्हती संत ॥ ७ ॥ तुका म्हणे नाहीं निरसला देह । तोंवरी अवघे हे संसारिक॥८॥

५६८. भक्तीचा जिव्हाळा । तोचि दैवाचा पुतळा ॥ १ ॥ आणिक नये माझ्या मना । हो कां पंडित शहाणा ॥ २ ॥ नामरूपीं जडलें चित्त । त्याचा दास मी अंकित ॥ ३ ॥ तुका म्हणे नवविध । भक्ति जाणें तोचि शुद्ध ॥ ४ ॥

५६९. आपुलिया हिता जो असे जागता । धन्य माता पिता तयाचिया ॥१॥ कुळीं कन्या पुत्र होती जीं सात्त्विक । तयांचा हरिख वाटे देवा ॥ २ ॥ गीता भागवत करिती श्रवण । अखंड चिंतन विठोबाचें ॥ ३ ॥ तुका म्हणे मज घडो त्यांची सेवा । तरी माझ्या दैवा पार नाहीं ॥ ४ ॥

५७०. बोल बोलतां वाटे सोपें । करणीं करितां टीर कांपे ॥१॥ नव्हे वैराग्य सोपार । मज बोलतां न वाटे खरें ॥ २ ॥ विष खावें ग्रासोग्रासीं । धन्य तोचि एक सोसी ॥ ३ ॥ तुका म्हणे करूनि दावी । त्याचे पाय माझे जीवीं ॥ ४ ॥

५७१. पवित्र तें कुळ पावन तो देश । जेथें हरीचे दास जन्म घेती ॥ १ ॥ कर्म धर्म त्यांचे झाला नारायण । त्यांचेनि पावन तिन्ही लोक ॥ २ ॥ वर्ण अभिमानें कोण झाले पावन । ऐसें द्या सांगून मजपाशीं ॥३॥ अंत्यजादि योनि तरल्या हरि-भजनें । तयांची पुराणें भाट झालीं ॥ ४ ॥ वैश्य तुळाधार गोरा तो कुंभार । धागा हा चांभार रोहिदास ॥ ५ ॥ कबीर मोमीन लतिफ मुसलमान । सेना न्हावी आणि विष्णुदास ॥ ६ ॥ कान्होपात्रा खोदु पिंजारी तो दादु । भजनीं अभेद हरीचे पायीं ॥७॥ चोखा मेळा बंका जातीचा महार । त्यासी सर्वेश्वर ऐक्य करी ॥ ८ ॥ नामयाची जनी कोण तिचा भाव । जेवी पंढरी-

शाव तिये सर्वें ।। ९ ।। मराळ जनक कोण कुळ त्याचें । महिमान तयाचें काय सांगों ।। १० ।। यातायातीधर्म नाहीं विष्णुदासा । निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं ।। ११ ।। तुका म्हणे तुम्ही विचारावे ग्रंथ । तारिलें पतित नेणों किती ।। १२ ।।

५७२. धन्य आजि दिन । झालें संतांचें दर्शन ।।१।। झाली पापा तापा तुटी । दैन्य गेलें उठाउठी ! ।।२।। झालें समाधान । पायीं विसावलें मन ।। ३ ।। तुका म्हणे आले घरां । तोचि दिवाळी दसरा ।। ४ ।।

५७३. तुमचिये दासाचा दास करूनि ठेवा । आशीर्वाद द्यावा हाचि मज ।। १ ।। नवविधा काय बोलिले जे भक्ती । द्यावी माझ्या हातीं संतजनीं ।।२।। तुका म्हणे तुमच्या पायांच्या आधारें । उतरेन खरें भवनदी ।। ३ ।।

५७४. अमंगळ वाणी । नये आयकों ते कानीं ।। १ ।। जो हे दूषी हरीची कथा । त्यासी क्षयरोगव्यथा ।। २ ।। याति वर्ण श्रेष्ठ । परि तो चांडाळ पापिष्ठ ।। ३ ।। तुका म्हणे पाप । माय नावडे ज्या बाप ।। ४ ।।

५७५. कीर्तन चांग कीर्तन चांग । होय अंग हरिरूप ।।१।। प्रेमें छंदें नाचे डोले । हरपला देहभाव ।। २ ।। एकदेशीं जीव कळा । हा सकळा सोयरा ।।३।। तुका म्हणे उरला देव । गेला भेव त्या काळें ।। ४ ।।

५७६. जेथें कीर्तन करावें । तेथें अन्न न सेवावें ।। १ ।। बुका लावूं नये भाळा । माळ घालूं नये गळां ।। २ ।। तट्टावृषभासी दाणा । तृण मागों नयें जाणा ।। ३ ।। तुका म्हणे द्रव्य घेती । देती तेही नरका जाती ।। ४ ।।

५७७. दीन आणि दुर्बळांसी । सुखरासी हरिकथा ।। १ ।। तारूं भवसागरीचें । उंच नीच अधिकार ।। २ ।। चरित्र तें उच्चारावें । केलें देवें गोकुळीं ।। ३ ।। तुका म्हणे आवडी धरी । कृपा करी म्हणवूनी ।। ४ ।।

५७८. स्वर्गींचे अमर इच्छिताती देवा । मृत्युलोकीं व्हावा जन्म आम्हां ।। १ ।। नारायणनामें होऊं जीवन्मुक्त । कीर्तनीं अनंत गाऊं गीतीं ।। २ ।। वैकुंठींचे जन सदा चिंतिताती । कई येथें येती हरीचे दास ।। ३ ।। यमधर्म वाट पाहे निरंतर । जोडोनियां कर तिष्ठतसे ।। ४ ।। तुका म्हणे पावावया पैल पार । नाम मंत्र सार भाविकासी ।। ५ ।।

५७९. नाम घेतां उठाउठी । होय संसारासी तुटी ।। १ ।। ऐसा लाभ बांधा गांठी । विठ्ठलपायीं पडे मिठी ।। २ ।। नामापरतें साधन नाहीं । जें तूं करिसी आणिक कांहीं ।। ३ ।। हांकारोनी सांगे तुका । नाम घेतां राहो नका ।। ४ ।।

५८०. लागोनियां पाया विनवितो तुम्हांला । करें टाळी बोला मुखें नाम ।। १ ।। विठ्ठल विठ्ठल म्हणा वेळोवेळां । हा सुखसोहळा स्वर्गी नाहीं ।। २ ।। कृष्ण विष्णु हरि गोविंद गोपाळ । मार्ग हा प्रांजळ वैकुंठींचा ।। ३ ।। सकळांसी येथें आहे अधिकार । कलियुगीं उद्धार हरीनामें ।। ४ ।। तुका म्हणे नामापासीं चारी मुक्ति । ऐसें बहु ग्रंथीं वोलियेलें ।। ५ ।।

५८१. कामामध्यें काम । कांहीं म्हणा राम राम । जाईल भवश्रम । सुख होईल दुःखाचें ।। १ ।। कळो येईल अंतकाळीं प्राणप्रयाणाचे वेळीं । राहाती निराळी रांडापोरें सकळ ।। २ ।।

जीतां जिसी जैसा तैसा । पुढें आहे रे वोळसा । उगवुनी फांसा । काय करणें तें करीं ॥ ३ ॥ केलें होतें याचि जन्में । अवघें विठोबाच्या नामें । तुका म्हणे कर्में । जाळोनियां तरसी ॥ ४ ॥

५८२. काय नव्हे केलें । एका चिंतिता विठ्ठले ॥ १ ॥ सर्व साधनांचें सार । भवसिंधु उतरी पार ॥ २ ॥ योग याग तपें । केली तयानें अमुपें ॥ ३ ॥ तुका म्हणे जपा । मंत्र त्रिअक्षरी सोपा ॥ ४ ॥

५८३. फळकट तो संसार । येथें सार भगवंत ॥ १ ॥ ऐसा जागवितों मना । सरसें जनासहित ॥ २ ॥ अवघें निरसुनी काम । घ्यावें नाम विठोबाचें ॥३॥ तुका म्हणे देवाविण । केला सीण तो मिथ्या ॥ ४ ॥

५८४. हांकेसरिसी उडी । घालूनियां स्तंभ फोडी ॥ १ ॥ ऐसी कृपावंत कोण । माझे विठाईवांचून ॥२॥ करितां आठव । धांवोनियां घाली कव ॥ ३ ॥ तुका म्हणे गीतीं गातां । नामें द्यावी सायुज्यता ॥ ४ ॥

५८५. मुखीं नाम हातीं मोक्ष । ऐसी साक्ष बहुतांची ॥१॥ वैष्णवांचा माल खरा । तुरतुरा वस्तूंसी ॥ २ ॥ भस्म दंड न लगे काठी । तीर्थ आटी भ्रमण ॥३॥ तुका म्हणे आडकाठी । नाहीं भेटी देवाचे ॥ ४ ॥

५८६. पवित्र तें अन्न । हरिचिंतनीं भोजन ॥ १ ॥ येर वेंठ्या पोट भरी । चाम मशकाच्या परी ॥ २ ॥ जेऊनि तो धाला । हरिचिंतनीं केला काला ॥ ३ ॥ तुका म्हणे चवी आलें । जें कां मिश्रित विठ्ठलें ॥ ४ ॥

५८७. पंढरीसी जा रे आल्यांनो संसारा । दीनांचा सोयरा

पांडुरंग ॥ १ ॥ वाट पाहे उभा भेटीची आवडी । कृपाळू तांतडी उतावीळ ॥ २ ॥ मागील परिहार पुढें नाहीं सीण । झालिया दर्शन एक वेळां ॥ ३ ॥ तुका म्हणे नेदी आणिकांचे हातीं । बैसला तो चित्तीं निवडेना ॥ ४ ॥

५८८. होय होय वारकरी । पाहें पाहें रे पंढरी ॥१॥ काय करावीं साधनें । फळ अवघेंचि तेणें ॥ २ ॥ अभिमान नुरे । कोड अवघेचि पुरे ॥ ३ ॥ तुका म्हणे डोळां । विठो बैसला सांवळा ॥ ४ ॥

५८९. पंढरीची वारी आहे माझे घरीं । आणिक न करीं तीर्थव्रत ॥ १ ॥ व्रत एकादशी करीन उपवासी । गाईन अहर्निशीं मुखीं नाम ॥ २ ॥ नाम विठोबाचें घेईन मी वाचे । बीज कल्पांतींचें तुका म्हणे ॥ ३ ॥

५९०. जोडोनिया धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेंच करी ॥ १ ॥ उत्तमचि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ॥ २ ॥ परउपकारीं नेणें परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ॥ ३ ॥ भूतदया गाई पशूंचें पाळण । तान्हेल्या जीवन वनामाजी ॥ ४ ॥ शांतिरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचे ॥ ५ ॥ तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ॥ ६ ॥

५९१. आलिया संसारा उठा वेग करा । शरण जा उदारा पांडुरंगा ॥ १ ॥ देह हे काळाचे धन कुबेराचें । तेथें मनुष्याचें काय आहे ॥ २ ॥ देता देवविता नेता नेवविता । तेथें याची सत्ता काय आहे ॥ ३ ॥ निमित्ताचा धणी केला असे प्राणी ।

माझें माझें म्हणोनि व्यर्थ गेला ॥ ४ ॥ तुका म्हणे कां रे नाशिवंतासाठीं । देवासवें आटी पाडितोसी ॥ ५ ॥

५९२. आतां उघडी डोळे । जरी अद्यापि न कळे । तरी मातेचिये खोळे । दगड आला पोटासी ॥ १ ॥ मनुष्य देहा ऐसा निध । साधेल ते साधा सिद्ध । करूनि प्रबोध । संत पार उतरले ॥ २ ॥ नाव चंद्रभागेतीरीं । उभी पुंडलीकाचे द्वारीं । कट धरूनिया करीं । उभाउभी पालवी ॥ ३ ॥ तुका म्हणे फुकासाठीं । पायीं घातलीया मिठी । होतो उठाउठी । लवकरीच उतार ॥ ४ ॥

५९३. कां रे नाठविसी कृपाळू देवासी । पोसितो जनासी एकला तो ॥ १ ॥ बाळा दुधा कोण करिते उत्पत्ति । वाढवी श्रीपति सवें दोन्ही ॥ २ ॥ फुटती तरुवर उष्णकाळमासीं । जीवन तयांसी कोण घाली ॥ ३ ॥ तेणें तुझी काय नाहीं केली चिंता । राहे त्या अनंता आठवूनि ॥ ४ ॥ तुका म्हणे ज्याचें नांव विश्वंभर । त्याचें निरंतर ध्यान करीं ॥ ५ ॥

५९४. हरि हरि तुम्ही म्हणा रे सकळ । तेणें मायाजाळ तुटतील ॥ १ ॥ आणिक नका पडूं गाबाळांचे भरी । आहे तिर्थे थोरी नागवण ॥ २ ॥ भावें तुळसीदळ पाणी जोडा हात । म्हणावें पतित वेळोवेळां ॥ ३ ॥ तुका म्हणे हा तंव कृपेचा सागर । नामासाठीं पार पाववील ॥ ४ ॥

५९५. सकळिकांच्या पायां माझी विनवणी । मस्तक चरणीं ठेवितसें ॥ १ ॥ अहो श्रोते वक्ते सकळही जन । बरें पारखून बांधां गाठी ॥ २ ॥ फोडिलें भांडार धन्याचा हा माल । मी तंव हमाल भार वाही ॥ ३ ॥ तुका म्हणे चाली झाली चहूं देशीं । उतरला कसीं खरा माल ॥ ४ ॥

५९६. आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ।।१।। सकळांच्या पायां माझे दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ।।२।। हित तें करावें देवांचें चिंतन । करूनियां मन शुद्ध भावें ।।३।। तुका म्हणे हित होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ।।४।।

५९७. निर्वाहापुरतें अन्न आच्छादन । आश्रमासी स्थान कोंपी गुहा ।।१।। कोठेंही चित्तासीं नसावें बंधन । हृदयीं नारायण सांठवावा ।।२।। नये बोलों फार बैसों जनामधीं । सावधान बुद्धीं इंद्रियें दमी ।। ३ ।। तुका म्हणे घडी घडीने साधावी । त्रिगुणांची गोवी उगवूनि ।।४।।

५९८. नम्र झाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता ।।१।। हेंचि शूरत्वाचें अंग । हरि आणिला श्रीरंग ।।२।। अवघा झाला पण । लवण सकळां कारण ।। ३ ।। तुका म्हणे पाणी । पातळपणें तळा आणी ।।४।।

५९९. ऐका गा ए अवघे जन । शुद्ध मन तें हित ।। १ ।। अवघा काळ नव्हे जरी । समयावरी जाणावें ।।२।। नाहीं कोणी सवें येता । सांचिता या वेगळा ।। ३ ।। बरवा अवकाश आहे । करा साहे इंद्रियें ।।४।। कर्मभूमी ऐसा ठाव । वेवसाव जाणावा ।।५।। तुका म्हणे उत्तम जोडी । जाती घडी नरदेह ।।६।।

६००. पुण्य परउपकार पाप ते परपीडा । आणिक नाहीं जोडा दुजा यासी ।।१।। सत्य तोचि धर्म असत्य तें कर्म । आणिक हें वर्म नाहीं दुजें ।। २ ।। गति तेचि मुखीं नामाचें स्मरण । अधोगति जाण विन्मुखता ।।३।। संतांचा संग तोचि

स्वर्गवास । नरक तो उदास अनर्गळ ॥४॥ तुका म्हणे उघडे आहे हित घात । जयाचें उचित करा तैसें ॥५॥

६०१. मायबापें जरी सर्पीण की बोका । त्यांचे संगें सुखा न पवे बाळ ॥१॥ चंदनाचा शूळ सोनियाची बेडी । सुख नेदी फोडा प्राण नाशी ॥२॥ तुका म्हणे नरकीं घाली अभिमान। जरी होय ज्ञान गर्व ताठा ॥३॥

६०२. एका बीजा केला नास । मग भोगलें कणीस ॥१॥ कळे सकळां हा भाव । लहान थोरांवरी जीव ॥२॥ लाभ नाहीं फुकासाठीं । केल्यावीण जीवा साठी ॥३॥ तुका म्हणे रणीं । जीव देतां लाभ दुणी ॥४॥

६०३. सेवितों हा रस वाटितों आणिकां । घ्यारे होऊं नका रानभरी ॥१॥ विटेवरी ज्याचीं पाऊलें समान। तोचि एक दानशूर दाता ॥२॥ मनाचे संकल्प पावेल सिद्धी । जरी राहे बुद्धी याचे पायीं ॥३॥ तुका म्हणे मज धाडिलें निरोपा । मारग हा सोपा सुखरूप ॥४॥

६०४. रंगीं रंगें रे श्रीरंगे । काय भुललासी पतंगे ॥ १ ॥ शरीर जायाचें ठेवणें। धरिसी अभिलास झणें ॥२॥ नव्हे तुझा हा परिवार । द्रव्य दारा क्षणभंगुर ॥३॥ अंतकाळींचा सोइरा । तुका म्हणे विठो धरा ॥ ४ ॥

६०५. आंधळ्यासी जन अवघेचि आंधळे । आपणासी डोळे दृष्टी नाहीं ॥१ ॥ रोग्या विषतुल्य लागे हें मिष्टान्न । तोंडासी कारण चवी नाहीं ॥ २ ॥ तुका म्हणे शुद्ध नाहीं जो आपण । तया त्रिभुवन अवघें खोटें ॥३॥

६०६. कांहीं नित्यनेमावीण। अन्न खाय तोचि श्वान। वाया मनुष्यपण। भार वाहे तो वृषभ ॥ १ ॥ त्याचा होय भूमीभार। नेणे यातीचा आचार। झाला दावेदार। भोगवी अघोर पितरांसी ॥ २ ॥ अखंड अशुभ वाणी। खरें न बोलेचि स्वप्नीं। पापी तयाहूनि। आणिक नाहीं दुसरा ॥३॥ पोट पोसी एकला। भूती दया नाहीं ज्याला। पाठीं लागे आल्या। अतिताचें दारासीं ॥ ४ ॥ कांहीं संतांचें पूजन। न घडे तीर्थांचें भ्रमण। यमाचा आंदण। सीण थोर पावेल ॥ ५ ॥ तुका म्हणे त्यांनीं। मनुष्यपणा केली हानी। देवा विसरूनी। गेली म्हणतां मी माझें ॥ ६ ॥

६०७. गाढवाचें तान्हें। पालटतें क्षणक्षणें ॥ १ ॥ तैसे अधमाचे गुण। एकाविध नाहीं मन ॥ २ ॥ उपजता बरें दिसे। रूप वाढतां तें नासे ॥३॥ तुका म्हणे भुंकतवेळें। वेळ अवेळ न कळे ॥ ४ ॥

६०८. सत्य संकल्पाचा दाता नारायण। सर्व करी पूर्ण मनोरथ ॥ १ ॥ येथें अळंकार शोभती सकळ। भावबळें फळ इच्छेचें तें ॥२॥ अंतरीचें बीज जाणें कळवळा। व्यापक सकळां ब्रह्मांडाचा ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं चालत तांतडी। प्राप्त काळ घडी आल्यावीण ॥ ४ ॥

६०९. घेऊनियां चक्र गदा। हाचि धंदा करितो ॥ १ ॥ भक्तां राखे पायांपासीं। दुर्जनासी संहारी ॥ २ ॥ अव्यक्त ते

आकारलें । रूपां आलें गुणवंत ॥३॥ तुका म्हणे पुरवी इच्छा । जया तैसा विठ्ठल ॥ ४ ॥

६१०. सांठविला हरि । जिहीं हृदयमंदिरीं ॥ १ ॥ त्यांची सरली येरझार । झाला सकळ व्यापार ॥ २ ॥ हरि आला हाता । मग कैंची भय चिंता ॥ ३ ॥ तुका म्हणे हरि । कांहीं उरों नेदी उरी ॥ ४ ॥

६११. म्हणऊनि शरण जावें । सर्वभावें देवासी ॥ १ ॥ तो हा उतरील पार । भव दुस्तुर नदीचा ॥ २ ॥ बहु आहे करुणावंत । अनंत हें नाम ज्या ॥३॥ तुका म्हणे साक्षी आलें । तरी केलें प्रकट ॥ ४ ॥

६१२. क्षणाक्षणा हाचि करावा विचार । तरावया पार भवसिंधु ॥ १ ॥ नाशिवंत देह जाणार सकळ । आयुष्य खातो काळ सावधान ॥ २ ॥ संतसमागमीं धरावी आवडी । करावी तांतडी परमार्थीं ॥३॥ तुका म्हणे इहलोकींच्या वेव्हारें । नये डोळे धुरे भरूनि राहो ॥ ४ ॥

६१३. शांतीपरतें नाहीं सुख । येर अवघेंचि दुःख ॥ १ ॥ म्हणऊनि शांति धरा । उतराल पैलतीरा ॥ २ ॥ खवळलिया कामक्रोधीं । अंगी भरतीं आधिव्याधि ॥ ३ ॥ तुका म्हणे त्रिविध ताप । जाती मग आपोआप ॥ ४ ॥

६१४. भावें गावें गीत । शुद्ध करूनियां चित्त ॥ १ ॥ तुज व्हावा आहे देव । तरि हा सुलभ उपाय ॥ २ ॥ आणिकांचे कानीं । गुण दोष मना नाणीं ॥ ३ ॥ मस्तक ठेंगणा । करी संतांच्या चरणा ॥ ४ ॥ वेचीं तें वचन । जेणें राहे समाधान ॥ ५ ॥ तुका म्हणे फार । थोडा तरी परउपकार ॥ ६ ॥

६१५. आलिया भोगासी असावें सादर । देवावरीं भार घालुनियां ॥ १ ॥ मग तो कृपासिंधु निवारी सांकडें । येर तें बापुडें काय रंक ॥ २ ॥ भयाचियें पोटीं दुःखाचिया रासी । शरण देवासी जातां भलें ॥ ३ ॥ तुका म्हणे नव्हे काय त्या करितां । चिंतावा तो आतां विश्वंभर ॥ ४ ॥

६१६. तरीच जन्मा यावें । दास विठ्ठलाचे व्हावे ॥ १ ॥ नाहीं तरी काय थोडीं । श्वान शुकरें बापुडीं ॥ २ ॥ ज्यालयाचें तें फळ । अंगीं लागों नेदी मळ ॥३॥ तुका म्हणे भले । ज्याच्या नांवें मानवलें ॥ ४ ॥

६१७. निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म । निर्धार हें वर्म चुकों नये ॥ १ ॥ निष्काम निश्चळ विठ्ठलीं विश्वास । पाहों नये वास आणिकांची ॥ २ ॥ तुका म्हणे ऐसा कोण उपेक्षिला । नाहीं ऐकिला ऐसा कोणी ॥ ३ ॥

६१८. काळ सारावा चिंतनें । एकांतवासी गंगास्नानें । देवाच्या पूजनें । प्रदक्षिणा तुळसीच्या ॥ १ ॥ युक्त आहार विहार । नेम इंद्रियांचा सार । नसावी वासर । निद्रा बहु भाषण ॥ २ ॥ परमार्थ महाधन । जोडी देवाचे चरण । व्हावया जतन । हे उपाय लाभाचे ॥ ३ ॥ देह समर्पिजे देवा । भार कांहींच न घ्यावा । होईल आघवा । तुका म्हणे आनंद ॥ ४ ॥

६१९. आलें देवाजीच्या मना । तेथें कोणाचें चालेना ॥१॥ हरिश्चंद्र ताराराणी । वाहे डोंबाघरीं पाणी ॥ २ ॥ पांडवांचा साहाकारी । राज्यावरोनि केले दुरी ॥ ३ ॥ तुका म्हणे उगेचि राहा । होईल ते सहज पाहा ॥ ४ ॥

६२०. भक्तिप्रेमसुख नेणवे आणिकां । पंडित वाचकां ज्ञानियांसी ॥ १ ॥ आत्मनिष्ठ जरी झाले जीवनमुक्त । तरी भक्तिसुख दुर्लभ त्यां ॥ २ ॥ तुका म्हणे कृपा करील नारायण । तरिच हें वर्म पडे ठावें ॥

६२१. आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी । बोलिले जे ऋषी । साच भावें वर्ताया ॥ १ ॥ झाडूं संतांचे मारग । आडरानीं भरलें जग । उच्छिष्टाचा भाग । शेष उरला तो सेवूं ॥ २ ॥ अर्थे लोपलीं पुराणें । नाश केला शब्दज्ञानें । विषय-लोभी मनें । साधनें बुडविलीं ॥ ३ ॥ पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा । तुका म्हणे करा । जयजयकार आनंदें ॥४॥

६२२. नको मना गुंतूं मायाजाळीं । काळ आला जवळीं ग्रासावया ॥ १ ॥ काळाची उडी पडेल बा जेव्हां । सोडविना तेव्हां मायबाप ॥ २ ॥ सोडविना बंधु पाठीची बहिण । शेजेची कामीण दूर राहे ॥३॥ सोडविना राजा देशीचा चौधरी । आणिक सोईरीं भलीं भलीं ॥ ४ ॥ तुका म्हणे तुला सोडविना कोणी । एक चक्रपाणिवांचूनियां ॥ ५ ॥

६२३. प्रारब्धेंचि जोडे धन । प्रारब्धेंचि वाढे मान ॥ १ ॥ सोस करिसी वाया । भज मना पंढरीराया ॥ २ ॥ प्रारब्धेंचि होय सुख । प्रारब्धेंचि पावें दुःख ॥ ३ ॥ प्रारब्धेंचि भरे पोट । तुका करीना बोभाट ॥ ४ ॥

६२४. करी हेंचि काम । नाम जपे राम राम ॥ १ ॥ लागो हाचि छंद । मना गोविंद गोविंद ॥ २ ॥ तुका म्हणे मना । मज भीक द्यावी दीना ॥ ३ ॥

६२५. घेईं घेईं माझे वाचे । गोड नामे विठोबाचे ।। १ ।। तुम्ही घ्यारे डोळे सुख । पाहा विठोबाचें मुख ।। २ ।। तुम्ही ऐका रे कान । माझ्या विठोबाचे गुण ।। ३ ।। मना तेथें धांव घेईं । राहे विठोबाचे पायीं ।। ४ ।। तुका म्हणे जीवा । नको सोडूं या केशवा ।। ५ ।।

६२६. आम्ही तेणें सुखी । म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखीं ।।१।। तुमचें येर वित्त धन । ते मज मृत्तिकेसमान ।।२।। कंठीं मिरवा तुळसी । व्रत करा एकादशी ।। ३ ।। म्हणवा हरीचे दास । तुका म्हणे मज हे आस ।। ४ ।।

६२७. रूपीं जडले लोचन । पायीं स्थिरावलें मन ।। १ ।। देहभाव हरपला । तुज पाहतां विठ्ठला ।। २ ।। कळों नेदी सुख-दुःख । तहान हरपली भूक ।। ३ ।। तुका म्हणे नव्हे परती । तुझ्या दर्शनें मागुती ।। ४ ।।

६२८. सदा नाम घोष करूं हरिकथा । तेणें सदा चित्ता समाधान ।।१।। सर्व सुख ल्यालों सर्व अलंकार । आनंदें निर्भर डुलतसों ।। २ ।। असो ऐसा कोठें आठवाचि नाहीं । देहींच विदेही भोगूं दशा ।। ३ ।। तुका म्हणे आम्ही झालों अग्निरूप । लागों नेदूं पापपुण्य अंगा ।। ४ ।।

६२९. विषयीं विसर पडिला निःशेष । अंगीं ब्रह्मरस ठसावला ।। १ ।। माझी मज झाली अनावर वाचा । छंद या नामाचा घेतलासे ।।२।। लाभाचिया सोसें पुढें चाले मना । धनाचा कृपणा लोभ जैसा ।। ३ ।। तुका म्हणे गंगा सागर संगमीं । अवघ्या झाल्या उर्मी एकमय ।। ४ ।।

६३०. याजसाठीं केला होता अट्टाहास । शेवटचा दिस गोड व्हावा ।। १ ।। आतां निश्चिंतीनें पावलों विसावा । खुंटलिया धांवा तृष्णेचिया ।। २ ।। कवतुक वाटे झालिया वेचाचें । नांव मंगळाचें तेणें गुणें ।। ३ ।। तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी । आतां दिवस चारी खेळीमेळीं ।। ४ ।।

६३१. ब्रह्मरस गोडी तयासी फावली । वासना निमाली सकळ ज्याचीं ।। १ ।। नाहीं त्या विटाळ अंखड सोवळीं । उपाधीवेगळीं जाणिवेच्या ।। २ ।। मन हें निश्चळ झालें एके ठायीं । तया उणें काई निजसुखा ।। ३ ।। तींचि पुण्यवंतें परउपकारी । प्रबोधी त्या नारीं नरलोकां ।।४।। तुका म्हणे त्यांचे पायीं पायपोस । होऊनियां वास करीन तेथें ।। ५ ।।

६३२. हेचि थोर भक्ति आवडते देवा । संकल्पावी माया संसाराची ।।१।। ठेविलें अनंतें तैसेंचि राहावें । चित्तीं असों द्यावें समाधान ।। २ ।। वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ । भोगणें तें फळ संचिताचें ।।३।। तुका म्हणे घालूं तयावरी भार । वाहूं हा संसार देवापायीं ।। ४ ।।

६३३. आपुला तो एक देव करूनि घ्यावा । तेणेंवीण जीवा सुख नव्हे ।। १ ।। येर तीं माइकें दुःखाचीं जनितीं । नाहीं आदि अंतीं अवसान ।। २ ।। अविनाश करी आपुलिया ऐसें । लावीं मना पिसे गोविंदाचें ।। ३ ।। तुका म्हणे एका मरणेंचि सरे । उत्तमचि उरे कीर्ति मागें ।। ४ ।।

६३४. चाले हें शरीर कोणाचिये सत्ते । कोण बोलवितें हरीवीण ।। १ ।। देखवी ऐकवी एक नारायण । तयाचें भजन चुकों नका ।। २ ।। माणसाची देव चालवी अहंता । मीचि एक

कर्ता म्हणो नये ।। ३ ।। वृक्षाचेंही पान हाले ज्याची सत्ता । राहिली अहंता मग कोठें ।। ४ ।। तुका म्हणे विठो भरला सबाह्य । तया उणें कांहीं चराचरीं ।। ५ ।।

६३५. विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रम अमंगळ ।। १ ।। आइका जी तुम्ही भक्त भागवत । कराल तें हित सत्य करा ।।२।। कोणाही जिवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचें ।। ३ ।। तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुख दुःख भोग पावे ।। ४ ।।

६३६. चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्रही न खाती सर्प तया ।। १ ।। विष तें अमृत आघात तें हित । अकर्तव्य नीत होय त्यासी ।।२।। दुःख तें देईल सर्व सुख फळ । होतील शीतळ अग्निज्वाळा ।। ३ ।। आवडेल जीवां जिवाचिये परी । सकळां अंतरीं एक भाव ।।४।। तुका म्हणे कृपा केली नारायणें । जाणिजे तें येणें अनुभवें ।। ५ ।।

६३७. संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।१।। ज्ञानदेवें रचिला पाया । रचियेलें देवालया ।। २ ।। नामा तयाचा किंकर । तेणें केला हा विस्तार ।। ३ ।। जनार्दन एकनाथ । ध्वज उभारिला भागवत ।। ४ ।। भजन करा सावकाश । तुका झालासे कळस ।। ५ ।।

६३८. देखोनिया तुझ्या रूपाचा आकार । उभा कटीं कर ठेवूनियां ।। १ ।। तेणें माझ्या चित्ता होतें समाधान । वाटतें चरण न सोडावे ।। २ ।। मुखें गातों गीत वाजवितों टाळी । नाचतों राउळीं प्रेमसुखें ।। ३ ।। तुका म्हणे मज तुझ्या नामापुढें । तुच्छ हें बापुडें सकळही ।। ४ ।।

६३९. मी अवगुणी अन्यायी । किती म्हणोन सांगो काई । आतां मज पायीं । ठाय देई विठ्ठले ॥ १ ॥ पुरे पुरे हा संसार । कर्म बळिवंत दुस्तर । राहों नेदी स्थिर । एके ठायीं निश्चळ ॥ २ ॥ अनेक बुद्धीचे तरंग । क्षणक्षणां पालटती रंग । धरूं जातां संग । तंव तो होतो बाधक ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां । अवघी तोडी माझी चिंता । येउनी पंढरीनाथा । वास करी हृदयीं ॥ ४ ॥

६४०. पडतां जड भारी । दासीं आठवावा हरी ॥ १ ॥ मग तो होऊं नेदी शीण । आड घाली सुदर्शन ॥ २ ॥ नामाच्या चिंतनें । बारा वाटा पळती विघ्नें ॥ ३ ॥ तुका म्हणे प्राण । करा देवासी अर्पण ॥ ४ ॥

६४१. आनंदाच्या कोटी । सांठवल्या आम्हां पोटीं ॥ १॥ प्रेम चालिला प्रवाहो । नाम ओघ लवलाहो ॥ २ ॥ अखंड खंडेना जीवन । राम कृष्ण नारायण ॥ ३ ॥ थडी आहिक्य परत्र । तुका म्हणे समतीर ॥ ४ ॥

६४२. अंतरींची घेतो गोडी । पाहे जोडी भावाची ॥ १ ॥ देव सोयरा देव सोयरा । देव सोयरा दीनाचा ॥ २ ॥ आपुल्याच वैभवें । शृंगारावें निर्मळ ॥ ३ ॥ तुका म्हणे जेवी सवें । प्रेम द्यावें प्रीतीचें ॥ ४ ॥

६४३. तेचि संत तेचि संत । ज्यांचा हेत विठ्ठलीं ॥ १ ॥ नेणती कांही टाणाटोणा । नामस्मरणावांचूनी ॥ २ ॥ काया वाचा आणि मनें । धालें चिंतनें इच्छती ॥ ३ ॥ निळा म्हणे विरक्त देहीं । आठवचि नाहीं विषयांचा ॥ ४ ॥

६४४. मार्ग दाउनि गेले आधीं । दयानिधी संत ते ॥ १ ॥

तेणोंचि पंथें चालों जातां । न पडे गुंता कोठें कांहीं ॥ २ ॥ मोडोनिया नाना मतें । देती सिद्धांतें सौरसु ॥ ३ ॥ निळा म्हणे ऐसे संत । कृपावंत सुखसिंधु ॥४॥

६४५. मुख्य महाविष्णु चैतन्याचें मुळ । सांप्रदाय फळ तेथोनियां ॥१॥ हंसरूपी ब्रह्मा उपदेशीं श्रीहरी । चतुःश्लोकीं चारी भागवत ॥ २ ॥ तें गुज विधाता सांगें नारदासी । नारदें व्यासासी उपदेशिलें ॥ ३ ॥ राघव चैतन्य केलें अनुष्ठान । त्यासी द्वैपायनें कृपा केली ॥ ४ ॥ कृपा करूनि हस्त ठेवियेला शिरीं । बोध तो अंतरीं ठसावला ॥ ५ ॥ राघवा चरणीं केशव शरण । बाबाजीशीं पूर्ण कृपा त्याची ॥ ६ ॥ बाबाजीनें स्वप्नीं येऊनि तुकयाला । अनुग्रह दिला निज प्रीति ॥७॥ जगद्गुरु तुका अवतार नामयाचा । संप्रदाय सकळांचा येथूनियां ॥ ८ ॥ निळा म्हणे मज उपदेश केला । संप्रदाय दिला सकळ जना ॥९॥

६४६. इस तन धनकी कौन बडाई । देखत नयनोंमें मिटी मिलाई ॥ध्रु०॥ अपने खातिर महल बनाया । आपकी जाकर जंगल सोया ॥१॥ हड्डी जले जैसे लकडीकी मोली । बाल जले जैसी घासकी पोली ॥ २ ॥ कहत कबीरा सुन मेरे गुनिया । आप मुवे पिछे डुब गई दुनिया ॥ ३ ॥

६४७. हरिसे कोई नहीं बडा । दिवाने क्यों गलफतमें पडा ॥ध्रु०॥ प्रल्हाद बेटा हरिसे लपटा । जभी खंभ कडकडा ॥१॥ गोपीचंद वचन सुनकर । महल मुलुख सब छोडा ॥ २ ॥ हनुमानने सेवा कीन्ही । ले द्रोणागिरी उडा ॥ ३ ॥

पुंडलीकने सेवा कीन्ही । विठ्ठल बिटपर खडा ॥ ४ ॥ कहत कबीरा सुन भाई साधु । हरीचरण चित जडा ॥५॥

६४८. भजो रे भैय्या राम गोविंद हरि ॥ धृ ॥ जप तप साधन कछु नहीं लागत । खरचत नहीं गठरी ॥ १ ॥ संतति संपत्ति सुखके कारन । ज्यामे भूल परी ॥ २ ॥ कहत कबीर ज्या मुख राम नहीं । वो मुख धूल परी ॥ ३ ॥

६४९. गुरुबिन कौन बतावे वाट । बडा बिकट यमघाट ॥धृ०॥ भ्रांतिकी वाडी नादिया बिचमों । अहंकारकी लाट ॥१॥ मदमत्सरकी धार बरसत । माया पवन घनदाट ॥ २ ॥ काम क्रोध दो पर्वत ठाडे । लोभ चोर संगात ॥ ३ ॥ कहत कबीरा सुन मेरे गुनिया । क्यों करना बोभाट ॥ ४ ॥

६५०. मैं गुलाम मैं गुलाम मैं गुलाम तेरा । तूही मेरा सच्चा सांई नाम लेउं तेरा ॥ धृ० ॥ रंग नहीं रूप नहीं नहीं बरन छाया । निराकार निरगुन तूही रघूराया ॥ १ ॥ एक रोटी दे लंगोटी द्वारा तेरा पावूं । काम क्रोध छोडकर हरिगुन गाऊं ॥२॥ मेहरबान मेहेरबान मेहेर करो मेरी । दास कबीर चरण खडा नजर देख तेरी ॥ ३ ॥

६५१. हरि बोलो भाई हरि बोलो । हरि ना बोले वांकु राम दुन्हाई ॥१॥ कायेकु पढता खिन खिन गीता । हरिनाम लिया सो सब कुछ होता ॥२॥ मेरा मेरा कर कर क्या फल पाया । हरिके भजन बिना जूट गमाया ॥ ३ ॥ कहत कबीर हरिगुन गाना । गावत नाचत वैकुंठ जाना ॥ ४ ॥

६५२. कान्हा बन्सरी बजाय गिरिधारी । तोरि बन्सरी

लागी मोको प्यारी ॥ ध्रु० ॥ दही दूध बेंचने जाती जमुना । कान्हाने घागरा फोरी ॥ १ ॥ सिरपर घट घटपर झारी । उसकू उतार मुरारी ॥ २ ॥ सास बुरी रे नणंद हठेली । देवर देवे मोको गारी ॥ ३ ॥ मीरा कहे प्रभु गिरिधर नागर । चरण कमल बलिहारी ॥ ४ ॥

६५३. हरि गुन गावत नाचुंगी ॥ १ ॥ अपने मंदिरमो बैठ बैठकर । गीता भागवत बाचुंगी ॥ २ ॥ ग्यान ध्यानकी गठडी बांधकर । हरिहर संग मैं लागूंगी ॥ ३ ॥ मीराके प्रभु गिरिधर नागर । सदा प्रेमरस चाखुंगी ॥ ४ ॥

६५४. झूलत राधा संग । गिरिधर झूलत राधा संग ॥ध्रु०॥ अबिर गुलालकी धूम मचाई । भर पिचकारी रंग ॥ १ ॥ लाल-भई बिंद्राबन जमुना । केशर चूवत रंग ॥ २ ॥ नाचत ताल अधार सुरभर । धिमी धिमी बाजे मृदंग ॥ ३ ॥ मीराके प्रभु गिरीधर नागर । चरनकमलकु दंग ॥ ४ ॥

६५५. कृष्ण करो यजमान । प्रभु तुम कृष्ण करो यजमान ॥ ध्रु० ॥ जाकी कीरत बेद बखानत । सांखी देत पुरान ॥१॥ मोर मुगुट पीतांबर शोभत । कुंडल झलकत कान ॥ २ ॥ मीराके प्रभु गिरिधर नागर । दरशनको दान ॥ ३ ॥

६५६. तुम बिन मेरी कौन खबर ले । गोवर्धन गिरिधारी ॥ ध्रु० ॥ मोर मुगुट पीतांबर शोभे । कुंडलकी छबी न्यारी ॥ १ ॥ भरी सभामें द्रौपदी ठारी । राखो लाज हमारी ॥ २ ॥ मीराके प्रभु गिरिधर नागर । चरणकमल बलिहारी ॥ ३ ॥

६५७. पग घुंगरू रे पग घुंगरू बांधकर नाची ॥ ध्रु० ॥

मैं अपने तो नारायणकी । हो गयी आपही दासी ।। १ ।। विषका प्याला राजजीने भेजा । पीवत मीरा दासी ।।२।। लोग कहे मीरा भई रे बावरी । बाप कहे कुलनासी ।। ३ ।। मीराके प्रभु गिरि-धर नागर । हरिचरनकी दासी ।। ४ ।।

## विनंतीचे अभंग

६५८. कृपाळु सज्जन तुम्ही संतजन । हेंचि कृपादान तुमचें मज ।। १ ।। आठवण तुम्ही द्यावी पांडुरंगा । कींव माझी सांगा काकुळती ।। २ ।। अनाथ अपराधी पतित आगळा । परि पाया वेगळा नका करूं ।। ३ ।। तुका म्हणे तुम्ही निरविल्यावरी । मग मज हरी उपेक्षीना ।। ४ ।।

६५९. संतांचिया पायीं हा माझा विश्वास । सर्वभावें दास झालों त्यांचा ।। १ ।। तेचि माझें हित करिती सकळ । जेणें हा गोपाळ कृपा करी ।। २ ।। भागलिया मज वाहतील कडे । त्यांचि याने जोडे सर्व सुख ।। ३ ।। तुका म्हणें शेष घेईन आवडीं । वचन न मोडीं बोलिलें तें ।। ४ ।।

६६०. लेकुराचें हित । वाहे माउलीचें चित्त ।। १ ।। ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीती ।। २ ।। पोटीं भार वाहे । त्याचे सर्वस्वही साहे ।। ३ ।। तुका म्हणे माझें । तुम्हां संतावरीं ओझें ।। ४ ।।

६६१. शेवटींची विनवणी । संतजनीं परिसावी ।। १ ।। विसर तो न पडावा । माझा देवा तुम्हांसी ।। २ ।। आतां फार बोलों कायी । अवघे पायीं विदित ।। ३ ।। तुका म्हणे पडिलों पाया । करा छाया कृपेची ।। ४ ।।

६६२. पायाच्या प्रसादें । कांहीं बोलिलों विनोदें ।। १ ।। मज क्षमा करणें संतीं । नव्हे अंगभूत युक्ति ।। २ ।। नव्हे हा उपदेश । तुमचे वडवडलों शेष ।। ३ ।। तुमचें कृपचें पोसणें । जन्मोजन्मीं तुका म्हणे ।। ४ ।।

भजन—ज्ञानेश्वर माउली ज्ञानराज माउली तुकाराम ।

६६३. हेंचि दान दे गा देवा तुझा विसर न व्हावा ।। १ ।। गुण गाईन आवडी । हेंचि माझी सर्व जोडी ।। २ ।। न लगे मुक्ति आणि संपदा । संत संग देई सदा ।। ३ ।। तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हांसी ।। ४ ।।

भजन—जय विठ्ठल जयजय विठ्ठल ।

६६४. बोलिलीं लेकुरें । वेडीं वाकुडीं उत्तरें ।। १ ।। करा क्षमा अपराध । महाराज तुम्ही सिद्ध ।। २ ।। नाहीं विचारला । अधिकार म्यां आपुला ।। ३ ।। तुका म्हणे ज्ञानेश्वरा । राखा पायां पै किंकरा ।। ४ ।।

भजन—ज्ञानदेव तुकाराम ।

६६५. झालें समाधान । तुमचे देखिले चरण ।। १ ।। आतां उठावेंसे मना । येत नाहीं नारायणा ।। २ ।। सुखाडिकपें । येथें सांपडलें कोणें ।। ३ ।। तुका म्हणे भोग । गेला निवारला लाग ।। ४ ।।

आरत्या

६६६. करूनी आरती । चक्रपाणि ओंवाळिती ।। १ ।। आजि पुरले नवस धन्य काळ हा दिवस ।। २ ।। पाहा वो सकळां ।

पुण्यवंत तुम्ही बाळा ॥ ३ ॥ तुका म्हणे वाहे टाळी । उभा संन्निध जवळीं ॥ ४ ॥

६६७. प्रेम सप्रम आरती । गोविंदाते ओवाळिती ॥ १ ॥ धन्य धन्य ते लोचन । नित्य करिती अवलोकन ॥ २ ॥ बाळा प्रौढा आणि मुग्धा । ओवाळिती परमानंदा ॥ ३ ॥ नामा म्हणे केशवाते । देखोनि राहिलों तटस्थें ॥ ४ ॥

६६८. युगें अठ्ठावीस विटेवरी उभा । वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा । पुंडलिका भेटी परब्रह्म आलें गा । चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ॥१॥ जयदेव जयदेव जय पांडुरंगा । रखु- माईवल्लभा राहीच्या वल्लभा पावे जीवलगा । जयदेव जयदेव ॥ ध्रु० ॥ तुळसीमाळा गळां कर ठेऊन कटीं । कांसे पीतांबर कस्तुरी लल्लाटीं । देव सुरवर नित्य येती भेटी । गरुड हनुमंत पुढें उभे राहाती ॥ २ ॥ आषाढी कार्तिकी भक्तजन येती । चंद्र- भागेमाजी स्नानें जे करिती । दर्शन हेळमात्रें तया होय मुक्ति । केशवाशी नामदेव भावें ओवाळिती ॥ ३ ॥

६६९. आरती ज्ञानराजा । महा कैवल्य तेजा सेविती साधु- संत । मनु वेधला माझा ॥ १ ॥ आरती ज्ञानराजा ॥ ध्रु० ॥ लोपलें ज्ञान जगीं । हित नेणती कोणी । अवतार पांडुरंग । नांव ठेविलें ज्ञानी ॥ २ ॥ प्रगट गुह्य बोलें । विश्व ब्रह्मची केलें । रामा जनार्दनीं । पायीं टकचि ठेलें ॥ ३ ॥

६७०. आरती एकनाथा । महाराजा समर्था । त्रिभुवनीं तूंचि थोर । सद्गुरु जगन्नाथ ॥१॥ आरती एकनाथा ॥ध्रु०॥ एकनाथ नाम सार । वेदशास्त्रांचे गुज । संसार दुःख नास ।

महामंत्राचें बीज ॥२॥ एकनाथ नाम घेतां । सुख वाटलें चित्ता । अनंत गोपाळ दासा । घणी न पुरे गातां ॥ ३ ॥

६७१. आरती तुकारामा । स्वामी सद्गुरुधामा । सच्चिदानंद मूर्ति । पाय दाखवी आम्हां ॥ १ ॥ आरती तुकारामा ॥ धृ० ॥ राघवे सागरांत । पाषाण तारिले । तैसे तुकोबाचे । अभंग रक्षिलें ॥ २ ॥ तुकितां तुळनेसी । ब्रह्म तुकासी आलें । म्हणोनि रामेश्वरे । चरणीं मस्तक ठेविलें ॥३॥

## उपसंहार व वरप्रसाद

६७२. घालीन लोटांगण वंदीन चरण । डोळ्यांनीं पाहीन रूप तुझें ॥१॥ प्रेमें आलिंगन आनंदे पूजीन । भावे ओवाळीन म्हणे नामा ॥२॥

भजन—विठ्ठल रखुमाई विठोबा रखुमाई ।

६७३. हेचि व्हावी माझी आस । जन्मोजन्मीं तुझा दास ॥१॥ पंढरीचा वारकरी । वारी चुको नेदी हरी ॥ २ ॥ संतसंग सर्वकाळ । अखंड प्रेमाचा कल्लोळ ॥ ३ ॥ चंद्रभागे स्नान । तुका मागे हेंचि दान ॥४॥

६७४. आकल्प आयुष्य व्हावें तया कुळा । माझिया सकळां हरीच्या दासा ॥१॥ कल्पनेची बाधा न हो कवणे काळीं । ही संतमंडळी सुखी असो ॥ २ ॥ अहंकाराचा वारा न लागो राजसा । माझिया विष्णुदासा भाविकासी ॥ ३ ॥ नामा म्हणे तया असावें कल्याण । ज्या मुखीं निधान पांडुरंग ॥४॥

६७५. मागणें तें एक तुजप्रती आहे । देशील तरी पाहें पांडुरंगा ॥ १ ॥ या संतांसीं निरवीं हेंचि मज देई । आणिक दुजे कांहीं न मागों देवा ॥ २ ॥ तुका म्हणे आतां उदार तूं होई । मज ठेवीं पायीं संतांचिया ॥ ३ ॥

## भजन—ज्ञानदेव तुकाराम

॥ पुंडलीकवरदा हरि विठ्ठल ॥ श्रीज्ञानदेव तुकाराम ॥

## पुरवणी

### दत्तस्तुति

पैलमेरूच्या शिखरीं । एक योगी निराकारी । मुद्रा लावुनि खेचरी । तो ब्रह्मपदीं बैसला ॥ १ ॥ तेणें सांडियेली माया । त्यजियेली कंथा काया । मन गेलें विलया । ब्रह्मानंदा माझारी ॥ २ ॥ अनुहत ध्वनि नाद । तो पावला परमपद । उन्मनी तुर्याविनोदें छंदे छंदे डोलतुसे ॥ ३ ॥ ज्ञानगोदावरीच्या तीरीं । स्नान केलें पांचाळेश्वरीं । ज्ञानदेवाच्या अंतरीं । दत्तात्रेय योगिया ॥ ४ ॥

### नक्रउद्धार

नक्र बोले ऐकें हृषीकेशी । नाममात्रें तारिले गजेंद्रासी । काय कृपें झालें मजविशीं । आतां कसा वा मोकलूनि जासी ॥ १ ॥ कळलें तुझें देवपण आतां । सोडीं ब्रीद आपुले दीना-नाथा ॥ धृ० ॥ दीनानाथ म्हणविसी कशासाठीं । द्वैतभाव

त्वां धारियेला पोटीं । कैसें पाप लाविलें माझे पाठीं । तुझें रूप देखिलें आजि दृष्टि ॥ २ ॥ दीनानाथ बोलती वेद चारीं । साधुसंत गातांती नानापरी । सत्य ब्रीद भिरवत चराचरीं । सोडीं ब्रीद आपुलें झडकरी ॥ ३ ॥ रज मात्रें तारिली अहिल्या शिळा । नामें करूनि उद्धारिलें अजामेळा । पापी कैसा मी घननीळा । तुझें रूप देखिलें म्यां आजि डोळां ॥ ४ ॥ न्याय ब्रीद घेईन तुझें आतां । पापी कैसा मी सांग दीनानाथ । कैसें पाप मारिलें माझ्या माथां । अझूनि लाज कां नये तुझ्या चित्ता ॥ ५ ॥ नक्र बोले देवासीं हांसूं आलें । निंदा नोहे स्तवन माझें केलें । दीनानाथें तात्काळ उद्धारिलें । विष्णुदास नामा कौतुकें बोले ॥ ६ ॥

२९३३ २८७९२ २३/२०१०

# अभंग सूची


| अभंग | क्रमांक |
|---|---|
| **ॐ** | |
| ॐ नमो भगवते | ७१ |
| ॐ नमो शिवा | १९० |
| **अ** | |
| अकार उकार | ४२३ |
| अगा ये सावळ्या | २७८ |
| अगाध तुझी | ५०५ |
| अगा ये वैकुंठ | ३२७ |
| अंगीकार ज्याचा | ३८५ |
| अंडज जारज | ४३७ |
| अंतराची घेतो | ६४२ |
| अधरी धरूनी वेणू | ११४ |
| अनंत जुगाचा | २६९ |
| अनंत ब्रह्मांडे | ३५९ |
| अनंत रूपाचे हें | २२४ |
| अनादि अंबिका | २०८ |
| अनादि निर्गुण | २०५ |
| अनुपम्य मनोहर | ४७७ |
| अमंगळ वाणी | ५७४ |
| अर्भकाचेसाठी | ५५० |
| अल्प भाव अल्प | २९६ |
| अलक्ष लक्षी मी | ८५ |
| अवघाचि संसार | ४६७ |
| अवघा तो शकून | ५५१ |
| अवघीच तीर्थे | १५९ |

| अभंग | क्रमांक |
|---|---|
| अवघेचि त्रैलोक्य | ५१० |
| अवघे हरिजन | २८ |
| अवघ्या दशा | ३०३ |
| अवघ्या सोडियल्या | ४०५ |
| अवताराची राशी | ३३ |
| अशौचिया जपो | ४४१ |
| अष्टांगयोगें | ४६१ |
| अहंवाघा सोहंवाघा | २६८ |
| अहो क्रोधे यावे | ४३१ |
| **आ** | |
| आइक पांडुरंगा | ३१९ |
| आकल्प आयुष्य | ६७४ |
| आकार स्थूळ | ४२९ |
| आकाशींची वाणी | ३४७ |
| आजि ओस | ४०८ |
| आजि संसार | ४४५ |
| आजि कां वो | १३५ |
| आजि नवल मी | १३३ |
| आणिक दुसरे | ५१७ |
| आणिकांची स्तुस्ति | ५१५ |
| आंत हरि बाहेर | १२६ |
| आता उघडी डोळे | ५९२ |
| आतां ऐसे करू | ४०३ |
| आतां कोठे धावें | ५२ |
| आतां जेऊ हेंचि | ४१२ |
| आतां तरी पुढे | ५९६ |

| अभंग | क्रमांक |
|---|---|
| आंता तुज कळेल | २८८ |
| आतां तुम्ही कृपावंत | ६ |
| आतां धर्माधर्मी | २९४ |
| आतां पावेन स | २७६ |
| आतां मज धरवावी | २७९ |
| आता माझा नेणों | ३०१ |
| आतां मी न पडे | २८७ |
| आतां येणे बळें | ३१८ |
| आदि आत्मज्योति | २०१ |
| आदिनाथ उमा | १८८ |
| आदिनाथ गुरू | १८९ |
| आंधळ्या पांग | ८० |
| आंधळ्याशी जन | ६०५ |
| आनंद अद्वय | २१८ |
| आनंदले वैष्णव | ४२१ |
| आनंदाच्या कोटी | ६२१ |
| आनंदोनि म्हणे | ३७० |
| आपुला तो एक | ६३३ |
| आपुलिया हिता | ५६९ |
| आपुलेनि भारे | ४४३ |
| आपुलेनि रंगें | ४६५ |
| आम्हां घरी धन | ५३३ |
| आम्हांसाठी अव | ५३० |
| आम्ही कापडी रे | १९२ |
| आम्ही तेणे सुखी | ६२६ |
| आम्ही नामाचे धा | ५१८ |
| आम्ही वैकुंठवासी | ६२१ |
| आरती एकनाथा | ६७० |

| अभंग | क्रमांक |
|---|---|
| आरती तुकारामा | ६७१ |
| आरती ज्ञानराजा | ६६९ |
| आरंभिला यज्ञ | ३७१ |
| आरंभी आवडी | ४१५ |
| आलिंगन घडे | ५५२ |
| आलिया भोगासी | ६१५ |
| आलिया संसारा | ५९१ |
| आले देवाजीच्या | ६१९ |
| आले हो संसारा | २८५ |
| आवडे हें रूप | १५ |
| आषाढी कार्तिकी | ४७९ |
| आहा आहा रे | १९९ |
| आळंदी हे गाव | २३९ |
| **इ** | |
| इतुले करी देवा | ३२३ |
| इवलेंसे रोप | ४४७ |
| इस तनधनकी | ६४६ |
| इहलोकींचा हा | ५३८ |
| **उ** | |
| उंच नीच काही | ३८३ |
| उंच पताका | ४२५ |
| उजळले भाग्य | ५५४ |
| उठा अरुणोदय | २४ |
| उठा उठा प्रभात | २१ |
| उठा उठा साधुसंत | २० |
| उठा जागे व्हा रे | २२ |
| उठा पांडुरंगा आता | २३ |
| उठा पांडुरंगा प्र. | २५ |
| उठा सकळ जन | ३१ |
| उठोनि प्रातःकाळी | ३९२ |
| उत्तम हा चैत्र | ३६८ |
| उदार भक्त | ५०० |
| उपजोनियां पुढती | ४११ |
| उपजोनि संसारीं | ४३५ |
| उपदेश मदालसा | ३७४ |
| उभा देखिला मी | ३३२ |
| उभारिला ध्वज | २२८ |
| **ए** | |
| एक आपण साधु | ३३८ |
| एक गावूं आम्ही | २२२ |
| एक तत्त्वनाम | १८१ |
| एक नाम हरि | १७० |
| एक मागणें | ३३० |
| एकलें न कंठेचि | १४७ |
| एकादशीस अन्नपा | ३७७ |
| एक बीजा केला | ६०२ |
| एकीं एकटचि | १४६ |
| एकी एकपणाचा | १५० |
| एके घाई खेळतां | २६६ |
| ऐक ऐक सखये | ११९ |
| ऐका गा ए अवघे | ५९९ |
| ऐसा ज्याचा अनुभ | ५५३ |
| ऐसी वाट पाहे | ३६ |
| ऐसी हे गर्जवूं | २९७ |
| **ओ** | |
| ओले मृतिकेचें | ७० |
| **क** | |
| कई ऐसी दशा | ५३१ |
| कई देखता हो | ३३३ |
| कंठी धरिला | ४१० |
| कनवाळू कृपाळु | २०४ |
| कन्या सासुऱ्याशी | ५२० |
| कर जोडूनि विन | ६२ |
| कर्म आणि धर्म | ४४० |
| करी हेंचि काम | ६२४ |
| करूनि उचित | ८ |
| करूनी आइतें | ३८२ |
| करूनि आरती | ६६६ |
| करूनि विनवणी | ३४ |
| कशी जाऊं मी | ११२ |
| कसा मला टाकुनी | १२२ |
| कां गा केविलवाणा | ३८ |
| कांदा मूळा भाजी | ४९६ |
| कन्हया रे जगजेठी | १२५ |
| कान्हा बन्सरी | ६५२ |
| कान्होबा तुझी | ४३२ |
| कानीं घालूनियां | ४६६ |
| काम घातला | २५२ |
| कामामध्यें काम | ५८१ |
| कामे नेलें चित्त | ४३ |
| काय आम्ही भक्ति | ३२१ |
| काय उणे कां | १३९ |
| काय करिसी | ४२७ |
| काय काय करितो | ३२९ |
| काय नव्हे केलें | ५८२ |
| काय मी उद्धार | २८१ |
| काय वानू आतां | ५५५ |
| काय सांगों आता | ५५६ |
| का रे नाठविसी | ५९३ |
| काल्याचिये आसे | ४०७ |
| कां सांडिसी गृहा | ४७३ |

| अभंग | क्रमांक |
|---|---|
| कांहीं नित्यनेमा | ६०६ |
| कांहीं नेणोनियां | २१३ |
| कांहीच न होनिया | १५४ |
| कां हो तुम्ही | २७ |
| कां हो माझी | ३१५ |
| काळ वेळ नाम | १७६ |
| काळ सारावा | ६१८ |
| किती वेळां जन्मा | ५३९ |
| कीर्तन चांग | ५७५ |
| कुंचे पताकांचे | ५२६ |
| कुळगुरु वसिष्ठ | ३६० |
| केली सीता शुद्धि | २५४ |
| कैलासीचा देव | १९७ |
| कैवल्याचा पुतळा | २३७ |
| कोण सुख धरोनि | २९० |
| कोण पुण्यें यांचा | ५५७ |
| कोणी एकी भुलली | १२७ |
| कोणी सुना कोणी | १४३ |
| कृपाळू सज्जन | ६५८ |
| कृष्ण करो यजमान | ६५५ |
| कृष्ण गोकुळी जा | ३५७ |
| कृष्ण माझी माता | ५४० |
| कृष्णमूर्ति होय गे | १२० |
| कृष्णाला भुलविले | १२१ |
| कृष्णे वेधिली | ९४ |
| **ख** | |
| खांद्यावरी कांवळी | ११८ |
| खेळ मांडियेला | २६३ |
| **ग** | |
| गंगा गेली सिंधू | ४९२ |
| गरूडाचे पायीं | १० |
| गवळण म्हणती | ५०४ |
| गाई गोपाळ | १३० |
| गाढवाचे घोडे | ५४१ |
| गाढवाचें तानें | ६०७ |
| गाते श्रोते आणि | ४१८ |
| गातो ऐका | ३८१ |
| गातों वासुदेव मी | ६७ |
| गिरी गव्हारें | ३४३ |
| गीता गीता गीता | ५०२ |
| गुणा आले विटे | ५१२ |
| गुरुविन कोन | ६४९ |
| गुरु हा संतकुळी | ४६९ |
| गेले टळले पहार | ६८ |
| गोकुळींच्या सुखा | ३५८ |
| गोधने चाराया | १२४ |
| गौळणी गाऱ्हाणे | १०६ |
| **घ** | |
| घनु वाजे घुणघुणा | ९८ |
| घरदार वोखटे | ४७२ |
| घाली कवाड | १४० |
| घालीन लोटांगण | ६७२ |
| घालूनिया भार | १८६ |
| घुळघुळा वाजती | ५४ |
| घई घेई माझे | ६२५ |
| घेईन मी जन्म | ५३४ |
| घेऊनियां चक्रगदा | ६०९ |
| घ्यारे भोकरे | ४०६ |
| **च** | |
| चला आळंदीला | २३६ |
| चला बाई पांडुरंग | ४०९ |
| चला वळूं गाई | ४०४ |
| चहू वेदी जाण | १५७ |
| चांगला तरी पूर्ण | ३२० |
| चांगलें नाम | ३१३ |
| चाले हें शरीर | ६३४ |
| चित्त शुद्ध तरी | ६३६ |
| चित्ती तुझे पाय | ४५ |
| चुराचुराकर | ४१३ |
| चोक भरियेला | २०३ |
| **ज** | |
| जग जोगी जग | ८४ |
| जन्म जन्मांतरी | २५८ |
| जन हें सुखाचे | ५२१ |
| जप तप कर्म | १७९ |
| जंबु या द्विपामाजी | ७४ |
| जयाचिये द्वारीं | २४० |
| जया परमार्थाची | ५९ |
| जर हे आकाश | २२५ |
| जंववरी रे तंववरी | ४७४ |
| जंव हें सकळ | ३१२ |
| जळोत तीं येथें | ४० |
| जळो माझे कर्म | ३९ |
| जाणीव नेणीव | १८० |
| जाणे भक्तीचा | ५६८ |
| जीवीचिया जीवा | १०० |
| जे कां रंजले | ५५८ |

| अभंग | क्रमांक |
|---|---|
| जेणे हा जीव | २८० |
| जेथे कीर्तन करावें | ४७६ |
| जे शंभूनें धरिले | ४३९ |
| जे सुख क्षीर | ४९७ |
| जोडोनिया जोडी | ४५२ |
| जोडोनिया धन | ५९० |
| जो निर्गुण निरा | ५०९ |
| जोहार मायबाप | ८८ |
| ज्याचिये आवडी | ९९ |

**झ**

| अभंग | क्रमांक |
|---|---|
| झणी दृष्टी लागो | १६ |
| झाली संध्या संदेह | ५०६ |
| झाले रामराज्य | २६२ |
| झालें रामाधान | ६६५ |
| झालें ज्ञानेश्वर | ३९१ |
| झूलत राधा | ६५४ |

**ठ**

| अभंग | क्रमांक |
|---|---|
| ठाकलोंसे द्वारी | ५२६ |

**त**

| अभंग | क्रमांक |
|---|---|
| तरीच जन्मां यावे | ६१६ |
| तरी म्यां आळ | ३०६ |
| ताप हें हरण | ३२६ |
| तिन्ही देव जैसे | २२९ |
| तीर्थ व्रत नेम | १६७ |
| तुज पाहतां | ४ |
| तुजवीण एकली रे | ९३ |
| तुज सगुण म्हणो | ४५५ |
| तुजसवें आम्ही | ४२ |
| तुझिया पार नाही | ३१४ |
| तुझिया सत्तेनें | ४८९ |
| तुझिया निढळी | २९ |
| तुझी आण वाहीन | ४५७ |
| तुझी संगति | १२३ |
| तुझी सेवा करीन | ४४९ |
| तुझें दास्य करूं | ४४ |
| तुझें श्रीमुख सुंदर | ११० |
| तुझ्या मुरलीची | ११५ |
| तुमचिये दासाचा | ५७३ |
| तुम बिन मेरो | ६५६ |
| तुम्ही विश्वनाथ | १९३ |
| तुम्ही संत माय | ५५९ |
| तुम्ही सनकादिक | ५ |
| तुळशीमाळा घा | ३१६ |
| तूंचि अनाथाचा | २८२ |
| तूं बळिया शिरोमणि | ३३१ |
| तू माझा स्वामी | ४५० |
| तूं माझी माऊली | ४८४ |
| तूं विटेवरी सखये | २४३ |
| तेचि संत तेचि | ६४३ |
| त्रिगुण असार | १५८ |
| त्रिभंगी देहुडा | ९१ |
| त्रिवेणी संगमी | १६५ |
| तृप्ति भुकेली | ४५८ |

**द**

| अभंग | क्रमांक |
|---|---|
| दशरथ राजा | ३६३ |
| दशरथे मारिला | ३५५ |
| दास्य करी दासाचें | ३०९ |
| दिनरजनी हाचि | ५४२ |
| दिसे सगुण हा | १४९ |
| दीन आणि दुबळा | ५७७ |
| दीप दीपिका | ४२० |
| दुडीवरी दुडी | ११७ |
| दुर्बुद्धि ते मना | ५२५ |
| दुर्लभ रे दुर्लभु | ४७५ |
| देखत होतो आधी | ७९ |
| देखिले तुमचे चरण | ५१ |
| देखोनिया तुझ्या | ६२८ |
| देवकीचे तेज | ३५२ |
| देव ते मंत | ५१२ |
| देव वसे चित्ती | ५२४ |
| देवांगना हाती | ३६९ |
| देवाचिये द्वारी | १५६ |
| देवा तुज चुकलो | ७३ |
| देवा तूं आमचा | २९३ |
| देवा तू कृपा | २८९ |
| देवा मी चांडाळ | ३२८ |
| देश-वेश नव्हे माझा | ८२ |
| देह जावो अथवा | ४८५ |
| दोन्ही हात ठेवूनी | २२६ |
| दोन्हीं बाही संता | ४१६ |

**ध**

| अभंग | क्रमांक |
|---|---|
| धणी न पुरे | ५११ |
| धन्य आजि दिन | ५७२ |
| धन्य देहू गांव | ५४४ |
| धर्म रक्षावयासाठीं | ५२३ |
| धर्माचें पाळण | ५४३ |
| धरिला पंढरीचा | ४९५ |

| अभंग | क्रमांक |
|---|---|
| धरिला पालव न | १४१ |
| धाले मन पोट | ४०१ |
| **न** | |
| नकळे तें कळों | २१७ |
| नका काही उप | १३७ |
| नको नको मना | ६२२ |
| नको ब्रह्मज्ञान | १९ |
| न धरी उदास | ९ |
| न पवे सन्निध | २९२ |
| न बोलसी तेंही | २८६ |
| न बोलेचि कांही | ३६४ |
| न मिळो खावया | ५४८ |
| नमो ज्ञानेश्वरा | २३० |
| नम्र झाला भूता | ५९८ |
| नव्हती ते संत | ५६७ |
| नव्हतें एक ना | १५१ |
| नव्हे तेचि कैसे | २६५ |
| न सांगतां तुम्हा | ४१ |
| नाचू कीर्तनाचे | ४८३ |
| नानापरि समजा | १०९ |
| नाम घेतां उठा | ५७९ |
| नाम प्रल्हाद | ४३६ |
| नाम संकीर्तन वै | १७४ |
| नाम संकीर्तन सा | १८३ |
| नित्य धर्म नाम | ४७० |
| नित्य नेम नामी | १७७ |
| नित्य सत्यामित | १६९ |
| नित्यानंदापुढे | १५२ |
| निमिष नलगे | ४३० |
| निरखित निरखित | ४४४ |
| निर्गुण निराकार | २४५ |
| निर्वाहापुरतें | ५९७ |
| निवृत्ति शोभे | ३८८ |
| निष्ठावंत भाव | ६१७ |
| नेणो ब्रह्ममार्ग | २१५ |
| **प** | |
| पग धुंगरु | ६५७ |
| पडता जड भारी | ६४० |
| पडिली भुली | १३८ |
| पडिले दूरदेशीं | ४७ |
| पंढरपुरीचा निळा | १०१ |
| पंढरपूर पाटणीं गा | ७५ |
| पंढरीचा वास | ४९० |
| पंढरीची वारी | ५८९ |
| पंढरीच्या सुखा | ४८१ |
| पंढरीये माझे | ३८७ |
| पंढरीसी जारें | ५८७ |
| पति जन्मला | २४४ |
| पतिव्रता नेणें | ५१४ |
| पतिव्रते जैसा | ५१६ |
| पंधरा दिवसा | ७८ |
| पन्नास अक्षरी | ४१७ |
| परब्रह्म निष्काम | १०२ |
| परब्रह्म पूर्ण | ३६६ |
| पर्वताप्रमाणे | १६२ |
| परिमाळाची धांव | ४१९ |
| परियेसी गव्हारा | ४३४ |
| पवित्र ते अन्न | ५८६ |
| पवित्र तें कुळ | ५७१ |
| पवित्र तो देह | ५६० |
| पवित्र सुदिन | २५० |
| पण्मुखे वेदाच्या | २३२ |
| पळाले ते भ्याड | ४०० |
| पांगुळ झालों देवा | ७८ |
| पांचासहित | ४४२ |
| पांडुरंगकांती | २११ |
| पाप ताप दैन्य | ५६१ |
| पापी जे अभक्त | ३४५ |
| पायाच्या प्रसादे | ६६२ |
| पावला प्रसाद | ३९५ |
| पाहतां श्रीमुख | १७ |
| पाहाती गौळणी | ४०२ |
| पाहे पां ध्वजेचे | ४६८ |
| पाहे प्रसादाची | ३९४ |
| पिंगळा महाद्वारीं | २७० |
| पिंड धारीने | ३७३ |
| पिंडांड ब्रह्मांड | २०६ |
| पुण्य परउपकार | ६०० |
| पुण्यवंत पाताळ | ४९४ |
| पुण्यवंत व्हावे | ३८९ |
| पूर्वजन्मी पाप केले | ७२ |
| पूर्वजन्मी सुकृतें | ४२४ |
| पूर्वी तूं अनुज | ३४९ |
| पैल आला राम | २५६ |
| पैल आला राम | ३५७ |
| पैल तो गे काऊ | ४३१ |
| पैल विळाचिये | ४८ |
| प्रारब्धेचि जोडे | ६२३ |
| प्रेम सप्रेम आरती | ६६७ |
| **फ** | |
| फळकट तो संसार | ५८३ |

| अभंग | क्रमांक |
|---|---|
| फिरविलें देऊळ | ५२२ |
| फिरविली दानी | ३५६ |
| फुगडी फू गे | २४९ |
| **ब** | |
| बरवा झाला | २७४ |
| बरवा वो हरि | ४५९ |
| बरवें झालें आजि | ३०० |
| बरवें झालें आलों | २९५ |
| बरवें झाले ला | ३०२ |
| बरा देवा कुणबी | ५३५ |
| बरें झालें आजि | ५१९ |
| बहिरा झालों | ९० |
| बहुत जाचलों | ३११ |
| बाबा अहंकार | ५५ |
| बाबा ममतानिशीं | ५३ |
| बाराही साळा | २६७ |
| बाळपणीं हरि | १३१ |
| बाळ सगुण गुणाचे | १०४ |
| बोल बोलता | ५७० |
| बोल बोले अबोले | ६५ |
| बोलावा विठ्ठल | २२३ |
| बोलिलीं लेंकुरें | ६६४ |
| बोलोनिया दाऊं कां | ३७ |
| ब्रह्म जैसे तैशा | ३३९ |
| ब्रह्मरस गोडी | ६३१ |
| ब्रह्मी स्फुरें जें | ४९८ |
| **भ** | |
| भक्त ऐसे जाणा | ५६२ |
| भक्तांकारणे येणे | ९७ |
| भक्तिप्रेम सुख | ६२० |
| भक्ति प्रेमाविण | ५०३ |
| भक्तिचिया पोटीं | ३० |
| भगवंता तुजकारणे | ८३ |
| भजो रे भैय्या | ६४८ |
| भरिला उलंडूनि | १३६ |
| भवसागर तरतां | २२७ |
| भस्म उटी | १९५ |
| भाव धरूनियां | ५०१ |
| भावें गावें गीत | ६१४ |
| भावेंवीण भक्ति | १५९ |
| भीमातीरी एक | २६४ |
| भुलविलें वेणुनादे | ११३ |
| भ्रम धरिसी | २१२ |
| **म** | |
| मऊ मेणाहूनि | ५४५ |
| मज ते हासतील | २९९ |
| मदालसा म्हणे पुत्रा | ३७६ |
| मनमोहन मुरली | १११ |
| मन हें धालें | ४७ |
| मन हें राम | २५९ |
| मन राजा एक | ६९ |
| मनुष्य करिसी | ४८६ |
| मयूरादि पक्षी | ३५४ |
| मागणे तें एक | ६७५ |
| मागुता हाचि | ३०८ |
| मागें बहुता जन्मीं | ५४६ |
| माझा कृष्ण देखि | १०८ |
| माझा तंव खुंटला | ३०५ |
| माझे कुळींची | २०७ |
| माझे चित्त तुझे | ३५ |
| माझ्या अंतरींचा | १८५ |
| माझ्या कान्हाचें | ४६४ |
| माझ्या जीवींची | ४४८ |
| माझ्या मीपणाचा | १५३ |
| माझ्या विठोबाचा | १८७ |
| मायबापें जरी | ६०१ |
| मार्ग दाउनी गेले | ६४४ |
| मी अवगुणी | ६३९ |
| मी तंव अनाथ | २७५ |
| मी तों अल्प मति | २५५ |
| मी माझे कल्पनेनें | ७७ |
| मी वासुदेव नामें | ६३ |
| मुका झालो वाचा | ८९ |
| मुखी नाम हातीं | ५८५ |
| मुख्य महाविष्णु | ६४५ |
| मुंगी व्याली | ४८७ |
| मुरली मनोहर रे | ११६ |
| मेळवूनी सगळे | ३९७ |
| मैं गुलाम मैं | ३५० |
| मैं भूली घर | १४४ |
| मोक्ष मेल्यापाठी | ४७६ |
| म्हणवूनि शरण | ६११ |
| मृत्युलोकी एक | ७६ |
| म्हैसीपुत्रामुखें | २३१ |
| **य** | |
| यम नियम पाप | ४३३ |
| यशोदे घराकडे | १०३ |
| याजसाठी केला | ६३० |
| यातिकुळ माझें | ९६ |

| अभंग | क्रमांक |
|---|---|
| यात्रे अलंकापुरा | २३३ |
| याल तर यारे | ३९८ |
| युगे अठ्ठावीस | ६६८ |
| येई वो येई वो | ५० |
| येई वो कान्हाई | ८६ |
| येऊनी संसारी | ५१९ |
| ये ग ये ग विठाबाई | ११ |
| येणे ऐकलें वो | १५५ |
| येणे मुखे तुझें | १८ |
| येतसे दशरथ | ३६२ |
| येतिया पुसे | ४९ |
| ये दशे चरित्र | २९६ |
| योग याग विधी | १३० |
| योगिया दुर्लभ | ३२ |
| योगियां मुनि | ९२ |
| योगी पावन | ३३४ |
| **र** | |
| रंगा येई वो ये | २०२ |
| रंगी रगे रे | ६०४ |
| रत्नजडित सिंहासन | ३९० |
| रसने वा रसु | ४६२ |
| राजस सुकुमार | १३ |
| राजा म्हणे इच्छा | ३६१ |
| रात्रंदिवस आ | ५३६ |
| राधा आणि तो | १०५ |
| रामकृष्ण गीती | ६६ |
| रामकृष्ण नामें | २३१ |
| राम बरवा कृष्ण | ४६० |
| राम म्हणतां | २६० |
| राम राम दोन्ही | ६४ |
| रावणे हें केलें | ३६५ |
| राहो आतां हेंचि | ३ |
| रुणुझुणु रुणु | ४२८ |
| रूप पाहतां | १ |
| रूपीं जडले लो | ६२७ |
| **ल** | |
| लहानपण दे गा | ५२८ |
| लक्ष लावूनि अंतरी | ९५ |
| लक्ष्मीवल्लभा | ५२७ |
| लागोनिया पाया | ५८० |
| लेकुराचें हित | ७ |
| **व** | |
| वचन ऐका | २ |
| वडाच्या पानी | २७२ |
| वरी भगवा झाला | २३६ |
| वसुदेवा देत | ३५० |
| वाजतसे वोंव | ४५३ |
| वाट पाहे बा | ४६ |
| वाराणसी यात्रे | ४५१ |
| वारी वो वारी | २७१ |
| वासुदेव स्मरण पाप | ५७ |
| वासुदेव स्मरणें | ५६ |
| वासुदेवा हृषीकेशा | ३४६ |
| विठ्ठल आमुचें | २७३ |
| विठ्ठल टाळ | २२० |
| विठ्ठल नाम तुच्चा | २१० |
| विठ्ठल नाही जये | २०९ |
| विठ्ठल भीमातीर | ३२५ |
| विठ्ठल विठ्ठल मं | २१६ |
| विठ्ठल विठ्ठल ये | २२१ |
| विठ्ठल हा चित्तीं | २१९ |
| विठा माझा लेंकुर | ४९३ |
| विदेह आत्मलिंगा | २०० |
| विभाग सत्वर | ३७२ |
| विमानांची दाटी | ३५३ |
| विरंचीचा बाप | ३६७ |
| विषय ओढीं | २८४ |
| विषया सेवितां गा | ६१ |
| विष्णुमय जग | ६३५ |
| विष्णुविण जप | १६४ |
| विषयी विसर | ६२९ |
| वेद अनंत बो | ५४७ |
| वेदशास्त्रप्रमाण | १७५ |
| वृंदावनी वेणु | १०६ |
| **श** | |
| शरण शरण एक | ३७९ |
| शरण शरण ह | २५१ |
| शरीर दुःखाचें | ३२२ |
| शांतीपरतें नाहीं | ६१३ |
| शिके लावियेलें | ३९९ |
| शिव तो निवृत्ति | २३४ |
| शिव भोळा | १९६ |
| शुद्ध ज्याचा भाव | ३४४ |
| शुद्ध बीजापोटीं | ५६३ |
| शेवटीची विनवणी | ६६१ |
| शेषप्रति बोले | ३४८ |
| **श्र** | |
| श्रवणे कीर्तनें | ३८४ |
| श्री अनंता मधु | ३०४ |
| श्रीगुरु देवराया | ३७५ |
| श्रीगुरुसारिखा | ४४६ |
| श्रीसंतांचिया | ५४९ |

| अभंग | क्रमांक |
|---|---|
| **स** | |
| सकळ मंगळ | ४१४ |
| सकळ धर्मांचें | ४६३ |
| सकळिकांच्या पा | ५९५ |
| सगुण चरित्रे | ५०७ |
| संतकृपा झाली | ६३७ |
| संतचरणरज | ५६४ |
| संत जाती हरि | ३८० |
| संत तोचि जाणा | ३३७ |
| संत भार पंढरीत | ४९१ |
| संत भेटती आजी | ४९२ |
| संताचिया पायीं | ६५९ |
| संतांचे संगतीं | १६३ |
| संतांनी सरतां | ५६५ |
| सत्य तू सत्य | ५३२ |
| सत्य संकल्पाचा | ६०८ |
| सत्य ज्ञानानंत | ४५६ |
| सद्गुरुनायकें | ४८३ |
| सत्य गुरुराये | १८४ |
| सदा नाम घोष | ६२८ |
| सदा माझे डोळे | १४ |
| सदाशिवाचा | २४२ |
| समाधी हरीची | १६८ |
| सर्व सुख गोडी | १८२ |
| सर्व सुखाचिया | २७७ |
| सर्व सुखाची लहरी | २३५ |
| सर्व सुखें आजि | ५६६ |
| संसारतापे तापलों | ५२९ |
| संसारसिंधु हा | ३२४ |
| सहज मी आंधळा | ८१ |
| सहस्र दीपे दीप | २६ |
| साठविला हरि | ६१० |
| सांडी कल्पना | ३४२ |
| सात पांच तीन | १७८ |
| सातवा जो गर्भ | ३५१ |
| साधुबोध झाला | १६१ |
| सार सार सार | २१४ |
| सुख दुःख समान | ५८ |
| सुख या संतसमा | २९१ |
| सुखसागर आपण | ३४० |
| सुखसागरी | ३३५ |
| सुखाचे हें सुख | ४७८ |
| सुखालागीं जरी | ४८० |
| सुखे सेऊं ब्रह्मानंदा | ६० |
| सुंदर तें ध्यान | १२ |
| सुंदर माझं जाते गे | ८६ |
| सुंदर मुख साजिरें | २४८ |
| सुदिन सुवेळ | २४७ |
| सुवेळ सुदिन | २४६ |
| सेंदरीं हेंदरीं | २८३ |
| सेवितों हा रस | ६०३ |
| सोनयाचा दिवस | ४३८ |
| स्मरतां निवृत्ति | ३८६ |
| स्वयें सुखाचे | १३ |
| स्वर्ग ज्याची | १९ |
| स्वर्गीचे अमर | ५७८ |
| **ह** | |
| हनुमंत महाबळी | २५ |
| हरि उच्चारणी | १६ |
| हरिगुण गावत | ६५ |
| हरि तुझी कांति | १२ |
| हरि तैसे हरिचे | ३१ |
| हरिपाठ कीर्ति | १७२ |
| हरिबिन रहिया | १४५ |
| हरि बुद्धि जपे | १७१ |
| हरि बोलो भाई | ६५१ |
| हरिरता चपळा | १४२ |
| हरिवंश पुराण | १७३ |
| हरिसे कोई नहीं | ६४७ |
| हरिहर सांडूनि | १९८ |
| हरिहरां भेद | १९४ |
| हरि हरि तुम्ही | ५९४ |
| हरीने माझें | १२८ |
| हाकेसारिसी उडी | ५८४ |
| हातीचे न संडावें | ३१७ |
| हेंचि थोर भक्ति | ६३२ |
| हेंचि दान देगा | ६६३ |
| हेंचि भवरोगाचें | ३०७ |
| हेंचि व्हावी माझी | ६७३ |
| हें नव्हे आजि | ४५४ |
| होईन भिकारी | ५३७ |
| होते बहुत दिवस | १४८ |
| होते वहुत दिवत | १३४ |
| होते तें चिंतित | २९८ |
| होय होय वारकरी | ५८८ |
| **क्ष** | |
| क्षणक्षणा हाचि | ६१२ |
| क्षीरसागरीचे | ३९३ |
| **ज्ञ** | |
| ज्ञानदेव चतुराक्षरी | २३८ |
| ज्ञानदेवें उपदेश | ५०८ |
| ज्ञानराज माझी | ४८२ |
| ज्ञानियांचा राजा | २४१ |

REFBK-0024719

REFBK-0024719